सत्यमेव जयते

शिक्षण विभाग
महाराष्ट्र शासन

भारतीय शिक्षण महामंडळाचे इतिवृत्त (१९६४-६६)

# शिक्षण
# व
# राष्ट्रीय विकास

शिफारशींचा सारांश

(अधिकृत अनुवाद)

-54792
379.15
MAH-S

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

(कार्यालयीन उपयोगाकरिता)

शिक्षण व राष्ट्रीय विकास

# भारतीय शिक्षण महामंडळाचे इतिवृत्त

# (१९६४–६६)

## शिफारशींचा सारांश

पुनर्मुद्रण सप्टेंबर १९८५

NIEPA DC
D03321

Sub. National Systems Unit,
National Institute of Educational
Planning and Administration
17-B, Sri Aurbindo Marg, New Delhi-110016
DOC. No.......3321.........
Date....10|9|86............

# अनुक्रमणिका

## भाग पहिला : शिक्षणाची पुनर्रचना


| प्रकरण | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | शिक्षण आणि राष्ट्रीय उद्दिष्टे | .. | १ |
| २ | शिक्षणक्रम : रचना व दर्जा | .. | ४ |
| ३ | शिक्षकांचा दर्जा | .. | ७ |
| ४ | शिक्षकांचे प्रशिक्षण | .. | ११ |
| ५ | विद्यार्थी-भरती आणि मनुष्यबळाचा प्रश्न | .. | १४ |
| ६ | शिक्षणाच्या समान संधीकडे वाटचाल | .. | १६ |


## भाग दुसरा : शिक्षणाच्या वेगवेगळ्या स्तरांवरील व शाखाविषयक समस्या


| | | | |
|---|---|---|---|
| ७ | शालेय शिक्षण : प्रसाराच्या समस्या | .. | १९ |
| ८ | शालेय शिक्षणातील अभ्यासक्रम | .. | २२ |
| ९ | शिक्षणपद्धती, मार्गदर्शन व मूल्यमापन | .. | २६ |
| १० | शालेय शिक्षण : शासन आणि पर्यवेक्षण | .. | ३२ |
| ११ | उच्चशिक्षण : उद्दिष्टे आणि सुधारणा | .. | ३७ |
| १२ | उच्चशिक्षण : विद्यार्थी प्रवेश व पाठ्यक्रम | .. | ४३ |
| १३ | विद्यापीठांचे व्यवस्थापन | .. | ४८ |
| १४ | कृषिशास्त्र शिक्षण | .. | ५२ |
| १५ | व्यावसायिक, तांत्रिक आणि स्थापत्यशास्त्राचे शिक्षण | .. | ५६ |
| १६ | शास्त्रशिक्षण आणि संशोधन | .. | ६० |
| १७ | प्रौढ शिक्षण | .. | ६४ |


## भाग तिसरा : कार्यान्विती


| | | | |
|---|---|---|---|
| १८ | शैक्षणिक प्रशासन | .. | ६७ |
| १९ | शिक्षणाची अर्थव्यवस्था | .. | ७४ |

# भाग पहिला

## प्रकरण पहिले

## शिक्षण आणि राष्ट्रीय उद्दिष्टचे

शिक्षणामध्ये अत्यंत तातडीने घडवून आणावयाची महत्त्वाची सुधारणा म्हणजे त्याचे स्वरूप पालटून टाकणे ही होय. शिक्षणाला जीवनाशी संबंधित करण्यासाठी जनतेच्या गरजा आणि आकांक्षांच्या संदर्भानुसार त्याला सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिवर्तनाचे शक्तिशाली साधन बनविण्यासाठी, आणि या परिवर्तनाच्या मार्गाने राष्ट्रीय उद्दिष्टचे गाठण्यासाठी कसोशीचे प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. यापुढे शिक्षणाचा विकास अशा पद्धतीने केला पाहिजे की त्यामुळे उत्पादन वाढावे, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता साधावी, लोकशाही सबळ व्हावी, आधुनिकीकरणाची प्रक्रिया अधिक वेगवान बनावी आणि सामाजिक, नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचा परिपोष व्हावा.

### शिक्षण व उत्पादनाची वाढ

शिक्षण व उत्पादन यांचा समन्वय घडण्याकरिता पुढील कार्यक्रम आवश्यक आहेत :—

१. विज्ञानाचे शिक्षण : विज्ञानाचे शिक्षण हा सर्व शालेय शिक्षणाचा अविभाज्य घटक झाला पाहिजे आणि महाविद्यालयीन पातळीवरील सर्व अभ्यासक्रमामध्ये त्याचा अंतर्भाव यथावकाश झाला पाहिजे.

२. श्रमानुभव (Work experience) : शिक्षणाच्या सर्व स्तरांवर, श्रमानुभवाचा समावेश अभ्याक्रमामध्ये झाला पाहिजे. श्रमानुभवाचा उपयोग तंत्रज्ञान वाढविण्यासाठी, औद्योगीकरणासाठी आणि विज्ञानाचा विनियोग अन्नधान्याचे व इतर सर्व आवश्यक वस्तुंचे उत्पादन वाढविण्यासाठी तत्परतेने केला पाहिजे.

३. माध्यमिक शिक्षण व्यवसायाभिमुख करण्याचे कार्य अधिक गतीने व मोठ्या प्रमाणात झाले पाहिजे. व महाविद्यालयीन शिक्षणामध्ये कृषिविद्या व तंत्रविद्या यांच्या अभ्यासक्रमावर अधिक भर दिला पाहिजे.

### सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता

सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता साधणे हे शिक्षणव्यवस्थेचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय भावना व एकता यांचे संगोपन करण्यासाठी पुढील पावले आता उचलली पाहिजेत :—

१. सम्मीलित शाळा : सर्व थरातील विद्यार्थ्यांना समानतेने शिक्षण देणाऱ्या शाळा काढून सार्वजनिक शिक्षणव्यवस्थेचा स्वीकार करणे व तिची अंमलबजावणी येत्या २० वर्षांच्या काळात टप्प्याटप्प्याने पूर्ण करणे.

२. सामाजिक व राष्ट्रीय सेवा : सामाजिक व राष्ट्रीय सेवेचा कार्यक्रम सर्व शैक्षणिक स्तरांवरील सर्व विद्यार्थ्यांसाठी सक्तीचा करण्यात यावा. शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमाच्या जोडीलाच तो राबविण्यात यावा. प्रत्येक शैक्षणिक संस्थेने स्वतःचे असे सामुदायिक जीवन घडवावे आणि संस्थेतील, तिच्या वसतिगृहातील आणि क्रीडांगणाची सुव्यवस्था ठेवण्याची शक्य तितकी कामे विद्यार्थ्यांकडूनच करवून घ्यावीत.

३. समाजविकासाच्या व राष्ट्रीय पुनर्रचनेच्या कार्यात भाग घेणे ही गोष्ट प्राथमिक पातळीपासून तो पदवीपूर्व पातळीपर्यन्तच्या शिक्षणाची अविभाज्य घटक मानावी.

४. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यन्त एन. सी. सी. सध्याप्रमाणे चालू राहावे. हे प्रशिक्षण पदवीपूर्व पातळीवर वर्षातून एकसंघपणे सतत ६० दिवस देता येण्याच्या शक्यतेचा विचार संबंधित अधिकारीवर्गाने करावा दरम्यानच्या काळात समाजसेवेचे पर्यायी प्रकार निर्माण्यात यावेत आणि ते जेव्हा कार्यवाहीत येऊ लागतील तेव्हा एन्. सी. सी. चा उपक्रम ऐच्छिक ठरविण्यात यावा.

५. भाषिक धोरण : शिक्षणाच्या क्षेत्रात सुयोग्य भाषिक धोरण अवलंबिल्यास सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेच्या विकासाला विशेष सहाय्य होईल.

६. शालेय आणि महाविद्यालयीन पातळीवर शिक्षणाचे माध्यम बनविण्याचा अग्रहक्क मातृभाषेलाच दिला पाहिजे. शिवाय, शालेय आणि उच्च शिक्षणाचे माध्यम सामान्यतः एकच असले पाहिजे. म्हणून उच्च शिक्षणासाठी प्रांतीय भाषांचाच वापर माध्यमाकरिता व्हावा.

७. प्रत्येक विद्यापीठात अगर विद्यापीठांच्या समूहामध्ये या शिफारशीची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने विद्यापीठ अनुदान मंडळाने व विद्यापीठांनी योग्य कार्यक्रम आखावा. माध्यमाचा हा बदल येत्या दहा वर्षांत पूर्णपणे अमलात यावा.

८. प्रांतीय भाषामध्ये पाठ्यपुस्तके, साहित्य व ग्रंथ तयार करण्यासाठी जोरदारपणे कार्य झाले पाहिजे. त्यांत तंत्रज्ञान आणि विज्ञान या शाखांकडे विशेष लक्ष दिले गेले पाहिजे. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या सहाय्याने ही जबाबदारी विद्यापीठांनी उचलली पाहिजे.

९. अखिल भारतीय संस्थांमध्ये इंग्रजीचे माध्यम चालू राहावे. तथापि, योग्य कालांतराने आणि खबरदारीने हिंदीचा स्वीकार करण्याचा विचार व्हावा.

१०. प्रांतीय भाषांना शासकीय व्यवहारात शक्य तितक्या लवकर आणावे म्हणजे त्यांच्या माध्यमातून अध्ययन करणारांना उच्च पदावर नेमण्यामध्ये बाध येणार नाही.

११. इंग्रजीचे अध्यापन व अध्ययन शालेय पातळीपासून सुरू व्हावे. आंतरराष्ट्रीय दळणवळणाला उपयुक्त असलेल्या इतर भाषांच्या अध्ययनालाही उत्तेजन मिळावे. रशियन भाषेच्या अध्ययनाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

१२. शालेय आणि विद्यापीठांच्या पातळीवरील थोडया संस्थांमध्ये जगातील महत्त्वाच्या भाषांपैकी काही भाषा शिक्षणाचे माध्यम म्हणून वापरणे उचित ठरेल.

१३. बौद्धिक देवघेवीकरिता आणि विद्याव्यासंगाकरिता उच्च शिक्षणामध्ये इंग्रजी भाषेचा उपयोग 'संयोजक—भाषा' म्हणून होईल. परंतु, आपल्या बहुसंख्य जनतेकरिता ती 'संयोजक—भाषा' ठरू शकणार नाही हे देखील स्पष्ट आहे. हे स्थान हिंदीलाच यथावकाश दिले पाहिजे. ज्याअर्थी हिंदी ही भारतीय गणराज्याची अधिकृत भाषा आहे व जनतेकरिता 'संयोजक—भाषा' आहे त्याअर्थी बिगरहिंदी प्रदेशातही तिचा प्रसार करण्यासाठी सर्व प्रकारची उपाययोजना करण्यात यावी.

१४. आंतर-प्रांतीय सम्पर्क व संवहनासाठी हिंदीखेरीज इतर अनेक आधुनिक भारतीय भाषांचा उपयोग केला पाहिजे. प्रत्येक भाषिक प्रांतामध्ये इतर प्रांतांच्या भाषा अवगत असणारे, त्या भाषांच्या साहित्याशी परिचित असलेले आणि त्यात अधिक भर घालू शकणारे थोडेबहुत लोक असलेच पाहिजेत. याकरिता शाळा व महाविद्यालयामध्ये निरनिराळया आधुनिक भारतीय भाषा शिकवण्याची सोय केली पाहिजे. याशिवाय, प्रत्येक विद्यापीठाने काही आधुनिक भारतीय भाषा शिकविण्यासाठी उत्तम दर्जाचे अध्ययन विभाग स्थापन केले पाहिजेत. बी. ए. व एम्. ए. परीक्षांकरिता दोन आधुनिक भारतीय भाषा घेण्याची सोय असावी.

१५. राष्ट्रीयत्वाच्या जाणिवेचे संवर्धन : राष्ट्रीयत्वाच्या जाणिवेचे संवर्धन करणे हे शालेय शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट असले पाहिजे. भारतीय संस्कृतीचे आकलन, आपल्या सांस्कृतिक परंपरांचे पुन:परीक्षण आणि ज्याकडे आपण आशेने पाहात आहोत त्या भविष्यकालासंबंधी दुर्दमनीय निष्ठेची निर्मिती, या मार्गांचा अवलंब करून हे उद्दिष्ट गाठता येईल.

भारतीय संस्कृतीचे आकलन होण्याकरिता पुढील गोष्टींच्या अध्यापनाची चांगली व्यवस्था केली पाहिजे. भारतीय भाषा व त्यांच्यातील साहित्य, भारतीय, धर्म व तत्त्वज्ञान आणि भारताचा इतिहास, त्याचबरोबर विद्यार्थ्यांचा भारतीय स्थापत्यकला, शिल्पकला, चित्रकला, संगीत, नृत्य व नाटच यांच्याशी परिचय करून दिला पाहिजे. त्याशिवाय, भारताच्या निरनिराळ्या विभागांचे वैशिष्टच समजून घेऊन त्यांच्याविषयी गुणग्राहकतेची वृत्ती अधिक वाढावी याकरिता त्यांचा अभ्यास पाठचक्रमामध्ये घालणे, त्यातील शिक्षकांना अदलाबदल करण्याची संधी देणे, शिक्षणसंस्थामध्ये बंधुत्वाचे संबंध निर्माण करणे आणि प्रांतिक व भाषिक भेदभावाचा अडसर मोडून काढण्याकरिता आंतरप्रांतीय भूमिकेवरून सुटीतील शिबिरे व 'वासंतिक शाला' भरविणे अत्यंत आवश्यक आहे.

भारताचा भविष्यकाल उज्वल होणार आहे अशी श्रद्धा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी याकरिता त्यांना भारतीय राज्यघटनेची तत्त्वे, तिच्या प्रस्तावनेमध्ये विशद केलेली महान जीवनमूल्ये, लोकशाही समाजवादाच्या पायावर आपल्याला उभारावयाची असलेली समाजरचना, राष्ट्रीय विकासाकरिता घडविण्यात येणाऱ्या पंचवार्षिक योजना—या सर्वांची पूर्ण जाणीव त्यांना नागरिकत्वाच्या अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग या दृष्टीने करून देण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

१६. राष्ट्रीयत्वाची भावना आणि आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन यामध्ये कोणताही परस्पर विरोध नाही.

### शिक्षण आणि लोकशाही

लोकशाही दृढ होण्याकरिता पुढील कार्यक्रम योजिले पाहिजेत :—

१. राज्यघटनेच्या ४५ व्या कलमानुसार सर्व मुलामुलींना वयाच्या १४ व्या वर्षापर्यन्त चांगल्या दर्जाचे सक्तीचे व विनामूल्य शिक्षण दिले पाहिजे. त्याबरोबरच प्रौढ शिक्षणाचे कार्यक्रम केवळ निरक्षरतेचे निर्मूलन करण्याचे ध्येय साधून थांबवू नयेत. सर्व नागरिकांची औद्योगिक क्षमता, सांस्कृतिक पातळी व नागरिकत्वाची पातळी ते सातत्याने वाढवतील असे पाहावे.

२. समाजाच्या सर्व थरांमध्ये कार्यक्षम नेतृत्व तयार करण्यासाठी माध्यमिक व उच्च शिक्षणाचा विस्तार केला पाहिजे आणि बौद्धिक योग्यता व विकसनशीलता या निकषावर जे विद्यार्थी या शिक्षणासाठी पात्र ठरतील त्यांना आर्थिक दर्जा, जात, धर्म, लिंग, राहाण्याचे ठिकाण अशा गोष्टींची आडकाठी न येऊ देता शिक्षणाची समान संधी दिली पाहिजे.

३. शालेय अभ्यासक्रमाच्या सहाय्याने पुढील लोकशाही जीवनमूल्ये विद्यार्थ्यांच्या मनात रुजविली पाहिजेत शास्त्रीय मनोवृत्ती व दृष्टिकोन, सहिष्णुता, लोकहित आणि लोकसेवा, संयम व शिस्त, स्वावलंबन, उपक्रमशीलता आणि कामकाजाविषयी दृढनिश्चयी वृत्ती.

### शिक्षण आणि आधुनिकीकरण

१. कोणत्याही आधुनिक समाजामध्ये ज्ञानाची वाढ अत्यंत वेगाने होत असते आणि समाजपरिवर्तनही झपाट्याने होते. यासाठी शिक्षणपद्धतीमध्ये क्रांतिकारक बदल घडणे आवश्यक ठरते. शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ ज्ञान-संक्रमण आहे किंवा परिपूर्ण व्यक्ती तयार करणे आहे असे न मानता शिक्षण हे जिज्ञासा जागृत करण्याचे, योग्य प्रकारची अभिरुची, वृत्ती आणि मूल्यस्वीकृती वाढविण्याचे, आणि स्वतंत्रपणे अभ्यास करणे, विचार करणे आणि निर्णय देणे अशा मानसिक कौशल्यवृद्धीचे साधन मानले पाहिजे. या दृष्टिकोनाच्या अनुरोधाने अध्यापनपद्धती व शिक्षकप्रशिक्षणाची पद्धती यात आमूलाग्र परिवर्तन घडविणे क्रमप्राप्त आहे.

२. ज्या समाजाला आधुनिक व्हावयाचे आहे त्याने स्वतःला सुशिक्षित केले पाहिजे. सर्वसामान्य नागरिकांच्या शिक्षणाची पातळी वाढवीत असतानाच आवश्यक गुणवत्ता असलेला बुद्धिप्रधान वर्ग पुरेशा संख्येने निर्माण केला पाहिजे, त्याचे घटक समाजाच्या सर्व थरातून निवडले जातील अशी काळजी घेतली पाहिजे आणि त्याच्या आकांक्षा व निष्ठा भारताच्या भूमीशी निगडित असल्या पाहिजेत.

## सामाजिक, नैतिक व आध्यात्मिक मूल्ये

१. सामाजिक, नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचा विकास करण्यावर शिक्षणाने भर दिला पाहिजे. यासाठी पुढील गोष्टी करणे आवश्यक आहे :—

(अ) विद्यापीठ अनुदान मंडळ आणि 'धार्मिक व नैतिक शिक्षण समिती' यांच्या अहवालामध्ये दर्शविलेल्या मार्गाने सामाजिक, नैतिक व आध्यामिक शिक्षण देण्याची व्यवस्था केंद्रीय व राज्य सरकारांनी स्वतःच्या अधिकाराखाली असलेल्या आणि स्थानिक प्रशासनाखाली असलेल्या संस्थांमध्येही करावी.

(ब) खाजगी संस्थांनीदेखील या व्यवस्थेचे अनुकरण करावे.

(क) सर्वसामान्य शालेय कार्यक्रमात तर या शिक्षणाचा समावेश व्हावाच ; परंतु दररोजच्या वेळापत्रकातील काही तास या शिक्षणाकरिता खास राखून ठेवावेत. त्यासाठी वेगळे शिक्षक न नेमता सर्व शिक्षकांवर त्यांची जबाबदारी टाकावी आणि होता होईल तो वेगवेगळया जमातींच्या शिक्षकांवर हे काम सोपवावे. या कामाकरिता शिक्षकांना तयार करणे हे शिक्षक-प्रशिक्षणसंस्थांचे एक प्रधान उद्दिष्ट मानले गेले पाहिजे.

(ड) विद्यापीठांमध्ये असणाऱ्या तौलनिक धर्मशास्त्र विभागांनी ही मूल्ये विवेकपूर्णतेने व परिणामकारक रीतीने कशी शिकविता येतील याच्या पद्धती शोधून काढाव्यात आणि विद्यार्थी व शिक्षक यांना उपयोगी पडेल असे वाङमय तयार करावे.

२. आपल्यासारख्या विविध धर्मीय लोकशाहीमध्ये सर्व नागरिकांना एकमेकांविषयी सहानुभूती वाटावी आणि त्यांनी मैत्रीने एकत्र रहावे याकरिता सर्व धर्मांचा सहिष्णुतापूर्वक अभ्यास करण्याला उत्तेजन दिले पाहिजे. प्रत्येक प्रमुख धर्माविषयी व्यवस्थितपणे निवडलेली माहिती देणारा अभ्यासक्रम नागरिकशास्त्राच्या अध्यापनात समाविष्ट करावा किंवा त्याला शालेय शिक्षणातील व प्रथम पदवीपर्यंतच्या शिक्षणातील सामान्य अभ्यासक्रमात स्थान द्यावे. जगातील महान धर्मांमध्ये असलेले साम्य त्यामध्ये प्रकर्षाने दर्शवावे आणि साधारणपणे तौलनिक मानता येतील अशा नैतिक व अध्यात्मिक मूल्यांच्या स्वीकृतीवर भर दिला जावा. या विषयाचा एकच पाठयक्रम सर्व देशभर असणे लाभदायी ठरेल. त्या दृष्टीने प्रत्येक धर्मातील तज्ज्ञ व सुपात्र व्यक्तींकडून देशभर वापरण्यासाठी पाठयपुस्तके राष्ट्रीय पातळीवर तयार करण्यात यावीत.

---

# प्रकरण दुसरे

## शिक्षणक्रम : रचना व दर्जा

७. (१) रचना आणि कालमर्यादा : कोणत्याही शिक्षणक्रमाचा कोणत्याही विवक्षित काळातील दर्जा पुढील चार आवश्यक घटकांवर अवलंबून असतो :—

(१) शैक्षणिक मनोऱ्याची (Pyramid) एकंदर रचना, म्हणजेच निरनिराळ्या स्तरांत किंवा अवस्थांमध्ये त्याची केलेली विभागणी व या विविध अवस्थांचे व स्तरांचे परस्परसंबंध, (२) विविध स्तर किंवा अवस्था मिळून होणारा कालखंड, (३) प्रत्येक स्तरामध्ये समाविष्ट होणाऱ्या घटकांचे, म्हणजे शिक्षक, पाठ्यक्रम, अध्यापन पद्धती, मूल्यमापन, शैक्षणिक साहित्य आणि इमारती यांच्या पुरवठ्याचे आणि गुणवत्तेचे प्रमाण, आणि (४) उपलब्ध सोयींचा उपयोग.

हे सर्व घटक एकमेकांशी संबंधित असले तरी सर्वांचे महत्त्व सारखे नाही. उदाहरणार्थ, शिक्षणक्रमाची रचना ही शिक्षण पद्धतीच्या सांगाड्याच्या स्वरूपाची असल्याने तिचे महत्त्व अगदी कमी मानले पाहिजे. शिक्षणाची कालमर्यादा किंवा एकूण कालखंड ही बाब त्यापेक्षा अधिक महत्त्वपूर्ण ठरते, तथापि जेव्हा उपलब्ध सोयींचा पूर्ण उपयोग करण्यात आलेला आहे व आता कालमर्यादा अधिक वाढ केल्याविना पुढे अधिक सुधारणा होणे शक्य नाही अशी परिस्थिती येऊन ठेपते तेव्हाच शिक्षणक्रमाच्या कालमर्यादेविषयी निर्णायक विचार पुन्हा करावा लागतो. शिक्षण पद्धतीतील विविध घटकांची गुणवत्ता ही गोष्ट सर्वात अधिक महत्त्वाची मानली पाहिजे. त्यात सुधारणा केली तर शिक्षणक्रमाच्या मूळ रचनेत फारसा फरक न करता किंवा त्याची कालमर्यादा न वाढविता खूप मोठ्या प्रमाणात शैक्षणिक गुणवत्ता उंचाविणे शक्य होईल.

(२) शालेय पातळीवरील ज्या गोष्टींवर ताबडतोब लक्ष केंद्रित करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत त्या मुख्यत्वेकरून दोन आहेत. शिक्षणातील घटकांची गुणवत्ता सुधारणे आणि उपलब्ध सोयी व साहित्याचा अधिक कसोशीने उपयोग करणे. कालमर्यादा ही बाब गौण आहे. मनःपूर्वक प्रयत्न करण्यात आले तर एका वर्षाच्या अभ्यासाची अधिक भर, कालमर्यादा न वाढविता, शालेय शिक्षणात टाकता येईल. त्याच्या जोडीलाच उच्च माध्यमिक शिक्षणाचा काल दोन वर्षांचा करणे जरूर आहे. त्याची सुरुवात पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या कालात टप्प्याटप्प्याने करून १९८५ च्या अखेर ही वाढ पूर्ण करता यावी.

(३) शिक्षणक्रमाची नवीन रचना पुढीलप्रमाणे असावी : (अ) १ ते ३ वर्षे मुदतीचे पूर्वप्राथमिक शिक्षण, (ब) ७ ते ८ वर्षांचे प्राथमिक शिक्षण : यात ४ किंवा ५ वर्षांचा निम्न प्राथमिक व ३ किंवा २ वर्षांचा उच्च प्राथमिक असे दोन उपविभाग, (क) ३ किंवा २ वर्षांची निम्न माध्यमिक अवस्था, (ड) दोन वर्षे सामान्य (General) शिक्षणासाठी उच्च माध्यमिक अवस्था किंवा १ ते ३ वर्षांची व्यावसायिक शिक्षणाची अवस्था, (ई) पहिल्या पदवीसाठीच्या तीन अगर जास्त वर्षांची उच्च शिक्षणाची अवस्था व त्यानंतर दुसऱ्या अगर संशोधनोत्तर पदवीसाठी निरनिराळ्या मुदतीचे उच्चस्तर शिक्षणासाठी पाठ्यक्रम.

(४) पहिल्या इयत्तेतील विद्यार्थ्यांचे प्रवेश वय पूर्ण सहा वर्षांपेक्षा कमी असता कामा नये.

(५) दहा वर्षांचे शाळेतील शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पहिली बहिःशाल सार्वत्रिक परीक्षा असावी. या परीक्षेचा सर्व अभ्यासक्रम "सामान्य शिक्षण" स्वरूपाचा ठेवून त्यात कोणत्याही विषयाचे विशेष अध्ययन अंतर्भूत करण्यात येऊ नये.

(६) सामान्य शिक्षण देणाऱ्या शाळांत सध्याची नवव्या इयत्तेपासून सुरू होणारी खास अभ्यासक्रमानुसार वर्ग उभारणी करण्याची पद्धती रद्द करावी. दहावी पूर्ण होईपर्यंत विशेष अभ्यासक्रमाची योजना ठेवण्याचा प्रयत्न केला जाऊ नये.

(७) माध्यमिक शाळांचे दोनच प्रकार ठेवावेत. दहा वर्षांचा अभ्यासक्रम शिकविणाऱ्या माध्यमिक शाळा आणि ११ किंवा १२ वर्षांचा अभ्यासक्रम शिकविणाऱ्या उच्च माध्यमिक शाळा.

(८) प्रत्येक माध्यमिक शाळेचे उच्च माध्यमिक शाळेत रूपांतर करण्याचे प्रयत्न सोडून द्यावेत. फक्त मोठ्या आणि कार्यक्षम माध्यमिक शाळांना (एकूण संख्येच्या सुमारे एक चतुर्थांश) उच्च माध्यमिक शाळांचा दर्जा देण्यात यावा. याच दृष्टिकोणातून सध्याच्या उच्च माध्यमिक शाळांच्या दर्जाची तपासणी करावी आणि आवश्यक वाटल्यास योग्य तो दर्जा नसणाऱ्या आजच्या उच्च माध्यमिक शाळांना साध्या माध्यमिक शाळांचा दर्जा द्यावा.

(९) अकरावीत सुरू होणारा एक नवीन उच्च माध्यमिक अभ्यासक्रम कार्यवाहीत आणावा. ११ वी व १२ वी या दोन इयत्तांत (आणि संक्रमण कालात फक्त ११ वी इयत्तेतच) विविध विषयांचा खास अभ्यास करण्याची सोय केली जावी. सध्या ज्या उच्च माध्यमिक शाळांत ९, १० व ११ या इयत्तांत मिळून विशेष अभ्यासक्रम संकलित स्वरूपात समाधानकारक रीतीने शिकविले जात असतील त्या शाळांत बारावी इयत्ता सुरू करीतोपर्यंत सध्याचीच व्यवस्था चालू राहावी.

८. (१) विद्यापीठपूर्व अभ्यासक्रमाचे हस्तांतर : विद्यापीठे व विद्यापीठांशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांतील विद्यापीठपूर्व अभ्यासवर्ग तेथून काढून ते १९७५–७६ पर्यंत माध्यमिक शाळांना जोडण्यात यावेत. १९८५–८६ सालाच्या अखेरीस हा अभ्यासक्रम वाढवून तो दोन वर्षांचा करण्यात यावा.

(२) विद्यापीठांतील व महाविद्यालयातील विद्यापीठ-पूर्व आणि इंटरमीजिएट अभ्यासक्रम तेथून काढून टाकून तो शाळांना जोडण्याची जबाबदारी विद्यापीठ अनुदान मंडळाकडे सोपवावी.

(३) राज्य सरकारच्या शिक्षणखात्याने याचवेळी निवडक शाळांत उच्च माध्यमिक शाळांतील वर्ग (एक अगर अधिक) सुरू करावेत. हे वर्ग स्वयंपूर्ण असावेत व त्यासाठी आवश्यक ते वार्षिक अनुदान सरकारने द्यावे.

(४) राज्यातील माध्यमिक शिक्षणासाठी नेमण्यात आलेल्या मंडळांची (बोर्डस्) पुनर्रचना करून त्यांच्यावर उच्च माध्यमिक शिक्षणांचीही जबाबदारी सोपविण्यात यावी.

(९) माध्यमिक अवस्थेचे-व्यवसायीकरण : "सामान्य शिक्षण" हा अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दोन इयत्तांतून व्यावसायिक अभ्यासक्रमाकडे जाता यावे. या संक्रमणाची पहिली पायरी सात (किंवा आठ) इयत्तांचे अखेरीस आणि दुसरी पायरी दहाव्या इयत्तेच्या अखेरीस यावी. निम्न व उच्च माध्यमिक स्तरावर विविध प्रकारचे व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्याची व्यवस्था केली जावी. या अभ्यास क्रमाची कालमर्यादा एक ते तीन वर्षांची असावी व त्या अभ्यासक्रमामुळे तरुण पिढीला नोकरीधंदा मिळविण्यासाठी आवश्यक ती तयारी करता यावी.

१०. (१) विद्यापीठ अवस्थेची पुनर्रचना : पहिल्या पदवीचा अभ्यासक्रम तीन वर्षापेक्षा कमी असू नये. दुसऱ्या पदवीसाठी दोन ते तीन वर्षांची कालमर्यादा असावी.

(२) काही विषयात काही विद्यापीठांनी अधिस्नातक (Master) पदवीपरीक्षांचे तीन वर्षांचे अभ्यासक्रम पदवीधरांसाठी सुरू करावेत.

(३) पहिल्या स्नातक पदवीसाठी देखील तीन वर्षे मुदतीचे विशेष (स्पेशल) अभ्यासक्रम कांही निवडक संस्थांत व काही निवडक विषयापुरते सुरू करावेत. या अभ्यासक्रमाची सुरुवात सध्याच्या तीन वर्षांच्या पदवीच्या अभ्यासक्रमाचे पहिले वर्ष संपल्यानंतर व्हावी.

(४) सध्या चालू असलेले अभ्यासक्रम व जास्त मुदतीचे नवीन अभ्यासक्रम यांची योग्य रीतीने जोडणी करण्याच्या योजना आखण्यात याव्यात.

(५) जास्त मुदतीचे अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उत्तेजनासाठी शिष्यवृत्त्यांची योजना केली जावी.

(६) उत्तर प्रदेश राज्यातील पदवीपरीक्षेच्या अभ्यासक्रमांची कालमर्यादा वाढविण्यास आरंभ करताना काही निवडक विद्यापीठांत काही खास विषयांचे तीन वर्षे मुदतीचे अभ्यासक्रम चालू करावेत. १५ ते २० वर्षांच्या कालावधीत इतर महाविद्यालयात पहिल्या पदवीचे सारे अभ्यासक्रम तीन वर्षांचे करण्यात यावेत.

११. (१) उपलब्ध सोयींचा उपयोग : शैक्षणिक पुनर्रचनेचा कार्यक्रम तयार करताना, उपलब्ध असलेल्या सर्व सोयींचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्याच्या उपक्रमांवर विशेष भर दिला जावा.

(२) शिक्षणाच्या दिवसांची वर्षातील संख्या वाढविली जावी. शाळामध्ये सुमारे ३९ आठवडे आणि महाविद्यालये व पूर्वप्राथमिक शाळा यात वर्षात ३६ आठवडे शिक्षण दिले जावे.

(३) शैक्षणिक अभ्यासक्रमाचे दिवस वाढविण्यासाठी सार्वत्रिक उपयुक्ततेचे नवे वार्षिक वेळापत्रक शिक्षण मंत्रालय व विद्यापीठ अनुदान मंडळ यांनी राज्य सरकारे व विद्यापीठे यांच्याशी वाटाघाटी करून तयार करावे. वर्षातील रविवार खेरीज इतर सुट्यांची संख्या दहा दिवसांवर आणून ठेवावी. परीक्षा आणि इतर कारणांसाठी शाळांचे एकवीसपेक्षा जास्त दिवस खर्ची पडू नयेत. महाविद्यालयांसाठी ही मुदत २७ दिवसांची असावी.

(४) अभ्याससत्रे, समाजसेवा शिबिरे, निर्मिती-कृतिसत्रे, साक्षरता प्रसार मोहीम, इत्यादी कामांसाठी मोठ्या सुट्यांचे दिवस पूर्णपणे उपयोगात आणावेत.

(५) शाळांतील रोजच्या कामाचा वेळ वाढविण्यात यावा. विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्रपणे अभ्यास करण्याला आवश्यक त्या सोयींची तरतूद करण्यात यावी.

(६) शैक्षणिक संस्थातील ग्रंथालये, प्रयोगशाळा, उद्योगशाळा, हस्तव्यवसाय-गृह अशा सर्व सोयींचा पुरेपूर उपयोग केला जाईल अशासाठी योग्य ती योजना आखली जावी.

१२. (१) शिक्षणाचा गतीमान व वर्धिष्णु दर्जा : शिक्षणातील सर्व थरांचा दर्जा सातत्याने उंचावला जाण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले जावेत. शाळांतील पहिल्या दहा वर्षांतील शिक्षणाची गुणवत्ता वाढवावी म्हणजे त्या स्तरांतील आज चालू असलेली गळती (Wastage) कमीत कमी होऊ शकेल. आज उच्च माध्यमिक शाळेच्या शेवटच्या वर्षात विद्यार्थ्यांची शैक्षणिक उंची जेवढी होऊ शकते ती येत्या दहा वर्षात १० वी इयत्तेचे सामान्य शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आटोक्यात आली पाहिजे. विद्यापीठातील पदवी अभ्यासक्रमाची सखोलता वाढवून एका अधिक वर्षाच्या विषय ज्ञानाची त्यात भर घालावी आणि या पद्धतीने सर्व शिक्षणाचा दर्जा वाढविण्याचे प्रयत्न व्हावेत.

(२) शाळांच्या अभ्यासक्रमात व एकूण दर्जात सातत्याने प्रगती होते की नाही ते पाहण्यासाठी व देशाच्या निरनिराळ्या विभागातील दर्जांची तुलनात्मक रीतीने निश्चिती व्हावी यासाठी राज्य व राष्ट्रीय पातळीवर एक योग्य व कार्यक्षम यंत्रणा उभारावी लागेल. ही यंत्रणा प्राथमिक निम्न माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शैक्षणिक दर्जांची व्याख्या करणे, फेरपहाणी करणे व मूल्यमापन करणे हे कार्य राष्ट्रीय पातळीवरून आणि राज्य पातळीवरून हाताळेल.

(३) शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी शिक्षणक्रमातील विविध स्तरांच्या दरम्यान अधिक चांगल्या तऱ्हेचे संयोजन साधावे आणि ज्या एकलकोंडेपणाने शिक्षणसंस्था कार्य करीत असतात तो नाहीसा करावा. या दृष्टिकोनाचा स्वीकार करून. (अ) विद्यापीठे व महाविद्यालये यांनी अनेकविध उपाय योजून माध्यमिक शाळांची कर्तृत्वशक्ती वाढविण्यास साह्य केले पाहिजे आणि (ब) शाला-संकल (School Complexes) उभारण्यात आले पाहिजेत. शाला–संकलामध्ये माध्यमिक शाळा केंद्रबिंदू राहील व त्या शाळाच्या निकटवर्ती असणाऱ्या निम्न व वरिष्ठ प्राथमिक शाळांचा अंतर्भाव संकलात केला जाईल. प्रत्येक शाला–संकलातील सर्व शाळांनी आपली प्रगती करण्यासाठी व दर्जा वाढविण्यासाठी सहकारी गटपद्धतीने कार्य केले पाहिजे.

१३. अंशवेळ शिक्षण : शिक्षणाच्या प्रत्येक अवस्थेत व प्रत्येक शाखेत अंश वेळ व स्वाधीन वेळ शिक्षणाच्या सोयी मोठया प्रमाणावर वाढवून त्यांना पूर्ण वेळ शिक्षणाशी समान दर्जा देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

१४. संज्ञांची निश्चिती : शिक्षण पद्धतीतील निरनिराळ्या अवस्था किंवा स्तर आणि उपस्तर यांचा निदेश करण्यासाठी वापरावयाच्या संज्ञा एकरूपतेने निश्चित करण्यासाठी भारत सरकारने राज्य सरकारशी विचारविनिमय करावा आणि निर्णय घ्यावा.

## प्रकरण तिसरे

# शिक्षकांचा दर्जा

१. शिक्षक-पेशाचा आर्थिक, सामाजिक व व्यावसायिक दर्जा उंचावणे आणि बुद्धिमान तरुण व्यक्तींना शिक्षणाच्या क्षेत्राकडे वळण्यास प्रवृत्त करणे यासाठी अत्यंत नेटाने व सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

### पारिश्रमिक (जीवन वेतन)

२. शिक्षकांना—विशेषत: शाळेच्या पातळीवरील शिक्षकांना—मिळणाऱ्या पारिश्रमिकात भरीव वाढ करणे ही अत्यंत निकडीची गरज आहे.

३. भारत सरकारने शाळेच्या पातळीवरील शिक्षकांची किमान वेतनमाने ठरवून द्यावीत आणि राज्यांना व केंद्रशासित प्रदेशांना त्यांच्या परिस्थितीला अनुकूल होईल अशा प्रकारे या वेतनमानांच्या समपातळीवरील किंवा त्याहून अधिक उंच पातळीवरील वेतनमाने स्वीकारण्याच्या कामी मदत करावी.

४. एकाच श्रेणीत परंतु वेगवेगळ्या व्यवस्थाखाली–उदाहरणार्थ : सरकारी, स्थानीय संस्थांत किंवा खाजगी संस्थांत काम करणाऱ्या शिक्षकांची वेतनमाने समान असावीत.

५. प्रत्येक राज्यात यापुढे सरकारी धोरण म्हणून समानतेचा सिद्धांत स्वीकारण्यात यावा. मात्र याची संपूर्ण अंमलबजावणी, आवश्यक असल्यास, पाच वर्षांच्या अवधीत करण्यात यावी.

६. शिक्षणमहामंडळाने खालील वेतनमाने सुचविली आहेत :—

| शिक्षक | पारिश्रमिक | रुपये |
|---|---|---|
| (१) ज्यांनी माध्यमिक शिक्षण पूर्ण केले आहे आणि दोन वर्षांचे व्यावसायिक प्रशिक्षण घेतले आहे असे शिक्षक. | प्रशिक्षित शिक्षकांचे किमानवेतन | १५० |
| | कमाल वेतन (हे वीस वर्षांच्या अवधीत मिळावे.) | २५० |
| | निवड श्रेणी (एकूण शिक्षकांपैकी सुमारे १५ टक्के लोकांसाठी) | २५० ते ३०० |
| (२) ज्यांनी एक वर्षाचे व्यावसायिक प्रशिक्षण घेतले आहे असे पदवीधर. | प्रशिक्षित पदवीधरांचे किमान वेतन | २२० |
| | कमाल वेतन (हे वीस वर्षांच्या अवधीत मिळावे). | ४०० |
| | निव्वळ श्रेणी (एकूण शिक्षकांपैकी सुमारे १५ टक्के लोकांसाठी). | ४०० ते ५०० |
| (३) माध्यमिक विद्यालयांतून काम करणारे व पदव्युत्तर शिक्षण घेतलेले शिक्षक. | | ३०० ते ६०० |
| (४) माध्यमिक विद्यालयांचे मुख्याध्यापक. | हे वेतन शाळेचा आकार व गुणवत्ता, तसेच मुख्याध्यापकांची अर्हता यावर अवलंबून राहील. खाली दिल्याप्रमाणे संबद्ध महाविद्यालयातील कोणत्या तरी प्रकारचे वेतनमान मुख्याध्यापकांना देण्यात यावे. | |
| (५) संबद्ध (ॲफीलिएटेड) महाविद्यालयातील शिक्षक (सरकारी मान्यता मिळालेल्या महाविद्यालयातील अध्यापक). | अधिव्याख्याता (लेक्चरर) | |
| | कनिष्ठ वेतनमान—रु. ३००—२५—६०० | |
| | वरिष्ठ वेतनमान—रु. ४००—३०—६४०—४०—८०० | |
| | वरिष्ठ अधिव्याख्याता/प्रपाठक (रीडर)— | रु. ७००—४०—१,१०० |
| | प्राचार्य—१ | रु. ७००—४०—१,१०० |
| | २ | रु. ८५०—५०—१,२५० |
| | ३ | रु. १,०००—५०—१,५०० |
| (६) विश्वविद्यालयांच्या विभागातील शिक्षक (सरकारी मान्यता मिळालेल्या विभागातील अध्यापक). | अधिव्याख्याता | ४००—४०—८००—५०—९५० |
| | प्रपाठक | रु. ७००—५०—१,२५० |
| | प्राध्यापक (प्रोफेसर) | रु. १,१००—५०—१,३००—६०—१,६०० |

७. विद्यापीठ पातळीवरील सुधारलेली वेतनमाने अंमलात आणणे सुकर व्हावे यासाठी अतिरिक्त खर्चामध्ये केंद्रीय सरकार व राज्य सरकार यांनी क्रमशः ८० टक्के व २० टक्के प्रमाणात आपापला वाटा उचलावा, तसेच खाजगी महाविद्यालयांच्या बाबतीत केंद्रीय मदत १०० टक्के मिळावी.

८. या वेतनमानांचा संबंध शिक्षकांच्या अर्हतेशी आणि त्यांच्या नियुक्तीच्या निवड-पद्धतीत सुधारणा करण्याशी जोडण्यात यावा. हे कार्य विद्यापीठांचा प्रतिरूप (Model) कायदा तयार करण्याकरिता नेमण्यात आलेल्या समितीच्या (कमिटी ऑन मॉडेल अॅक्ट फॉर युनिव्हर्सिटीज) शिफारशीनुसार करण्यात यावे.

९. खाजगी संस्थातर्फे चालविण्यात येणाऱ्या महाविद्यालयांच्या बाबतीत या सूचना तारतम्यपूर्वक अंमलात आणल्या जाव्यात. चांगल्या संस्थांना आपले शिक्षक निवडण्याच्या बाबतीत अधिक स्वातंत्र्य देण्यात यावे आणि जेथील व्यवस्था समाधानकारक नसेल तेथे या नियमांची अंमलबजावणी कडकपणे करण्यात यावी.

१०. शालेय शिक्षकांसाठी तीन मुख्य वेतनमाने स्वीकारण्यात यावीत :—(१) ज्यांनी माध्यमिक शिक्षण पूर्ण केले आहे व प्रशिक्षण घेतले आहे अशा शिक्षकांसाठी ; (२) प्रशिक्षित पदवीधरांसाठी : (३) पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या शिक्षकांसाठी.

११. ज्याने माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेले नाही व दोन वर्षांचे व्यवसायिक प्रशिक्षण घेतले नाही असा कोणीही शिक्षक प्राथमिक शाळेत असता कामा नये. ज्या उच्च प्राथमिक व निम्न प्राथमिक शाळातील विद्यार्थ्यांची संख्या २०० हून अधिक असेल त्यांचे मुख्याध्यापक प्रशिक्षित पदवीधर असले पाहिजेत. त्यांचे पगार माध्यमिक विद्यालयातील प्रशिक्षित पदवीधरांच्या पगाराइतके असावेत.

१२. कनिष्ठ वेतनमानाच्या जागा निर्माण करणे आणि सुपात्र शिक्षक मिळत असता तेथे कमी योग्यतेच्या शिक्षकांच्या नेमणुकी करणे अथवा या जागांवर सुपात्र शिक्षकांची भरती करून त्यांना कमी वेतनमान देणे या गोष्टी टाळल्या जाव्यात.

१३. माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांची वेतनमाने एका बाजूस महाविद्यालयीन व विद्यापीठातील अध्यापकांच्या वेतनमानाशी आणि दुसऱ्या बाजूने प्राथमिक शाळातील शिक्षकांच्या वेतनमानाशी निगडित असावीत.

१४. निम्न व उच्च माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापकांच्या वेतनमानांचा, संबद्ध महाविद्यालयातीलच नव्हे तर विद्यापीठातीलही अध्यापकांच्या वेतनमानाशी निश्चित अनुबंध असला पाहिजे. विद्यालयातील छात्रसंख्या, कार्य व गुणवत्ता ध्यानात घेऊन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील एकूण शिक्षकांशी पदव्युत्तर अर्हताप्राप्त शिक्षकांचे प्रमाण शेकडा १० ते ३० टक्के असावे जे शिक्षक पहिल्या अथवा दुसऱ्या वर्गात बी. ए., बी. एससी. किंवा एम. ए., एम.एससी उत्तीर्ण झाले असतील त्यांना आगाऊ वेतनवृद्धी देण्यात यावी. माध्यमिक विद्यालयातील सर्व शिक्षकांना व्यवसायिक प्रशिक्षण अनिवार्य असावे.

## विद्यालयीन शिक्षकांच्या अर्हता (पात्रता) व नेमणुकी

१५. राज्य शालेय शिक्षण मंडळे आणि शिक्षण विभाग यातील शिक्षकाच्या अर्हता ठरवून द्याव्यात आणि केवळ सरकारी शाळांसाठी नव्हे तर स्थानीय संस्था व खाजगी मंडळचा याच्यातर्फे चालविल्या जाणाऱ्या शाळांसाठीही शिक्षकांची निवड करण्याची योग्य कार्यपद्धती ठरवून द्यावी. स्थानिक संस्थाच्या शाळा मुख्यतः जिल्हा शिक्षण मंडळाच्या अखत्यारीत येतील. सरकारी मान्यता मिळालेल्या व राज्य शिक्षण विभागाकडून अनुदान मिळणाऱ्या प्रत्येक खाजगी शाळेच्या कार्यकारी मंडळावर शिक्षण विभागाचे प्रतिनिधी असले पाहिजेत. शिक्षण विभागाने सरकारी संस्थातील शिक्षकाप्रमाणे खाजगी शाळातील शिक्षकांसाठीही अर्हतेचे नियम ठरवून द्यावेत. भरण्यात येणाऱ्या प्रत्येक जागेची योग्य ती जाहीरात केली जावी आणि योग्य प्रकारे नेमण्यात आलेल्या निवड समितीकडून उमेदवारांच्या मुलाखतीही घेतल्या जाव्यात, घालून दिलेल्या नियमांचे उल्लंघन करून अथवा वरील नियंत्रणाच्या बाहेर जाऊन ज्या शिक्षकाची नेमणूक करण्यात येईल त्यांच्या पगारासाठी सहाय्यक अनुदान देण्यात येऊ नये.

## बढतीच्या सोयी

१६. शालेय पातळी : प्राथमिक शाळांतील अर्हता-प्राप्त व प्रशिक्षित शिक्षकांना मुख्याध्यापकांच्या व शाळा-निरीक्षकांच्या जागेवर बढती देण्याचा विचार करण्यात यावा.

१७. माध्यमिक विद्यालयांतील ज्या प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांनी असामान्य कामगिरी करून दाखविली असेल त्यांना पदव्युत्तर अर्हता-प्राप्त कर्मचाऱ्याइतका पगार मिळणाऱ्या जागांवर बढती मिळण्यास योग्य समजण्यात यावे.

१८. आवश्यक बुद्धी व योग्यता असणाऱ्या माध्यमिक शिक्षकांना महाविद्यालयीन व विद्यापीठातील शिक्षकांच्या जागेवर नेमता आले पाहिजे.

१९. असामान्य कामगिरी करणाऱ्या शिक्षकांना आगाऊ पगारवाढ देता आली पाहिजे.

२०. विद्यापीठ पातळीवर ज्या अधिव्याख्यात्याने अथवा प्रपाठकाने असामान्य कार्य करून दाखविले असेल आणि योग्य जागा उपलब्ध नसल्यामुळे ज्याला बढती देता येत नसेल त्याच्यासाठी उच्च श्रेणीतील तदर्थ हंगामी जागा निर्माण करण्यात यावी.

२१. ज्या विभागात पदव्युत्तर कार्य केले जाते तेथे प्राध्यापकीय पातळीवरील जागांची संख्या आवश्यकतेवर अवलंबून ठेवण्यात यावी. असामान्य योग्यतेच्या व्यक्तींना रु. १६००–१८०० च्या विशेष वेतनमानाहून अधिक पारिश्रमिक देण्याचे स्वातंत्र्य एखाद्या विद्यापीठाला असले पाहिजे. मात्र त्याने याबाबतीत विद्यापीठ अनुदान मंडळाचा सल्ला घ्यावा.

### जीवन परिव्ययाशी पगाराचा अनुबंध

२२. सर्व शिक्षकांच्या वेतनमानाची दर पांच वर्षांनी फेरतपासणी करण्यात यावी आणि शिक्षकांना देण्यात येणारा महागाई-भत्ता सरकारी नोकरांना मिळणाऱ्या महागाई भत्त्याशी जोडण्यात यावा.

### कल्याण सेवा योजना

२३. प्रत्येक राज्यात व केंद्रशासित प्रदेशात सर्व शालेय शिक्षकांसाठी कल्याण-सेवा योजनेचा एक सर्वमान्य कार्यक्रम संघटित करण्यात यावा. त्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा वाटा शिक्षक व राज्य सरकार या दोघांनी मिळून योग्य प्रमाणात उचलावा. या पैशाचा विनियोग कसा करावयाचा ते शिक्षक व सरकार यांच्या प्रतिनिधींच्या संयुक्त समित्यांनी ठरवावे.

### केंद्रीय मदतीची गरज

२४. शालेय शिक्षकांच्या पगारात सुधारणा करण्याच्या सूचनांची ताबडतोब अंमलबजावणी करण्यात यावी. या कामासाठी राज्य सरकारांना केंद्रीय सरकारकडून उदारपणे आर्थिक मदत दिली जावी.

### निवृत्तीविषयक लाभ

२५. शिक्षकांना निवृत्तीविषयक लाभही एकरुपता व समानता यांच्या सिद्धांतांनुसार उपलब्ध करून दिले जावेत.

२६. हंगामी स्वरूपाचा उपाय म्हणून तिहेरी लाभाची योजना सरकारी शाळांतील शिक्षक आणि विद्यापीठाचे व महाविद्यालयीन अध्यापक यांच्या बाबतीत अधिक व्यापक स्वरूपात अमलात आणली जावी.

२७. शाळा, महाविद्यालये व विश्वविद्यालये यांतील शिक्षकांचे सामान्य निवृत्तीवय ६० वर्षांचे ठरविण्यात यावे. ही मुदत ६५ वर्षांपर्यंत वाढविण्याची तरतूद असावी.

२८. भविष्य-निर्वाह-निधी (प्रॉव्हिडंट फंड) मध्ये पैसे गुंतविण्याची अधिक न्याय्य पद्धती शोधून काढण्यात यावी.

### काम आणि नोकरी यांच्या अटी

२९. शैक्षणीक संस्थातील कामाच्या अटी अशा असाव्यात की ज्यायोगे शिक्षकांना ज्यांच्या कार्यक्षमतेच्या सर्वोच्च पातळीवर काम करणे शक्य होईल.

३०. क्षमतापूर्वक काम करण्यासाठी आवश्यक असलेल्या किमान सोयी सर्व शैक्षणिक संस्थांना उपलब्ध करून देण्यात याव्यात. व्यावसायिक प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या योग्य सोयीही शिक्षकांना दिल्या जाव्यात.

३१. कामाचे तास ठरविताना केवळ प्रत्यक्ष वर्गातील शिकविण्याच्या कामाचाच विचार न करता शिक्षकाला करावे लागणारे इतर सर्व कामही विचारात घेतले जावे.

३२. प्रत्येक शिक्षकाला दर पांच वर्षांनी देशाच्या कोणत्याही भागात जाता येईल असा सवलतीचा रेल्वेपास मिळू शकेल अशी एक योजनाही तयार करण्यात यावी.

३३. सरकारी नोकरीत असलेल्या शिक्षकासाठी शिक्षकी पेशाला योग्य असे आचरणाचे व शिस्तीचे नवे नियम तयार करण्यात यावेत.

३४. खाजगी शाळांतून समानतेचा सिद्धांत अवलंबिण्यात यावा आणि तेथील शिक्षकांना सरकारी शाळांतील शिक्षकांना लागू असलेल्या नोकरीच्या अटी लागू करण्यात याव्यात.

३५. ग्रामीण भागातील शिक्षकांसाठी निवासाच्या सोयी वाढविण्याच्या दृष्टीने सर्व प्रकारे प्रयत्न केले जावेत. सर्व मोठ्या शहरामध्ये घरे बांधण्याचा व योग्य घरभाडे-भत्ता देण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात यावा ;

शिक्षकासाठी सहकारी घरबांधणी योजनांना प्रोत्साहन देण्यात यावे आणि घरे बांधण्यासाठी अनुकूल अटीवर कर्ज मिळविण्याची सोय करण्यात यावी.

३६. येत्या पंधरा वर्षांमध्ये विद्यापीठे व महाविद्यालये यांच्या बाबतीत पुढील लक्ष्य गाठण्यात यावे. विद्यापीठातील सुमारे ५० टक्के अध्यापकांना व संबद्ध महाविद्यालयातील सुमारे २० टक्के अध्यापकांना राहण्याची सोय उपलब्ध करून दिली जावी.

३७. ज्या मुलांना खास शिक्षण देणे जरूर असेल त्यांना ते शिक्षण देण्याची व्यवस्था संस्थेतर्फे करण्यात यावी आणि ते शिक्षण देणाऱ्या शिक्षकांना पुरेसे पारिश्रमिक दिले जावे.

३८. विद्यापीठ पातळीवर उच्च शिक्षणविषयक संशोधनामध्ये शिक्षकांना अंशकालिक (पार्टटाईम) सल्ला देणे किंवा जादा काम करणे यांसारख्या गोष्टींची परवानगी देण्यात यावी. या कामी मिळणारी रक्कम पगाराच्या पन्नास टक्क्यांहून अधिक नसेल तर ती संस्थेला परत भरणा करण्याची आवश्यकता असू नये.

३९. शिक्षकांना आपले नागरीकत्वाचे अधिकार बजावण्याचे स्वातंत्र्य असावे; आणि स्थानिक, जिल्ह्याच्या, राज्याच्या व राष्ट्रीय पातळीवरील संस्थांमध्ये पदाधिकारी बनण्याची मुभा असावी. निवडणुकीत भाग घेण्याच्या बाबतीत त्यांच्यावर कोणतेही कायदेशीर बंधन नसावे; परंतु जेव्हा ते भाग घेतील तेव्हा त्यांनी रजा घेतलेली असावी.

## शिक्षिका

४०. शिक्षणाच्या सर्व पातळ्यांवर व सर्व विभागांत शिक्षकांना नेमण्याच्या बाबतीत उत्तेजन दिले जावे. शिक्षिकांना अंशकालिक नोकऱ्या मोठ्या प्रमाणावर मिळण्याची संधी उपलब्ध करून देण्यात यावी.

४१. शिक्षिकांना राहण्यासाठी जागा, विशेषत: ग्रामीण भागात, उपलब्ध करून देण्यात याव्यात.

४२. केंद्रीय समाज कल्याण मंडळातर्फे प्रौढ स्त्रियांसाठी चालविण्यात येणाऱ्या संक्षिप्त अभ्यासक्रमांची व्याप्ती वाढविण्यात यावी.

४३. पत्रव्यवहाराद्वारे शिक्षण मिळण्याच्या अधिकाधिक सोयी शिक्षिकांना उपलब्ध करून देण्यात याव्यात.

४४. जेथे आवश्यकता असेल तेथे ग्रामीण भागात काम करणाऱ्या शिक्षिकांना खास भत्ता दिला जावा.

## आदिवासी भागातील शिक्षक

४५. आदिवासी भागातील शिक्षकांना खास भत्ते, त्यांच्या मुलांच्या शिक्षणास साह्य आणि राहण्याच्या सोई मिळतील अशी व्यवस्था करण्यात यावी. आदिवासी (ग्रामीण) भागात जाणाऱ्या शिक्षकांना विशेष प्रशिक्षण मिळण्याची व्यवस्था केली जावी.

## शिक्षकांच्या संघटना

४६. शिक्षकांच्या ज्या व्यावसायिक संघटना शिक्षक व्यवसाय व शिक्षणशास्त्र यात सुधारणा घडवून आणण्यासाठी झटत असतील त्यांना केंद्रीय व राज्य सरकारांनी मान्यता द्यावी आणि शालेय शिक्षण, शिक्षकांचे सामान्य व व्यावसायिक शिक्षण, त्यांचे पगार व कामाच्या अटी यांच्याशी संबंधित असलेल्या विषयांच्या बाबतीत त्यांचा सल्ला घेण्यात यावा.

४७. प्रत्येक राज्यात व केंद्रशासित प्रदेशात शिक्षकांचा पगार, कामाच्या व नोकरीच्या अटी आणि कल्याण-सेवा यांच्याशी संबंधीत असलेल्या सर्व विषयांच्या बाबतीत चर्चा करण्यासाठी संयुक्त शिक्षक परिषदा स्थापन करण्यात याव्यात.

## राष्ट्रीय पारितोषिके

४८. शिक्षण मंत्रालयाने पुढील सूचनांचा विचार करावा: (अ) राष्ट्रीय पारितोषिकांची संख्या वाढविणे, (आ) निवड समित्यांत भर घालणे, (इ) पारितोषिक मिळविणाऱ्यांना प्रथम श्रेणीच्या सरकारी अधिकाऱ्यांइतका प्रवासभत्ता देणे.

* * *

## प्रकरण चौथे

# शिक्षकांचे प्रशिक्षण

१. शिक्षकांची व्यावसायिक तयारी ही सर्वसामान्यपणे शिक्षणाच्या गुणात्मक सुधारणेच्या दृष्टीने अत्यंत निकडीची बाब असल्यामुळे शैक्षणिक नियोजनामध्ये तिला अत्यंत महत्त्वाचे स्थान देण्यात यावे; आणि राज्याच्या व केंद्रीय पातळीवर तिच्यासाठी पुरेशी आर्थिक व प्रशासनात्मक तरतूद करण्यात यावी.

### शिक्षक-प्रशिक्षणातील पृथक्‌पणा दूर करणे

२. शिक्षकांची व्यावसायिक तयारी परिणामकारक व्हावी यासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण हे एका बाजूने विद्यापीठांच्या शैक्षणिक जीवनाच्या आणि दुसऱ्या बाजूने शालेय जीवन व शैक्षणिक विकास यांच्या मुख्य प्रवाहाशी जोडण्यात आले पाहिजे.

३. विद्यापीठांच्या जीवनापासून सध्या असलेला शिक्षक-प्रशिक्षणाचा पृथक्‌पणा दूर करण्यासाठी खालील गोष्टी करण्यात याव्यात :—

(अ) अध्यापन-प्रशिक्षण व शिक्षणशास्त्र हे विषय वेगळे काढून शिक्षणशास्त्राला स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून मान्यता देण्यात यावी आणि बी.ए.,बी.एस्‌सी. व एम.ए.,एम्.एस्‌सी. च्या परिक्षांना तो एक ऐच्छिक विषय ठेवण्यात यावा.

(आ) शिक्षक-प्रशिक्षण व प्रशिक्षण विषयक अध्ययन आणि संशोधन यांचे कार्यक्रम विकसित करण्यासाठी विद्यापीठांतील इतर शाखांच्या सहकार्याने निवडक शिक्षणविभाग काढण्यात यावेत.

४. सध्याच्या शिक्षक-प्रशिक्षणाचा शालेय कार्यक्रमापासून पृथक्‌पणा दूर करण्यासाठी खालील गोष्टीं करण्यात याव्यात :—

(अ) विस्तारकार्य हे शिक्षक-प्रशिक्षण संस्थेचे एक अत्यावश्यक कार्य समजण्यात यावे. तसेच प्रत्येक पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक प्रशिक्षण संस्थेमध्ये तिचे अविभाज्य अंग म्हणून एक विस्तारसेवा विभाग स्थापन करण्यात यावा.

(आ) प्रशिक्षणाचा एकंदर कार्यक्रम व अभ्यासक्रम याविषयी चर्चा करून त्यांची योजना बनविण्यासाठी माजी विद्यार्थी व प्राध्यापक यांना एकत्र आणण्याच्या दृष्टीने परिणामकारक माजी-विद्यार्थी संघ स्थापन करण्यात यावेत.

(इ) निवडक शाळांच्या सक्रिय सहकार्याने अध्यापनाचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात यावी. या शाळांना ‘सहकारी शाळा’ म्हणून शिक्षण विभागाकडून मान्यता मिळावी आणि त्यांना साहित्य व परिनिरीक्षण यांसाठी विशेष अनुषंगिक अनुदान दिले जावे.

(ई) सहकारी शाळा आणि शिक्षक-प्रशिक्षण संस्था यांच्यातील अध्यापकांची अधूनमधून अदलाबदल करण्यात यावी.

५. शिक्षणाच्या वेगवेगळ्या थरांसाठी अथवा हस्तव्यवसाय, कला किंवा शारीरिक शिक्षण सारख्या विशेष क्षेत्रा-साठी शिक्षक तयार करणाऱ्या संस्थांमध्ये जो पृथक्‌पणा सध्या आढळत आहे तो दूर करण्यासाठी पुढील उपायांचा अवलंब करून नेटाचे प्रयत्न करण्यात यावेत :—

(अ) सर्व प्रकारचे शिक्षक-प्रशिक्षण विद्यापीठांच्या कक्षेत आणण्याच्या अंतिम उद्दिष्टाच्या दृष्टीने सर्व प्रशिक्षण संस्थांना महाविद्यालयाच्या पातळीवर नेण्यासाठी एक टप्प्याटप्प्यांचा कार्यक्रम अंमलात आणणे.

(आ) प्रत्येक राज्यात योजनाबद्ध पायावर बहुग्राही (Comprehensive) प्रशिक्षण-महाविद्यालये स्थापन करणे.

(इ) प्रत्येक राज्यात एक राज्य शिक्षक-प्रशिक्षण मंडळ स्थापन करणे. हे मंडळ सर्व थरांतील व सर्व क्षेत्रातील शिक्षक प्रशिक्षणाशी संबंधित कार्याबद्दल जबाबदार असावे.

### व्यावसायिक प्रशिक्षणात सुधारणा घडवून आणणे

६. शिक्षक-प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाची गुणवत्ता सुधारण्यासाठी खालील उपायांचा अवलंब करण्यात यावा :—

(अ) सुनियोजित विषय-नूतनीकरणाचे अथवा सघन अभ्यासक्रम हाती घेणे. या अभ्यासक्रमामुळे प्रशिक्षणाच्या मूलभूत कल्पना, उद्दिष्टे व अभिप्रेत अर्थ याची चांगली कल्पना शिक्षकांना यावी. हे अभ्यासक्रम विद्यापीठातील शिक्षण विभागांच्या सहकार्याने अंमलात आणले जावेत.

(आ) विद्यापीठामध्ये सामान्य व व्यावसायिक प्रशिक्षणाचे संकलित अभ्यासक्रम सुरू करावे.

(इ) व्यावसायिक प्रशिक्षणामध्ये चैतन्य आणावे आणि सुविकसित संशोधनाच्याद्वारे त्यांना भारतीय परि-स्थितीवर आधारित करावे.

(ई) स्वाध्याय व चर्चा यांना अधिक वाव देणाऱ्या अध्यापन-पद्धतीचा वापर करावा; तसेच मूल्यमापनाच्या नव्या पद्धती अंमलात आणाव्या. यामध्ये प्रत्यक्ष अध्यापनाव्यतिरिक्त प्रात्यक्षिक व सत्रात्मक कार्याच्या सातत्यपूर्ण, अंतर्गत मूल्यमापनाचा समावेश असावा.

(उ) प्रत्यक्ष अध्यापनात सुधारणा करून त्याला व्यापक कार्यक्रमाचे रूप द्यावे.

(ऊ) खास अभ्यासक्रम व कार्यक्रम विकसित करावे.

(ए) शिक्षणाच्या विकसनशील पद्धतीमध्ये शिक्षकांना त्यांच्या अनेकविध जबाबदाऱ्या पेलण्यास तयार करण्याची मूलभूत उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून सर्व पातळ्यांवरील शिक्षक-प्रशिक्षणाचे पाठ्यक्रम व कार्यक्रम तपासून सुधारावे.

(ऐ) प्रशिक्षण संस्थांची सुधारणा घडवून आणावी.

७. ज्या प्राथमिक शिक्षकांनी माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केलेली असेल त्यांच्यासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमाची मुदत दोन वर्षांची असावी. पदवीधर उमेदवारासाठी ही मुदत एक वर्षाची असावी. मात्र वर्षातील कामाचे दिवस वाढवून ते २३० करण्यात यावेत.

८. शिक्षक-प्रशिक्षणाच्या राज्य मंडळांनी शिक्षक-प्रशिक्षण कार्यक्रम व अभ्यासक्रम यांची पाहणी करावी आणि त्यात आवश्यक त्या सुधारणा कराव्यात.

९. मुख्याध्यापक, शिक्षक-प्रशिक्षक व शैक्षणिक प्रशासक यांना त्यांच्या त्यांच्या विशिष्ट कार्यक्षेत्रासंबंधी नवी माहिती देण्यासाठी नवे व्यावसायिक अभ्यासक्रम आखण्यात यावेत.

१०. शिक्षण विषयाचे पदव्युत्तर अभ्यासक्रम लवचिक असावेत. ज्यायोगे शिक्षणविषयाच्या विद्वत्तापूर्ण व शास्त्रीय अध्ययनाला उत्तेजन मिळेल आणि जेथे विशेष ज्ञान व अभिक्रमशिलता यांची गरज असते अशा शिक्षणाच्या विशिष्ट क्षेत्रासाठी लागणारे कार्यकर्ते तयार होतील अशा पद्धतीने या अभ्यासक्रमाची योजना आखण्यात यावी. हे अभ्यासक्रम अशा कामास खरोखरी योग्य असणाऱ्या व्यक्तीकडून चालविले जावेत.

**शिक्षक-प्रशिक्षण संस्था सुधारणे**

११. माध्यमिक प्रशिक्षण महाविद्यालयातील प्राध्यापक कोणतातरी एक विद्याविषय व शिक्षणविषय घेऊन दोनदा अधिस्नातक झालेले पदवीधर असावेत. त्यांच्यापैकी अधिकांश लोक डॉक्टरेटची पदवी धारण करणारे असावेत. त्यांनी शिक्षक-प्रशिक्षणाचे प्रादेशिक किंवा परिचयात्मक अभ्यासक्रम पूर्ण केलेले असावेत.

१२. मानसशास्त्र, समाजशास्त्र, विज्ञान अथवा गणित या विषयांतील अर्हता-प्राप्त विशेषज्ञांनी व्यावसायिक प्रशिक्षण घेतलेले नसेल तरी त्यांची नियुक्ती शिक्षक-प्रशिक्षक म्हणून करण्यास हरकत नसावी.

१३. व्यवसायांतर्गत प्रशिक्षणासाठी उन्हाळी वर्ग चालविण्यात यावेत.

१४. पहिल्या पदवी-परीक्षेमध्ये जो विषय घेतलेला नसेल अथवा प्रशिक्षणाच्यापूर्वी त्या विषयाची समकक्ष अर्हता प्राप्त केलेली नसेल तर त्याविषयाची अध्यापन पद्धती घेण्यास कुणाही प्रशिक्षणार्थीला परवानगी दिली जाऊ नये.

१५. राज्य सरकारे व केंद्रशासित प्रदेश यांनी असा नियम करावा की, माध्यमिक शाळांतील शिक्षकांनी महाविद्यालयात ज्या विषयांचा अभ्यास केलेला असेल तेच विषय त्यांनी शाळेत शिकवावेत.

१६. ज्यांना महाविद्यालयांत शिकलेल्या विषयांव्यतिरिक्त दुसरे विषय शिकवावे लागतील त्यांनी पत्रव्यवहाराच्याद्वारे अथवा उन्हाळी वर्गात अशा विषयांचा अभ्यासक्रम पार पाडावा.

१७. शिक्षक-प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळविणारे विद्यार्थी पहिल्या वर्गात किंवा उच्च दुसऱ्या वर्गात उत्तीर्ण झालेले असतील असे शक्य तो पाहावे. त्यांना अनुरूप शिष्यवृत्त्याही देण्यात याव्यात.

१८. माध्यमिक प्रशिक्षण संस्थांतील सर्व शिक्षण शुल्के ( ट्युशन फीज ) रद्द करण्यात यावीत आणि प्रशिक्षणार्थ्यांना पाठ्यवेतने ( स्टायपेंड्स ) व कर्जे मिळण्याची भरपूर सोय करण्यात यावी.

१९. प्रत्येक प्रशिक्षण संस्थेशी एक प्रायोगिक किंवा प्रात्यक्षिक शाळा जोडलेली असावी.

२०. प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांतील प्राध्यापक बी. एड्. असून त्या शिवाय त्यांनी शिक्षण विषयात अथवा दुसऱ्या एखाद्या विषयात एम. ए. ची पदवी मिळविलेली असावी. तसेच त्यांनी प्राथमिक पातळीवर शिक्षक-प्रशिक्षणाचे विशेष प्रादेशिक अभ्यासक्रम पूर्ण केलेले असावेत.

२१. प्राथमिक शिक्षकांच्या नव्या नेमणूका करिताना ज्यांनी कमीत कमी दहा वर्षांचे सामान्य माध्यमिक शिक्षण पूर्ण केले असेल त्यांचीच नेमणूक करण्यात यावी. मात्र या नियमाला शिक्षिका व आदिवासी भागांतील शिक्षक यांच्या बाबतीत अपवाद करण्यात हरकत नसावी.

२२. प्राथमिक शाळांतील अनर्ह शिक्षकांना अर्हता प्राप्त करता यावी यासाठी पत्रव्यवहाराने पूर्ण करता येणारे अभ्यासक्रम सुरू करण्यात यावेत आणि अभ्यासासाठी रजेच्या उदार सवलती त्यांना देण्यात याव्यात.

२३. प्राथमिक शाळांत शिक्षक म्हणून येणाऱ्या पदवीधरासाठी खास प्रशिक्षणक्रम योजण्यात यावेत.

२४. ज्यांनी माध्यमिक शिक्षण पूर्ण केले आहे अशा प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाची मुदत सर्वत्र दोन वर्षांचीच असावी. विभिन्न शैक्षणिक अर्हता असणाऱ्या उमेदवारांना एकाच प्रकारच्या अभ्यासक्रमात गोवण्यात येवू नये.

२५. प्राथमिक प्रशिक्षण संस्थातील सर्व शिक्षण-शुल्के रद्द करण्यात यावीत आणि प्रशिक्षणार्थ्यांना शिष्यवृत्त्या, पाठ्यवेतने व कर्जे मिळण्याची उदार सोय करण्यात यावी.

२६. प्राथमिक प्रशिक्षण संस्थांमधील वसतिगृहे व निवासस्थाने यांच्यात भरपूर वाढ करण्यात यावी.

२७. प्राथमिक प्रशिक्षण संस्थांना प्रायोगिक किंवा प्रात्यक्षिक शाळा जोडण्यात याव्यात.

### प्रशिक्षणाच्या सोयींची वाढ

२८. आपल्या विभागातील प्रशिक्षित शिक्षकांची मागणी पूर्ण होऊ शकेल अशा प्रकारे प्रत्येक राज्याने प्रशिक्षणाच्या सोयीची वाढ करण्यासाठी एक योजना तयार करावी.

२९. मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षणाच्या पूरक, अंशकालिक सोयी उपलब्ध करून देण्यात याव्यात.

३०. योग्य उपायांच्याद्वारे चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत सर्व अप्रशिक्षित शिक्षकांना प्रशिक्षित करण्यात यावे.

### सेवांतर्गत प्रशिक्षण

३१. शिक्षकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षणाचा मोठ्या प्रमाणावरील व समन्वित कार्यक्रम अंमलात आणला जावा.

३२. प्रत्येक शिक्षकाला दर पाच वर्षांनी किमान दोन किंवा तीन महिन्यांचे सेवांतर्गत प्रशिक्षण मिळू शकेल अशा प्रकारे सर्व थरांतील शिक्षकांसाठी विद्यापीठे, शिक्षक-प्रशिक्षण संस्था आणि शिक्षक संघटना यांनी सेवांतर्गत प्रशिक्षणाचे पद्धतशीर व समन्वित कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर संघटित करावेत. त्यात विषयज्ञान व पद्धती यांचा समावेश असावा.

३३. माध्यमिक शिक्षकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षणाकरिता उन्हाळी वर्गाचा कार्यक्रम व्यापक करण्यात यावा. यात पद्धतशीर मागोवा घेणे, संबंधित संस्थामध्ये सक्रिय सहकार्य रुजविणे आणि शिक्षणशास्त्रातील संशोधनास उत्तेजन देणे या गोष्टींचा समावेश असावा.

### उच्च शिक्षणातील शिक्षकांची व्यावसायिक तयारी

३४. उच्च शिक्षणातील शिक्षकांसाठी व्यावसायिक प्रशिक्षणाची गरज आहे; त्यादृष्टीने योग्य सोयी करण्यात याव्यात.

३५. नव्याने नेमणूक झालेल्या अधिव्याख्यात्यांना संस्थेशी समरस होण्यासाठी थोडा काळ देण्यात यावा. चांगल्या अध्यापकांच्या व्याख्यानांना (पाठांना) हजर राहण्यास त्यांना उत्तेजन देण्यात यावे.

३६. प्रत्येक विद्यापीठात आणि शक्य असेल तेथे प्रत्येक महाविद्यालयात नवीन शिक्षकांसाठी नियमित प्रशिक्षण अभ्यासक्रम योजण्यात यावेत.

३७. मोठ्या विद्यापीठात अथवा विद्यापीठांच्या गटांमध्ये अध्यापक-महाविद्यालय स्थापन करून या अभ्यासक्रमांना स्थायी स्वरूप देता येईल.

### शिक्षक-प्रशिक्षणाचा दर्जा

३८. शिक्षक-प्रशिक्षणाचा दर्जा टिकविण्याची राष्ट्रीय पातळीवरील जबाबदारी विद्यापीठ अनुदान मंडळाने उचलावी. दर्जा उंचावण्याची राज्य पातळीवरील जबाबदारी राज्य शिक्षक-प्रशिक्षण मंडळांनी उचलावी.

३९. शिक्षक-प्रशिक्षणात सुधारणा घडवून आणण्यासाठी चौथ्या पंचवार्षिक योजनेत विद्यापीठ अनुदान मंडळाला भरपूर आर्थिक मदत देण्यात यावी.

४०. विद्यापीठ अनुदान मंडळाने शिक्षक-प्रशिक्षणाच्या दर्जाचा विचार करण्यासाठी या व्यवसायातील सदस्य असलेली एक स्थायी शिक्षक-प्रशिक्षण समिती नेमावी.

४१. राज्यसरकारांना शिक्षक-प्रशिक्षणाचा विकास करण्याच्या कामी साह्य देण्याकरिता भारत सरकारने केंद्र-पुरस्कारित योजनांच्याद्वारे आर्थिक मदतीची तरतूद करावी.

## प्रकरण पाचवे

# विद्यार्थी-भरती आणि मनुष्यबळाचा प्रश्न

१. ज्या तत्त्वांनुसार शैक्षणिक सोयी उपलब्ध करून द्यावयाच्या ती पुढीलप्रमाणे असावीत: प्रत्येक बालकास कमीत कमी सात वर्षे मुदतीचे चांगले, परिणामकारक 'सामान्य शिक्षण' (General Education) उपलब्ध करून देणे; अधिक अध्ययन करण्याची ज्यांची इच्छा असेल त्या सर्वांना निवडीचे निकष लावून त्यांच्या उच्च माध्यमिक व विद्यापीठीय शिक्षणाची सोय करणे; व्यावसायिक, तांत्रिक व उद्योगधंद्याच्या शिक्षणाच्या वाढीवर जोर देणे; बुद्धिमान व्यक्ती शोधून काढणे व बुद्धीमत्तेची वाढ होण्यास साह्य देणे; समाजातील निरक्षरता नष्ट करणे, प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम राबविणे सर्वांना शैक्षणिक संधी समानतेने उपलब्ध करून देणे.

### निरनिराळ्या शैक्षणिक अवस्था (पायऱ्या) तील विद्यार्थी-भरतीविषयीची धोरणे

२. सर्वसामान्य नागरिकांची शैक्षणिक उंची वाढविण्याच्या कार्यक्रमात पुढील उपक्रम अग्रहक्काने केले जावेत: १९७५–७६ पर्यन्त सर्व बालकांना पाच वर्षे मुदतीचे परिणामकारक प्राथमिक शिक्षण व १९८५–८६ सालाअखेरीस याच तऱ्हेने सात वर्षे मुदतीचे शिक्षण मिळावे अशी व्यवस्था करणे. ११ ते १४ वर्षे वयाच्या दरम्यानच्या ज्या विद्यार्थ्यांनी निम्न प्राथमिक शिक्षणावस्था पुरी केली नसेल व जे कोणत्याही शैक्षणिक संस्थेत जाऊ शकत नसतील, त्या सर्वांसाठी एक वर्ष मुदतीच्या अंशवेळ (पार्टटाईम) शिक्षण योजनेची सक्तीने अंमलबजावणी करणे, प्रौढांची निरक्षरता नष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे.

३. माध्यमिक आणि उच्च शिक्षणक्रमात विद्यार्थ्यांना प्रवेश पुढील चार निकषांनुसार दिला जावा: लोकांची मागणी; कर्तृत्ववान विद्यार्थ्यांचा सामूहिक लाभ-कोश (Pool) तयार करण्याची गरज; शैक्षणिक सोयी उपलब्ध करून देण्याची शक्यता आणि वैशिष्टयपूर्ण मनुष्यबळाची निवड.

४. जनतेची मागणी व उपलब्ध असलेल्या सोयी यांच्यामध्ये असलेले महदंतर कमी करण्याकरिता उच्च माध्यमिक आणि विद्यापीठीय शिक्षण क्षेत्रात प्रवेश देताना विद्यार्थ्यांची निवड करण्याचे धोरण अंगीकारले पाहिजे.

५. सर्व बुद्धिमान विद्यार्थ्यांना—विशेषतः प्राथमिक व माध्यमिक स्तरांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांतील उच्च श्रेणीच्या ५ ते १५ प्रतिशत उमेदवारांना—पुढील अभ्यासक्रम पूर्ण करण्याची सोय उपलब्ध करून दिली जावी.

६. पुरेशा कार्यक्षमतेने चालणाऱ्या किती शैक्षणिक संस्था सुरू करून त्या दर्जेदारपणे चालू ठेवता येतील त्याच्या शक्यतेवर सोयी किती प्रमाणात उपलब्ध होतील ते अवलंबून राहील.

७. प्राथमिक शिक्षणाच्या वरच्या स्तरामधील विद्यार्थी-भरतीचे नियंत्रण करण्यासाठी भावी कालातील विविध क्षेत्रांमध्ये आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाचा अंदाज मूलभूत धरावा लागेल.

८. मनुष्यबळाविषयीची माहिती मिळविण्याच्या पद्धतीत व त्याचा अंदाज करण्याचे तंत्र सुधारण्यासाठी सतत प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे.

### मनुष्यबळ आणि शैक्षणिक विकास

९. इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिटयूट आणि लंडन स्कूल ऑफ् इकॉनॉमिक्स या संस्थेच्या 'युनिट फॉर इकॉनॉमिक ॲन्ड स्टॅटिस्टिकल स्टडीज ऑन हायर एज्युकेशन' यांनी केलेले अंदाज आम्ही सर्वसाधारणपणे ग्राह्य मानले आहेत.

१०. निम्न माध्यमिक शिक्षण स्तरात विद्यार्थ्यांची निवड करताना प्रवेश नाकारण्याच्या धोरणाऐवजी विद्यार्थ्यांचे बुद्धिमापन करणे व त्यानुसार त्यास मार्गदर्शन करणे हे धोरण असावे.

११. निम्न माध्यमिक शिक्षणस्तरापलीकडे प्रवेश देताना निवड करण्याचे धोरण अपरिहार्य आहे. संक्रमणकालातील धोरण म्हणून अनुसूचित जाती व इतर मागासलेल्या वर्गासाठी काही जागा राखून ठेवाव्या लागतील.

१२. उच्च माध्यमिक शिक्षण संस्था आणि विद्यापीठाच्या पातळीच्या शैक्षणिक केंद्रात प्रवेश देताना राष्ट्राची शिक्षित मनुष्यबळाविषयीची उद्दिष्टे सर्वसाधारणपणे जमेस धरावी लागतील.

१३. उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षण संस्था, विद्यापीठाशी सम्बद्ध असलेली महाविद्यालये, मानव्य शाखा व व्यापारी अभ्यासक्रम शिकविणाऱ्या उच्च शैक्षणिक संस्था यामध्ये प्रवेश देताना निवडीनंतर प्रवेश हे राष्ट्रीय धोरण असले पाहिजे.

### मनुष्यबळाचे अंदाज व विद्यार्थी-भरती यांची जुळणी

१४. राष्ट्रीय विकासासाठी विविध क्षेत्रांत कोणत्या लायकीचे मनुष्यबळ किती संख्येने अपेक्षित आहे याचे अंदाज ठरविण्याची जबाबदारी नियोजन मंडळाने पत्करली पाहिजे आणि त्याने मनुष्यबळ अंदाजासाठी एक स्थायी समिती नेमण्याचा विचार केला पाहिजे.

१५. अंदाजित मनुष्यबळाचा विकास व यासाठीची जिल्हा पातळीवरील व राज्य पातळीवरील योजना तयार करण्यासाठी 'राज्य मनुष्यबळ समीती' नेमणे योग्य ठरेल.

१६. राष्ट्रीय विकासासाठी अत्यावश्यक असलेल्या शिक्षणशाखामध्ये विद्यार्थी-भरती किती करावी हे केंद्र सरकारने राज्य सरकारच्या सल्लामसलतीनुसार ठरवावे.

१७. केंद्र सरकारच्या पातळीवर माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या ज्या शाखाचे नियोजन केले जाते त्या व्यतिरिक्त इतरांचे नियोजन राज्य सरकारने राज्य पातळीवर करणे इष्ट आहे.

१८. सर्व स्तरांतील व्यावसायिक शिक्षण-व्यवस्था अग्रहक्काने वाढविणे आवश्क आहे.

१९. सामान्य शिक्षणाबाबत आपापल्या परिस्थितीनुसार व गरजांनुसार राज्य सरकारांनी आपापला कार्यक्रम तयार करावा. १९६६ सालातील राष्ट्र पातळीवरील सरासरी इष्टांक ज्यांना अद्याप गाठावयाचा आहे त्या राज्यांना विस्तार करण्याची पूर्ण मुभा राहील आणि ज्यांनी १९८६ चा अपेक्षित इष्टांक गाठला आहे त्यांना विस्ताराला मर्यादा घालाव्या लागतील.

२०. केंद्र सरकार वेळोवेळी राज्य सरकारांना अपेक्षित लक्ष्य-इष्टांक ( Target ) सुचवील. त्याचप्रमाणे राज्य सरकार ते जिल्हा पातळीला सूचित करील.

२१. उच्च शिक्षणाबाबतची योजना आखण्याचे कार्य राज्य पातळीवरून व्हावे व त्यामध्ये राज्यातील सर्व विद्यापीठे सहभागी व्हावीत. प्रत्येक विद्यापीठाने आपली पंचवार्षिक योजना तयार करून कोणत्या शैक्षणिक सोयी आपल्याकडे उपलब्ध होतील व त्यातून किती तज्ज्ञ मनुष्यबळ निर्माण होईल याचे आराखडे तयार करावेत. राज्य पातळीवरील विविध क्षेत्रांतील मनुष्यबळाचे अंदाज ध्यानात घेऊनच विद्यापीठांच्या या योजनांना मान्यता दिली जावी.

२२. शालेय शिक्षणाची जिल्हा पातळीवर योजना आखण्यासाठी जिल्हापातळीवरून शासकीय यंत्रणेची आवश्यकता आहे. तिने आपली योजना आखताना, स्थानिक गरजेनुसार आवश्यक मनुष्यबळाविषयी केलेल्या अभ्यासाचे अंदाज आणि राज्य व केंद्र सरकारकडून आलेली सर्वसामान्य मार्गदर्शक सूचना यांचा साकल्याने विचार करावा.

२३. प्रत्येक पदवीधरास त्याची पदवी अगर डिप्लोमा मिळताच योग्य असा व्यवसायही आपण देऊ शकू या दृष्टीनेच आपली यापुढील शैक्षणिक वाटचाल झाली पाहिजे.

२४. सध्या वैद्यकीय अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जसे पदव्युत्तर कालात एक वर्ष नोकरीवजा प्रत्यक्ष कार्य करण्याचे बंधन आहे तसे इतर क्षेत्रातील पदवीधरांना घालण्यात यावे.

२५. शिक्षणाच्या योजना यशस्वी व्हावयाच्या असतील तर त्यांचा समन्वय पुढील गोष्टींशी झाला पाहिजे; देशातील लोकसंख्यावाढीचे प्रमाण निम्यावर आणणे; नोकरीधंद्याच्या उपलब्धतेत भरपूर वाढ करणे; आणि सर्व तरुणांना व्यवसाय मिळेल अशा रीतीने त्यास शिक्षण देणे.

२६. अशा तऱ्हेच्या समन्वित योजना राष्ट्रीय, राज्य व जिल्हा पातळीवर आखण्यात आल्या पाहिजेत.

## प्रकरण सहावे

# शिक्षणाच्या समान संधींकडे वाटचाल

### शिक्षणाचे शुल्क

१. सर्वशिक्षण 'अध्यापन शुल्क' न भरता, म्हणजे मोफत मिळू शकेल अशा स्थितीकडे देशाने वाटचाल केली पाहिजे.

२. शक्य तितक्या लवकर आणि होता होईल तोवर चौथी पंचवार्षिक योजना संपण्यापूर्वी प्राथमिक शाळेतील अध्यापन शुल्क रद्द करण्यात आले पाहिजे.

३. शक्य तितक्या लवकर आणि विशेषत: पाचवी पंचवार्षिक योजना संपण्यापूर्वी सरकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या किंवा सरकारी अनुदान घेणाऱ्या खाजगी शिक्षण संस्थांतील निम्न–माध्यमिक स्तरावरील शुल्क रद्द होऊन हे शिक्षण मोफत मिळाले पाहिजे.

४. त्यानंतर दहा वर्षांच्या कालावधीत उच्च शिक्षण माध्यमिक शिक्षण व विद्यापीठातील शिक्षण, सर्व गरजू व लायक विद्यार्थ्यांना, अध्यापनाचे शुल्क न घेता देण्यात यावे. या करिता विशेष प्रयत्न व्हावयास पाहिजेत.

### इतर खर्च

५. शिक्षणाचे इतर खर्चही कमी करण्यासाठी आणि अध्ययनाचे साहित्य विद्यार्थ्यांना विनामूल्य मिळावे यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे.

६. प्राथमिक स्थरावर, विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मोफत देण्याची सोय अग्रहक्काने करण्यात यावी; माध्यमिक शाळा आणि उच्च शिक्षणाच्या ठिकाणी पाठ्यपुस्तकांचे संचीय ( Book banks ) तयार करण्याचा कार्यक्रम आखून या संस्थांच्या ग्रंथालयांतही पाठ्यपुस्तकांच्या अनेक प्रती उपलब्ध करून द्याव्या लागतील. विशेष बुद्धिमान विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके विकत घेण्यासाठी अनुदान देण्याची व्यवस्था आवश्यक आहे.

### शिष्यवृत्त्या

७. निम्न-प्राथमिक शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या होतकरू मुलांना पुढील अभ्यासक्रम घेता यावा म्हणून पुरेशा शिष्यवृत्त्या देण्याची व्यवस्था व्हावी. हुशार विद्यार्थ्यांना चांगल्या शाळात प्रवेश मिळविण्यासाठी मार्ग दर्शन लाभावे म्हणून एक स्वतंत्र प्रवेश–मार्गदर्शक यंत्रणा उभारली पाहिजे. निम्न–माध्यमिक शिक्षणासाठी जिल्हा किंवा विकास–खंड पातळीवर शिष्यवृत्त्या देण्याची सध्याची केंद्रीय पद्धती रद्द करावी आणि प्रत्येक शाळेतील सातवी किंवा आठवी इयत्तेतील सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांपैकी वरच्या दहा टक्के विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जावी/ चांगल्या दर्जाच्या शाळांमध्ये बुद्धिमान विद्यार्थ्यांना व शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या मुलांना निश्चितपणे प्रवेश मिळवून देण्यासाठी पद्धतशीर रीतीने प्रवेश–योजनेची यंत्रणा उभारावी.

८. अशी यंत्रणा योग्य रीतीने कार्यवाहीत आणण्याची जबाबदारी राज्य सरकारांच्या शिक्षण विभागावर टाकण्यात यावी. या विभागाने विद्यापीठांच्या सहकार्याने ही जबाबदारी पार पाडली पाहिजे.

९. शालेय स्थरावतील बुद्धीमान विद्यार्थी शोधण्यासाठी योग्य शोधन–पद्धती किंवा मुल्यांकन-तंत्र तयार करण्याचा उपक्रम ताबडतोबीने हाती घेतला पाहिजे.

१०. आपल्या संस्थेत शिकणाऱ्या बुद्धिमान मुलांना ओळखून काढण्याची पद्धती विकसित करण्यासाठी व अध्यनाची प्रगत व्यवस्था त्यांच्यासाठी उपलब्ध करण्याकरिता प्रत्येक शैक्षणिक संस्थेला मदत केली पाहिजे.

११. बुद्धिमान विद्यार्थ्यांचा शोध घेताना गणित, भाषा, कला व प्रयोगशीलता यामध्ये अनेकविध प्रकारे नैपुण्य दाखविण्याची सुप्त शक्ती असणाऱ्यांचा अंतर्भाव करण्यासाठी निवड क्षेत्र विशाल ठेवावे.

१२. पदवीपूर्व पातळीवरील निदान पंधरा टक्के विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची व्यवस्था १९७६ पर्यन्त उपलब्ध व्हावी आणि १९८६ साली हे प्रमाण पंचवीस टक्क्यांपर्यंत वाढवावे.

१३. पदव्युत्तर शिक्षणक्रमासाठी नोंदलेल्या विद्यार्थ्यांपैकी पंचवीस टक्के विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्यांची सोय १९७६ पर्यंत व्हावी. १९८६ कमाच्या सुमारास ही सोय पन्नास टक्के विद्यार्थ्यांसाठी करावी.

१४. पाठ्यवेतने किंवा शिष्यवृत्त्या दोन प्रकारच्या असल्या पाहिजेत. जे विद्यार्थी वसतिगृहात राहात असतील त्यांना सर्व शिक्षणाचा व रहाण्या-जेवण्याचा खर्च भागविण्याइतकी शिष्यवृत्तीची रक्कम द्यावी आपल्या घरी राहून अभ्यास करतील त्यांच्या केवळ शिक्षणाच्या सर्व खर्चाची सोय शिष्यवृत्तीतून व्हावी.

१५. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वयंसेवा पद्धतीने राहण्याची योजना कार्यवाहीत आणावी म्हणजे खर्चात काटकसर होईल व अशा रीतीने वाचणाऱ्या पैशातून मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देणे शक्य होईल.

१६. पदवीपूर्व व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी सरासरीने शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा ७५ रुपये व १५० रुपये असावी.

१७. राष्ट्रीय शिष्यवृत्तीच्या योजनेखाली १९७५–७६ साली परीक्षेस बसणाऱ्यांपैकी पाच टक्के विद्यार्थ्यांना साह्य व्हावे आणि याचे प्रमाण १९८५–८६ सालापर्यंत दहा टक्क्यांपर्यंत जावे.

१८. शिष्यवृत्त्या देण्याची पद्धती सुधारण्याच्या दिशेने पहिले पाऊल या दृष्टीने राष्ट्रीय शिष्यवृत्त्यांचे वाटप निरनिराळ्या परीक्षांसाठी राज्य पातळीवर कोणत्या प्रमाणात करावे ते केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने ठरवून द्यावे.

१९. एकूण उपलब्ध असलेल्या शिष्यवृत्त्यांपैकी पन्नास टक्के शिष्यवृत्त्या देताना 'शाळासमूह' हा घटक मानावा आणि उरलेल्या ५० टक्के शिष्यवृत्त्या सर्व राज्य हे एक घटक मानून वाटाव्यात.

२०. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या कालखंडात, विद्यापीठातील शिष्यवृत्त्यांची योजना पुढील सूत्रानुसार अंमलात यावी. १९७६ च्या सुमारास नोंदलेल्या पदवीपूर्व विद्यार्थ्यांच्या एकूण दहा टक्के विद्यार्थ्यांना आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नोंदलेल्या विद्यार्थ्यांपैकी वीस टक्के विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळावी.

२१. शिष्यवृत्त्यांचे वाटप करण्याचा कार्यक्रम सुसंयोजित रीतीने पार पाडला जावा यासाठी पदव्युत्तर व संशोधन क्षेत्रातील शिष्यवृत्त्यांबाबत राष्ट्रीय पातळीवर एक स्थायी समिती नेमण्यात यावी.

### व्यावसायिक शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या

२२. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थात—विशेषतः इंजिनियरिंग व वैद्यक महाविद्यालये आणि इन्स्टिटयूटस् ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थांत प्रवेश देताना जिच्यामुळे समतेचे तत्त्व अंमलात येईल अशी नवी पद्धती अवलंबविण्याचा कसोशीने प्रयत्न होणे जरूर आहे.

२३. इन्स्टिटयूटस् ऑफ टेक्नॉलॉजीच्या (तांत्रिक शिक्षण संस्था) प्रवेश परीक्षा इंग्रजी व प्रादेशिक भाषा या दोन्ही माध्यमातून घेण्यात आल्या पाहिजेत.

२४. शालेय स्तरावर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी तीस टक्के विद्यार्थी शिष्यवृत्त्या मिळविणारे असले पाहिजेत आणि उच्च शिक्षणाच्या स्तरावर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी पन्नास टक्के शिष्यवृत्त्या मिळवणारे असावेत.

### परदेशातील अध्ययन

२५. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी परदेशात पाठविण्याकरिता दरवर्षी पाचशे शिष्यवृत्त्या देण्याची योजना राष्ट्रीय पातळीवर करावी.

### कर्जाऊ शिष्यवृत्त्या

२६. बिनपरतफेडीच्या शिष्यवृत्त्यांच्या बरोबरच कर्जाऊ किंवा परतफेडीच्या शिष्यवृत्त्यांची योजना पूरक म्हणून सुरू केली पाहिजे. या शिष्यवृत्त्या मुख्यत्वेकरुन शास्त्राचे विद्यार्थी किंवा व्यावसायिक अभ्यासक्रम घेणारे विद्यार्थी यांच्यासाठी असाव्यात. कर्जाऊ शिष्यवृत्ती घेणाऱ्याने अभ्यासक्रम पुरा केल्यानंतर जर शिक्षकव्यवसाय पत्करला तर प्रत्येक वर्षाच्या नोकरीमागे त्याला दिलेल्या कर्जापैकी एक दशांश कर्ज माफ केले जावे. ही कर्जाऊ शिष्यवृत्त्यांची यंत्रणा सुयोग्य रीतीने अंमलात यावी म्हणून एक मंडळ स्थापन करण्यात यावे.

### काही सर्वसाधारण समस्या

२७. विद्यार्थ्यांना सोयीस्कर रीतीने शिक्षण संस्थांत येण्यासाठी वाहतूक साधनांची सोय म्हणून सायकली पुरविण्याची व्यवस्था मोठ्या प्रमाणात करावी; माध्यमिक शाळा व विद्यापीठ या पातळीवरील विद्यार्थ्यांसाठी दिवसा अभ्यास करण्याची केंद्रे मोठ्या संख्येने सुरू करावीत. शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्याला अभ्यास चालू असताना अर्थार्जन करण्याच्या सोयी देखील उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

२८. विद्यार्थिनींच्या शिष्यवृत्त्या आणि इतर प्रकारची मदत याबाबतच्या गरजांचा विचार व्यावसायिक दृष्टीकोनातून व्हावा.

### आर्थिक जबाबदारी

२९. शालेय स्तरातील शिष्यवृत्त्यांबाबत योग्य ती योजना तयार करण्याची जबाबदारी राज्य सरकारांची राहील. उच्च शिक्षण व परदेशातील शिक्षण या पातळीवरील शिष्यवृत्ती योजनांची जबाबदारी भारत सरकारची राहील. शालेय स्तरावरील शिष्यवृत्त्यांसाठी लागणारी आर्थिक व्यवस्था केंद्र-पुरस्कारित योजना करण्यात यावी.

### अपंग मुले

३० अपंग मुलांचे शिक्षण हे सामान्य शिक्षण योजनेचाच एक अविभाज्य भाग राहिल.

३१ अपंग मुलांच्या शिक्षणासाठी १९८६ पर्यंत प्रत्येक जिल्हयात एक उत्कृष्ट संस्था सुरू करण्यात यावी व त्या मुदतीपर्यंत कमीतकमी दहा टक्के अपंग मुलांच्या शिक्षणासाठी सोयी उपलब्ध करून द्याव्या.

३२. अपंग विद्यार्थी आणि इतर विद्यार्थी यांना एका स्वरूपाचे शिक्षण कसे देता येईल या दृष्टीने करण्यात येणारे प्रयोग स्वागतार्ह मानावेत.

३३. ज्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा काही विशिष्ट प्रकारच्या असतील त्यांच्यासाठी काही प्रयोग-केंद्रे सुरू करावीत.

३४. विशिष्ट शैक्षणिक गरजा असणाऱ्या मुलांसाठी शिक्षक तयार करणाऱ्या संस्थातील प्रशिक्षणार्थ्यांची संख्या वाढविणे, नव्या प्रशिक्षण-संस्था सुरू करणे, या क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या कामात एकसूत्रता आणणे व संशोधनाचा विकास करणे या गोष्टी आवश्यक आहेत.

## प्रादेशिक असमानता

३५. निरनिराळ्या प्रदेशातील (विभागांतील) शैक्षणिक प्रगतीमध्ये जो असमतोल निर्माण होत असतो तो दूर करण्याच्या कार्यावर नव्या प्रकारे भर द्यावयास पाहिजे व कमी प्रगत विभागाला जास्त सहाय्य देऊन कमीत कमी ठरविलेल्या पूर्व संकल्पित पातळीपर्यंत त्या विभागांची प्रगती घडवून आणली पाहिजे. यासाठी अंगिकारावयाचे उपक्रम म्हणजे शैक्षणिक नियोजन आणि सुधारणा यांसाठी जिल्हा हा मूलभूत घटक मानणे; एकाच राज्यातील जिल्हावार प्रगतीत समतोल राखणे; आणि राष्ट्रातील वेगवेगळ्या राज्यामधील शैक्षणिक विकासात समानता आणणे.

## स्त्रियांचे शिक्षण

३६. मुली व स्त्रिया यांच्या शिक्षणाच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी नेमण्यात आलेल्या निरनिराळ्या समित्यांनी केलेल्या शिफारशींना महामंडळाचा पाठिंबा आहे.

३७. "राष्ट्रीय स्त्री-शिक्षण समिती" ने सुचविलेल्या खास कार्यक्रमांवर भर दिला पाहिजे. त्याचप्रमाणे शिक्षणाच्या सर्व स्तरावरील व सर्व शैक्षणिक शाखातील मुलींच्या शिक्षणाकडे सर्वसाधारणपणे लक्ष द्यावे लागेल. मुली व स्त्रिया यांच्या शिक्षणाकडे सातत्याने लक्ष देण्यासाठी राज्य पातळीवर व केंद्रीय पातळीवर खास यंत्रणा उभारणे जरूर आहे.

३८. माध्यमिक शालान्त (मॅट्रिक्युलेशन) परिक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा त्यापेक्षा अधिक शैक्षणिक लायकी असलेल्या तरूण स्त्रियांना अर्धवेळ नोकऱ्यांची संधी अधिकाधिक मिळण्यासाठी व्यवस्था केली जावी. शिक्षण, रूग्णसेवा आणि सामाजिक संस्थांतील नोकऱ्या येथे लायक स्त्रियांना पूर्ण वेळ काम मिळण्याची शक्यता निर्माण केली जावी.

## अनुसूचित जमाती

३९. अनुसूचित जमातीतील लोकांच्या शिक्षणासाठी आज असलेल्या योजना यापुढेही चालू राहाव्यात आणि यात वाढही केली जावी.

४०. भटक्या आणि निमभटक्या जमातींच्या प्रश्नांचा विशेष अभ्यास करून जेथे पुरेशा संख्येने विद्यार्थी सापडू शकतील तेथे त्यांच्यासाठी फिरत्या (Mobile) आणि इतर शैक्षणिक सोयी निर्माण केल्या जाव्यात.

४१. अशा जमातीतील मुलांसाठी वसतिगृहांची सोय केली जावी.

४२. वर्गीकृत विभाग व अनुसूचित जमाती यांच्याबाबत नेमण्यात आलेल्या मंडळाच्या शिफारशींचा आणि नियोजन मंडळ आणि नॅशनल कौन्सिल फॉर एज्युकेशनल रीसर्च ॲन्ड ट्रेनिंग यांच्यातर्फे आदिवासी जमातींची शिक्षणासाठी जी दोन चर्चासत्रे (सेमिनार) आयोजित करण्यात आली होती त्यात करण्यात आलेल्या शिफारशींचा आम्ही पुरस्कार करीत आहोत.

४३. सर्व आदिवासी जमातीतील मुलांसाठी पाचवर्षाचे सुव्यवस्थित शिक्षण देण्याची व्यवस्था १९७५-७६ पर्यंत केली जावी आणि हा कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जावेत.

४४. माध्यमिक स्तरांवर शक्य तेवढ्या मोठ्या प्रमाणात आश्रम शाळांची सोय करण्यात यावी.

४५. आदिवासी जमातीतील मुलांना व्यवसायीक शिक्षण संस्थेत प्रवेश देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जावेत.

४६. भारत सरकारने दिलेल्या शिष्यवृत्त्यांबाबतच्या प्रशासन यंत्रणेचे विकेंद्रीकरण करण्यात यावे; या कार्यक्रमाच्या कक्षेत विद्यार्थ्यांना विशेष शिकवणी देण्याच्या योजना अंतर्भूत केल्या जाव्यात आणि सर्व उपलब्ध अभ्यासक्रमांचेबाबत त्या अंमलात आणाव्यात.

४७. आदिवासी जमातींमध्ये जाऊन काम करण्याची लायकी व आवड असणाऱ्या अधिकाऱ्यांची निवड करून त्यांच्यासाठी वेगळ्या "सेवा श्रेणी" ची व्यवस्था करावी.

४८. आदिवासींच्या प्रत्येक गटाची सांस्कृतिक आणि आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन, स्थानिक नेतृत्व घडविण्याचे विशेष कार्यक्रम अंगिकारणे अत्यावश्यक आहे.

४९. भारतीय शिक्षण मंत्रालय, आणि जेथे आदिवासी जमाती वा भटक्या जमाती मोठ्या प्रमाणात असतील अशा राज्यातील शिक्षण विभाग यांनी अशा जमातींच्या गरजा समजून घेण्यासाठी आणि त्यांच्याभागात सुधारणा-योजना राबविण्यासाठी खास कक्ष सुरू करावेत.

५०. आदिवासी जमातीतील शिक्षण प्रसाराबाबतचे आकडे गोळा करण्याचे काम भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने करावे.

५१. विद्यापीठामध्ये आदिवासी जाती/जमातींबाबत संशोधन करण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने काही निधी स्वतंत्र काढून ठेवला पाहिजे.

# भाग दुसरा

## प्रकरण सातवे

## शालेय शिक्षण : प्रसाराच्या समस्या

१. विद्यापीठपूर्व पातळीवरील शिक्षणाच्या सर्व अवस्थांमध्ये समस्यांच्या भिन्नतेपेक्षा साधर्म्यच अधिक आढळत असल्यामुळे त्या संपूर्ण कालखंडाचा विचार साकल्याने करण्यात यावा.

### पूर्व-प्राथमिक शिक्षण

२. सर्व बालकांच्या आणि विशेषतः ज्यांच्या घरातील परिस्थिती असमाधानकारक असेल अशांच्या शारीरिक, भावनिक आणि बौद्धिक वाढीसाठी पूर्व-प्राथमिक शिक्षण फार महत्त्वाचे आहे. १९८६ पर्यंत देशातील ३ ते ५ वर्षे वयांच्या मुलांपैकी फक्त ५ टक्के आणि ५ ते ६ वर्षे वयाच्या मुलांपैकी ५० टक्के मुलांना पूर्व-प्राथमिक शिक्षणसंस्थात प्रवेश द्यावा.

३. येत्या वीस वर्षांच्या कालखंडात पुढील सूत्रानुसार पूर्व-प्राथमिक शिक्षणाची वाढ व्हावी :

(१) प्रत्येक राज्यातील शिक्षणग्रस्त संस्थेमध्ये पूर्व-प्राथमिक शिक्षणाचे 'विकास-केंद्र' स्थापण्यात यावे. त्याचप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यातही असेच एक विकास केंद्र उभारावे. आपल्या कार्यक्षेत्रातील पूर्व-प्राथमिक शिक्षणाचा विकास घडवून आणण्यासाठी या केंद्राच्या अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन आणि पर्यवेक्षण ही दोन्ही कामे करणे आवश्यक ठरेल.

(२) पूर्व-प्राथमिक केंद्रे चालविण्यासाठी खाजगी संस्थांवरच जास्तीत जास्त जबाबदारी सोपविली जावी. या केंद्रांना 'समान संधी' तत्त्वानुसार सरकारी अनुदान देण्याची व्यवस्था केली जावी.

(३) पूर्व-प्राथमिक शिक्षणक्षेत्रात नवनवीन प्रयोग करून पाहण्यासाठी उत्तेजन देण्यात यावे. या शिक्षणासाठी कमी खर्चिक शिक्षणपद्धती शोधण्याच्या संशोधनास विशेष उत्तेजन दिले जावे.

(४) बालक्रिडा केंद्रे शक्य तितक्या प्राथमिक शाळांना जोडण्यात येऊन ती प्राथमिक शिक्षकाच्या (शिक्षिकेच्या) मार्गदर्शनाखाली चालविण्यात आल्यास शैशवावस्थेतून औपचारीक शालेय शिक्षणाकडे मुलांचे संक्रमण सुगमतेने होऊ शकेल.

(५) राज्य सरकारने राज्यपातळीवर व जिल्हा पातळीवर क्रिडा-केंद्रे चालवावीत, पूर्व-प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सोय करावी, पूर्व-प्राथमिक शिक्षणाबाबत होणाऱ्या संशोधनास मार्गदर्शन देऊन पूर्व-प्राथमिक शिक्षणावर वाङ्मय तयार करण्याकडेही लक्ष पुरवावे, पूर्व-प्राथमिक शाळा आणि पूर्व-प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षण संस्था याचे मार्गदर्शन व पर्यवेक्षक करावे, खाजगी पूर्व-प्राथमिक शिक्षण-संस्थांना अनुदान द्यावे व आदर्श पूर्व-प्राथमिक शाळा चालवाव्यात.

४. पूर्व-प्राथमिक पातळीवरील शैक्षणिक कार्यक्रम लवचिक स्वरूपाचा असावा आणि त्यात विविध प्रकारचे खेळ, हस्तव्यवसाय व शैक्षणिक संस्कारासाठी क्रियात्मक कार्यक्रम आखताना केंद्रीय शिक्षणाचाही समावेश करावा.

५. पूर्व-प्रथमिक शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या विविध संस्थांच्या कार्यास सुसंघटितपणा आणावा.

### प्राथमिक शिक्षणाचा प्रसार

६. **लक्ष्ये.**—प्रत्येक बालकाला वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे ही भारतीय राज्य घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वात केलेली तजवीज म्हणजे पहिल्या क्रमांकाचे शैक्षणिक उद्दिष्ट मानले पाहिजे व त्याची पूर्ती देशाच्या सर्व भागात पुढीलप्रमाणे दोन हप्त्यात व्हावयास पाहिजे :

१९७५-७६ पर्यन्त सर्व मुलांना पाच वर्षांचे दर्जेदार व उपयुक्त शिक्षण देण्याचे आणि १९८५-८६ सालापर्यंत अशा तऱ्हेचे सात वर्षांचे शिक्षण देण्याचे लक्ष्य गाठण्यात यावे. या लक्ष्यांच्या अनुरोधाने व स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन प्रत्येक राज्य सरकारने व जिल्हयाने दीर्घ मुदतीची योजना (दृष्टिसीमान्वित योजना) तयार केली पाहिजे आणि ती कार्यवाहीत आणण्यासाठी त्यांना मदत देण्यात आली पाहिजे.

७. वरील उद्दिष्टे किंवा लक्ष्ये सिद्ध करताना गळती व नापासी कमीत कमी होईल याकडे लक्ष देऊन पहिलीच्या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी निदान ८० टक्के तरी सातवीच्या वर्गात जातील असे पहावे आणि प्रत्येक विद्यार्थ्याला उपयुक्त व जबाबदार नागरीक बनविण्याचे उद्दिष्ट गाठता येण्याजोगा प्राथमिक शिक्षणाचा दर्जा असावा.

८. सातवीच्या अभ्यासक्रमाचे अखेरीस ज्यांचे वय चौदा वर्ष झाले नसेल व ज्यांना कामधंद्यात पडण्याची इच्छा असेल अशा विद्यार्थ्यांच्या पसंतीचे छोटे व्यावसायिक अभ्यासक्रम त्यांना उपलब्ध करून द्यावेत.

## कार्यक्रम योजना

९. प्राथमिक शाळांची स्थलनिश्चिती करताना पुढील सूत्र व्यवहारात आले पाहिजे :

प्रत्येक मुलाच्या घरापासून एक मैलाच्या अंतरात निम्न प्राथमिक शाळा आणि तीन मैलाच्या आत उच्च प्राथमिक शाळा असावी.

१०. विद्यार्थ्यांच्या सार्वत्रिक शाळाभरतीचा कार्यक्रम कार्यवाहीत आणीत असतानाच पुढील गोष्टींकडे विशेष लक्ष दिले जावे :

(१) पहिल्या इयत्तेतील प्रवेशाकरिता येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वयातील विविधता कमी करायासाठी

(अ) शाळेत नाव घालण्यापूर्वी आसपासच्या सर्व मुलांची शाळेने पूर्व-नोंदणी करून ठेवणे आणि (ब) पहिलीत नाव घालण्याकरिता जी वयोमर्यादा ठरविली असेल त्या वर्षातच प्रवेश घेतला पाहिजे असा नियम घालणे.

(२) चौथीतील शंभर टक्के विद्यार्थी पुढल्या इयत्तेत गेलेच पाहिजेत हे उद्दिष्ट पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत गाठता यावे म्हणून विविध उपाय आतापासूनच योजणे.

११. येत्या दहा वर्षातील महत्त्वाच्या कार्यक्रमात प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे व १९७६ च्या अखेरपर्यंत निम्न-प्राथमिक पातळीवरील नापासी व गळती थांबविण्यासाठी व १९८६ च्या अखेरीपर्यंत ती उच्च प्राथमिक पातळीवरही थांबावी यासाठी योजना करणे, या गोष्टींचा अंतर्भाव करावा.

१२. पहिल्या इयत्तेतील गळती व नापासी कमी करण्यासाठी (१) इयत्ता पहिली व दुसरी हे वेगळे वर्ग न मानता शैक्षणिकदृष्ट्या एकच घटक मानावेत, (२) एक वर्षाचे पूर्व प्राथमिक-शिक्षण सुरू करावे व (३) पहिल्या इयत्तेत क्रीडन पद्धतीचा अवलंब करावा.

१३. इतर इयत्तांतील नापासी व गळती कमी करण्यासाठी शाळा सुधारण्याची राष्ट्रव्यापी योजना, अनेक प्रकारचे अर्धवेळ शैक्षणिक उपक्रम आणि पालक शिक्षणाचा भरघोस कार्यक्रम तावडतोब कार्यवाहीत आणावेत.

१४. अकरा ते चौदा या वयातील जी मुले शाळेत जात नाहीत आणि ज्यांनी प्राथमिक शाळांतील अभ्यासक्रम पुरा केला नाही व जे व्यवहारतः साक्षर झालेले नाहीत त्यांना कमीतकमी एक वर्षाचा साक्षरतेचा अभ्यासक्रम सक्तीचा करावा लागेल. हे वर्ग प्राथमिक शाळेतच विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार भरवावेत. योजना सुरू करण्यापूर्वी या वर्गामागील मूलभूत कल्पनेची माहिती स्थानिक लोकांना परिपूर्णतेने देण्यात यावी.

१५. ज्या विद्यार्थ्यांनी निम्न प्राथमिक शाळेचा अभ्यासक्रम पुरा केला आहे व ज्यांना पुढील अभ्यास करण्याची इच्छा आहे त्यांना मागील कलमात सांगितल्याप्रमाणे अर्ध वेळ शैक्षणिक अभ्यासक्रम देण्याची व्यवस्था व्हावी. १९७५-७६ च्या अखेरीस अशा नोंदलेल्या विद्यार्थ्यांपैकी दहा टक्के व १९८५-८६ अखेर वीस टक्के विद्यार्थ्यांची सोय करण्याचे उद्दिष्ट असावे. या अभ्यासक्रमात सामान्य शिक्षणाचा भाग ठेवावा किंवा स्थानिक गरजेनुसार व्यावसायिक शिक्षणविषयक भाग कमी अधिक प्रमाणात अंतर्भूत केला जावा.

## मुलींचे शिक्षण : प्राथमिक अवस्था

१६. राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार मुलींच्या शिक्षणाचा कार्यक्रम अंमलात आणण्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे आणि 'भारतीय स्त्रीशिक्षण समिती'ने सुचविलेले उपाय योजून त्याची गती वाढविली पाहिजे.

## आदिवासी जमातीचे शिक्षण

१७. आदिवासी जमातीमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी विशेष अगत्याने प्रचार करून त्या दृष्टीने सुयोग्य शिक्षकांचा पुरवठा, शालेय अभ्यासक्रमाची पुनर्रचना आणि आश्रमशाळांची स्थापना या उपायांचा अवलंब करावा.

१८. देशातील वेगवेगळे विभाग, प्रत्येक राज्यातील जिल्हे, विकासखंड व गावे यामध्ये सध्या आढळणारा प्राथमिक शिक्षणातील असमतोल नाहीसा करणे हे राज्यघटनेच्या तत्त्वानुसार अत्यावश्यक आहे. प्राथमिक शिक्षणाची सार्वत्रिक सोय उपलब्ध करून देण्यात राहिलेल्या अनेक उणीवा भरून काढण्याकरिता केंद्र पुरस्कारित योजनेच्याद्वारे भारत सरकारने राज्य सरकारांना विशेष सहाय्यक अनुदान दिले पाहिजे.

## गुणवत्तेची वाढ

१९. प्राथमिक शिक्षणाच्या सोयी मोठ्या प्रमाणावर प्रसारित करणे, सार्वत्रिक विद्यार्थी-भरती करणे व विद्यार्थ्यांना शाळेत टिकवून धरणे, या कार्यक्रमांच्या सोबतच प्राथमिक शिक्षणातील गुणवत्तेची वाढ करण्याकडे लक्ष दिले पाहिजे.

२०. येत्या वीस वर्षांत, पुढील उपाययोजनांच्याद्वारे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी-प्रवेशाचे व्यवस्थित नियंत्रण केले पाहिजे : (१) माध्यमिक शाळांची योजनाबद्ध स्थलनिश्चिती, (२) यथायोग्य शैक्षणिक दर्जाचे पालन व (३) अत्युत्तम विद्यार्थ्यांची निवड.

२१. माध्यमिक शिक्षणाची जिल्हावार योजना आखून ती येत्या दहा वर्षांत क्रमाक्रमाने अंमलात आणावी. सर्व नव्या संस्थांकडून आवश्यक दर्जाचे पालन होईल अशी ग्वाही मिळावी व अस्तित्वात असलेल्या संस्थांचा दर्जा निदान कमीत कमी 'प्रमाणित' पातळीपर्यंत आणावा.

२२. माध्यमिक शाळांतील विद्यार्थी निवडताना उत्तम विद्यार्थीच निवडावेत. यासाठी निम्न माध्यमिक शिक्षणाच्या स्तरामध्ये उच्च ठरणारे आपोआपच निवडता येतील. उच्च माध्यमिक स्तरावर प्रवेश देताना माध्यमिक शिक्षणक्रमाचे अखेरीस होणाऱ्या बहि:शाल परीक्षेचा निकाल आणि शाळेत सातत्याने ठेवण्यात येणाऱ्या विद्यार्थीप्रगतीच्या नोंदी या गोष्टींचा उपयोग निवडीसाठी करण्यात यावा.

## माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायीकरण

२३. माध्यमिक शिक्षणाच्या स्तरावर व्यावसायिक शिक्षणक्रमाचा हिस्सा मोठा राहावा. निम्न माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांपैकी वीस टक्के विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रम शिकण्याची सोय राहावी व उच्च माध्यमिक शिक्षणाच्या स्तरावरील एकूण विद्यार्थ्यांपैकी पन्नास टक्के विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रम देण्यात यावा.

२४. ग्रामीण व शहरी भागातील मुलामुलींच्या गरजांना अनुरूप अशा तऱ्हेतऱ्हेच्या व्यावसायिक शिक्षणाच्या सोयी माध्यमिक स्तरावर पूर्णवेळ व अंशवेळ पाठ्यक्रमाच्याद्वारे, करण्यात याव्या.. जे विद्यार्थी सातवी किंवा आठवीनंतर शाळा सोडतात त्यांना पूर्णवेळ किंवा अंशवेळ शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यासाठी राज्यातील शिक्षण विभागात स्वतंत्र कक्ष सुरू करावा व त्याने अशा तऱ्हेच्या सर्व अभ्यासक्रमांचे नियंत्रण करावे.

२५. माध्यमिक स्तरावर व्यावसायिक शिक्षणक्रम सुरू करण्याच्या कार्यक्रमासाठी केंद्र पुरस्कारीत योजना करून केंद्र सरकारतर्फे राज्य सरकारांना विशेष अनुदान देण्याची व्यवस्था व्हावी.

## अंशवेळ शिक्षणक्रम

२६. निम्न व उच्च माध्यमिक शिक्षणस्तरावर सामान्य प्रकारच्या त्याचप्रमाणे व्यावसायिक स्वरूपाच्या अंशवेळ शिक्षणाची सोय खूप मोठ्या प्रमाणीत उपलब्ध करून देण्यात यावी. निम्न माध्यमिक शाळांत नोंदलेल्या विद्यार्थीसंख्येच्या वीस टक्के विद्यार्थ्यांसाठी आणि उच्च माध्यमिक शाळांतील नोंदलेल्या विद्यार्थ्यांपैकी पंचवीस टक्के विद्यार्थ्यांसाठी अंशवेळ पाठ्यक्रम आयोजित करणे इष्ट ठरेल. ज्यांनी शेतीचा व्यवसाय पत्करला आहे त्या मुलांना शेतीचा, आणि गृहजीवनशास्त्र किंवा घरगुती उद्योगधंद्याबाबत मुलींसाठी, अंशवेळ शिक्षणाचा व्यावसायिक अभ्यासक्रम आखण्यावर विशेष भर दिला जावा.

## मुलींचे शिक्षण : माध्यमिक स्तर

२७. मुलींच्या शिक्षणाचा प्रसार खूप त्वरेने करण्याचे जोरदार प्रयत्न करून येत्या वीस वर्षांत त्यांचे निम्न माध्यमिक पातळीवरील मुलांशी प्रमाण १ :२ व उच्च माध्यमिक पातळीवर १ : ३ होईल असे पाहावे

२८. मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढणे, वसतीगृहे, शिष्यवृत्या, अंशवेळ अभ्यासक्रम व व्यावसायिक अभ्यासक्रम यांची योजना करणे, या गोष्टींवर भर द्यावा.

## शाळांची योजनाबद्ध स्थलनिश्चिती

२९ पैसा व शक्तीचा अपव्यय आणि अनावश्यक दुहेरी सोयी टाळण्यासाठी प्रत्येक प्रकारच्या शिक्षण संस्थांच्या जागांची निश्चिती करण्यासाठी एक राष्ट्रीय धोरण अंगीकारावे. सध्या नव्याने करण्यात येत असलेल्या शैक्षणिक सर्वेक्षणाच्या निष्कर्षावरून शैक्षणिक संस्थांच्या जागा निश्चित करण्याची योजना ठरवावी.

३०. प्राथमिक पातळीवर मुलामुलींच्या संमिश्र शाळा समाजाने मान्य कराव्यात यासाठी लोकमत जागृत करावे व मोठ्या व कार्यक्षम शाळात मुलगे व मुली एकत्र शिकण्यास प्रत्यवाय नसावा. प्राथमिक शाळांची उभारणी आर्थिकदृष्ट्या सुकर व्हावी यासाठी आवश्यक तेथे खेड्यांचे शालेय-गट पाडावेत.

३१. माध्यमिक शिक्षणक्षेत्रात, लहान व आर्थिकदृष्ट्या तोट्यात चालणाऱ्या संस्था स्थापन करण्याचे टाळावे व सध्या अस्तित्वात असलेल्या तोट्यात चालणाऱ्या शाळांची पुनर्रचना करून त्यांचे एकत्रीकरण करावे.

३२. व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या शाळांची स्थापना जेथे विशिष्ट उद्योगधंदे चालू आहेत अशा ठिकाणाजवळच करण्यात यावी.

## प्रकरण आठवे

# शालेय शिक्षणातील अभ्यासक्रम

१. गेल्या काही वर्षांत ज्ञानाचा जो उत्स्फोट झाला व विज्ञानक्षेत्रात ज्या अनेक मूलभूत कल्पना नव्याने पुढे मांडण्यात आल्या त्यांच्या संदर्भात पाहू जाता सध्याच्या शालेय अभ्यासक्रमाचा अपुरेपणा प्रकर्षाने स्पष्ट झाला आहे व त्यामुळेच शालेय अभ्यासक्रमात मूलभूत सुधारणा तातडीने करण्याची जोरदार मागणी वाढत्या प्रमाणात पुढे येत आहे. म्हणून शालेय पातळीवरील संपूर्ण अभ्यासक्रमाची नवी रचना एकसंधपणे करण्यावर कटाक्ष ठवला पाहिजे. सामान्य शिक्षणाची नवीन व्याख्या करण्यात आली पाहिजे आणि सामान्य अभ्यासक्रमात विषयतज्ञाला (Specialization) कोणते स्थान द्यावयाचे त्याबाबत नवीन दृष्टिकोन अंगीकारावा लागेल.

### अभ्यासक्रम सुधारण्याती आवश्यक बाबी

२. शालेय अभ्यासक्रमाची गुणवत्ता वाढविण्यासाठी (अ) विद्यापीठातील शिक्षण विभाग, प्रशिक्षण महाविद्यालये, राज्य शिक्षणशास्त्र संस्था, शालेय शिक्षण मंडळे अशा संस्था व संघटनांनी अभ्यासक्रमातील सुधारणेबाबत संशोधन करण्याची जबाबदारी उचलली पाहिजे ; (ब) या संशोधनाच्या आधाराने अभ्यासक्रमाची फेररचना केली पाहिजे ; (क) पाठ्यपुस्तके व अध्ययन-अध्यापनाचे साहित्य तयार झाले पाहिजे ; (ड) सेवांतर्गत प्रशिक्षणाच्याद्वारे शिक्षकांना पुनर्रचित अभ्यासक्रमाचे नवे वळण समजावून दिले पाहिजे.

३. आपापल्या गरजांनुसार नवीन अभ्यासक्रम तयार करण्याचे व तो प्रायोगिक रीतीने उपयोगात आणण्याचे स्वातंत्र्य शाळांना देण्यात यावे. विद्यापीठ आणि प्रशिक्षण महाविद्यालये यांनी आपापल्या प्रायोगिक शाळांमध्ये हे उपक्रम सुरू करण्यात पुढाकार घ्यावा.

४. आजच्यापेक्षा अधिक वरच्या पातळीवरील अभ्यासक्रम राज्य शालेय शिक्षण मंडळांनी सर्व विषयांत तयार करावा आणि ज्या शाळा अध्यापकवर्ग आणि इतर साधनसंपत्ती याबाबत लायक ठरतील त्या शाळांमध्ये तो अभ्यासक्रम पायरीपायरीने अंमलात आणावा.

५. शालेय अभ्यासक्रम शिकविणाऱ्या विषय-शिक्षकांच्या संघटना निर्माण करण्याने प्रायोगिक अध्यापन करण्याला उत्तेजन मिळेल आणि अभ्यासक्रमाचा दर्जा वाढविता येईल. अभ्यासक्रमांत भरदारपणा आणण्यासाठी आणि शिक्षकांच्या अंगी प्रयोगशीलता बाणविण्यासाठी निरनिराळे शालेय विषय शिकविणाऱ्या शिक्षकांच्या "विषय-शिक्षण संघटना" उभारण्याने बरेच उत्तेजन मिळेल. राज्यसरकारांचे शिक्षण विभाग, राज्य-शिक्षण शास्त्र संस्था आणि "राष्ट्रीय शिक्षण संशोधन व प्रशिक्षण अनुसंधान" (NCERT) या संस्थांनी शिक्षक संघटनांना त्यांच्या शैक्षणिक कार्यक्रमात मदत करावी आणि आपापल्या अधिकारक्षेत्रातील शिक्षक संघटनांच्या कामात एकसूत्रता आणावी.

### अभ्यासक्रमाची पुनर्घटना

६. सामान्य किंवा बिगर-व्यावसाईक शाळांमध्ये दहा वर्षांचा 'सामान्य शिक्षणा' चा एकच अभ्यासक्रम आखण्यात यावा. विशेष विषयांचा व पर्यायी विषयांचा अभ्यास उच्च माध्यमिक शिक्षणावस्थेतच सुरू व्हावा. शिवाय शिक्षणाच्या प्रत्येक उप-अवस्थेच्या अखेरीस विद्यार्थ्यांची प्रगती किती असली पाहिजे या बाबतीतील निकष काटेकोरपणे ठरविले जावेत.

७. निम्न प्राथमिक शिक्षणाच्या अवस्थेतील अभ्यासक्रमांत भाषाज्ञान आणि प्राथमिक गणित यावर विशेष जोर देण्यात यावा आणि इतर औपचारिक विषयांचे ओझे कमी करण्यात यावे.

८. वाचन शिकविण्याच्या सुरवातीच्या अडचणींचा विशेष अभ्यास केला जावा आणि त्याचबरोबर निम्न प्राथमिक अवस्थेतील वाचनाचे अध्यापन सुधारण्यासाठी फार कसोशीने प्रयत्न करण्यावर भर दिला जावा.

९. उच्च प्राथमिक शिक्षणावस्थेत अभ्यासक्रमाची रुंदी व खोली सहाजिकच अधिक वाढविली जावी. अध्यापनपद्धती जास्त पद्धतशीर व्हाव्यात व विद्यार्थ्यांचे प्रगतीविषयक निकष देखील अधिक निश्चित स्वरूपाचे असावेत.

१०. निम्न माध्यमिक अभ्यासक्रमात प्रत्येक विषयाच्या अभ्यासाला अधिक शिस्तबद्धता आली पाहिजे व विषयज्ञानाची खोलीही अधिक वाढली पाहिजे.

११. सामान्य शिक्षणक्रमाच्या उच्च माध्यमिक अवस्थेत पाठ्य विषयांचे वैविध्य अशा तऱ्हेने साधावे की, त्यामुळे विद्यार्थ्यांना कोणत्याही तीन विषयांच्या गटाचा अभ्यास सखोलतेने करता येईल व विषयांचे गट तयार करण्यात पुष्कळसे स्वातंत्र्य व लवचिकपणा राहील. उदाहरणार्थ, एखादा विद्यार्थी शास्त्र विभागातील कोणत्याही तीन विषयांची निवड करू शकेल ; किंवा शास्त्र आणि मानव्य-विषय या दोन विभागातून कोणतेही तीन विषय घेऊ शकेल. कुमारवयाच्या विद्यार्थ्यांच्या एकूण व्यक्तीमत्वाची समतोल वाढ करण्याचा खात्रीलायक उपाय म्हणून या अवस्थेतील अभ्यासक्रमातील अर्धा वेळ त्यांना ऐच्छिक विषयांच्या अभ्यासासाठी चतुर्थांश वेळ भाषा-अध्ययनासाठी आणि तेवढाच वेळ शारीरिक शिक्षण, कला, छंद, नैतीक आणि आध्यात्मिक शिक्षण यासाठी दिला जावा.

१२. शक्य असेल तेथे आठवी इयत्तेपासूनच्या अभ्यासक्रमाची आखणी दोन पातळ्यांवर असावी; एक साधा अभ्यासक्रम आणि दुसरा प्रगत अभ्यासक्रम. त्याखालच्या वर्गामध्ये म्हणजे पाचवीपासून पुढे, विशेष हुशार विद्यार्थ्यांसाठी अधिक समृद्ध अभ्यासयोजना आखली पाहिजे. तिचे स्वरूप विविध प्रकारचे राहील. विद्यार्थ्यांस कधी पुरवणी विषय निवडता येतील किंवा नेहमीच्या अभ्यासक्रमातील एखाद्या विषयाचे सखोल अध्ययन करता येईल. हा जादा अभ्यास शालेय वेळापत्रकात किंवा त्या वेळेच्या बाहेर किंवा स्वाध्याय पद्धतीने पुरा करावयाची योजना आखावी. या कार्यक्रमाचा आरंभ निम्न माध्यमिक पातळीवर गणित, शास्त्र व भाषा यांच्या प्रगत अभ्यासक्रमाने करावा आणि उच्च माध्यमिक शिक्षणक्रमातील विशेषज्ञतेचे सर्वच विषय अशा प्रगत अभ्यासामध्ये अंतर्भूत केले जावेत.

## निरनिराळ्या विषयांच्या अभ्यासाबाबतची खास वैशिष्ट्ये

### १. भाषांचा अभ्यास

१३. शालेय अवस्थेतील भाषा शिक्षणाची फेरपाहणी करण्याची व (फार काळपर्यंत या देशात इंग्रजीत भाषेचा वापर साहाय्यक शासकीय भाषा म्हणून करण्यात आल्यामुळे) या अवस्थेतील भाषाध्ययनाच्या बाबतीत नवीन धोरण आखण्याची गरज निर्माण झाली आहे.

१४. भाषाविषयक संकेताची पुढे दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार फेरआखणी करण्यात] यावी :—

(१) भारतीय संघराज्याची अधिकृत भाषा म्हणून मातृभाषेच्या खालोखाल हिंदीचे महत्त्व मानले जावे.

इंग्रजीचे कामचलाऊ ज्ञान विद्यार्थ्यांच्या फायद्याचे ठरणार] आहे.

(३) कोणत्याही भाषेवरील प्रभुत्वाची प्रगती ती भाषा किती वर्षे शिकण्यात येते यावर जेवढी अवलंबून आहे तेवढीच ती कोणत्या तऱ्हेच्या साधनांच्या मदतीने व कोणत्या प्रकारच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शिकण्यात येते यावरही अवलंबून आहे.

(४) कनिष्ठ माध्यमिक शाळांतील कालखंड (इ. ८ ते १०) हाच नव्या भाषा शिकण्यासाठी अत्यंत योग्य असा आहे. या स्तरावर इंग्रजीच्या शिक्षकांची संख्या कमी लागेल.

(५) दोन जादा भाषा शिकविण्याची सुरूवात एका पाठोपाठ दुसरी अशा क्रमाने करण्यात यावी.

(६) हिंदी किंवा इंग्रजी भाषेच्या शिक्षणाची सुरूवात ज्यावेळी त्याची खरी गरज भासत असेल व ज्यावेळी त्या भाषेच्या अध्ययनासाठी विद्यार्थी विशेष हेतूने प्रेरित झाला असेल तेव्हांच करावी.

(७) कोणत्याही इयत्तेत एकाच वेळी चार भाषा सक्तीने शिकविण्यात येऊ नयेत.

१५. वरील तत्वानुसार फेरबदल केलेल्या त्रिभाषासूत्रात पुढील बाबी अंतर्भूत होतील: (अ) मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा; (ब) भारतीय संघराज्याची अधिकृत शासकीय भाषा किंवा संघराज्याची (जोपर्यंत अशी भाषा राहणार आहे तोपर्यंत) "सहयोगी" शासकीय भाषा आणि (क) वर दिलेल्या (अ) व (ब) मध्ये अंतर्भूत न होणारी व शिक्षणाचे माध्यम नसलेली कोणतीही आधुनिक भारतीय किंवा युरोपियन भाषा.

१६. साधारणतः निम्न प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्याला फक्त मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा अशा एकाच भाषेचा अभ्यास करावा लागेल; उच्च प्राथमिक शिक्षणावस्थेत विद्यार्थ्याला दोन भाषा शिकाव्या लागतील. मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा आणि शासकीय किंवा सहयोगी शासकीय भाषा. निम्न माध्यमिक शिक्षण स्तरातील विद्यार्थ्यास मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा, शासकीय किंवा सहयोगी शासकीय भाषा आणि एक आधुनिक भारतीय भाषा अशा तीन भारतीय भाषांचा अभ्यास करावा लागेल आणि उच्च माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना फक्त दोनच भाषा सक्तीच्या राहतील.

१७. प्रत्येक राज्यातील निवडक शाळामध्ये इंग्रजी सोडून इतर आधुनिक संदर्भ-भाषांचा अभ्यास करण्याची सोय उपलब्ध असली पाहिजे. वरील पर्यायी भाषा इंग्रजी किंवा हिंदी या भाषांऐवजी शिकण्याची व्यवस्था असावी.

१८. हिंदी किंवा इंग्रजीचा अभ्यास ठरविताना तो अभ्यासाचे तास व साधावयाच्या प्रभुत्वाची पातळी यांच्या बैठकीवर आधारण्यात यावा. शासकीय व सहयोगी शासकीय भाषांतील प्रभुत्वाच्या दोन वेगवेगळ्या पातळ्या निश्चित करण्यात याव्या. यापैकी पहिली पातळी तीन वर्षाच्या अभ्यासावर आधारलेली आणि वरिष्ठ पातळी सहा वर्षाच्या अभ्यासक्रमाच्या अखेरीची असावी.

१९. उच्च शिक्षणामध्ये भाषेचा अभ्यास सक्तीचा असू नये.

२०. ऐच्छिक रीतीने हिंदीचा अभ्यास व्हावा यासाठी एक राष्ट्रव्यापी कार्यक्रम आखण्यात आला पाहिजे; तथापि तो शिकण्यास राजी नसलेल्या लोकांवर तिच्या अभ्यासाची सक्ती करण्यात येऊ नये.

२१. निरनिराळ्या भाषांच्या लिप्यांमध्ये फार फरक असल्यामुळे भाषांचा अभ्यास करण्याचे ओझे अतिशय जड होते. ते कमी करण्यासाठी प्रत्येक आधुनिक भारतीय भाषेतील काही साहित्य देवनागरी व रोमन लिपीत प्रसिद्ध करण्यात यावे व सर्व आधुनिक भारतीय भाषांनी आंतरराष्ट्रीय अंक स्वीकारावेत. मातृभाषेच्या

अभ्यासात पाचवी इयत्तेपर्यंत चांगली प्रगती झाल्यानंतरच इंग्रजीच्या अभ्यासास सुरुवात व्हावी. पाचवीच्या अगोदर इंग्रजीच्या अभ्यासाची सुरुवात करणे शैक्षणिक दृष्टया अयोग्य आहे.

२२. संस्कृत आणि अरबी यासारख्या प्राचीन भाषांचा अभ्यास आठव्या इयत्तेपासून ऐच्छिक पद्धतीने करण्यास मान्यता द्यावी आणि भाषांच्या अध्ययनाचे महत्व विद्यापीठ पाळीवर विशेष मानावे. निवडक विद्यापीठांत या भाषांचा प्रगत अभ्यास करण्यासाठी खास केंद्रे सुरू करण्यात आली पाहिजेत. नवीन संस्कृत विद्यापीठ स्थापन करण्यात येऊ नये.

## २. शास्त्राचे व गणिताचे शिक्षण

२३. शाळेतील पहिल्या दहा वर्षात सामान्य शिक्षणाच्या पाठ्यक्रमाचा एक भाग म्हणून शास्त्र आणि गणित या विषयांचा अभ्यास सर्व विद्यार्थ्यांकरिता सक्तीचा करावा.

### शास्त्राचा अभ्यास

२४. निम्न प्राथमिक वर्गात मुलांच्या भोवतालच्या परिस्थितीशी शास्त्राचा अभ्यास जुळता असावा. आंतरराष्ट्रीय मान्यता पावलेली शास्त्रीय मापन पद्धती, नकाशे, तक्ते आणि आकडेवारीचे आलेख इत्यादी कळावेत म्हणून चौथ्या इयत्तेपासून विद्यार्थ्यांना रोमन मुळाक्षरे शिकविली जावीत.

२५. उच्च प्राथमिक शिक्षणाच्या कालखंडात शास्त्राध्यायनाचे व गणताचे उद्दिष्ट ज्ञान मिळविणे, तर्कशुद्ध रीतीने विचार करण्यास शिकणे, निष्कर्ष काढणे व वरच्या दर्जाचे निर्णय घेणे हे असावे. "सामान्य शास्त्र" ( General Science ) शिकविण्याऐवजी प्रत्येक विज्ञानशाखेचा स्वतंत्र अभ्यास करण्याने वरील उद्दिष्ट परिणामकारपणे साधता येईल.

२६. शास्त्राच्या अभ्यासासाठी निम्न प्राथमिक शाळेत शास्त्र शिक्षणाचा स्वतंत्र वर्ग किंवा निदान वर्गाचा एक कोपरा ( Science Corner ) निश्चित करावा आणि उच्च प्राथमिक शाळांत शास्त्राच्या अभ्यासासाठी स्वतंत्र खोली व अभ्यासवर्गासाठी प्रयोगशाळा असावी.

२७. निम्न माध्यमिक शिक्षणकाळात शास्त्राचा अभ्यास हे विद्यार्थ्यांमध्ये मानसिक शिस्त बाणविण्याचे साधन ठरले पाहिजे. पदार्थ विज्ञान, रसायणशास्त्र व जीवशास्त्र यांतील नव्याने उदयास आलेल्या संबोधावर ( concepts ) व शास्त्राध्यायनाच्या प्रायोगिक पद्धतींवर जोर देण्यात यावा.

२८. निवडक निम्न प्राथमिक शाळांमध्ये हुशार विद्यार्थ्यांसाठी प्रगत दर्जाचा शास्त्राचा अभ्यासक्रम शिकविला जावा; त्यासाठी आवश्यक ते शिक्षक व प्रयोगशाळा यांची व्यवस्था व्हावी.

२९. ग्रामीण भागातील शास्त्राचा अभ्यास शेती प्रश्नांशी संलग्न रहावा आणि शहरी भागात तो तंत्रज्ञानाशी संबंधित असावा. तथापि दोन्ही तऱ्हेच्या शाळांतील विज्ञानाच्या अभ्यासातील प्रगती एकाच पातळीची असली पाहिजे आणि दोन्ही शाळांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकडे जाण्याची सारखीच संधी मिळाली पाहिजे.

### गणिताचा अभ्यास

३०. शास्त्रीय आणि औद्योगिक क्षेत्रांतील नव्याने झालेल्या क्रांतीमध्ये सांख्यिक अनुमान, स्वयंचलित यंत्रे आणि यंत्रगणन पद्धतीने निर्णय घेण्याला जे महत्व प्राप्त झाले आहे त्यामुळे गणिताच्या अभ्यासाकडे खास लक्ष देणे आवश्यक झाले आहे.

३१. शिक्षणाच्या सर्व अवस्थांतील गणिताच्या अभ्यासक्रमाचे आधुनिकीकरण होऊन तो अद्यावधिक झाला पाहिजे व त्यामध्ये गणिताची मूलतत्त्वे, सिद्धांत आणि तर्कशुद्ध विचार-पद्धती यावर विशेष जोर देण्यात आला पाहिजे.

### शास्त्र व गणित शिकविण्याच्या पद्धती

३२. शास्त्र व गणित हे विषय शिकविण्यात आधुनिक पद्धतीचा उपयोग करून मूलभूत तत्त्वांचा अभ्यास आणि संशोधन प्रवृत्तींची वाढ यावर भर दिला पाहिजे. शिक्षकांनी हा नवीन दृष्टीकोण अंगीकारावा. यासाठी त्यांना आवश्यक ते मार्गदर्शक साहित्य पुरविण्यात आले पाहिजे. प्रयोगशाळेतील कामाचे स्वरूप यापुढे खूपच सुधारावे लागेल व योग्य त्या रीतीने शिक्षकांना नवी माहिती व अध्यापन कौशल्य द्यावे लागेल. अत्यंत प्रखर बुद्धीच्या विद्यार्थ्यांच्या विशेष गरजा भागविण्यासाठी अभ्यासक्रमात लवचिकपणा ठेवावा लागेल.

## ३. समाजाभ्यास आणि सामिजक शास्त्रे

३३. चांगले नागरिक निर्माण करण्यासाठी आणि राष्ट्रीय एकता सिद्ध करण्यासाठी 'समाजाभ्यास' ( Social Studies ) या विषयात परिणामकारक कार्यक्रम आवश्यक आहे.

३४. राष्ट्रीय ऐक्य व मानवी एकता या कल्पनांवर अभ्यासक्रमास विशेष जोर दिला जावा.

३५. शास्त्रीय प्रवृत्ती आणि सामाजिक शास्त्रांची तर्कपद्धती यांचा मिलाफ 'समाजाभ्यास' हा विषय शिकविताना अनिवार्यतेने प्रतीत व्हावा.

## ४. कार्यानुभव ( Work Experience )

३६. नवीन सामाजिक घडणीचे स्वरूप कसे आहे ते लक्षात घेऊन भविष्यकाळाच्या गरजा भागविणारा कार्यानुभवाचा कार्यक्रम अंमलात यावा. निम्न प्राथमिक अवस्थेत त्याचे स्वरूप केवळ हस्तकौशल्यापुरतेच मर्यादित राहील परंतु उच्च प्राथमिक अवस्थेत मुलांना काही हस्तव्यवसाय दिले पाहिजेत. निम्न माध्यमिक शिक्षण स्तरात त्याचे स्वरूप शाळेतील उद्योगशालेत (work shop) प्रशिक्षण घेण्याचे असेल आणि उच्च माध्यमिक स्तरावर सर्व विद्यार्थ्यांना उद्योगशालेत, शेतावर किंवा व्यापारी व्यवसाय स्थानात, अगर औद्योगिक कारखान्यात, प्रत्यक्ष कामाचा अनुभव घ्यावा लागेल.

३७. ज्या शाळात उद्योगशालेची—वर्कशॉपची—व्यवस्था करता येणार नाही त्या शाळांसाठी आवश्यक अवजारांच्या व उपकरणांच्या पेटया व इतर साहित्य स्वस्त किंमतीत मिळण्याची व्यवस्था केली जावी.

३८. शिक्षकांचे प्रशिक्षण, वर्कशॉपची उभारणी, स्थानिक साधनसंपत्तीचा उपयोग करण्याची योजना, आवश्यक त्या पुस्तकांचे प्रकाशन आणि पायरी-पायरीने अभ्यासक्रम कार्यवाहीत आणण्याची योजना, या सर्व उपक्रमांच्या योग्य सहाय्याने हा कार्यक्रम अपेक्षित यश मिळवू शकेल.

## ५. समाजसेवा ( Social Service )

३९. समाजसेवा व समाजविकास कार्य यांच्या कार्यक्रमाची तरतूद विद्यार्थ्यांच्या वयोमानानुसार सर्व पातळीवर करण्यात यावी आणि टप्प्याटप्प्याने कार्यवाहीत आणावी.

४०. प्रत्येक जिल्ह्यात एक खास संघटना स्थापन करून तिच्या मार्फत श्रमदान व समाजसेवा शिबिरे चालविण्यात यावी. वर्षातून अनेक शिबिरे भरविण्यात यावी. शाळातील विद्यार्थ्यांच्या समाजसेवेचे कार्यक्रम राबविण्यासाठी ही शिबिरे फार उपयुक्त ठरतील. अशा तऱ्हेचे उपक्रम प्रायोगिक स्वरूपात पाच टक्के जिल्ह्यात सुरू करण्यात यावे व नंतर इतर जिल्ह्यामध्ये त्यांचा प्रसार करण्यात यावा.

## ६. शारीरिक शिक्षण

४१. शारीरिक क्षमता, कार्यक्षमता, मानसिक चापल्य आणि चारित्र्याचे काही पैलू विकसित करण्यासाठी शारीरिक शिक्षण महत्त्वाचे ठरते. शारीरिक शिक्षणाची सध्याची योजना व कार्यपद्धती सुसंबद्ध आहे की नाही याची नव्याने पाहणी करून त्यांची पुनर्रचना करावी.

## ७. नैतिक आणि आध्यात्मिक मूल्याविषयी शिक्षण

४२. शाळांतील विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षण देण्याचे व त्यांच्यात आध्यात्मिक मूल्यांची जाणीव निर्माण करण्याचे संघटित प्रयत्न केले पाहिजेत. ही शिकवण प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशा दोन्ही रीतीने द्यावी लागेल. व त्यासाठी वेगवेगळ्या महान धर्मांतील नैतिक शिकवणीचा उपयोग करणे इष्ट ठरेल.

४३. नैतिक व आध्यात्मिक मूल्यांच्या शिक्षणासाठी शालेय वेळापत्रकात आठवड्याला एक दोन तास मुद्दाम दिले पाहिजेत. या विषयाची शिकवण इतर अभ्यासक्रमापासून वेगळी न काढता ती सर्वस्पर्शी राखावी.

## ८. सृजनशील कार्यक्रम

४४. कलाशिक्षण.—देशातील कलाशिक्षणाची आजची स्थिती अभ्यासून त्याच्या पद्धतशीर विकासाची व विस्ताराची योजना आखण्याच्या सर्व प्रकारच्या शक्यतेच्या दृष्टीने शोध घेण्यासाठी एक तज्ज्ञ समिती भारत सरकारने नेमावी. भरपूर स्थानिक सहाय्याच्या आधाराने देशातील सर्व भागात बालभवने सुरू करण्यात यावीत. कलाशिक्षणाच्या क्षेत्रात संशोधन करण्यासाठी निवडक विद्यापीठात कलाविभाग सुरू करण्यात यावेत.

४५. विद्यार्थ्यांना सृजनशीलतेने आत्मप्रकटीकरण करण्याची संधी मिळावी यासाठी त्यांना विविध-स्वरूपाच्या अभ्यासेतर उपक्रमांची सोय करून द्यावी.

## मुलगे आणि मुली यांच्या अभ्यासक्रमातील फरक

४६. राष्ट्रीय स्त्रीशिक्षण मंडळाने शालेय अभ्यासक्रमात लिंगभेदावर आधारलेला वेगळेपणा असून नये अशी जी शिफारस केली आहे ती आम्ही स्वीकारार्ह मानतो. गृहजीवनशास्त्र हा विषय कुणालाही सक्तीचा न करता तो ऐच्छिक ठेवावा. संगीत व इतर ललितकलांच्या अभ्यासाची अधिक सोय केली जावी. त्याचबरोबर गणित व शास्त्र यांच्या अभ्यासास उत्तेजन दिले जावे.

## नवीन अभ्यासक्रम आणि मूलोद्योगी शिक्षण

४७. उत्पादक हस्तव्यवसाय, उत्पादक हस्तव्यवसायाचा व भोवतालच्या परिस्थितीचा अभ्यासक्रमाशी समन्वय, आणि शालेय कार्यक्रम व स्थानिक जनतेचे निकटचे संबंध, ही मूलोद्योगी शिक्षणातील विशेष सूत्रे इतकी महत्त्वाची आहेत की या देशातील सर्व थरातील शैक्षणिक योजनांचे स्वरूप ठरविताना त्याच तत्त्वांचा मार्गदर्शक तत्त्वे म्हणून उपयोग झाला पाहिजे. या अहवालातील सर्व शिफारशींच्या मुळाशी तीच तत्त्वे आहेत. त्यामुळे, शैक्षणिक सोपानाच्या कोणत्याही एका पायरीला 'मूलोद्योग शिक्षण' असे वेगळेपणाचे नाव देण्याची आवश्यकता उरत नाही.

# प्रकरण आठवे

## शालेय शिक्षणातील अभ्यासक्रम

१. गेल्या काही वर्षांत ज्ञानाचा जो उत्स्फोट झाला व विज्ञानक्षेत्रात ज्या अनेक मूलभूत कल्पना नव्याने पुढे मांडण्यात आल्या त्यांच्या संदर्भात पाहू जाता सध्याच्या शालेय अभ्यासक्रमाचा अपुरेपणा प्रकर्षाने स्पष्ट झाला आहे व त्यामुळेच शालेय अभ्यासक्रमात मूलभूत सुधारणा तातडीने करण्याची जोरदार मागणी वाढत्या प्रमाणात पुढे येत आहे. म्हणून शालेय पातळीवरील संपूर्ण अभ्यासक्रमाची नवी रचना एकसंधपणे करण्यावर कटाक्ष ठवला पाहिजे. सामान्य शिक्षणाची नवीन व्याख्या करण्यात आली पाहिजे आणि सामान्य अभ्यासक्रमात विषयतज्ञाला (Specialization) कोणते स्थान द्यावयाचे त्याबाबत नवीन दृष्टिकोन अंगीकारावा लागेल.

### अभ्यासक्रम सुधारण्याती आवश्यक बाबी

२. शालेय अभ्यासक्रमाची गुणवत्ता वाढविण्यासाठी (अ) विद्यापीठातील शिक्षण विभाग, प्रशिक्षण महाविद्यालये, राज्य शिक्षणशास्त्र संस्था, शालेय शिक्षण मंडळे अशा संस्था व संघटनांनी अभ्यासक्रमातील सुधारणेबाबत संशोधन करण्याची जबाबदारी उचलली पाहिजे ; (ब) या संशोधनाच्या आधाराने अभ्यासक्रमाची फेररचना केली पाहिजे ; (क) पाठ्यपुस्तके व अध्यायन-अध्यापनाचे साहित्य तयार झाले पाहिजे ; (ड) सेवांतर्गत प्रशिक्षणाच्याद्वारे शिक्षकांना पुनर्रचित अभ्यासक्रमाचे नवे वळण समजावून दिले पाहिजे.

३. आपापल्या गरजांनुसार नवीन अभ्यासक्रम तयार करण्याचे व तो प्रायोगिक रीतीने उपयोगात आणण्याचे स्वातंत्र्य शाळांना देण्यात यावे. विद्यापीठ आणि प्रशिक्षण महाविद्यालये यांनी आपापल्या प्रायोगिक शाळामध्ये हे उपक्रम सुरू करण्यात पुढाकार घ्यावा.

४. आजच्यापेक्षा अधिक वरच्या पातळीवरील अभ्यासक्रम राज्य शालेय शिक्षण मंडळांनी सर्व विषयांत तयार करावा आणि ज्या शाळा अध्यापकवर्ग आणि इतर साधनसंपत्ती याबाबत लायक ठरतील त्या शाळांमध्ये तो अभ्यासक्रम पायरीपायरीने अंमलात आणावा.

५. शालेय अभ्यासक्रम शिकविणाऱ्या विषय-शिक्षकांच्या संघटना निर्माण करण्याने प्रायोगिक अध्यापन करण्याला उत्तेजन मिळेल आणि अभ्यासक्रमाचा दर्जा वाढविता येईल. अभ्यासक्रमांत भरदारपणा आणण्यासाठी आणि शिक्षकांच्या अंगी प्रयोगशीलता बाणविण्यासाठी निरनिराळे शालेय विषय शिकविणाऱ्या शिक्षकांच्या "विषय-शिक्षण संघटना" उभारण्याने बरेच उत्तेजन मिळेल. राज्यसरकारांचे शिक्षण विभाग, राज्य-शिक्षण शास्त्र संस्था आणि "राष्ट्रीय शिक्षण संशोधन व प्रशिक्षण अनुसंधान" (NCERT) या संस्थांनी शिक्षक संघटनांना त्यांच्या शैक्षणिक कार्यक्रमात मदत करावी आणि आपापल्या अधिकारक्षेत्रातील शिक्षक संघटनांच्या कामात एकसूत्रता आणावी.

### अभ्यासक्रमाची पुनर्घटना

६. सामान्य किंवा बिगर-व्यावसाईक शाळांमध्ये दहा वर्षांचा 'सामान्य शिक्षणा' चा एकच अभ्यासक्रम आखण्यात यावा. विशेष विषयांचा व पर्यायी विषयांचा अभ्यास उच्च माध्यमिक शिक्षणावस्थेतच सुरू व्हावा. शिवाय शिक्षणाच्या प्रत्येक उप-अवस्थेच्या अखेरीस विद्यार्थ्यांची प्रगती किती असली पाहिजे या बाबतीतील निकष काटेकोरपणे ठरविले जावेत.

७. निम्न प्राथमिक शिक्षणाच्या अवस्थेतील अभ्यासक्रमांत भाषाज्ञान आणि प्राथमिक गणित यावर विशेष जोर देण्यात यावा आणि इतर औपचारिक विषयांचे ओझे कमी करण्यात यावे.

८. वाचन शिकविण्याच्या सुरवातीच्या अडचणीचा विशेष अभ्यास केला जावा आणि त्याचबरोबर निम्न प्राथमिक अवस्थेतील वाचनाचे अध्यापन सुधारण्यासाठी फार कसोशीने प्रयत्न करण्यावर भर दिला जावा.

९. उच्च प्राथमिक शिक्षणावस्थेत अभ्यासक्रमाची रुंदी व खोली सहाजिकच अधिक वाढविली जावी. अध्यापनपद्धती जास्त पद्धतशीर व्हाव्यात व विद्यार्थ्यांचे प्रगतीविषयक निकष देखील अधिक निश्चित स्वरूपाचे असावेत.

१०. निम्न माध्यमिक अभ्यासक्रमात प्रत्येक विषयाच्या अभ्यासाला अधिक शिस्तबद्धता आली पाहिजे व विषयज्ञानाची खोलीही अधिक वाढली पाहिजे.

११. सामान्य शिक्षणक्रमाच्या उच्च माध्यमिक अवस्थेत पाठ्य विषयांचे वैविध्य अशा तऱ्हेने साधावे की, त्यामुळे विद्यार्थ्यांना कोणत्याही तीन विषयांच्या गटाचा अभ्यास सखोलतेने करता येईल व विषयांचे गट तयार करण्यात पुष्कळसे स्वातंत्र्य व लवचिकपणा राहील. उदाहरणार्थ, एखादा विद्यार्थी शास्त्र विभागातील कोणत्याही तीन विषयांची निवड करू शकेल ; किंवा शास्त्र आणि मानव्य-विषय या दोन विभागातून कोणतेही तीन विषय घेऊ शकेल. कुमारवयाच्या विद्यार्थ्यांच्या एकूण व्यक्तीमत्वाची समतोल वाढ करण्याचा खात्रीलायक उपाय म्हणून या अवस्थेतील अभ्यासक्रमातील अर्धा वेळ त्यांना ऐच्छिक विषयांच्या अभ्यासासाठी चतुर्थांश वेळ भाषा-अध्ययनासाठी आणि तेवढाच वेळ शारीरिक शिक्षण, कला, छंद, नैतीक आणि आध्यात्मिक शिक्षण यासाठी दिला जावा.

१२. शक्य असेल तेथे आठवी इयत्तेपासूनच्या अभ्यासक्रमाची आखणी दान पातळ्यांवर असावी; एक साधा अभ्यासक्रम आणि दुसरा प्रगत अभ्यासक्रम. त्याखालच्या वर्गामध्ये म्हणजे पाचवीपासून पुढे, विशेष हुशार विद्यार्थ्यांसाठी अधिक समृद्ध अभ्यासयोजना आखली पाहिजे. तिचे स्वरूप विविध प्रकारचे राहील. विद्यार्थ्यांस कधी पुरवणी विषय निवडता येतील किंवा नेहमीच्या अभ्यासक्रमातील एखाद्या विषयाचे सखोल अध्ययन करता येईल. हा जादा अभ्यास शालेय वेळापत्रकात किंवा त्या वेळेच्या बाहेर किंवा स्वाध्याय पद्धतीने पुरा करावयाची योजना आखावी. या कार्यक्रमाचा आरंभ निम्न माध्यमिक पातळीवर गणित, शास्त्र व भाषा यांच्या प्रगत अभ्यासक्रमाने करावा आणि उच्च माध्यमिक शिक्षणक्रमातील विशेषज्ञतेचे सर्वच विषय अशा प्रगत अभ्यासामध्ये अंतर्भूत केले जावेत.

## निरनिराळ्या विषयांच्या अभ्यासाबाबतची खास वैशिष्ट्ये

### १. भाषांचा अभ्यास

१३. शालेय अवस्थेतील भाषा शिक्षणाची फेरपाहणी करण्याची व (फार काळपर्यंत या देशात इंग्रजीत भाषेचा वापर साहाय्यक शासकीय भाषा म्हणून करण्यात आल्यामुळे) या अवस्थेतील भाषाध्ययनाच्या बाबतीत नवीन धोरण आखण्याची गरज निर्माण झाली आहे.

१४. भाषाविषयक संकेताची पुढे दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार फेरआखणी करण्यात] यावी :—

(१) भारतीय संघराज्याची अधिकृत भाषा म्हणून मातृभाषेच्या खालोखाल हिंदीचे महत्त्व मानले जावे.

इंग्रजीचे कामचलाऊ ज्ञान विद्यार्थ्यांच्या फायद्याचे ठरणार] आहे.

(३) कोणत्याही भाषेवरील प्रभुत्वाची प्रगती ती भाषा किती वर्षे शिकण्यात येते यावर जेवढी अवलंबून आहे तेवढीच ती कोणत्या तऱ्हेच्या साधनांच्या मदतीने व कोणत्या प्रकारच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शिकण्यात येते यावरही अवलंबून आहे.

(४) कनिष्ठ माध्यमिक शाळांतील कालखंड (इ. ८ ते १०) हाच नव्या भाषा शिकण्यासाठी अत्यंत योग्य असा आहे. या स्तरावर इंग्रजीच्या शिक्षकांची संख्या कमी लागेल.

(५) दोन जादा भाषा शिकविण्याची सुरूवात एका पाठोपाठ दुसरी अशा क्रमाने करण्यात यावी.

(६) हिंदी किंवा इंग्रजी भाषेच्या शिक्षणाची सुरूवात ज्यावेळी त्याची खरी गरज भासत असेल व ज्यावेळी त्या भाषेच्या अध्ययनासाठी विद्यार्थी विशेष हेतूने प्रेरित झाला असेल तेव्हांच करावी.

(७) कोणत्याही इयत्तेत एकाच वेळी चार भाषा सक्तीने शिकविण्यात येऊ नयेत.

१५. वरील तत्वानुसार फेरबदल केलेल्या त्रिभाषासूत्रात पुढील बाबी अंतर्भूत होतील: (अ) मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा; (ब) भारतीय संघराज्याची अधिकृत शासकीय भाषा किंवा संघराज्याची (जोपर्यंत अशी भाषा राहणार आहे तोपर्यंत) "सहयोगी" शासकीय भाषा आणि (क) वर दिलेल्या (अ) व (ब) मध्ये अंतर्भूत न होणारी व शिक्षणाचे माध्यम नसलेली कोणतीही आधुनिक भारतीय किंवा युरोपियन भाषा.

१६. साधारणतः निम्न प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्याला फक्त मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा अशा एकाच भाषेचा अभ्यास करावा लागेल; उच्च प्राथमिक शिक्षणावस्थेत विद्यार्थ्याला दोन भाषा शिकाव्या लागतील. मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा आणि शासकीय किंवा सहयोगी शासकीय भाषा. निम्न माध्यमिक शिक्षण स्तरातील विद्यार्थ्यास मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा, शासकीय किंवा सहयोगी शासकीय भाषा आणि एक आधुनिक भारतीय भाषा अशा तीन भारतीय भाषांचा अभ्यास करावा लागेल आणि उच्च माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना फक्त दोनच भाषा सक्तीच्या राहतील.

१७. प्रत्येक राज्यातील निवडक शाळामध्ये इंग्रजी सोडून इतर आधुनिक संदर्भ-भाषांचा अभ्यास करण्याची सोय उपलब्ध असली पाहिजे. वरील पर्यायी भाषा इंग्रजी किंवा हिंदी या भाषांऐवजी शिकण्याची व्यवस्था असावी.

१८. हिंदी किंवा इंग्रजीचा अभ्यास ठरविताना तो अभ्यासाचे तास व साधावयाच्या प्रभुत्वाची पातळी यांच्या बैठकीवर आधारण्यात यावा. शासकीय व सहयोगी शासकीय भाषांतील प्रभुत्वाच्या दोन वेगवेगळ्या पातळ्या निश्चित करण्यात याव्या. यापैकी पहिली पातळी तीन वर्षांच्या अभ्यासावर आधारलेली आणि वरिष्ठ पातळी सहा वर्षांच्या अभ्यासक्रमाच्या अखेरीची असावी.

१९. उच्च शिक्षणामध्ये भाषेचा अभ्यास सक्तीचा असू नये.

२०. ऐच्छिक रीतीने हिंदीचा अभ्यास व्हावा यासाठी एक राष्ट्रव्यापी कार्यक्रम आखण्यात आला पाहिजे; तथापि तो शिकण्यास राजी नसलेल्या लोकांवर तिच्या अभ्यासाची सक्ती करण्यात येऊ नये.

२१. निरनिराळ्या भाषांच्या लिप्यांमध्ये फार फरक असल्यामुळे भाषांचा अभ्यास करण्याचे ओझे अतिशय जड होते. ते कमी करण्यासाठी प्रत्येक आधुनिक भारतीय भाषेतील काही साहित्य देवनागरी व रोमन लिपीत प्रसिद्ध करण्यात यावे व सर्व आधुनिक भारतीय भाषांनी आंतरराष्ट्रीय अंक स्वीकारावेत. मातृभाषेच्या

अभ्यासात पाचवी इयत्तेपर्यंत चांगली प्रगती झाल्यानंतरच इंग्रजीच्या अभ्यासास सुरुवात व्हावी. पाचवीच्या अगोदर इंग्रजीच्या अभ्यासाची सुरुवात करणे शैक्षणिक दृष्टया अयोग्य आहे.

२२. संस्कृत आणि अरबी यासारख्या प्राचीन भाषांचा अभ्यास आठव्या इयत्तेपासून ऐच्छिक पद्धतीने करण्यास मान्यता द्यावी आणि भाषांच्या अध्ययनाचे महत्व विद्यापीठ पातळीवर विशेष मानावे. निवडक विद्यापीठांत या भाषांचा प्रगत अभ्यास करण्यासाठी खास केंद्रे सुरू करण्यात आली पाहिजेत. नवीन संस्कृत विद्यापीठ स्थापन करण्यात येऊ नये.

## २. शास्त्राचे व गणिताचे शिक्षण

२३. शाळेतील पहिल्या दहा वर्षात सामान्य शिक्षणाच्या पाठ्यक्रमाचा एक भाग म्हणून शास्त्र आणि गणित या विषयांचा अभ्यास सर्व विद्यार्थ्यांकरिता सक्तीचा करावा.

### शास्त्राचा अभ्यास

२४. निम्न प्राथमिक वर्गात मुलांच्या भोवतालच्या परिस्थितीशी शास्त्राचा अभ्यास जुळता असावा. आंतरराष्ट्रीय मान्यता पावलेली शास्त्रीय मापन पद्धती, नकाशे, तक्ते आणि आकडेवारीचे आलेख इत्यादी कळावेत म्हणून चौथ्या इयत्तेपासून विद्यार्थ्यांना रोमन मुळाक्षरे शिकविली जावीत.

२५. उच्च प्राथमिक शिक्षणाच्या कालखंडात शास्त्राध्यायनाचे व गणताचे उद्दिष्ट ज्ञान मिळविणे, तर्कशुद्ध रीतीने विचार करण्यास शिकणे, निष्कर्ष काढणे व वरच्या दर्जाचे निर्णय घेणे हे असावे. "सामान्य शास्त्र" ( General Science ) शिकविण्याऐवजी प्रत्येक विज्ञानशाखेचा स्वतंत्र अभ्यास करण्याने वरील उद्दिष्ट परिणामकारपणे साधता येईल.

२६. शास्त्राच्या अभ्यासासाठी निम्न प्राथमिक शाळेत शास्त्र शिक्षणाचा स्वतंत्र वर्ग किंवा निदान वर्गाचा एक कोपरा ( Science Corner ) निश्चित करावा आणि उच्च प्राथमिक शाळांत शास्त्राच्या अभ्यासासाठी स्वतंत्र खोली व अभ्यासवर्गासाठी प्रयोगशाळा असावी.

२७. निम्न माध्यमिक शिक्षणकाळात शास्त्राचा अभ्यास हे विद्यार्थ्यांमध्ये मानसिक शिस्त बाणविण्याचे साधन ठरले पाहिजे. पदार्थ विज्ञान, रसायणशास्त्र व जीवशास्त्र यांतील नव्याने उदयास आलेल्या संबोधावर ( concepts ) व शास्त्राध्यायनाच्या प्रायोगिक पद्धतींवर जोर देण्यात यावा.

२८. निवडक निम्न प्राथमिक शाळांमध्ये हुशार विद्यार्थ्यांसाठी प्रगत दर्जाचा शास्त्राचा अभ्यासक्रम शिकविला जावा; त्यासाठी आवश्यक ते शिक्षक व प्रयोगशाळा यांची व्यवस्था व्हावी.

२९. ग्रामीण भागातील शास्त्राचा अभ्यास शेती प्रश्नांशी संलग्न रहावा आणि शहरी भागात तो तंत्रज्ञानाशी संबंधित असावा. तथापि दोन्ही तऱ्हेच्या शाळांतील विज्ञानाच्या अभ्यासातील प्रगती एकाच पातळीची असली पाहिजे आणि दोन्ही शाळांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकडे जाण्याची सारखीच संधी मिळाली पाहिजे.

### गणिताचा अभ्यास

३०. शास्त्रीय आणि औद्योगिक क्षेत्रातील नव्याने झालेल्या क्रांतीमध्ये सांख्यिक अनुमान, स्वयंचलित यंत्रे आणि यंत्रगणन पद्धतीने निर्णय घेण्याला जे महत्व प्राप्त झाले आहे त्यामुळे गणिताच्या अभ्यासाकडे खास लक्ष देणे आवश्यक झाले आहे.

३१. शिक्षणाच्या सर्व अवस्थांतील गणिताच्या अभ्यासक्रमाचे आधुनिकीकरण होऊन तो अद्यावधिक झाला पाहिजे व त्यामध्ये गणिताची मूलतत्त्वे, सिद्धांत आणि तर्कशुद्ध विचार-पद्धती यावर विशष जोर देण्यात आला पाहिजे.

### शास्त्र व गणित शिकविण्याच्या पद्धती

३२. शास्त्र व गणित हे विषय शिकविण्यात आधुनिक पद्धतीचा उपयोग करून मूलभूत तत्त्वांचा अभ्यास आणि संशोधन प्रवृत्तींची वाढ यावर भर दिला पाहिजे. शिक्षकांनी हा नवीन दृष्टीकोण अंगीकारावा. यासाठी त्यांना आवश्यक ते मार्गदर्शक साहित्य पुरविण्यात आले पाहिजे. प्रयोगशाळेतील कामाचे स्वरूप यापुढे खूपच सुधारावे लागेल व योग्य त्या रीतीने शिक्षकांना नवी माहिती व अध्यापन कौशल्य द्यावे लागेल. अत्यंत प्रखर बुद्धीच्या विद्यार्थ्यांच्या विशेष गरजा भागविण्यासाठी अभ्यासक्रमात लवचिकपणा ठेवावा लागेल.

## ३. समाजाभ्यास आणि सामिजक शास्त्रे

३३. चांगले नागरिक निर्माण करण्यासाठी आणि राष्ट्रीय एकता सिद्ध करण्यासाठी 'समाजाभ्यास' ( Social Studies ) या विषयात परिणामकारक कार्यक्रम आवश्यक आहे.

३४. राष्ट्रीय ऐक्य व मानवी एकता या कल्पनांवर अभ्यासक्रमास विशेष जोर दिला जावा.

३५. शास्त्रीय प्रवृत्ती आणि सामाजिक शास्त्रांची तर्कपद्धती यांचा मिलाफ 'समाजाभ्यास' हा विषय शिकविताना अनिवार्यतेने प्रतीत व्हावा.

### ४. कार्यानुभव ( Work Experience )

३६. नवीन सामाजिक घडणीचे स्वरूप कसे आहे ते लक्षात घेऊन भविष्यकाळाच्या गरजा भागविणारा कार्यानुभवाचा कार्यक्रम अंमलात यावा. निम्न प्राथमिक अवस्थेत त्याचे स्वरूप केवळ हस्तकौशल्यापुरतेच मर्यादित राहील परंतु उच्च प्राथमिक अवस्थेत मुलांना काही हस्तव्यवसाय दिले पाहिजेत. निम्न माध्यमिक शिक्षण स्तरात त्याचे स्वरूप शाळेतील उद्योगशालेत (work shop) प्रशिक्षण घेण्याचे असेल आणि उच्च माध्यमिक स्तरावर सर्व विद्यार्थ्यांना उद्योगशालेत, शेतावर किंवा व्यापारी व्यवसाय स्थानात, अगर औद्योगिक कारखान्यात, प्रत्यक्ष कामाचा अनुभव घ्यावा लागेल.

३७. ज्या शाळात उद्योगशालेची—वर्कशॉपची—व्यवस्था करता येणार नाही त्या शाळांसाठी आवश्यक अवजारांच्या व उपकरणांच्या पेटया व इतर साहित्य स्वस्त किंमतीत मिळण्याची व्यवस्था केली जावी.

३८. शिक्षकांचे प्रशिक्षण, वर्कशॉपची उभारणी, स्थानिक साधनसंपत्तीचा उपयोग करण्याची योजना, आवश्यक त्या पुस्तकांचे प्रकाशन आणि पायरी-पायरीने अभ्यासक्रम कार्यवाहीत आणण्याची योजना, या सर्व उपक्रमांच्या योग्य सहाय्याने हा कार्यक्रम अपेक्षित यश मिळवू शकेल.

### ५. समाजसेवा ( Social Service )

३९. समाजसेवा व समाजविकास कार्य यांच्या कार्यक्रमाची तरतूद विद्यार्थ्यांच्या वयोमानानुसार सर्व पातळीवर करण्यात यावी आणि टप्प्याटप्प्याने कार्यवाहीत आणावी.

४०. प्रत्येक जिल्ह्यात एक खास संघटना स्थापन करून तिच्या मार्फत श्रमदान व समाजसेवा शिबिरे चालविण्यात यावी. वर्षातून अनेक शिबिरे भरविण्यात यावी. शाळातील विद्यार्थ्यांच्या समाजसेवेचे कार्यक्रम राबविण्यासाठी ही शिबिरे फार उपयुक्त ठरतील. अशा तऱ्हेचे उपक्रम प्रायोगिक स्वरूपात पाच टक्के जिल्ह्यात सुरू करण्यात यावे व नंतर इतर जिल्ह्यामध्ये त्यांचा प्रसार करण्यात यावा.

### ६. शारीरिक शिक्षण

४१. शारीरिक क्षमता, कार्यक्षमता, मानसिक चापल्य आणि चारित्र्याचे काही पैलू विकसित करण्यासाठी शारीरिक शिक्षण महत्त्वाचे ठरते. शारीरिक शिक्षणाची सध्याची योजना व कार्यपद्धती सुसंबद्ध आहे की नाही याची नव्याने पाहणी करून त्यांची पुनर्रचना करावी.

### ७. नैतिक आणि आध्यात्मिक मूल्याविषयी शिक्षण

४२. शाळांतील विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षण देण्याचे व त्यांच्यात आध्यात्मिक मूल्यांची जाणीव निर्माण करण्याचे संघटित प्रयत्न केले पाहिजेत. ही शिकवण प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशा दोन्ही रीतीने द्यावी लागेल. व त्यासाठी वेगवेगळ्या महान धर्मांतील नैतिक शिकवणीचा उपयोग करणे इष्ट ठरेल.

४३. नैतिक व आध्यात्मिक मूल्यांच्या शिक्षणासाठी शालेय वेळापत्रकात आठवड्याला एक दोन तास मुद्दाम दिले पाहिजेत. या विषयाची शिकवण इतर अभ्यासक्रमापासून वेगळी न काढता ती सर्वस्पर्शी राखावी.

### ८. सृजनशील कार्यक्रम

४४. **कलाशिक्षण.**—देशातील कलाशिक्षणाची आजची स्थिती अभ्यासून त्याच्या पद्धतशीर विकासची व विस्ताराची योजना आखण्याच्या सर्व प्रकारच्या शक्यतेच्या दृष्टीने शोध घेण्यासाठी एक तज्ज्ञ समिती भारत सरकारने नेमावी. भरपूर स्थानिक सहाय्याच्या आधाराने देशातील सर्व भागात बालभवने सुरू करण्यात यावीत. कलाशिक्षणाच्या क्षेत्रात संशोधन करण्यासाठी निवडक विद्यापीठात कलाविभाग सुरू करण्यात यावेत.

४५. विद्यार्थ्यांना सृजनशीलतेने आत्मप्रकटीकरण करण्याची संधी मिळावी यासाठी त्यांना विविध-स्वरूपाच्या अभ्यासेतर उपक्रमांची सोय करून द्यावी.

### मुलगे आणि मुली यांच्या अभ्यासक्रमातील फरक

४६. राष्ट्रीय स्त्रीशिक्षण मंडळाने शालेय अभ्यासक्रमात लिंगभेदावर आधारलेला वेगळेपणा असून नये अशी जी शिफारस केली आहे ती आम्ही स्वीकारार्ह मानतो. गृहजीवनशास्त्र हा विषय कुणालाही सक्तीचा न करता तो ऐच्छिक ठेवावा. संगीत व इतर ललितकलांच्या अभ्यासाची अधिक सोय केली जावी. त्याचबरोबर गणित व शास्त्र यांच्या अभ्यासास उत्तेजन दिले जावे.

### नवीन अभ्यासक्रम आणि मूलोद्योगी शिक्षण

४७. उत्पादक हस्तव्यवसाय, उत्पादक हस्तव्यवसायाचा व भोवतालच्या परिस्थितीचा अभ्यासक्रमाशी समन्वय, आणि शालेय कार्यक्रम व स्थानिक जनतेचे निकटचे संबंध, ही मूलोद्योगी शिक्षणातील विशेष सूत्रे इतकी महत्त्वाची आहेत की या देशातील सर्व थरातील शैक्षणिक योजनांचे स्वरूप ठरविताना त्याच तत्त्वांचा मार्गदर्शक तत्त्वे म्हणून उपयोग झाला पाहिजे. या अहवालातील सर्व शिफारशींच्या मुळाशी तीच तत्त्वे आहेत. त्यामुळे, शैक्षणिक सोपानाच्या कोणत्याही एका पायरीला 'मूलोद्योग शिक्षण' असे वेगळेपणाचे नाव देण्याची आवश्यकता उरत नाही.

# प्रकरण नववे

## शिक्षणपध्दती, मार्गदर्शन व मूल्यमापन

१. अभ्यासक्रमाची सखोलता वाढविण्याच्या उपक्रमाच्या जोडीलाच तो अभ्यासक्रम शिकविण्याच्या व मूल्यमापनाच्या पद्धतीतही खूप प्रभावीपणे सुधारणा केली पाहिजे.

२. शिक्षणपद्धतीतील ठोकळेबाजपणा आणि शाळांमध्ये नवीन शैक्षणिक उपक्रम सुरू करण्यातील शासकीय यंत्रणेचे अपयश या गोष्टी आजच्या शालेय शिक्षणाच्या मलूलपणाची व निष्प्रभावित्वाची मुख्य कारणे होत. शिक्षणातील या दुर्बलतेवर मात करण्यात आली पाहिजे.

### लवचिकपणा आणि गतिमानता

३. चांगली शैक्षणिक पद्धती पुरेशी गतिमान लवचिक आणि शिक्षण संस्था आणि शिक्षक यांना आप-आपल्या वेगळ्या पातळीवर पुढे जाण्यात साहाय्य करण्याइतकी विवेकप्रधान असावी लागते. अशा पद्धतीतूनच चांगल्या शाळांना सजनशील आणि प्रयोगात्मक प्रयत्न करण्यास साहाय्य होते आणि दुर्बल शाळांना व शिक्षकांना सुरक्षिततेची भावना लाभू शकते.

४. शासकीय अधिकाऱ्यांचा पाठिंबा, सुधारणेचे वातावरण, संस्था-प्रमुखांचे उत्तेजन, पाठ्यविषयावर भरपूर प्रभुत्व, शिक्षक-प्रशिक्षण संस्थांचे नेतृत्व आणि शैक्षणिक साधनांची उपलब्धता या गोष्टी जर प्रयोगशील शिक्षकाला लाभल्या तरच शिक्षणामध्ये लवचिकपणा व गतिमानता ही साधता येतात.

### नवीन पद्धतीचे प्रसारण

५. नव्याने विकास पावलेल्या पद्धतींचा शाळाशाळांतून प्रसार झाला नाही आणि नवनवीन उपक्रमांचा उपयोग करून पहाण्यासाठी शिक्षकांना जाणत्या मार्गदर्शकाकडून साहाय्य दिले गेले नाही तर शैक्षणिक क्षेत्रातील लवचिकपणाला काहीच महत्त्व राहणार नाही.

६. शिक्षणाच्या नवीन पद्धतींचा जलद प्रसार व्हावा यासाठी शैक्षणिक प्रशासनाने (१) शिक्षकांना परोपरीने त्या पद्धतींचा उपयोग पटवून दिला पाहिजे. व पद्धतीविषयक स्वातंत्र्यही दिले पाहिजे, (२) शाळांच्या कुवतीनुसार पायरीपायरीने नवीन पद्धतींचा अवलंब करण्याविषयी तजवीज केली पाहिजे ; (३) शिक्षकांना योग्य तऱ्हेचे सेवांतर्गत प्रशिक्षण दिले पाहिजे ; आणि (४) योग्य ते मार्गदर्शक वाचन-साहित्य पुरवून त्याचे सातत्याने नूतनीकरण व सुधारण केली पाहिजे. परंतु पुरोगामी म्हणून मान्य करण्यात आलेल्या नवीन अध्यापन-तंत्राची पुन्हा एक परंपरागत रूढी होऊन बसणार नाही याविषयी प्रशासकाने अत्यंत दक्षता दाखविली पाहिजे.

### पाठ्यपुस्तके, शिक्षकांसाठी मार्गदर्शक साहित्य आणि शैक्षणिक साधने

७. उत्तम प्रतीची पाठ्यपुस्तके व अध्यापन अध्ययनाची इतर साधने यांचा पुरवठा करण्याचा कार्यक्रम म्हणजे कमी खर्चात शिक्षणचा दर्जा सुधारण्याची गुरुकिल्ली मानली पाहिजे.

८. "राष्ट्रीय शिक्षण संशोधन व प्रशिक्षण मंडळ" (NCERT) या संस्थेने ज्या प्रकाराने सध्या पाठ्य-पुस्तकांच्या निर्मितीचे कार्य चालविले आहे त्याच धर्तीवर देशातील सर्वोत्कृष्ट विद्वानांचे कर्तृत्व राष्ट्रीय पातळीवर एकवटून पाठ्यपुस्तके निर्मितीचा सर्वंकष कार्यक्रम अंमलात आणला पाहिजे. अशा पाठ्यपुस्तकांमुळे शिक्षणाच्या अपेक्षित दर्जाची व्याख्या करणे व त्यांचे प्रत्यक्ष स्वरूप दर्शविणे सोपे जाईल. राष्ट्रीय एकात्मतेच्या कार्यातही त्यांचे साह्य होईल. केंद्रीय शिक्षणमंत्रालयाने या दृष्टीने पुढाकार घेऊन राष्ट्रीय पातळीवर शास्त्रीय आणि तांत्रिक विषयातील पुस्तके तयार करून ती व्यापारी पद्धतीने प्रकाशित करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रात एक स्वायत्त संघटना उभारली पाहिजे. या प्रकल्पाची सविस्तर आखणी करण्यासाठी एक छोटी समिती नेमण्यात यावी.

९. राष्ट्रीय पातळीवरून होणाऱ्या या उपक्रमास साह्य देऊन त्याचे क्षेत्र वाढविण्यासाठी प्रत्येक राज्य सरकारने पाठ्यपुस्तक निर्मितीसाठी सुयोग्य असा एक विभाग सुरू करावा.

१०. पाठ्यपुस्तके तयार करणे, ती प्रायोगिक रीत्या वापरून पाहाणे आणि त्यांच्या गुणावगुणाचे मूल्य-मापन करणे ही राज्य सरकारच्या शिक्षणविभागाची जबाबदारी मानली जावी ; पाठ्यपुस्तके तयार करण्याचे काम शक्य तेथे राज्य सरकारच्या शिक्षणविभागानेच स्वतःच्या छापखान्याची उभारणी करून सांभाळावी. पाठ्यपुस्तकांची विक्री व वाटप करण्याचे काम सरकारने स्वतः न करता ते विद्यार्थ्यांच्या सहकारी भांडारावर सोपवावे.

११. राज्य पातळीवरील पाठ्यपुस्तके व अध्यापन-साहित्य तयार करण्याचे काम शिक्षण विभागाच्या सहकार्याने चालणाऱ्या एखाद्या स्वायत्त यंत्रणेकडे दिले जावे.

१२. पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीसाठी यंत्रणा तयार करताना तिच्याकडून पुस्तकांची सुधारणा सतत होत राहील अशी अंतर्गत व्यवस्था त्यात ठेवावी.

३४. राष्ट्रीय ऐक्य व मानवी एकता या कल्पनांवर अभ्यासक्रमास विशेष जोर दिला जावा.

३५. शास्त्रीय प्रवृत्ती आणि सामाजिक शास्त्रांची तर्कपद्धती यांचा मिलाफ 'समाजाभ्यास' हा विषय शिकविताना अनिवार्यतेने प्रतीत व्हावा.

### ४. 'कार्यानुभव ( Work Experience )

३६. नवीन सामाजिक घडणीचे स्वरूप कसे आहे ते लक्षात घेऊन भविष्यकाळाच्या गरजा भागविणारा कार्यानुभवाचा कार्यक्रम अंमलात यावा. निम्न प्राथमिक अवस्थेत त्याचे स्वरूप केवळ हस्तकौशल्यापुरतेच मर्यादित राहील परंतु उच्च प्राथमिक अवस्थेत मुलांना काही हस्तव्यवसाय दिले पाहिजेत. निम्न माध्यमिक शिक्षण स्तरात त्याचे स्वरूप शाळेतील उद्योगशालेत (work shop) प्रशिक्षण घेण्याचे असेल आणि उच्च माध्यमिक स्तरावर सर्व विद्यार्थ्यांना उद्योगशालेत, शेतावर किंवा व्यापारी व्यवसाय स्थानात, अगर औद्योगिक कारखान्यात, प्रत्यक्ष कामाचा अनुभव घ्यावा लागेल.

३७. ज्या शाळात उद्योगशालेची—वर्कशॉपची—व्यवस्था करता येणार नाही त्या शाळांसाठी आवश्यक अवजारांच्या व उपकरणांच्या पेटचा व इतर साहित्य स्वस्त किंमतीत मिळण्याची व्यवस्था केली जावी.

३८. शिक्षकांचे प्रशिक्षण, वर्कशॉपची उभारणी, स्थानिक साधनसंपत्तीचा उपयोग करण्याची योजना, आवश्यक त्या पुस्तकांचे प्रकाशन आणि पायरी-पायरीने अभ्यासक्रम कार्यवाहीत आणण्याची योजना, या सर्व उपक्रमांच्या योग्य सहाय्याने हा कार्यक्रम अपेक्षित यश मिळवू शकेल.

### ५. समाजसेवा ( Social Service )

३९. समाजसेवा व समाजविकास कार्य यांच्या कार्यक्रमाची तरतूद विद्यार्थ्यांच्या वयोमानानुसार सर्व पातळीवर करण्यात यावी आणि टप्प्याटप्प्याने कार्यवाहीत आणावी.

४०. प्रत्येक जिल्ह्यात एक खास संघटना स्थापन करून तिच्या मार्फत श्रमदान व समाजसेवा शिबिरे चालविण्यात यावी. वर्षातून अनेक शिबिरे भरविण्यात यावी. शाळांतील विद्यार्थ्यांच्या समाजसेवेचे कार्यक्रम राबविण्यासाठी ही शिबिरे फार उपयुक्त ठरतील. अशा तऱ्हेचे उपक्रम प्रायोगिक स्वरूपात पाच टक्के जिल्ह्यात सुरू करण्यात यावे व नंतर इतर जिल्ह्यामध्ये त्यांचा प्रसार करण्यात यावा.

### ६. शारीरिक शिक्षण

४१. शारीरिक क्षमता, कार्यक्षमता, मानसिक चापल्य आणि चारित्र्याचे काही पैलू विकसित करण्यासाठी शारीरिक शिक्षण महत्त्वाचे ठरते. शारीरिक शिक्षणाची सध्याची योजना व कार्यपद्धती सुसंबद्ध आहे की नाही याची नव्याने पाहणी करून त्याची पुनर्रचना करावी.

### ७. नैतिक आणि आध्यात्मिक मूल्याविषयी शिक्षण

४२. शाळांतील विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षण देण्याचे व त्यांच्यात आध्यात्मिक मूल्यांची जाणीव निर्माण करण्याचे संघटित प्रयत्न केले पाहिजेत. ही शिकवण प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशा दोन्ही रीतीने द्यावी लागेल. व त्यासाठी वेगवेगळ्या महान धर्मांतील नैतिक शिकवणीचा उपयोग करणे इष्ट ठरेल.

४३. नैतिक व आध्यात्मिक मूल्यांच्या शिक्षणासाठी शालेय वेळापत्रकात आठवड्याला एक दोन तास मुद्दाम दिले पाहिजेत. या विषयाची शिकवण इतर अभ्यासक्रमापासून वेगळी न काढता ती सर्वस्पर्शी राखावी.

### ८. सृजनशील कार्यक्रम

४४. कलाशिक्षण.—देशातील कलाशिक्षणाची आजची स्थिती अभ्यासून त्याच्या पद्धतशीर विकासाची व विस्ताराची योजना आखण्याच्या सर्व प्रकारच्या शक्यतेच्या दृष्टीने शोध घेण्यासाठी एक तज्ज्ञ समिती भारत सरकारने नेमावी. भरपूर स्थानिक सहाय्याच्या आधाराने देशातील सर्व भागात बालभवने सुरू करण्यात यावीत. कलाशिक्षणाच्या क्षेत्रात संशोधन करण्यासाठी निवडक विद्यापीठात कलाविभाग सुरू करण्यात यावेत.

४५. विद्यार्थ्यांना सृजनशीलतेने आत्मप्रकटीकरण करण्याची संधी मिळावी यासाठी त्यांना विविध-स्वरूपाच्या अभ्यासेतर उपक्रमांची सोय करून द्यावी.

### मुलगे आणि मुली यांच्या अभ्यासक्रमातील फरक

४६. राष्ट्रीय स्त्रीशिक्षण मंडळाने शालेय अभ्यासक्रमात लिंगभेदावर आधारलेला वेगळेपणा असून नये अशी जी शिफारस केली आहे ती आम्ही स्वीकारार्ह मानतो. गृहजीवनशास्त्र हा विषय कुणालाही सक्तीचा न करता तो ऐच्छिक ठेवावा. संगीत व इतर ललितकलांच्या अभ्यासाची अधिक सोय केली जावी. त्याचबरोबर गणित व शास्त्र यांच्या अभ्यासास उत्तेजन दिले जावे.

### नवीन अभ्यासक्रम आणि मूलोद्योगी शिक्षण

४७. उत्पादक हस्तव्यवसाय, उत्पादक हस्तव्यवसायाचा व भोवतालच्या परिस्थितीचा अभ्यासक्रमाशी समन्वय, आणि शालेय कार्यक्रम व स्थानिक जनतेचे निकटचे संबंध, ही मूलोद्योगी शिक्षणातील विशेष सूत्रे इतकी महत्त्वाची आहेत की या देशातील सर्व थरातील शैक्षणिक योजनांचे स्वरूप ठरविताना त्याच तत्त्वांचा मार्गदर्शक तत्त्वे म्हणून उपयोग झाला पाहिजे. या अहवालातील सर्व शिफारशींच्या मुळाशी तीच तत्त्वे आहेत. त्यामुळे, शैक्षणिक सोपानाच्या कोणत्याही एका पायरीला 'मूलोद्योग शिक्षण' असे वेगळेपणाचे नाव देण्याची आवश्यकता उरत नाही.

## प्रकरण नववें

# शिक्षणपध्दती, मार्गदर्शन व मूल्यमापन

१. अभ्यासक्रमाची सखोलता वाढविण्याच्या उपक्रमाच्या जोडीलाच तो अभ्यासक्रम शिकविण्याच्या व मूल्यमापनाच्या पद्धतीतही खूप प्रभावीपणे सुधारणा केली पाहिजे.

२. शिक्षणपद्धतीतील ठोकळबाजपणा आणि शाळांमध्ये नवीन शैक्षणिक उपक्रम सुरू करण्यातील शासकीय यंत्रणेचे अपयश या गोष्टी आजच्या शालेय शिक्षणाच्या मलूलपणाची व निष्प्रभावित्वाची मुख्य कारणे होत. शिक्षणातील या दुर्बलतेवर मात करण्यात आली पाहिजे.

### लवचिकपणा आणि गतिमानता

३. चांगली शैक्षणिक पद्धती पुरेशी गतिमान लवचिक आणि शिक्षण संस्था आणि शिक्षक यांना आप-आपल्या वेगळ्या पातळीवर पुढे जाण्यात साहाय्य करण्याइतकी विवेकप्रधान असावी लागते. अशा पद्धतीतूनच चांगल्या शाळांना सजनशील आणि प्रयोगात्मक प्रयत्न करण्यास साहाय्य होते आणि दुर्बल शाळांना व शिक्षकांना सुरक्षिततेची भावना लाभू शकते.

४. शासकीय अधिकाऱ्यांचा पाठिंबा, सुधारणेचे वातावरण, संस्था-प्रमुखांचे उत्तेजन, पाठ्यविषयावर भरपूर प्रभुत्व, शिक्षक-प्रशिक्षण संस्थांचे नेतृत्व आणि शैक्षणिक साधनांची उपलब्धता या गोष्टी जर प्रयोगशील शिक्षकाला लाभल्या तरच शिक्षणामध्ये लवचिकपणा व गतिमानता ही साधता येतात.

### नवीन पद्धतीचे प्रसारण

५. नव्याने विकास पावलेल्या पद्धतींचा शाळाशाळांतून प्रसार झाला नाही आणि नवनवीन उपक्रमांचा उपयोग करून पहाण्यासाठी शिक्षकांना जाणत्या मार्गदर्शकाकडून साहाय्य दिले गेले नाही तर शैक्षणिक क्षेत्रातील लवचिकपणाला काहीच महत्त्व राहणार नाही.

६. शिक्षणाच्या नवीन पद्धतींचा जलद प्रसार व्हावा यासाठी शैक्षणिक प्रशासनाने (१) शिक्षकांना परोपरीने त्या पद्धतींचा उपयोग पटवून दिला पाहिजे. व पद्धतीविषयक स्वातंत्र्यही दिले पाहिजे, (२) शाळांच्या कुवतीनुसार पायरीपायरीने नवीन पद्धतींचा अवलंब करण्याविषयी तजवीज केली पाहिजे; (३) शिक्षकांना योग्य तऱ्हेचे सेवांतर्गत प्रशिक्षण दिले पाहिजे; आणि (४) योग्य ते मार्गदर्शक वाचन-साहित्य पुरवून त्याचे सातत्याने नूतनीकरण व सुधारणा केली पाहिजे. परंतु पुरोगामी म्हणून मान्य करण्यात आलेल्या नवीन अध्यापन-तंत्राची पुन्हा एक परंपरागत रूढी होऊन बसणार नाही याविषयी प्रशासकाने अत्यंत दक्षता दाखविली पाहिजे.

### पाठ्यपुस्तके, शिक्षकांसाठी मार्गदर्शक साहित्य आणि शैक्षणिक साधने

७. उत्तम प्रतीची पाठ्यपुस्तके व अध्यापन अध्ययनाची इतर साधने यांचा पुरवठा करण्याचा कार्यक्रम म्हणजे कमी खर्चात शिक्षणाचा दर्जा सुधारण्याची गुरुकिल्ली मानली पाहिजे.

८. "राष्ट्रीय शिक्षण संशोधन व प्रशिक्षण मंडळ" (NCERT) या संस्थेने ज्या प्रकाराने सध्या पाठ्य-पुस्तकांच्या निर्मितीचे कार्य चालविले आहे त्याच धर्तीवर देशातील सर्वोत्कृष्ट विद्वानांचे कतृत्व राष्ट्रीय पातळीवर एकवटून पाठ्यपुस्तके निर्मितीचा सर्वकष कार्यक्रम अंमलात आणला पाहिजे. अशा पाठ्यपुस्तकांमुळे शिक्षणाच्या अपेक्षित दर्जाची व्याख्या करणे व त्याचे प्रत्यक्ष स्वरूप दर्शविणे सोपे जाईल. राष्ट्रीय एकात्मतेच्या कार्यातही त्यांचे साह्य होईल. केंद्रीय शिक्षणमंत्रालयाने या दृष्टीने पुढाकार घेऊन राष्ट्रीय पातळीवर शास्त्रीय आणि तांत्रिक विषयातील पुस्तके तयार करून ती व्यापारी पद्धतीने प्रकाशित करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रात एक स्वायत्त संघटना उभारली पाहिजे. या प्रकल्पाची सविस्तर आखणी करण्यासाठी एक छोटी समिती नेमण्यात यावी.

९. राष्ट्रीय पातळीवरून होणाऱ्या या उपक्रमास साह्य देऊन त्याचे क्षेत्र वाढविण्यासाठी प्रत्येक राज्य सरकारने पाठ्यपुस्तक निर्मितीसाठी सुयोग्य असा एक विभाग सुरू करावा.

१०. पाठ्यपुस्तके तयार करणे, ती प्रायोगिक रीत्या वापरून पाहाणे आणि त्यांच्या गुणावगुणाचे मूल्य-मापन करणे ही राज्य सरकारच्या शिक्षणविभागाची जबाबदारी मानली जावी; पाठ्यपुस्तके तयार करण्याचे काम शक्य तेथे राज्य सरकारच्या शिक्षणविभागानेच स्वतःच्या छापखान्याची उभारणी करून सांभाळावी. पाठ्यपुस्तकांची विक्री व वाटप करण्याचे काम सरकारने स्वतः न करता ते विद्यार्थ्यांच्या सहकारी भांडारावर सोपवावे.

११. राज्य पातळीवरील पाठ्यपुस्तके व अध्यापन-साहित्य तयार करण्याचे काम शिक्षण विभागाच्या सहकार्याने चालणाऱ्या एखाद्या स्वायत्त यंत्रणेकडे दिले जावे.

१२. पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीसाठी यंत्रणा तयार करताना तिच्याकडून पुस्तकांची सुधारणा सतत होत राहील अशी अंतर्गत व्यवस्था तिच्यात ठेवावी.

१३. एकाच विषयावर तीन चार पुस्तके तयार केली जावीत, म्हणजे त्यातून हवे ते पुस्तक निवडून घेण्याची संधी शाळांना मिळेल.

१४. पाठ्यपुस्तकांच्या लेखकांना पारिश्रमिक देताना उदार धोरण स्वीकारावे.

१५. सरकारी पाठ्यपुस्तके तयार करण्याची संपूर्ण योजना "ना नफा ना तोटा" या धोरणानुसार चालविली जावी.

१६. शिक्षक आणि इतर अनेक लेखकांकडून पाठ्यपुस्तकांची हस्तलिखिते मागवावीत आणि शिक्षण व्यवसायातील तज्ज्ञांची एक समिती स्थापन करून तिच्याकरवी या हस्तलिखितांच्या निवडीचे व त्यांना मान्यता देण्याचे काम व्हावे.

१७. पाठ्यपुस्तकांच्या जोडीनेच पुरवणी साहित्य म्हणून शिक्षकांसाठी 'सूचना पुस्तके' आणि अध्यापन साहित्य तयार केले जावे.

१८. प्रत्येक प्रकारच्या शाळेसाठी लागणारी अत्यावश्यक शैक्षणिक साधने व इतर साहित्य यांच्या याद्या करण्यात याव्या आणि त्याचा पुरवठा प्रत्येक शाळेला करण्याचा उपक्रम अग्रहक्क देऊन अंमलात आणावा.

१९. आकाशवाणीवरील पाठांचा उपयोग करण्यासाठी राज्य सरकारच्या शिक्षण विभागाने आकाशवाणीशी सहकार्य करावे. या पाठांच्या जोडीने लागणाऱ्या पुस्तिका व तत्सम साहित्यही शिक्षक व विद्यार्थी यांच्यासाठी तयार करावे. शिक्षकांसाठी मुद्दाम तयार करून घेण्यात आलेली भाषणे जर सकाळी व सायंकाळी प्रसारित केली तर त्यांना आपल्या पाठांची तयारी करण्यास मदत होऊ शकेल. नव्या अध्यापनतंत्रांचे जे प्रकार फार गुंतागुंतीचे असतील ते सध्याच्या सामान्य दर्जाच्या शाळांत एकदम आणता येणार नाहीत, तथापि त्यांचा प्रायोगिक वापर शिक्षण-प्रशिक्षण संस्थांतून केला जावा.

२०. कमी खर्चाचे, जवळपास मिळणारे व स्थानिक पदार्थांतून तयार करण्यात आलेले शैक्षणिक साहित्य कसे वापरावे याबद्दल शिक्षकांना मार्गदर्शन केले पाहिजे. महागाची शैक्षणिक साधने शेजारपाजारच्या अनेक शाळांनी सामूहिक पद्धतीने घ्यावीत व वापरावीत.

### वर्गातील विद्यार्थीसंख्या

२१. शैक्षणिक दृष्ट्या योग्य ठरविलेल्या विद्यार्थीसंख्येपेक्षा अधिक गर्दी असणारे वर्ग या देशात बराच काळ टाळता येणे शक्य नाही. तथापि प्रत्येक वर्गातील विद्यार्थीसंख्या पुढीलप्रमाणे नियंत्रित ठेवणे आवश्यक आहे, निम्न-प्राथमिक स्तरावरील वर्गात जास्तीत जास्त ५० विद्यार्थी असावेत. उच्च-प्राथमिक आणि निम्न-माध्यमिक स्तरातील वर्गात ४५ आणि उच्च-माध्यमिक वर्गात ४० विद्यार्थी असावेत.

### जोड वर्गातील अध्यापन

### ( Multiple Class Teaching )

२२. जोड वर्गामध्ये अध्यापन करताना येणाऱ्या अडचणी व अध्यापनाची योग्य तंत्रे याविषयी संशोधन करणे अत्यावश्यक आहे. शिक्षकांना या तंत्रांची ओळख करून देण्याचे काम शिक्षक-प्रशिक्षण संस्थांनी करावे.

### शाळांच्या इमारती

२३. शाळांच्या इमारतीबाबतची सध्याची असमाधानकारक स्थिती लक्षात घेता ज्या शाळांसाठी इमारती बांधण्यात आलेल्या नाहीत त्यांची नड तातडीने दूर करण्याच्या योजना कार्यवाहीत आल्या पाहिजेत. त्या शिवाय शाळांतील विद्यार्थीसंख्येची अंदाजित वाढ सामावून घेतील अशा जादा इमारती बांधण्याची योजना अंमलात आली पाहिजे.

### इमारतीसाठी निधी

२४. केंद्र व राज्य सरकारांच्या अंदाजपत्रकात शाळांच्या इमारतीसाठी धरलेल्या रकमांमध्ये वाढ करण्यात आली पाहिजे आणि समानतेच्या तत्त्वावर ठरविलेली सहाय्यक अनुदाने देऊन ग्रामस्थांना स्थानिक साधन संपत्तीचा इमारतीसाठी विनियोग करण्यास उद्युक्त केले पाहिजे. खाजगी शाळांना इमारती बांधण्यासाठी कर्जाऊ रकमा आणि अनुदाने पुरेशा प्रमाणात देण्यात याव्वीत.

### खर्चातील सहाय्यक बचत

२५. शाळांच्या इमारती कोठे व कशा बांधाव्यात याबाबत जे मार्गदर्शक आदेश व नमुनेदार आराखडे उपलब्ध आहेत त्यांचा उपयोग करावा.

२६. इमारतींच्या बांधकामांना लागणाऱ्या नेहमीच्या पद्धतीच्या साहित्याचा तुटवडा व त्याची चढती किंमत लक्षात घेऊन व्यवस्थितपणे योजिलेल्या व चांगल्या प्रकारे बांधलेल्या कच्च्या इमारतींना आपल्या शिक्षण-व्यवस्थेत स्थान देणे भाग आहे.

### ग्रामीण भागातील इमारती

२७. ग्रामीण भागातील शाळांसाठी इमारती बांधण्याबाबत स्थानिक जनतेचा स्वयंस्फूर्त पुढाकार व शाळागृहांच्या उभारणीसाठी त्यांनी देऊ केलेले आर्थिक व इतर साहय यांना उत्तेजन द्यावे. याबाबत केंद्रीय मंत्रालयाने सूचित केलेल्या योजनेनुसार मुख्य इमारतीची पूर्वरचित' चौकट ग्रामस्थांना द्यावी आणि पाया-बांधणी व भिंती उभारणे वगैरे बांधकाम स्थानिकरीत्या व्हावे.

### शहरी भागातील इमारती

२८. शहरी शाळांच्या इमारतींच्या बांधकामात काटकसर करण्याकरिता जवळपास मिळणारे साहित्य वापरणे, सफाईदार देखाव्याला फाटा देणे, आणि जरा कमी प्रतीचे बांधकाम मान्य करणे हे उपाय योजावेत जेथे शक्य असेल तेथे तात्पुरत्या इमारतीवर भागविले जावे आणि पक्क्या इमारतीसाठीच्या बांधकामात नवीन सुधारलेली तंत्रे वापरावीत.

### बांधकामाचा वेग वाढविणे

२९. शाळांसाठी तातडीने इमारती बांधण्याच्या कार्यक्रमाचा वेग वाढविण्यासाठी ग्रामीण भागातील शाळागृहें बांधण्यासाठी जिम्मेदारी स्थानिक जनतेवर किंवा ग्रामपंचायतीवर सोपविण्यात यावी आणि शहरी भागातील शाळांसाठी ही कामे नगरपालिका आणि महानगरपालिकांकडे सोपविली जावीत.

३०. शाळागृहे बांधण्याच्या कार्यक्रमाचे मार्गदर्शन व देखरेख करण्यासाठी आणि सुधारलेले शिल्पतंत्र बांधकामात वापरले जावे यासाठी, राज्य सरकारने आपल्या सार्वजनिक बांधकाम खात्यात (पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट) "शैक्षणिक-वास्तू विकास विभाग" (एज्युकेशनल बिल्डींग डिव्हेलपमेंट ग्रुप) नेमावा. या विभागाने राज्यातील शिक्षण विभागाच्या सहकार्याने काम करावे. त्याने शालेय इमारतींच्या बांधकामाचे आपल्या प्रदेशामध्ये आवश्यक ठरणारे दंडक तपशीलवारीने तयार करावेत म्हणजे त्या प्रकारच्या बांधकामासाठी लागणारे सुटे भाग मोठ्या कारखान्यामध्ये तयार करता येतील. अशाच तऱ्हेचा शैक्षणिक-वास्तू विभाग केंद्र सरकारने सुरू करावा आणि राज्याराज्यातील शैक्षणिक-वास्तू विभागांच्या कामात त्याने एकसूत्रीपणा राखण्याचा यत्न करावा.

३१. सरकारी इमारतींच्या बांधण्यातील दिरंगाई थांबविण्याच्या दृष्टीने शैक्षणिक इमारतींच्या बांधकामाची जबाबदारी घेण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये एक स्वतंत्र विभाग सुरू केला जावा. शैक्षणिक-वास्तू विभागांनी शालागृहांचे आदर्श नमुने व शिल्पतंत्रे तयार केल्यानंतर इंग्लंडमध्ये ज्याप्रमाणे औद्योगिक स्तरावर शैक्षणिक इमारतींचे बांधकाम करण्याच्या योजना राबविण्यात येतात त्याप्रमाणे त्या आपल्याकडे राबविण्यासाठी 'शैक्षणिक-वास्तू सहयोग संघटना" ( Educational Buildings Consortium निर्माण) करण्यात यावी.

३२. शैक्षणिक-वास्तू विभागाने काटकसरीचे जे उपाय ताडून पाहिले असतील त्यांची सविस्तर माहिती खाजगी शिक्षणसंस्थांना पुरविली जावी आणि तिच्या आधारावर, इमारतीत बांधणीसाठी सहाय्यक अनुदान दिले जावे.

### शैक्षणिक आणि व्यावसायिक मार्गदर्शन

३३. शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन उपलब्ध करून देणे ही गोष्ट शिक्षण व्यवस्थेचा एक अविभाज्य भाग मानण्यात यावी. त्याद्वारे सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणविषयक निर्णय घेण्यास व वेळोवेळी योग्य ती तडजोड करण्यासाठी वैयक्तिक साह्य मिळावे.

### प्राथमिक शिक्षणातील मार्गदर्शन

३४. प्राथमिक शाळेतील अगदी खालच्या वर्गापासून मार्गदर्शनाची सोय झाली पाहिजे. परंतु प्राथमिक शाळांची प्रचंड संख्या लक्षात घेता, हा कार्यक्रम पुढील सोप्या तऱ्हेने राबवावा.

(१) प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना मुलांमधील व्यक्तिगत विभिन्नतेचे प्रश्न व निदान काही कसोट्या यांची माहिती देणे ;

(२) या विषयाची माहिती शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या द्वारे देणे ;

(३) व्यावसायिक माहिती व मार्गदर्शन याबाबतचे वाचन-साहित्य निर्माण करणे ; व

(४) पुढील शिक्षणक्रमाची निश्चिती करण्याबाबत विद्यार्थी आणि पालक यांना मदत करणे.

### माध्यमिक शाळांतील मार्गदर्शन

३५. कुमार वयातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक आवडनिवड आणि कर्तृत्वशक्ती यांचे स्वरूप जाणून घेऊन त्यांच्या वाढीसाठी साह्य देणे हा माध्यमिक पातळीवरील मार्गदर्शन कार्यक्रमाचा उद्देश असावा.

३६. सर्व माध्यमिक शाळांना मार्गदर्शनाची योजना लागू करण्याचे उद्दिष्ट क्रमाक्रमाने आटोक्यात आणले पाहिजे व प्रत्येक शाळेत एक प्रशिक्षित सल्लागार (counsellor) नेमला पाहिजे. तथापि आर्थिक मर्यादा आणि योग्य कार्यकर्त्यांची वाण लक्षात घेता येत्या २० वर्षांच्या कालापुरती एक अल्पमुदतीची योजना पुढीलप्रमाणे अंगीकारावी :—

(१) दहा शाळांच्या एका गटासाठी एक फिरता शालेय मार्गदर्शक नेमण्यात यावा, आणि इतर शिक्षकांचे साह्य त्याने मार्गदर्शनाचे साधेसोपे प्रश्न हाताळण्यासाठी घ्यावे. अशा प्रकारची योजना सर्व शाळांना लागू करण्यात यावी ;

(२) प्रत्येक जिल्ह्यातून एक शाळा नमुन्याची म्हणून निवडावी व तिच्यात व्यावसायिक मार्गदर्शन देण्याची व्यवस्था व्यापकतेने केली जावी ;

(३) राज्यातील व्यावसायिक मार्गदर्शन कार्यालयामध्ये पुरेशा संख्येने पर्यवेक्षक नेमावे.

३७. शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शनाची मूलतत्त्वे सर्व माध्यमिक शिक्षकांना शिकविण्यासाठी, सेवापूर्व प्रशिक्षणक्रमात तर सोय करावीच पण त्याबरोबरच सेवांतर्गत प्रशिक्षणाचे उपक्रमही सुरू करावेत. प्रशिक्षण महाविद्यालयात या कामासाठी लायक व्यक्तींची नेमणूक करण्यात यावी.

३८. मार्गदर्शन क्षेत्रातील कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्याची सोय राज्यातील मार्गदर्शन कार्यालयाने व प्रशिक्षण महाविद्यालयांनी करावी. मार्गदर्शन कार्यकर्त्यांच्या उच्च स्तरावरील प्रशिक्षणाची सोय राष्ट्रीय पातळीवर व्हावी.

३९. वरील योजनेच्या जोडीनेच पुढील योजना अंमलात आणावी : व्यावसायिक मार्गदर्शनाचे साहित्य व इतर आवश्यक गोष्टींची भरपूर निर्मिती व पुरवठा, विद्यार्थ्यांसाठी अर्धवेळ नोकऱ्यांची संधी आणि सध्याच्या भारतीय परिस्थितीत व्यावसायिक मार्गदर्शन क्षेत्रात कोणत्या तऱ्हेने मार्गदर्शन करावे याबाबत संशोधन ही व्यवस्था त्वरेने होणे जरूर आहे.

## बुद्धिवंतांचा शोध व विकास

४०. बुद्धिमान विद्यार्थ्यांना शोधून काढून त्यांच्या विशेष गुणांचा कल्पकतेने विकास करण्याच्या कामी सध्याची शिक्षणपद्धती असमर्थ असल्याने आपला देश फार मोठ्या सुप्त बुद्धिसामर्थ्याला पारखा झाला आहे. शैक्षणिक गुणवत्ता उत्तम प्रकारे वाढविण्यासाठी बुद्धिमान मुले लहान वयातच शोधून काढून त्यांचा विकास अनुकूल वातावरणात केला पाहिजे.

४१. प्रज्ञावान विद्यार्थी ओळखण्याचा प्रयत्न जरी सर्व शैक्षणिक स्तरांवर सातत्याने करावयाचा असला तरी माध्यमिक स्तरावर हा उपक्रम अधिक आशयपूर्ण ठरतो.

४२. प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा नित्याचा अभ्यासक्रम तर अधिक समृद्ध करावयाचा पण अशा प्रगत अभ्यास-क्रमांच्या जोडीने त्यांना विविध बहिःशाल कार्यक्रमात भाग घेण्याची संधी दिली जावी. त्यात उन्हाळी वर्ग, शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाच्या स्थलांना भेटी यांचा समावेश करावा. ज्यांची घरची परिस्थिती अभ्यासाला उपयकारक नसेल त्यांच्यासाठी वसतीगृहे व दिन-अभ्यासिका (Day-study) यांची सोय करावी.

४३. प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना शिकवितांना कोणती विशिष्ट तंत्रे वापरावीत याचे प्रशिक्षण शिक्षकांना द्यावे आणि त्यात विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला व मुक्त अभिव्यक्तीला वाव देण्यासाठी योग्य वातावरण निर्माण करण्यावर भर द्यावा.

## अभ्यासात मागास असणाऱ्या मुलांचे शिक्षण

४४. मागास मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करण्यामुळे शैक्षणिक तरतुदींचा व मनुष्यबळाचा जो अपव्यय होतो त्याचे प्रमाण अगदी कमी करावयाचे प्रयत्न हाती घेणे विकसनशील देशात अत्यावश्यक ठरते.

## सुस्तपणे शिकणारे विद्यार्थी

४५. मागासलेल्या विद्यार्थ्यांची विभागणी दोन प्रमुख गटांत करता येते : मंदबुद्धी मुले व असमाधाना--कारक प्रगती दाखविणारी मुले. मंदबुद्धी विद्यार्थ्यांतील ७५ पेक्षा कमी बुद्ध्यंक असलेल्या विद्यार्थ्यांचा औपचारिक शिक्षणातून काहीच फायदा होत नसतो. जे केवळ सुस्त किंवा सावकाश गतीने शिकणारे असतात त्यांना शिक्षण देणे शक्य असते ; परंतु जेथे त्यांच्याकडे वैयक्तिक लक्ष देता येईल अशा स्वतंत्र शाळांत किंवा वर्गात त्यांची सोय केली पाहिजे.

## असमाधानकारक प्रगती असलेली मुले

४६. असमाधानकारक प्रगती दर्शविणाऱ्या विद्यार्थ्यांतील काही अत्यंत प्रखर बुद्धीचेही आढळतात. त्यांची ही बुद्धिमत्ता सुप्त राहिली तर मनुष्यबळाच्या बाबतीत राष्ट्राचे नुकसान होते. म्हणून मुलांच्या असमाधानकारक प्रगती मागील कारणांची चिकित्सा करण्यासाठी आणि त्यावर दुरूस्तीचे उपाय योजून त्यांची शाळेतील नित्याच्या अभ्यासक्रमात अंमलबजावणी करण्यासाठी, ताबडतोबीने प्रयत्न केले पाहिजेत. विद्यार्थ्यां-विषयी आपुलकी असणारे शिक्षक, बाल-मार्गदर्शन केंद्रे (जेथे असतील तेथे), आणि पालक शिक्षक-संघटना यांच्या मदतीने हा उपक्रम अंमलात आणावा.

### शैक्षणिक मूल्यमापन

४७. मूल्यमापन ही एक सातत्याने चालणारी प्रक्रिया असून शिक्षणाच्या एकूण व्यवस्थेतील अविभाज्य भाग आहे. शैक्षणिक उद्दिष्टांशी या प्रक्रियेचा घनिष्ट संबंध आहे. विद्यार्थ्यांच्या अध्ययन-पद्धतीवर व शिक्षकांच्या अध्यापन पद्धतीवर तिचा फार मोठचा प्रभाव पडतो आणि त्यामुळे केवळ शैक्षणिक प्रगतीचेच मापन न होता शिक्षणाची गुणवत्ताही वाढत असते. याकरिता मात्र मूल्यमापनाचे तंत्र सप्रमाण (Valid), विश्वासार्ह, वस्तुनिष्ठ आणि व्यवहार्य असले पाहिजे. सध्या भारतातील सर्वसामान्य मूल्यमापनतंत्र म्हणजे लेखी परीक्षा हे असल्याने तेच प्रथम सुधारण्याचे प्रयत्न अशा दिशेने करावेत की, ज्यामुळे त्यातून शैक्षणिक प्रगतीचे सप्रमाण व विश्वासार्ह मूल्यमापन घडू शकेल. परंतु केवळ लेखी परीक्षेने मोजता येणार नाहीत अशा अनेक महत्त्वाच्या बाबी विद्यार्थ्यांच्या वाढीचा अविभाज्य भाग असतात आणि त्यांचा विकास मापण्यासाठी साहजिकच इतर काही तंत्रे शोधावी लागतील. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास आणि इतर कर्तृत्व मापण्यासाठी ही तंत्रे सुधारून त्यांना विश्वासार्ह साधनांचा दर्जा प्राप्त करून द्यावा लागेल.

### प्राथमिक स्तरावरील मूल्यमापन

४८. मूलभूत शैक्षणिक कौशल्यात प्रगती करण्याची आणि सुयोग्य प्रवृत्ती व सवयी अंगी बणविण्याची प्रेरणा या स्तरावरील मूल्यमापन तंत्राने विद्यार्थ्यांना दिली पाहिजे.

४९. या स्तरावरील विद्यार्थ्यांना आपापल्या कुवतीप्रमाणे प्रगती करण्याला संधी मिळावी म्हणून पहिली ते चौथी या चार इयत्तांची वर्गवारी काटेकोरपणे न करता तो सर्वच एक सरमिसळ शैक्षणिक टप्पा आहे असे मानावे. ज्या ठिकाणी हे शक्य नसेल त्या शाळांत निदान पहिली व दुसरी इयत्ता मिळून एकच गट मानला जावा व त्यात जलद शिकणाऱ्यांचा व सावकाश शिकणाऱ्यांचा असे दोन पोट-विभाग करावेत अशा सरमिसळ स्वरूपाच्या गटाला कोणत्या पद्धतीने शिकवावे याचे खास प्रशिक्षण शिक्षकांना द्यावे.

### उच्च प्राथमिक स्तरावरील मूल्यमापन

५०. या स्तरावरील मूल्यमापनात लेखी परीक्षेच्या जोडीलाच अंतर्गत चाचणीकरिता मौखिक परीक्षा घेण्यास विशेष प्राधान्य देण्यात यावे. शिक्षकांनीच तयार केलेल्या कसोटचांच्या आधारे गुणवत्ता-निदानाचे कार्य व्हावे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीची व विकासाची नोंद करण्यासाठी संकलित अभिलेख (Cumulative Record Cards) फार उपयुक्त ठरतात. परंतु त्याचे स्वरूप साधे-सोपे असावे व ते वापरण्यास टप्प्याटप्प्याने सुरवात करावी.

### प्राथमिक स्तराच्या अखेरीची बहिःशाल परीक्षा

५१. शिक्षणाच्या गुणवत्तेचा पहिला राष्ट्रीय निकष प्राथमिक स्तराच्या अखेरीस लावण्यात येणार असला तरी त्याची अंमलबजावणी करण्यासाठी सक्तीच्या बहिःशाल परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांची सर्व प्रकारची प्रगती एकाच नियम-निष्ठ मापाने मोजणे इष्ट ठरणार नाही. तथापि, निश्चित केलेल्या शैक्षणिक दर्जाचे रक्षण व्हावे यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील शैक्षणिक प्रशासन व्यवस्थेकडून प्राथमिक शाळांच्या शैक्षणिक पातळीचे सर्वेक्षण वेळोवेळी केले जावे. या सर्वेक्षणासाठी राज्य पातळीवरील "मूल्यमापन कक्षा" ने केलेल्या यथायोग्य कसोटचा वापरण्यात याव्या.

### आंतरशालेय प्रगतीच्या तुलनेसाठी समान दर्जाची अंतर्गत प्रकती

५२. प्रमाणीभूत केलेल्या व यथायोग्य ठरलेल्या कसोटचांच्या साहाय्याने प्राथमिक शिक्षण अवस्थेच्या शेवटी जिल्हापातळीवर एकच परीक्षा ठेवण्यास हरकत नसावी. प्रत्येक शाळेने स्वतंत्रपणे घेतलेल्या परीक्षेपेक्षा या जिल्हानिहाय परीक्षेची सप्रमाणता आणि विश्वासार्हता अधिक राहू शकेल. आणि निरनिराळचा शाळांतील विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे तुलनात्मक परीक्षण करण्यासाठी ती उपयुक्त ठरेल.

५३. प्राथमिक शिक्षणाचे अखेरीचे प्रमाणपत्र शाळांनी द्यावे. या प्रमाणपत्राबरोबर संकलित अभिलेख (Cumulative Record Card) आणि जिल्हापातळीवर परीक्षा घेण्यात आली असल्यास तिचेही गुणदर्शकपत्र (Statement of Result) देण्यात यावे.

५४. शिष्यवृत्त्या देण्यासाठी, विशेष गुणवत्तेची शिफारसपत्रे देण्यासाठी, आणि बुद्धिमान मुलांचा शोध घेण्याच्या दृष्टीने, सामान्य परीक्षेखेरीज इतर खास चाचण्या प्राथमिक शिक्षणक्रमाच्या अखेरीस घेण्याची व्यवस्था करता येईल.

### बहिःशाल परीक्षांची सुधारणा

५५. बहिःशाल परीक्षातंत्र सुधारण्यासाठी प्रश्नपत्रिका काढणाऱ्या शिक्षकांचे त्याविषयीचे तांत्रिक कौशल्य वाढविणे, केवळ ज्ञान मिळविण्याच्या एकमेव उद्दिष्टापुरतेच परीक्षेचे प्रश्न मर्यादित न ठेवता त्यांना इतर उद्दिष्टांच्या समीप करणे, प्रश्नांचे स्वरूप बदलणे, उत्तरपत्रिका तपासण्यासाठी शास्त्रीय पद्धतींचा उपयोग करणे, उत्तरपत्रिकांना गुण देण्यासाठी आणि परीक्षांचे निकाल देण्यासाठी यांत्रिक साधनांचा उपयोग करणे, असे सर्व उपाय योजण्यात आले पाहिजेत.

## शाळा व शिक्षणमंडळ यांनी द्यावयाचे प्रमाणपत्र

५६. बहिःशाल परीक्षेच्या निकालानंतर शालेय शिक्षणमंडळाकडून जे प्रमाणपत्र दिले जाते त्यामध्ये उमेदवार सर्व परीक्षेत उत्तीर्ण अगर अनुत्तीर्ण झाल्याची नोंद करण्याऐवजी ज्या विषयांत तो उत्तीर्ण झाला असेल तेवढ्यांचीच नोंद करण्यात यावी. या प्रमाणपत्राबरोबरच त्याला सर्व विषयांतील गुण व श्रेणी दाखविणारी गुणपत्रिका द्यावी. एखाद्या विषयातील आपली प्रगती अधिक समाधानकारक करण्याकरिता किंवा सर्वच परीक्षेत अधिक वरची श्रेणी मिळविण्याकरिता जर एखाद्या विद्यार्थ्याला पुन्हा त्याच परीक्षेस बसावयाचे असेल तर त्याला तशी परवानगी असावी. ज्या शाळेत विद्यार्थी शिकला असेल तिने त्याच्या संकलित अभिलेखाच्या आधारे त्याच्या प्रगतीचे अंतर्गत मूल्यमापन दर्शविणारे प्रमाणपत्र वेगळे द्यावे. हे प्रमाणपत्र शिक्षणमंडळानें दिलेल्या प्रमाणपत्रास जोडण्यास हरकत नसावी. तथापी, दहावी, अकरावी किंवा बारावी या इयत्तांच्या अखेरीस प्रत्येक विद्यार्थ्याने बहिःशाल परीक्षेस सक्तीने बसलेच पाहिजे असा दंडक घालू नये. शिक्षणमंडळाच्या बहिःशाल परीक्षेला न बसता केवळ शाळेचेच प्रमाणपत्र घेऊन त्याच्या आधारावर नोकरी मिळविण्यास अगर हे प्रमाणपत्र व संकलित अभिलेख यांच्या साहाय्याने व्यावसायिक शिक्षणसंस्थेत प्रवेश घेण्याची मुभा विद्यार्थ्याला असावी. उच्च माध्यमिक स्तरावर व उच्च शिक्षणाच्या संस्थामध्ये मात्र उमेदवाराची निवड करूनच त्यांना प्रवेश दिला जावा आणि उच्च शिक्षण संस्थांच्या नियंत्रणाधिकारी संघटनांनी प्रवेशाबाबतचे जे नियम केले असतील ते प्रवेशेच्छुकांना लागू करण्यात यावेत.

## प्रायोगिक शाळांची स्थापना

५७. प्रत्येक राज्यातील काही निवडक शाळांना दहावी इयत्तेतील आपल्या विद्यार्थ्यांची शेवटची परीक्षा घेण्याचा हक्क देण्यात यावा. ही परीक्षा राज्य शालेय शिक्षणमंडळाच्या परीक्षेच्या तोलाची मानली जावी. अशा शाळांच्या शिफारशीनुसार यशस्वी विद्यार्थ्यांना राज्य शालेय शिक्षणमंडळाने प्रमाणपत्रे द्यावीत. अशा तोलाच्या शाळा निवडण्याकरीता जे मापनदंड किंवा लक्षणे काळजीपूर्वक ठरवावी लागतील त्याची घडण मंडळाने नियुक्त केलेल्या एका खास समितीकडे सोपविण्यात यावी. अशा शाळा निवडताना कोणत्या गोष्टी पाहाण्यात याव्यात याची निश्चिती राज्य शिक्षणमंडळाच्या समितीने काळजीपूर्वक विचार करून करावी. या शाळांच्या चालकांना स्वतःचा अभ्यासक्रम तयार करण्याची, पाठ्यपुस्तके निवडण्याची आणि शैक्षणिक उपक्रम चालविण्याची विशेष परवानगी देण्यात यावी व त्यांच्या अशा कार्यावर शिक्षण विभागाच्या नियमांचे बंधन घालण्यात येऊ नये.

## अंतर्गत मूल्यमापनाच्या पद्धती

५८. शाळांनी करावयाचे अंतर्गत मूल्यमापन सर्वांगीण असावे. त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या विकासात अभिप्रेत असलेल्या प्रत्येक गोष्टीचे आणि विशेषतः बहिःशाल परीक्षेत ज्यांचे मोजमाप घेता येत नाही अशा गोष्टींचे मूल्यमापन व्हावे. या मूल्यमापनाची नोंद गुणांकात त्याचप्रमाणे वर्णनात्मक पद्धतीनेही व्हावी. शाळेत घेतल्या जाणाऱ्या लेखी परीक्षेची सुधारणा केली जावी व त्यासाठी शिक्षकांना सुयोग्य प्रशिक्षण द्यावे. बहिःशाल परीक्षेतील गुण आणि शाळेच्या अंतर्गत परीक्षेतील गुण या दोहोंची नोंद वेगवेगळी ठेवावी.

## उच्च माध्यमिक स्तराअखेरची परीक्षा

५९. पाठ्यक्रमाच्या पुनर्रचनेच्या संक्रमणकालामध्ये उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना एका पाठोपाठ एक अशा दोन बहिःशाल परीक्षांना (दहावी व अकरावी) एकाच वर्षात बसावे लागेल. परंतु ज्या शाळांत नववी ते अकरावीचा अभ्यासक्रम संमिश्र असेल त्यांनी दहावीच्या अखेरच्या परीक्षेचा आग्रह धरू नये.

## प्रकरण दहावे

# शालेय शिक्षण : प्रशासन आणि पर्यवेक्षण

१. शिक्षणामध्ये नवीन सुधारणांचा प्रवेश घडवून आणण्यासाठी व सुधारणेचा वेग वाढविण्यासाठी शैक्षणिक प्रशासनाच्या आणि पर्यवेक्षणाच्या व्यवस्थेमध्ये सहानुभूती व कल्पकता हे गुण अत्यावश्यक आहेत.

### सार्वजनिक शिक्षणासाठी सम्मीलित शाळांची निर्मिती

२. शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरांवर सर्व प्रकारच्या शिक्षण संस्थांना समाविष्ट करून घेणारी अशी सार्वजनिक शालेय व्यवस्था निर्माण करून तिच्या साह्याने सर्व मुलांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आपण निर्धारपूर्वक केला पाहिजे. या व्यवस्थेत समाविष्ट केलेल्या सम्मीलित (Common) शाळांतील शिक्षणाचा दर्जा इतका चांगला राखावा की कोणाही पालकाला आपले मुल खाजगी किंवा अप्रामाणिक शाळेत पाठविण्याची गरज भासू नये.

३. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी पुढील उपक्रम हाती घेतले पाहिजेत :—

(१) निरनिराळ्या प्रकारच्या व्यवस्थापनाखालील शाळांत काम करणाऱ्या शिक्षकांमध्ये सध्या आढळून येत असलेला भेदभाव नष्ट करण्यात आला पाहिजे.

(२) सर्व शिक्षण विना-शुल्क (मोफत) देण्याचा कार्यक्रम टप्प्याटप्प्याने अंमलात आला पाहिजे. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंत प्राथमिक स्तरावर आणि पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत निम्न माध्यमिक स्तरावर सर्व अध्यापन-शुल्क ( tuition fees ) पूर्णतया रद्द करण्यात यावे.

(३) शिक्षण संस्थांत उपलब्ध करून द्यावयाच्या कमीत कमी सोयी व साधने याबाबत राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी संस्था यांची भूमिका एकच असावी.

(४) निकटवर्ती-शाळा पद्धती ( Neighbour hood School ) अंमलात आणून तिच्या साह्याने सधन मुलांसाठी एका तऱ्हेच्या शाळा आणि गरीब मुलांसाठी दुसऱ्या तऱ्हेच्या शाळा असा भेदभाव नष्ट करावा.

### जिल्हा शिक्षणमंडळाची स्थापना

४. जिल्हा पातळीवरील शालेय शिक्षणाचे नियोजन व विकास करण्याकरिता, प्रत्येक राज्य सरकारने पाचवी पंचवार्षिक योजना संपण्यापूर्वी योग्य कायदा करून जिल्हा शिक्षणमंडळाची स्थापना केली पाहिजे.

### सरकारी आणि स्थानिक प्रशासनाखालील शाळा

५. सरकारी किंवा स्थानिक प्रशासनाखालील शाळांतील शिक्षणाचा दर्जा बहुतेक उच्च नसतो कारण या संस्थांतील शिक्षकांत संस्थेविषयी निष्ठा नसते व स्थानिक जनतेबरोबर त्यांचा संपर्क एकतर अत्यल्प असतो किंवा असलाच तर त्याचा दुरुपयोगही केला जातो. ती उणीव दूर करण्यासाठी पुढील उपाय योजने इष्ट होईल.

(१) स्थानिक प्रतिनिधी असलेली एक शाला-समिती स्थापन करून तिच्याकडे सर्व सरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचा कारभार किंवा शाळांचा एक गट करून त्याचा सर्व कारभार सोपविण्यात यावा. शाळांतील सर्व सोयी पुरविण्यासाठी ही समिती स्वतःच्या 'शालेय निधीचा' विनियोग करील.

(२) शिक्षकांच्या बदल्या वारंवार होऊ नयेत यासाठी बदली करण्याच्या धोरणामागे काही तर्कशुद्ध नियम असावेत.

(३) या सार्वजनिक शाळांना अधिक कार्य-स्वातंत्र्य देण्यात यावे.

### खाजगी शाळा

६. सरकारी अनुदानातून चालविण्यात येणाऱ्या ज्या खाजगी शाळांचे व्यवस्थापन समाधानकारक रीतीने होत नसेल त्यांना योग्य मदत देऊन त्यांची सुधारणा करण्याची जबाबदारी सरकारची आहे.

७. खाजगी शाळांना द्यावयाचे साह्य व त्यांचे नियंत्रण या बाबतीत तरतमभाव ठेवण्याचे धोरण सरकारने अंगीकारणे जरूर आहे. चांगल्या चालविण्यात येणाऱ्या शाळांना अधिक स्वातंत्र्य व मदत देऊन सार्वजनिक शाला-पद्धतीमध्ये त्या केंद्रशाळा होऊ शकतील असे पहावे.

८. शिक्षण-शुल्क रद्द करण्याच्या योजनेमुळे बहुतेक सर्व खाजगी शाळा सार्वजनिक शालेय योजनेत आपोआपच समाविष्ट होतील. या शाळांचे व्यवस्थापन अधिक कार्यक्षम करण्यासाठी पुढील उपाय योजावेत :—

(१) प्रत्येक खाजगी शाळेच्या कार्यकारी समितीवर शाळेचे व्यवस्थापक, राज्य शिक्षणविभाग व शिक्षक यांचे प्रतिनिधी असावेत.

(२) या शाळांतील शिक्षकांची नेमणूक करण्याबाबतचे धोरण सरकारच्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळाप्रमाणेच असावे.

(३) या प्रकरणात केलेल्या सूचनांनुसार या शाळांचे आवर्ती ( recurring ) अनुदान निश्चित केले जावे. तथापि, शिक्षक-वेतन सोडून इतर खर्च आणि व्यवस्थापकांनी सोसण्याचा खर्च यांची कमाल मर्यादा किती राहावी ते प्रत्येक शाळेसाठी स्वतंत्रपणे निश्चित करण्यात यावे.

९. सरकारी अनुदान पाहिजे असल्यास खाजगी संस्थांनी आपले कार्य नफा न घेताच केले पाहिजे असा कडक नियम घातला जावा.

१०. सरकारी अटी न पाळणाऱ्या व योग्य दर्जा ठेवण्याला नेहमी असमर्थ ठरणाऱ्या खाजगी शाळा ताब्यात घेण्याचा अधिकार राज्य सरकारच्या शिक्षण विभागाला मिळावा यासाठी आवश्यक ती दुरुस्ती अनुदान-कायद्यात करण्यात यावी.

## दर्जेदार खाजगी शाळा

११. दर्जेदार खाजगी शाळांपैकी ज्या शाळा शिक्षण-शुल्क रद्द करतील व सार्वजनिक शाळांच्या योजनेत समाविष्ट होतील त्यांचा दर्जा कायम राहाण्यासाठी साह्य देण्यात आले पाहिजे व अशा शाळांच्या अनुदानाचे प्रमाणही इतर सुमार शाळांच्या पातळीवर न ठरविता, गुणवत्तापूर्ण शाळांची वेगळी पातळी मानून त्यानुसार अधिक ठेवण्यात आले पाहिजे.

## निकटवर्ती शालापद्धतीच्या शाळा

१२. प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांमधील सध्याचा सामाजिक अलगपणा नष्ट करण्यासाठी 'निकटवर्ती शालापद्धतीची' कल्पना अंमलात आणली पाहिजे. या व्यवस्थेमध्ये प्रत्येक शाळेभोवतालच्या क्षेत्रातील सर्व विद्यार्थ्यांना विना-अपवाद त्याच शाळेत जावे लागेल.

१३. येत्या वीस वर्षात पुढील उपाययोजना करून निकटवर्ती शालापद्धती अंमलात आणली पाहिजे :—

(१) पहिल्या दहा वर्षात, सर्व प्राथमिक शाळांची सुधारणा करून प्रत्येक शाळा निदान किमान दर्जाची होईल यासाठी खटपट केली पाहिजे व त्यापैकी दहा टक्के शाळांचा दर्जा अधिक उच्च केला पाहिजे.

(२) त्याच कालखंडात (म्हणजे येत्या दहा वर्षात) निकटवर्ती शाला-योजनेची अंमलबजावणी निम्न प्राथमिक स्तरावर पथदर्शक (pilot) पद्धतीने करावी. हा सुरुवातीचा प्रयोग ज्या विभागातील लोकांची त्याला मान्यता असेल तेथेच करावा.

१४. सम्मीलित शाळा योजनेतील शाळांमध्ये शिकण्याला उत्तेजन म्हणून सरकारने व स्थानिक स्वराज्य संस्थेने ठेवलेल्या शिष्यवृत्त्या या शाळांतील विद्यार्थ्यांनाच मिळाव्यात. तसेच, विद्यापीठांच्या पातळीवर ज्या शिष्यवृत्त्या सार्वजनिक निधीतून देण्यात येतात त्यातील ९० टक्के शिष्यवृत्त्यांकरिता ज्यांचे माध्यमिक शिक्षण सम्मीलित शाळांतून झाले आहे अशाच विद्यार्थींना पात्र मानावे.

## राष्ट्रव्यापी शाळासुधार मोहीम

१५. शालेय शिक्षणाचा दर्जा वाढविण्याची आजची आत्यंतिक निकड लक्षात घेता एक राष्ट्रव्यापी शाळा सुधार कार्यक्रम अंमलात आणून त्यामध्ये प्रत्येक शाळेला आपला दर्जा शक्य तितका उंचावण्याची परिस्थिती उपलब्ध करून देण्यात आली पाहिजे.

१६. प्रत्येक शाळेने स्वतःच्या यथाशक्ती विकासाचा आणि साधनसामग्रीच्या परिपूर्ण उपयोगाचा कार्यक्रम स्वतःपुरता आखावा.

१७. शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या या संकल्पित योजनेत भौतिक साहित्य-सोयींत किती भर पडावयास पाहिजे याचा विचार महत्त्वाचा न मानता शिक्षणाच्या सुधारणेसाठी स्वतःचा जास्तीतजास्त उपयोग करून देण्याची प्रेरणा त्या शाळेतील मानवी शक्तीला कशी देता येईल या विचाराचे महत्त्व अधिक मानावे. स्थानिक समाजाच्या सहकार्याने शाळेस हव्या असलेल्या भौतिक सोयी वाढवाव्यात.

१८. या कार्यक्रमाचे यशापयश त्यासाठी किती काळपर्यंत चिकाटीने प्रयत्न केले जातील त्यावरच अवलंबून आहे. प्रत्येक संस्था एक स्वतंत्र घटक आहे असे समजून तिच्या शक्तीप्रमाणे तिच्या प्रगतीचा वेग निश्चित करावा.

१९. शाळांच्या विकासाची पातळी दर्शविणाऱ्या मूल्यमापन कसोट्या ( Evalkative criterid ) प्रत्येक राज्याने तयार कराव्यात व त्यांचा उपयोग शाळेने 'स्व-परीक्षणासाठी' ( Self-evaluation ) व पर्यवेक्षकांनी वार्षिक आणि त्रैवार्षिक तपासणीच्या वेळी करावा. शाळांच्या 'अपेक्षित' व 'कमीत कमी' दर्जाची लक्षणे निश्चित ठरवून, त्रि-सोपान ( three point scale ) मानदंडाच्या आधारे, त्यांची वर्गवारी लावावी.

२०. येत्या दहा वर्षात प्रत्येक विकासखंडातील निदान १० टक्के प्राथमिक शाळा व एक तरी माध्यमिक शाळा 'अपेक्षित' दर्जापर्यंत आणून सोडाव्या. निम्न प्राथमिक पातळीवरील अशा शाळांमध्ये जवळपास राहणाऱ्या मुलांनाच प्रवेश मिळेल. उच्च प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील प्रवेश गुणवत्तेच्या आधारे देण्यात येईल.

**पर्यवेक्षण : राज्य शिक्षण विभागाची पुनर्घटना**

२१. राज्य पातळीवरील शिक्षणविभाग हीच शैक्षणिक बाबी हाताळणारी प्रमुख कार्यसंघटना राहणार असल्याने, तिने पुढील कामे पार पाडावीत :—

(१) शाळासुधार कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी ;

(२) शैक्षणिक दर्जा ठरविणे व प्रत्यक्षात आणणे ;

(३) शिक्षकांचा पुरवठा व प्रशिक्षण यांची जबाबदारी पत्करणे ;

(४) शाळांची तपासणी व पर्यवेक्षण करणे ;

(५) 'राज्य मूल्यमापन संघटना' स्थापन करून ती कार्यतत्पर ठेवणे ;

(६) दर्जेदार शिक्षणाची जोपासना करणे आणि विस्तार कार्यक्रम चालविणे

(७) राज्य शिक्षणशास्त्र संस्था स्थापन करून ती कार्यतत्पर ठवणे ;

(८) शालेय स्तरावरील व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणाचे संयोजन करून काही कालानंतर ते चालविण्याची संपूर्ण जबाबदारी उचलणे.

२२. शिक्षण-विभागाच्या जिल्हा पातळीवरील कार्याची संघटना अधिक प्रभावी करण्यासाठी—

(१) जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यास पुरेशा योग्यतेचे स्थान देता यावे म्हणून भारतीय शिक्षण-सेव विभागामध्ये (Indian Educational Service) जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याची जागा समाविष्ट केली जावी ;

(२) त्याच्या हाती पुरेशी सत्ता दिली जावी ;

(३) जिल्हा पातळीवरील प्रशासक व पर्यवेक्षक यांची पात्रता व वेतनश्रेणी यात वाढ करण्यात यावी ;

(४) जिल्हा पातळीवरील अधिकाऱ्यांची संख्या वाढविण्यात येऊन त्याचबरोबर सांख्यिक माहितीच्य संकलनासाठी एक कक्ष निर्माण केला जावा.

(५) मुलींच्या शिक्षणास उत्तेजन देण्यासाठी जिल्हा पातळीवरील शैक्षणिक कर्मचाऱ्यांमध्ये स्त्रियांचे प्रमाण बरेच असावे.

**मुख्याध्यापक**

२३. मुख्याध्यापकांनी शाळांच्या सुधारणेकडे आत्मीयतेने लक्ष पुरवावे याकरिता त्यांची निवड काळजीपूर्वक करावी, त्यांना उत्तम प्रशिक्षण द्यावे, आणि त्यानंतर भरपूर कार्य-स्वातंत्र्य व आवश्यक ते अधिकार त्यांना देण्यात यावेत.

**नवीन पर्यवेक्षण योजनेतील शालासमूहाची (School Complex) भूमिका**

२४. प्रत्येक जिल्हा शिक्षणाधिकारी शक्यतोवर प्रत्येक शालासमूहाशी संपर्क ठेवील व प्रत्येक शालासमूह म्हणजे शैक्षणिक विकासाचा एक अविभिन्न घटक मानील. शालासमूहाकडे काही कर्तव्ये सोपविली जातील व ती पार पाडताना समूहातील प्रत्येक शाळेकडे व्यक्तीगत लक्ष देण्याकडे जबाबदारी समूहावर राहील. अध्यापनाच्या आणि मूल्यमापनाच्या सुधारलेल्या पद्धतींचा प्रयोग करण्याची शक्यता वाढावी, उपलब्ध सोयी व साहित्याचा लाभ शाळांनी सामुदायिकरीत्या घ्यावा. शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण करणे सोपे जावे व नव्या कार्यक्रमांची उपयुक्तता प्रत्यक्षात अजमावून पाहाता यावी यासाठी शाला-समूहाकडे यथोचित जबाबदाऱ्या व अधिकार सोपविण्यात यावेत.

२५. शालासमूह–योजना मोठ्या प्रमाणात कार्यवाहीत आणण्यापूर्वी प्रत्येक राज्यातील काही जिल्ह्यात पथदर्शक-प्रकल्पाच्या (Pilot Project) स्वरूपात ती प्रचारात आणून पहावी.

२६. शालासमूहामध्ये केवळ एकच नवीन उपक्रम सर्वव्यापी करावा असे नाही. समूहातील शाळांनी त्याखेरीज स्वतंत्रपणेही प्रायोगिक काम करावे.

**नवीन पर्यवेक्षण पद्धती**

२७. पर्यवेक्षण पद्धती ही शैक्षणिक सुधारणेचा कणाच आहे असे मानले पाहिजे आणि तिच्यात चैतन्य आणण्याचे कार्य अत्यावश्यक मानले पाहिजे.

२८. शैक्षणिक प्रशासन व शैक्षणिक पर्यवेक्षण ही कामे एकमेकापासून वेगळी केली पाहिजेत आणि जिल्हा शिक्षणमंडळाने प्रशासनाचे व जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याने पर्यवेक्षणाचे कार्य एकोप्याने केले पाहिजे.

२९. शाळेला मान्यता मिळणे व ती कायम राहाणे या स्वाभाविक गोष्टी आहेत ही कल्पना सोडून दिली पाहिजे आणि (सरकारसह) कुणाच्याही व्यवस्थापनाखाला असलेल्या प्रत्येक शाळेने आपल्या गुणवत्तेचे सातत्याने रक्षण केले तरच तिला मान्यता मिळाली पाहिजे व चालू राहिली पाहिजे.

३०. प्रत्येक शाळेची तपासणी दोन प्रकारे व्हावी :—

प्राथमिक शाळांची वार्षिक तपासणी जिल्हा शिक्षणमंडळाच्या अधिकाऱ्यांकडून, व त्रैवार्षिक अगर पंचवार्षिक तपासणी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याकडून; माध्यमिक शाळांची वार्षिक तपासणी जिल्हाशिक्षणाधिकाऱ्याकडून व त्रैवार्षिक अगर पंचवार्षिक तपासणी राज्य शालेय शिक्षणमंडळाकडून.

३१. या नव्या पर्यवेक्षण पद्धतीकडे शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन आणि विस्तारकार्य या जबाबदाऱ्या देखील राहतील.

३२. सर्व प्रशासक आणि पर्यवेक्षक यांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाची सोय राज्य शिक्षणशास्त्र संस्थेने व शैक्षणिक प्रशासकांच्या राष्ट्रीय प्रशिक्षण महाविद्यालयाने करावी.

## राज्य शिक्षणशास्त्र संस्था

३३. शिक्षणशास्त्र संस्थेच्या निर्मितीद्वारे राज्यातील शिक्षण–विभागात एक शिक्षणशास्त्रविषयक कक्ष निर्माण करणे इष्ट होईल. शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचे सेवांतर्गत प्रशिक्षण, शिक्षक-प्रशिक्षणातील सुधारणा, अभ्यासक्रम आणि क्रमिक पुस्तके यांचे प्रश्न, व्यावसायिक आणि शैक्षणिक मार्गदर्शन व मूल्यमापन, शैक्षणिक कार्यक्रमविषयक संशोधन व शैक्षणिक योजनांचे मूल्यमापन ही सारी कामे या कक्षाने करावीत.

## राज्य व राष्ट्रीय शिक्षण मंडळे

३४. शिक्षणाची गुणवत्ता सातत्याने वाढविण्यासाठी राज्य व राष्ट्रीय पातळीवर एक सुयोग्य यंत्रणा उभारण्यात आली पाहिजे.

३५. गुणवत्तेचे मानदण्ड पुढील अवस्थांच्या अखेरीस लागू करण्यात यावेत; उच्च प्राथमिक, निम्न माध्यमिक आणि दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाच्या अखेरीस येणारी उच्च माध्यमिक अवस्था.

३६. शैक्षणिक गुणवत्तेचे हे मानदण्ड स्थानिक परिस्थितीनुसार राज्य सरकारने निश्चित करावेत. राज्य मूल्यमापन संघटना आणि राज्य शालेय शिक्षण मंडळ यांनी गुणवत्तेच्या व्याख्या करणे, तिचे मूल्यमापन करणे आणि तिची वेळोवेळी फेरपहाणी करणे ही कामे करावीत.

३७. राष्ट्रीय शिक्षणमंडळाने राज्याराज्यातील शैक्षणिक दर्जाचे सुसंयोजन करावे व तो सतत उंचावत राहावा यासाठी राज्यांना साह्य द्यावे.

३८. राष्ट्रीय शैक्षणिक दर्जा केवळ किमान प्रगतीचा निदर्शक राहील. त्या खाली कोणत्याही राज्याची प्रगती घसरू नये. सर्व राज्यामध्ये निष्प्राण स्वरूपाचा शैक्षणिक सारखेपणा असावा असा या निदर्शकाचा अर्थ नाही.

## राज्य मूल्यमापन संघटना

३९. राज्यातील शिक्षणाच्या दर्जाची पातळी निश्चित करणे, त्याचे रक्षण करणे आणि त्याची फेरपाहणी करणे या कामात राज्य शिक्षण विभागाला साह्य करण्यासाठी एक 'राज्य मूल्यमापन संघटना' निर्माण करण्यात यावी. ही संघटना एक स्वतंत्र संस्था आहे असे मानावे. ती स्वायत्त असणे इष्ट ठरेल. तिच्या कार्याचा लाभ सर्व संबंधित शैक्षणिक संस्थांना व कार्यकर्त्यांना मिळावा.

४०. शाळांतील मूल्यमापन तंत्रात सुधारणा करण्याच्या कामी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांना, राज्य मूल्यमापन संघटना मदत देईल. अपेक्षित दर्जानुरूप शाळांतील अभ्यासक्रमाचे स्वरूप ठरविणे क्रमिक पुस्तके आणि इतर शैक्षणिक साहित्याची निर्मिती करणे, त्याचप्रमाणे निश्चित करण्यात आलेला दर्जा दोन्ही शैक्षणिक पातळीवर साध्य झाला आहे की नाही ते पाहणे, या सर्व कामांमध्ये राज्य सरकारच्या शिक्षण-विभागास राज्य मूल्यमापन संघटना सल्ला व साह्य देईल.

४१. राज्य सरकारच्या शालेय शिक्षणमंडळाच्या अध्यक्षांच्या प्रमुखत्वाखाली एक सल्लागार समिती नेमण्यात येऊन तिने राज्य मूल्यमापन संघटनेला साह्य द्यावे.

४२. राज्य शालेय शिक्षणमंडळाची नियुक्ती प्रत्येक राज्यात कायद्याने करावी आणि सध्या अस्तित्वात असलेल्या माध्यमिक शिक्षणमंडळाची व इतर संबंधित संघटनांची कामे नव्या शालेय शिक्षणमंडळाकडे सोपवावीत. आपल्या जबाबदाऱ्या व कामे योग्य रीतीने करण्यासाठी या मंडळाला भरपूर स्वातंत्र्य आणि पुरेसे अधिकार देण्यात यावेत. या मंडळाची अर्थव्यवस्था करताना त्याकडे जमणारा सर्व निधी एकत्र करून त्याची व्यवस्था व विनियोग करण्याचे काम मंडळाकडेच सोपविले तर त्याचे सुकर होईल. राज्य सरकारच्या शिक्षण विभागाचा एक अविभाज्य घटक म्हणून या मंडळाने काम करावे.



Sub. National Systems Unit,
National Institute of Educatio
Planning and Aminstration
17-B, Sri Aurbindo Marg, New Delhi-
DOC. No. 3321
Date 10/9/86

४३. शालेय पातळीवरील अभ्यासक्रमाच्या सर्व बाबतीची जबाबदारी मंडळाकडे राहील. प्राथमिक शाळांना मान्यता देण्याचे काम जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याकडे राहील आणि माध्यमिक शाळांना मान्यता देण्याचे काम शालेय शिक्षणमंडळ आणि राज्य सरकारचा शिक्षणविभाग या दोघांना मिळून करावे लागेल.

४४. मंडळाकडे निम्न माध्यमिक पातळीवरच्या बहि:शाल परीक्षा घेण्याचे काम तर राहीलच पण त्याशिवाय सामान्य अभ्यासक्रमाची उच्च माध्यमिक पातळीवरची बहि:शाल परीक्षा देखील मंडळालाच घ्यावी लागेल.

४५. काही काळानंतर शालेय शिक्षणमंडळाकडे सामान्य आणि व्यावसायिक या दोन्ही शाखांतील शैक्षणिक काम सोपवावे लागेल. परंतु ही व्यवस्था ताबडतोबीने करणे कदाचित व्यवहार्य ठरणार नाही. यासाठी काही काळापर्यंत शालेय स्तरावरील निरनिराळ्या व्यावसायिक पाठ्यक्रमासाठी वेगवेगळ्या संघटना निर्माण करणे आवश्यक आहे. तथापी या संघटनांच्या आणि शालेय शिक्षणमंडळाच्या कार्यामध्ये एकसूत्रिपणा असावा आणि त्यांचे काही सदस्यदेखील एकच असावेत.

४६. उच्च माध्यमिक अभ्यासक्रमांची व्यवस्था करण्याकरिता मंडळाने एक विशेष समिती नेमावी. या समितीच्या सदस्यांपैकी अर्धे शालेय स्तरातून व अर्धे विद्यापीठाच्या स्तरातून यावेत.

४७. परीक्षांचे निकाल जाहीर करताना लागणाऱ्या वेळेमध्ये शक्य तितकी कपात करण्यासाठी (१) यांत्रिकी सहाय्य घ्यावे आणि (२) एका किंवा दोन जिल्ह्यांसाठी उपमंडळे नेमून निकाल जाहीर करण्याचे काम सोपे करावे.

## केंद्र सरकारची भूमिका

४८. भारत सरकारला शालेय शिक्षणाविषयी सर्व प्रकारचा सल्ला देण्यासाठी शिक्षण मंत्रालयाने एक राष्ट्रीय शालेय शिक्षणमंडळ नियुक्त करावे. या मंडळाकडून शालेय शिक्षणाच्या वेगवेगळ्या स्तरांतील गुणवत्तेच्या 'अपेक्षित' प्रमाणाची निश्चिती होईल, गुणवत्तेच्या निकषांची वेळोवेळी फेरतपासणी करण्यात येईल आणि अभ्यासक्रमाच्या सुधारणासाठी व गुणवत्ता वधिष्णू ठेवण्यासाठी राज्यस्तरावरील शिक्षण-विभागांना सल्ला आणि साह्य देण्यात येईल. हे राष्ट्रीय मंडळ, विद्यापीठ अनुदान मंडळाशी आणि सर्व विद्यापीठाशी घनिष्ट संबंध ठेवील.

४९. शालेय शिक्षणाच्या विकासाकरिता भारत सरकारने केंद्रीय अर्थसहाय्य देऊन एक मोठा कार्यक्रम हाती घ्यावा. या कार्यक्रमात व्यावसायिक शिक्षणाच्या संस्थांची निर्मिती, गुणवत्तापूर्ण संस्थांचा विकास, आणि शिष्यवृत्यांची सोय या गोष्टी विशेषकरून समाविष्ट कराव्या.

५०. राष्ट्रीय शालेय शिक्षणमंडळाशी विचारविनिमय करून सध्याच्या केंद्रीय माध्यमिक शिक्षणमंडळाने काही निवडक शालेय विषयांच्या उच्च पातळीवरील परीक्षा दहावी आणि बारावी या वर्गांच्या अखेरीस घ्याव्यात. या परीक्षांचा अभ्यासक्रम तयार करताना राष्ट्रीय पातळीवर निश्चित केलेले गुणवत्तेचे मानदंड लक्षात घ्यावा. आरंभीच्या काळात गणित आणि विज्ञान या विषयांच्या परीक्षा घेण्यात याव्या. देशाच्या कोणत्याही भागातील शासकीय मान्यता असलेल्या माध्यमिक शाळेतून कोणाही विद्यार्थ्याला या परिक्षांना बसण्याची परवानगी असावी आणि परीक्षेतील मिळविलेल्या गुणांचे प्रमाणपत्र वेगवेगळ्या विषयाकरिता स्वतंत्रपणे देण्याची सोय असावी. शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्याकरिता या परिक्षांचा उपयोग होईल.

## सरकारमान्य नसलेल्या शाळा

५१. सर्व प्रकारच्या शिक्षणसंस्थांची शासकीय नोंद करण्याकरिता कायदेशिर तरतूद करणे इष्ट होईल. सरकारमान्य नसलेली संस्था चालविणे हा गुन्हा समजण्यात यावा. सरकारमान्य संस्थापैकी जिच्याकडून नियमाचे पालन होणार नाही तिची नोंद सरकारी कागदपत्रातून काढून टाकण्याचा कायदेशीर अधिकार राज्य सरकारांना द्यावा.

---

## प्रकरण अकरावें

# उच्च शिक्षण : उद्दिष्टे आणि सुधारणा

१. विद्यापीठे जेव्हा सत्य आणि उत्कृष्टता या दोन्ही मूल्यांशी अविचलपणे एकनिष्ठ राहातील तेव्हा राष्ट्रीय जीवनाच्या धारणेमध्ये आपली भूमिका व्यवस्थित बजावणे त्यांना शक्य होईल.

२. स्थूलमानाने पहाता विद्यापीठाची कर्तव्ये पुढीलप्रमाणे निर्देशिता येतील :—ज्ञानाचा शोध आणि वा करणे ; सामाजिक उद्दिष्टांशी समरस झालेले प्रशिक्षित कार्यकर्ते व लोकनेते यांचा समाजाला पुरवठा करणे ; समता आणि सामाजिक न्याय यांचा प्रसार करण्याकरिता कसोशीने प्रयत्न करणे ; आणि विद्यार्थी व शिक्षक यांच्या अंगी योग्य प्रवृत्ती आणि मूल्ये बाणवून त्यांच्या सहाय्याने ती सर्वसाधारण समाजामध्ये पसरविण्याचा प्रयत्न करणे.

३. देशातील सत्प्रवृत्तींचे रक्षण करणे हे विद्यापीठाचे अंगीकृत कार्य असल्यामुळे त्यांनी स्वतःचा विकास करताना 'समाजाचा चिकित्सकपणे विचार करणारी संघटना म्हणजे विद्यापीठ' या दृष्टीकोनाला उत्तेजन द्यावे.

४. समाज जे काही मागतो ते त्याला देणे ही विद्यापीठाची भूमिका नाही. समाजाला ज्याची गरज आहे ते त्याला दिले पाहिजे असा कटाक्ष विद्यापीठांनी ठेवणे आवश्यक आहे. याकरिता, स्वतंत्र आणि निस्पृह विचार पद्धतीतून अहितकारक आणि पारंपारिक वर्तनप्रवृत्तींना अडसर घालण्याचे काम त्याने करावे. अशा पद्धतीने (निस्पृह) विचार करण्याच्या प्रवृत्तीला त्यांनी विद्यार्थीवर्गात आणि सर्वसाधारण समाजामध्ये सुद्धा विशेष उत्तेजन द्यावे.

५. आधुनिक जगातील मानवाला भेडसावणाऱ्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक प्रश्नांची चिकित्सा करून समाजातील बुद्धिवंतांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचे काम विद्यापीठांनी करावे.

६. विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या थोरपणाशी समीप आणण्याच्या दृष्टीने विद्यापीठांनी आपले कार्यक्रम कल्पकता वापरून तयार करावेत आणि त्याद्वारे विद्यार्थ्यांचा परिचय उत्कृष्ट ग्रंथ, अत्युत्तम विचार आणि लोकोत्तर स्त्रिया व पुरुष यांच्याशी करून द्यावा.

७. सतत वाढत असलेल्या विविधप्रकारच्या विद्यार्थीसंख्येला शैक्षणिक सोयी पुरविण्यासाठी विद्यापीठांनी अंशवेळ अभ्यासक्रम, टपाली अभ्यासक्रम आणि अनेक तऱ्हेचे विस्तार-कार्यक्रम सुरू करावेत.

८. प्रौढ व्यक्तींच्या शैक्षणिक विकासाच्या जोडीलाच शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाला देखील विद्यापीठांनी सहाय्य करावे. त्याचप्रमाणे, पूर्वापार चालत आलेल्या आणि परीक्षांना महत्त्व देणाऱ्या शैक्षणिक परंपरा बाजूला सारून उत्कृष्ट अध्यापन आणि संशोधन यांच्या परस्परावलंबित विकासामधून शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याकडे विद्यापीठांनी लक्ष द्यावे. या कार्यक्रमाला अनुसरून काही प्रगताभ्यास केंद्र निर्माण करावी आणि जगातील उच्च शिक्षणाच्या संस्थामधील गुणवत्ता त्यांच्यात आणून भारतीय बौद्धिक जीवनाचा गुरुत्वमध्ये या देशात परत येईल असा प्रयत्न व्हावा.

९. ही उद्दिष्टे साधावयाची असल्यास, येत्या वीस वर्षामध्ये, काटेकोरपणे घडविलेला आणि विस्तृत असा उच्च शिक्षणाचा विकास कार्यक्रम आपल्याला अमलात आणावा लागेल. त्यामध्ये पुढील तीन गोष्टींना अग्रहक्क देण्याची जरूरी आहे :—(१) उच्च शिक्षण आणि संशोधन यांच्या गुणवत्तेत मूलभूत सुधारणा करणे, (२) देशाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची निकड भागविण्याकरिता आणि काही प्रमाणांत जनतेच्या वाढत्या सामाजिक आकांक्षांची दखल घेण्याकरीता उच्च शिक्षणाचा अधिक प्रसार करणे, (३) विद्यापीठांच्या व्यवस्थापनाची आणि प्रशासनाची सुधारणा करणे.

### प्रमुख (Major) विद्यापीठांची स्थापना

१०. ज्या विद्यापीठांमध्ये पहिल्या दर्जाचे पदव्युत्तर अभ्यासक्रम आणि संशोधनाचे कार्यक्रम राबविण्यात येतील आणि ज्याची गुणवत्ता जगातील इतर विद्यापीठांशी तुलनेमध्ये उत्कृष्ट ठरेल अशी काही प्रमुख विद्यापीठे स्थापन करणे ही उच्च शिक्षणाच्या पातळीवरची मूलभूत सुधारणा मानली पाहिजे. देशातील एकंदर विद्यापीठा-मधून विद्यापीठ अनुदान मंडळाने शक्य तितक्या लवकर सहा विद्यापीठे अशा प्रकारच्या विकासाकरिता निवडावीत.

११. त्यामध्ये एक भारतीय तंत्रविज्ञान संस्था (IIT) आणि एक कृषि विद्यापीठ असावे. हा कार्यक्रम १९६६–६७ मध्ये सुरू व्हावा.

१२. या प्रमुख विद्यापीठांमध्ये बुद्धिमान आणि चिकित्सक वृत्तीचे विद्यार्थी आणि प्रज्ञावंत व नामवंत प्राध्यापक घेण्यात यावेत व त्यांना अध्ययन आणि अध्यापन करण्यासाठी आवश्यक त्या सोयी निर्माण करून द्याव्या.

१३. प्रत्येक प्रमुख विद्यापीठांमध्ये पुष्कळशा शिष्यवृत्त्या पदवीपूर्व पातळीवर देण्यात याव्यात आणि त्यांची संख्या विद्यापीठ अनुदान मंडळाने दरवर्षी ठरवून द्यावी.

१४. प्रमुख विद्यापीठांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना द्यावयाच्या शिष्यवृत्त्यांची योजना राष्ट्रीय पातळीवरून करण्यात यावी आणि पदव्युत्तर अभ्यासकालात देखील त्या पुढे चालू ठेवाव्यात.

१५. या पैकी निम्म्या शिष्यवृत्त्या विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी असाव्यात आणि निम्म्या कार्यक्षेत्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवल्या जाव्यात.

१६. राज्य शालेय शिक्षणमंडळे व विद्यापीठे यांच्याकडून ज्या परीक्षा सध्या घेतल्या जात आहेत त्यांच्या आधारे शिष्यवृत्त्या देण्यास प्रत्यवाय नसावा; किंवा प्रत्येक प्रमुख विद्यापीठाने आपली खास चाचणी परीक्षा ठेवावी; अगर सर्व प्रमुख विद्यापीठांनी संयुक्तपणे एक चाचणी परीक्षा राष्ट्रीय पातळीवर घ्यावी.

१७. प्रमुख विद्यापीठांमध्ये अध्यापन आणि संशोधन करण्याकरिता विशेष पात्रतेचे आणि कार्यशक्तीचे जे प्राध्यापक मिळवावे लागतील त्यांची निवड देशाच्या सर्व भागातून करण्यात यावी.

१८. प्रमुख विद्यापीठांच्या प्रत्येक विभागाकरिता एक 'नेमणूक सल्लागार समिती' नेमावी आणि तिने देशातून व परदेशातून उत्कृष्ट पात्रतेचे प्राध्यापक मिळविण्याला सहाय्य करावे.

१९. या विद्यापीठात नेमावयाच्या प्राध्यापकांना सुरवातीसच जादा वेतनवाढ देण्यास हरकत नसावी आणि संशोधन करण्याची पुरेशी संधी व व्यावसायिक पात्रता वाढविण्याकरिता आवश्यक रजा त्यांना देण्यात यावी.

२०. या पद्धतीच्या प्रत्येक विद्यापीठाला विद्यापीठ अनुदान मंडळाने 'प्रासंगिक निधी' द्यावा आणि त्याचा उपयोग लोकोत्तर दर्जाचे प्राध्यापक मिळविण्याकरिता अधिक आकर्षक वेतने देण्याकडे करावा.

२१. अधिव्याख्याते आणि प्रपाठक यांच्या जागा कमी करून त्यामुळे वाचलेला पैसा अधिक प्राध्यापक नेमण्यासाठी खर्च करण्याला प्रमुख विद्यापीठांना मुभा द्यावी.

२२. प्रमुख विद्यापीठांमध्ये कार्यकर्ते नेमताना त्यांच्या सुयोग्यतेची खात्री झाल्याखेरीज नेमणुका करण्यात येऊ नयेत.

## प्रगताभ्यास केंद्रे

२३. विद्यापीठ अनुदान मंडळाने प्रगताभ्यास केंद्रे निर्माण करण्याच्या कार्यक्रमात वाढ करावी.

२४. सुयोग्य विद्यापीठामध्ये प्रगताभ्यास केंद्रांचे समूह स्थापण्यास यावेत.

२५. अशी प्रगताभ्यास केंद्रे विद्यापीठाच्या इतर कार्यक्रमापासून विभक्त होणार नाहीत याची काळजी घेण्यात यावी.

२६. येत्या पाच ते दहा वर्षांच्या काळात अशी पन्नास प्रगताभ्यास केन्द्रे स्थापन करण्यात यावीत आणि त्यातील काही आधुनिक भारतीय भाषांसाठी व निदान एक तरी शिक्षणशास्त्रासाठी असावे.

२७. सध्याच्या प्रगताभ्यास केंद्राच्या कार्यक्रमामध्ये कृषिशास्त्र, स्थापत्यशास्त्र, वैद्यकशास्त्र आणि आधुनिक भारतीय भाषा यांचा समावेश नाही. यापुढील कार्यक्रमात त्यांचा समावेश व्हावा.

२८. विद्यापीठांतील कोणत्याही अध्ययन विभागाची प्रगताभ्यास केंद्र म्हणून निवड करण्याआधी त्यामध्ये झालेल्या कार्याची गुणवत्ता व विस्तार, त्याची गुणवत्तेविषयी ख्याती, संशोधनामध्ये त्याने घातलेली भर आणि पुढील विकासाकरिता त्यामध्ये अंगभूत असणारी शक्ती या सर्व बाबींचा विचार करण्यात यावा.

२९. असे प्रगताभ्यास केंद्र विद्यापीठांमध्ये कायमचे व्हाण्याचा सन्मान विद्यापीठाला मिळवावयाचा असेल तर त्या दृष्टीने सतत प्रयत्न करून आपली पात्रता त्याने सिद्ध केली पाहिजे.

३०. प्रत्येक प्रगताभ्यास केंद्रामध्ये होत असलेल्या कार्याचे परीक्षण व त्याच्या विशेष यशस्वितेचे मूल्यमापन करण्यासाठी एक निरीक्षक समिती नेमण्यात यावी.

३१. प्रगताभ्यास केंद्राचा कारभार पहाण्याची जबाबदारी त्याच्या संचालकावर सोपविण्यात यावी आणि त्यामध्ये साह्य करण्यासाठी त्याच्या सहकाऱ्यांची एक लहान परंतु प्रातिनिधिक समिती नेमण्यात यावी.

## उत्कृष्ट कार्याचा विद्यापीठांतील इतर विभागात प्रसार

३२. विद्यापीठांतील सर्व कार्यकर्त्यांनी बौद्धिक जीवनाला प्राधान्य देणाऱ्या एकसंघ समूहामध्ये आपले रूपांतर करावे यासाठी योग्य ती उपाययोजना करण्यात यावी.

३३. प्रमुख विद्यापीठांतील सर्व विभागांची गुणवत्ता प्रगताभ्यास केंद्राइतकी वाढविण्यासाठी त्यांना विशेष अनुदाने देण्यात यावी.

३४. प्रगताभ्यास केंद्राशी जी महाविद्यालये संबद्ध असतील त्यांतील शिक्षक व पदव्युत्तर पातळीवरचे विद्यार्थी यांना केंद्राच्या कार्यात शक्य तितक्या प्रमाणात समाविष्ट करून घेण्यात यावे.

३५. महाविद्यालयांतील प्राध्यापकांना संशोधन करण्याची संधी द्यावी आणि प्रगताभ्यास केंद्रातील सोयींचा वापर करून त्यांतील कार्यकर्त्यांच्या बरोबरीने काम करण्याचा मानही त्यांना देण्यात यावा.

३६. प्रमुख विद्यापीठांच्या अधिकाराखाली असलेल्या महाविद्यालयांचा दर्जा वाढविण्यासाठी विशेष अनुदान देण्यात यावे.

३७. सर्व प्रकारचे मार्गदर्शन व सहाय्य दिल्यानंतरही संबद्ध महाविद्यालयांची प्रगती जर समाधनकारक वाटली नाही तर त्यांना दिलेली मान्यता विद्यापीठाने रद्द करावी.

३८. प्रगताभ्यास केंद्रांच्या विकासासाठी आवश्यक असलेला आवर्ती आणि अनावर्ती खर्चाचा निधी केंद्र सरकारने विद्यापीठ अनुदान मंडळाकडे सोपवावा.

## इतर विद्यापीठे आणि संबद्ध महाविद्यालयांची सुधारणा

३९. प्रमुख विद्यापीठांतील गुणवान विद्यार्थ्यांना अध्यापनाच्या व्यवसायात येण्याकरिता विशेष उत्तेजन द्यावे आणि त्यांपैकी बहुसंख्यांना त्यांनी ज्या महाविद्यालयांत शिक्षण घेतले असेल तेथे न नेमता इतर विद्यापीठांत व महाविद्यालयांत नेमावे. या व्यवस्थेमुळे शिक्षणाची गुणवत्ता वाढेल.

४०. अध्यापनाच्या व्यवसायामध्ये अत्युत्कृष्ट प्रज्ञेच्या व्यक्तींची निवड व्हावी म्हणून त्यांचा शोध घेण्यासाठी व योग्य ठिकाणी त्यांची नियुक्ती करण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने एक विशेष यंत्रणा निर्माण करावी.

४१. अत्युत्कृष्ट बुद्धिसामर्थ्याच्या व्यक्तींना विद्यापीठ अनुदान मंडळाने विद्यावेतन (Fellowship) देण्याची व्यवस्था करावी आणि विद्यापीठातील वेगवेगळ्या विभागांमध्ये मोकळ्या असलेल्या जागांवर काम करण्याची त्यांना संधी द्यावी.

४२. विद्यापीठे आणि संबद्ध महाविद्यालये यांना नेमून घ्यावयाच्या व्यक्तींची पूर्वनिवड (pre-selection) करण्याची संधी दिली जावी आणि या निवडलेल्या व्यक्तींना काही काल प्रमुख विद्यापीठांमध्ये काम पहाण्याची व करण्याची संधी देण्यात यावी.

४३. प्रमुख विद्यापीठे, प्रगताभ्यास केंद्रे आणि संशोधनाच्या विशेष शाखांमध्ये नामवंत असलेली महाविद्यालये यांना परिषदा आणि चर्चासत्रे यांमधून एकत्र येण्याला उत्तेजन देऊन त्यांचे आंतर-विद्यापीठ संबंध घनिष्ट करावे.

४४. इतर विद्यापीठे अगर महाविद्यालये यामध्ये काम करणाऱ्या विद्वान प्राध्यापकांना आणि शास्त्रज्ञांना काही काळ प्रगताभ्यास केंद्रामध्ये संशोधन करण्याची आणि चर्चासत्रे चालविण्याची संधी देण्यात यावी.

## इतर विद्यापीठांचा विकास

४५. ज्यांना प्रमुख विद्यापीठे म्हणून मानलेले नाही अशा इतर विद्यापीठांना देखील गुणवत्तेची वाढ करण्याकरिता विद्यापीठ अनुदान मंडळाने खास अनुदान आणि इतर सोई उपलब्ध करून द्याव्या.

## संबद्ध महाविद्यालयांचा विकास

४६. जी महाविद्यालये अनेक वर्षे चालू आहेत व विशेष चांगले कार्य करीत आहेत अशांना प्रमुख विद्यापीठांकडून खास सहाय्य मिळावे.

४७. संबद्ध महाविद्यालयाच्या कार्याचा दर्जा लक्षात घेऊन त्यांची वर्गवारी करण्यात यावी. ही वर्गवारी करताना त्यांच्या दर्जामध्ये जो तपशील अभिप्रेत असेल तो विद्यापीठ अनुदान मंडळाने ठरवावा आणि त्याच्या आधारे चौथ्या पंचवार्षिक योजनेमध्ये द्यावयाच्या अनुदानाची निश्चिती करावी.

४८. अत्युत्कृष्ट कार्य करणाऱ्या महाविद्यालयाला स्वायत्ततेचा अधिकार देण्यात यावा आणि त्या अधिकारानुसार त्या महाविद्यालयाने प्रवेशाचे नियम, अभ्यासक्रम आणि परीक्षा यांची व्यवस्था स्वतः ठरवावी.

४९. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात उत्कृष्ट महाविद्यालयांपैकी ज्यांना या स्वायत्ततेच्या योजनेत समाविष्ट होण्याची इच्छा असेल त्यातील पन्नास महाविद्यालये विशेष सहाय्यासाठी निवडण्यात यावीत.

# अध्यापन व मूल्यमापन यांची सुधारणा

## अध्यापनाची सुधारणा

५०. महाविद्यालयीन अभ्यासक्रमात सध्यापेक्षा अधिक लवचिकपणा असावा व विषय निवडण्याचे अधिक स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना देण्यात यावे.

५१. औपचारिक अध्यापन कमी करून त्याच्या जागी वैयक्तिक मार्गदर्शन, गटवार चर्चा, चर्चासत्रे, आणि स्वतंत्र अध्ययन यांवर अधिक भर देण्यात यावा.

५२. अध्यापन पद्धतींचा रोख घोकंपट्टी कमी करण्याकडे असावा. विद्यार्थ्यांची जिज्ञासा जागृत व्हावी आणि प्रमेयांची उकल करणे व स्वतंत्र विचार करणे याला उत्तेजन मिळावे, हे त्यांचे उद्दिष्ट असावे.

५३. शैक्षणिक वर्षामध्ये आणि सुटीच्या काळात देखील विद्यार्थ्यांच्या वाचनाच्या उपक्रमाला उत्तेजन देण्याकरीता चांगल्या वाचनालयाची सोय प्रत्येक महाविद्यालयामध्ये व्हावी.

५४. प्रत्येक विषयाच्या अध्ययनामध्ये त्याचे मूलभूत सिद्धांत समजून घेण्यावर आणि त्यांचा स्वतंत्रपणे विचार करण्यावर भर असावा.

५५. महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक आणि संशोधक कधी कधी कनिष्ठांच्या पातळीवर कार्य करू शकतील आणि त्यांच्याजवळ येऊ शकतील अशी संधी निर्माण करण्यात यावी.

५६. महाविद्यालयीन शिक्षणावरचा खर्च विशेष न वाढविता किंवा प्राध्यापकांची संख्याही अधिक न ठेवता, मोठी विद्यार्थीसंख्या असलेले वर्ग परिणामकारक रीतीने कसे शिकवता येतील याविषयीचे प्रायोगिक कार्य करण्याला आणि महाविद्यालयातील शिक्षण अंशतः तरी संशोधनाच्या आणि पदव्युत्तर पातळीच्या विद्यार्थ्यांकडून करण्याचे जे प्रयत्न होतील त्यांना विद्यापीठ अनुदान मंडळाने उत्तेजन द्यावे.

## अध्यापन पद्धती

५७. उच्च शिक्षणामध्ये उपयोगात आणावयाच्या अध्यापन पद्धतींच्या प्रश्नांची चिकित्सा विद्यापीठ अनुदान मंडळाने एक खास समिती नेमून करावी.

५८. विद्यापीठांमध्ये ज्या शिक्षण विभागांची निर्मिती सुचविण्यात आली आहे त्यांनी शालेय स्तरांवरील व त्याचप्रमाणे विद्यापीठे आणि संबद्ध महाविद्यालये यामध्ये वापरावयाच्या अध्यापन पद्धतींचा विशेष अभ्यास करण्याचे कार्य अंगीकारावे.

## परीक्षा पद्धतीतील सुधारणा

५९. प्रमुख विद्यापीठांमध्ये व अध्यापननिष्ठ विद्यापीठांमध्ये (Teaching Universities) ठराविक अभ्यासक्रम आणि बहि:शाल परीक्षा यांना चिकटून न राहता नव्या पद्धतीने अंतर्गत मूल्यमापनाचे कार्य प्राध्यापकांनी सातत्याने करण्याची पद्धती शक्य तितक्या लवकर अंमलात आणावी.

६०. ज्या विद्यापीठांच्या कक्षेत संबद्ध महाविद्यालये असतील त्यांनी बहि:शाल परीक्षाच्या जोडीला अंतर्गत मूल्यमापनाची पद्धतही अंमलात आणावी.

६१. विद्यापीठ अनुदान मंडळाने एक 'केंद्रीय परीक्षा सुधारणा कक्ष' निर्माण करावा आणि या कक्षाने विद्यापीठांच्या सहकार्याने काम करावे.

६२. काही विद्यापीठांमध्ये परीक्षा पद्धतीची सुधारणा करण्याकरिता स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात यावेत.

६३. मूल्यमापनाची नवी आणि सुधारलेली तंत्रे विद्यापीठातील अध्यापकांनी मान्य करावीत व वापरावीत यासाठी त्यांच्याकरिता चर्चासत्रे व कृतिसत्रे यांचा एक विस्तृत कार्यक्रम आखण्यात यावा.

६४. मूल्यमापन हा अध्यापनाचाच भाग असल्यामुळे परीक्षकांना त्याकरिता वेगळे पारिश्रमिक देण्याची पद्धती रद्द करण्यात यावी. परंतु कुणाही अध्यापकाला वर्षाकाठी पाचशेपेक्षा जास्त उत्तर-पत्रिका तपासण्यास सांगू नये.

## शिक्षणाचे माध्यम

६५. सर्वसाधारण शिकविण्याचे व परीक्षेचे माध्यम एकच असावे.

६६. विद्यापीठांमध्ये इंग्रजीचा वापर माध्यम या दृष्टीने करण्याचा प्रश्न इंग्रजीच्या प्रशासनामधील उपयोगावर अवलंबून राहील.

६७. विद्यापीठ स्तरावरील शिक्षणाकरिता प्रादेशिक भाषांचा वापर करणे हे अंतिम उद्दिष्ट असले तरी महत्त्वाची संदर्भ–भाषा (library-language) या दृष्टीने इंग्रजीला उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात नेहमीच महत्त्वाची व अत्यावश्यक भूमिका घ्यावी लागणार आहे.

६८. योग्य कालावधीत उच्च शिक्षणाच्या स्तरावरील सर्व अध्यापन शक्यतोवर द्वैभाषिक असावे आणि पदव्युत्तर पातळीवरील विद्यार्थ्यांना प्रादेशिक भाषांतून त्याचप्रमाणे इंग्रजीतून दिलेली व्याख्याने समजण्याइतके आणि इंग्रजीतील वाचनसाहित्य वापरण्याइतके भाषा ज्ञान असावे.

६९. पदवीपूर्व पाठ्यक्रमामध्ये बहुतेक सर्व अध्यापन प्रादेशिक भाषेतून करण्यात यावे. परंतु पदव्युत्तर पातळीवर ते इंग्रजीमधून करावे.

७०. ज्या प्रदेशात हिंदी भाषा वापरली जात नाही तेथे हिंदीच्या माध्यमातून शिकविणारी महाविद्यालये चालविण्याची परवानगी द्यावी आणि त्यांना उत्तेजनही द्यावे. ज्या भागामध्ये उर्दू बोलणारे विद्यार्थी पुरेशा संख्येने असतील तेथे उर्दू भाषेच्या माध्यमातून विद्यालये काढणे व चालविणे या बाबतीतही असेच धोरण स्वीकारावे.

७१. भाषिक दृष्टीने अल्पसंख्य असलेल्या लोकांनी चालविलेल्या उच्चशिक्षण संस्थांना अनुदाने देण्यात यावीत. भारतातील उर्दूसह सर्व अधुनिक भाषांच्या विकासासाठी प्रगताभ्यास केंद्र निर्माण करण्यात यावीं.

७२. भारतातील प्राचीन व आधुनिक भाषा ऐच्छिक विषय म्हणून अभ्यासाकरिता निवडण्यात याव्या. परंतु त्यातील कोणतीही भाषा विद्यापीठाच्या पातळीवर सक्तीची करण्यात येऊ नये.

७३. इंग्रजीच्या अभ्यासाकरिता आणि जेथे शक्य असेल तेथे इतर संदर्भभाषांच्या अभ्यासाकरिता विद्यापीठे व महाविद्यालये यामध्ये पुरेशा सोयी उपलब्ध करून देण्यात याव्या.

७४. विद्यापीठामध्ये नव्याने प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता इंग्रजीचे पुरेसे व्यावहारिक ज्ञान देऊ शकतील असे स्वतंत्र कक्ष निर्माण करावे आणि त्यामध्ये आधुनिक अध्यापन तंत्रे वापरण्यात यावीत.

७५. महाविद्यालयाच्या प्रथम वर्षामध्ये इंग्रजीच्या अभ्यासाचा समावेश ऐच्छिक विषय म्हणून करणे उपयुक्त ठरेल.

७६. इंग्रजीखेरीज इतर संदर्भ भाषांच्या अभ्यासावर आणि विशेषत: रशियन भाषेच्या अभ्यासावर मोठ्या प्रमाणात भर देण्यात यावा.

७७. प्रमुख विद्यापीठांच्या अखिल भारतीय स्वरुपाचे रक्षण करण्याकरिता त्यांचे शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असणे आवश्यक आहे.

### विद्यार्थी-कल्याण योजना

७८. विद्यार्थी–कल्याण योजना या केवळ विद्यार्थ्यांना साह्य देण्याचे उपक्रम नसून शिक्षणाचा एक अविभाज्य भाग आहेत असे मानले पाहिजे.

७९. या योजनांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश व्हावा :—

नवीन विद्यार्थ्यांना संस्थेची ओळख करून देणे, आरोग्यसेवा, वसतिगृहाच्या सोयी, शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन, व्यवसाय शोधण्यामध्ये साह्य, विद्यार्थ्यांचे अभ्यासेतर कार्यक्रम आणि आर्थिक मदत.

८०. उच्च शिक्षणाच्या सर्व संस्थांनी शक्षणिक वर्षाच्या आरंभी नव्या विद्यार्थ्यांसाठी परिचय कार्यक्रम आखून त्यांना संस्थेमध्ये रुळण्यास साह्य करावे.

८१. प्रत्येक विद्यार्थी एका शैक्षणिक सल्लागाराकडे सोपवून द्यावा आणि त्याचा अभ्यास व इतर कार्यक्रम यांची आखणी करण्यास व ते तडीला नेण्यास सल्लागाराचे साह्य मिळावे. संस्थेतील अध्यापकांपैकी प्रत्येकाने विद्यार्थ्यांच्या एका गटाचा सल्लागार म्हणून कार्य करावे.

८२. प्रत्येक विद्यापीठामध्ये आणि महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी आरोग्यसेवेची सोय करण्याच्या उपक्रमाला अग्रहक्क देण्यात यावा आणि विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक शिक्षण देण्यासाठी पुरेशा सोयी उपलब्ध करून द्याव्या.

८३. भारत सरकारने चालविलेल्या "वर्गणीदार आरोग्य योजने" च्या धर्तीवर विद्यार्थी आणि अध्यापक यांच्याकरिता आरोग्य सेवेची सोय करण्याची शक्यता विद्यापीठ अनुदान मंडळाने अजमावावी.

८४. शक्य तितक्या लवकर पदवीपूर्व पातळीवरील पंचविस टक्के आणि पदव्युत्तर पातळीवरील पन्नास टक्के विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहाची सोय करण्यात यावी.

८५. बाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता दिन-अभ्यासिकांची सोय करून त्या जोडीला कमी खर्चाची किंवा सहाय्यक अनुदान देण्यात आलेली उपहारगृहे काढावीत.

८६. निदान एक हजार विद्यार्थ्यांमागे एक शैक्षणिक मार्गदर्शक असावा.

८७. काही विद्यापीठांना शैक्षणिक मार्गदर्शनाचे प्रशिक्षण देण्याचा प्रकल्प हाती घ्यावा.

८८. काही विद्यापीठांतील विद्यार्थीसेवा योजनेच्या प्रमुखाच्या देखरेखीखाली एक माहितीकेंद्र व व्यवसायकेंद्र चालविण्यात यावे.

८९. शैक्षणिक सत्रे चालू असताना आणि सुटीच्या काळामध्येदेखील विद्यार्थ्यांना अनेक अभ्यासेतर प्रवृत्ती-मध्ये भाग घेता यावा यासाठी निरनिराळ्या प्रवृत्तींचा समावेश असलेले भरगच्च कार्यक्रम तयार करण्यात यावे.

९०. विद्यार्थी-सेवा योजना राबविण्यासाठी एक पूर्ण वेळ काम करणारा योजनाप्रमुख प्रत्येक विद्यापीठात असावा.

**विद्यार्थी संघटना**

९१. प्रत्येक विद्यापीठातील विद्यार्थी संघाने (Student Union) कोणत्या पद्धतीने कार्य करावे याविषयीचा निर्णय विद्यापीठाने घ्यावा. या बाबतीतील प्रायोगिक कार्य फार उपयुक्त ठरेल.

९२. विद्यार्थी संघाचे सदस्यत्व स्वयंसिद्धतेने प्रत्येक विद्यार्थ्याला मिळावे परंतु विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांसाठी नियोजित केलेल्या अनेक उपक्रमांपैकी निदान एकामध्ये तरी भाग घेणे प्रत्येक विद्यार्थ्याला आवश्यक असावे.

९३. विद्यार्थी संघाच्या पदाधिकाऱ्यांची निवडणूक विद्यापीठातील वेगवेगळ्या विद्यार्थी मंडळातून व्हावी. परंतु जे विद्यार्थी एकाच वर्गात दोन किंवा अधिक वर्षे राहिले असतील त्यांना निवडणुकीसाठी अपात्र ठरविण्यात यावे.

९४. विद्यार्थी संघाच्या उपक्रमामध्ये अध्यापकांनी अधिक मोठ्या प्रमाणात भाग घ्यावा याकरिता विद्यापीठातील किंवा महाविद्यालयातील विद्यार्थी संघाची घटना तयार करताना सर्व अध्यापकांना व विद्यार्थ्यांना स्वयंसिद्धतेने संघाचे सदस्यत्व मिळू शकेल अशी काळजी घ्यावी.

९५. विद्यार्थ्यांच्या खऱ्याखुऱ्या अडचणी जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी विद्यार्थी व शिक्षकांच्या संयुक्त समित्यांचा पुरेपूर उपयोग करून घेण्यात यावा.

९६. विद्यापीठ आणि महाविद्यालये यांतील विद्यार्थी संघाच्या प्रतिनिधींची वार्षिक परिषद भरविण्याकरिता विद्यापीठ अनुदान मंडळाने पुढाकार घ्यावा व आर्थिक साह्य करावे.

**विद्यार्थ्यांची शिस्त**

९७. विद्यापीठ पातळीवरील युवक-युवतींना सुसंस्कृत समाजातील अपेक्षित मानदण्ड शिक्षणाच्या नाह्याने समजावेत आणि ते प्रत्यक्षात आणता यावेत. त्याचबरोबर, महत्त्वाच्या सामाजिक मूल्यांविषयीची निष्ठा त्यांच्यात निर्माण व्हावी

९८. बेशिस्तपणाची जबाबदारी अनेकांवर येते आणि त्यातील सर्वांनी आपआपले कर्तव्य केल्याखेरीज बेशिस्तपणाच्या समस्येचे निराकारण होऊ शकत नाही; म्हणून योग्य कर्तव्यपालनाचे कार्य विद्यार्थी, पालक, अध्यापक, राज्य सरकार आणि राजकीय पक्ष या सर्वांकडून पार पाडले पाहिजे.

९९. ज्या शैक्षणिक उणीवांमुळे विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण होते त्या नाहीशा करण्याची जबाबदारी शिक्षणव्यवस्थेने घेतली पाहिजे आणि बेशिस्त वर्तनाचा पुनःपुनः होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी योग्य सल्लामसलत देणारी यंत्रणा व प्रशासकीय व्यवस्था निर्माण करण्यात आली पाहिजे.

१००. शिक्षणसंस्थेमधून जीवनविकासाची जी संधी उपलब्ध होऊ शकते आणि विद्यार्थ्यांकडून ज्या बौद्धीक व सामाजिक अपेक्षा संस्थेकडून ठेवल्या जातात, त्यांच्याद्वारे विद्यार्थ्यांना शिस्तपालनासाठी प्रेरणा मिळत असते. या विषयीच्या सुधारणेबरोबरच विद्यार्थ्यांकरिता योजण्यात आलेल्या कल्याण व सेवा कार्यक्रमांचा दर्जा देखील उंचावला पाहिजे.

१०१. विद्यापीठातील सर्व जीवन एकसंघ आहे असे मानण्यात आले पाहिजे आणि अध्यापक, विद्यार्थी व शासन यंत्रणा यामध्ये निर्माण होणारा विभक्तपणा टाळण्याचे प्रयत्न कसोशीने झाले पाहिजेत.

# प्रकरण बारावे

## उच्चशिक्षण : विद्यार्थीप्रवेश व पाठ्यक्रम

१. उच्चशिक्षणाच्या सोयींचा विस्तार करण्याची योजना आखताना देशातील मनुष्यबळाची आवश्यकता आणि उपलब्ध असलेले व्यवसाय या दोन्ही गोष्टी जमेस धराव्या लागतील.

२. कृषीशास्त्र, स्थापत्यशास्त्र, वैद्यकशास्त्र इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सोयी वाढवाव्या लागतील आणि ज्ञानविज्ञानाच्या पदव्युत्तर कार्यक्रमात विशेष वाढ करावी लागेल.

३. पदव्युत्तर पातळीवरील विद्यार्थ्यांचे पदवीपूर्व पातळीवरील विद्यार्थ्यांशी प्रमाण ११ टक्के आहे ते १९८६ सालापर्यंत ३० टक्क्यांपर्यंत वाढवावे.

### प्रवेशाकरिता निवड

४. पदवीपूर्व पातळीवरील विद्यार्थीसंख्या देशातील मनुष्यबळाच्या आवश्यकतेशी निगडित करावी. उच्चशिक्षणाची सार्वजनिक मागणी व मनुष्यबळाच्या दृष्टीने ठरविण्यात आलेली विद्यार्थीसंख्या यांच्या दरम्यान असलेले अंतर भरून काढण्यासाठी निवडक विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्याचे धोरण आखणे भाग आहे.

५. उच्चशिक्षणाच्या सर्व शाखा व सर्व संस्थांमध्ये निवडक प्रवेशाचे धोरण स्वीकारले पाहिजे.

६. निवडक प्रवेशाचा कार्यक्रम अंमलात आणत असताना प्रत्येक संस्थेतील अध्यापकांची संख्या व पात्रता आणि इतर सोयी जमेला धरून तिच्यात किती विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल ते ठरविण्यात आले पाहिजे. प्रवेशाच्या पात्रतेचे नियम विद्यापीठांनी ठरविले पाहिजेत. प्रवेश इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांतून सर्वोत्तम विद्यार्थी निवडून घेण्याकरिता प्रत्येक संस्थेने निवडीसाठी योग्य नियम ठरवावे.

७. विद्यापीठातील ज्ञानशाखा आणि वाणिज्यशाखा यांच्या पाठ्यक्रमासाठी किती जागा राखावयाच्या या विषयीचे काटेकोर निष्कर्ष आणि तपशीलवार नियम विद्यापीठांनी ठरवावे.

८. या समस्येचा अभ्यास करण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने एक समिती नेमावी व तिचे निष्कर्ष विद्यापीठांना कळवावे.

९. प्रत्येक संबद्ध महाविद्यालयामध्ये किती जागा उपलब्ध करून द्यावयाच्या ते संस्थावर ठरवावे आणि मान्यता देण्याच्या अटींमध्ये जागांच्या संख्येविषयीची अट समाविष्ट करण्यात यावी.

१०. विद्यापीठांनी प्रवेश-पात्रतेच्या अटी तयार करताना त्यामध्ये पुरेसा लवचिकपणा ठेवावा आणि सर्व होतकरू विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल अशी व्यवस्था करावी.

११. उत्कृष्ट विद्यार्थी निवडण्याचे आपआपले तंत्र प्रत्येक संस्थेने स्वतंत्रपणे ठरवावे.

१२. विद्यार्थी प्रवेशाची पात्रता ठरविण्याकरिता जोपर्यंत सध्या अस्तित्वात असलेल्या परीक्षापद्धतीखेरीज अधिक चांगली पध्दती उपलब्ध होत नाही तोपर्यंत परीक्षापद्धतीतील उणीवा लक्षात घेऊन त्यांची भरपाई करण्याकरिता विद्यार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचाही विचार करण्यात यावा आणि विद्यार्थी-प्रवेशाची सांगड विद्यार्थ्यांच्या जन्मजात बुद्धिमत्तेशी घालावी. विशेषतः काठावर असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत प्रवेशाचे नियम या दृष्टिकोनातून थोडे सैल करण्यास हरकत नसावी.

१३. विद्यार्थ्यांची अंतिम निवड करताना परीक्षेतील गुणाबरोबरच शालेय प्रगतीची नोंद आणि परीक्षेमध्ये ज्या नैपुण्याचे निदान होऊ शकत नाही ते देखील जमेला धरण्यात यावे.

१४. ज्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता स्पष्ट दिसत असेल परंतु ज्यांच्या बाबतीत प्रवेशाच्या अटींची पूर्तता झाली नसेल अशा विद्यार्थ्याला प्रवेशाचे नित्याचे नियम सैल करून उच्च शिक्षणाची संधी देण्याचा अधिकार, फक्त अपवादात्मक उदाहरणात, विद्यापीठांना असावा आणि विद्यापीठांनी यासंबंधी विशेष नीतिधैर्य दाखवावे.

१५. उत्तम दर्जाच्या संस्थांमध्ये प्रवेश देताना, शिष्यवृत्त्यांकरिता शालेय समूहांमधून विद्यार्थी निवडण्याची जी तंत्रे सुचविलेली आहेत त्यांचा उपयोग करावा.

### विद्यार्थी-प्रवेश मंडळ

१६. प्रवेशासंबंधी सर्व बाबतीत सल्ला देण्याकरिता प्रत्येक विद्यापीठाने एक विद्यापीठ-प्रवेश मंडळ नियुक्त करावे.

४९. ज्या विद्यापीठामध्ये चांगल्या शैक्षणिक सोई उपलब्ध असतील त्यांनी फक्त विशेष किंवा सन्मानासहित -या दोन प्रकारच्याच पाठ्यक्रमाची सोय करावी.

५०. सर्व संबद्ध महाविद्यालयांना आपल्या सोईप्रमाणे सामान्य (पास किंवा सम्मानासहित) आणि विशेष या दोन्ही प्रकारचे पाठ्यक्रम ठेवता यावेत परंतु अशा पाठ्यक्रमासाठी प्रवेश देतांना खर्चामध्ये काटकसर करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या संख्येवर किमान मर्यादा घालाव्यात.

५१. अधिस्नातक पातळीवरील पाठ्यक्रमामध्ये पुष्कळच लवचिकपणा आणि नूतनीकरण साधण्याची आवश्यकता आहे. पुढील अभ्यासक्रमामध्ये वेगवेगळ्या विषयात आंतरशाखीय संशोधन करता यावे या दृष्टीने हा बदल करण्यात यावा.

५२. पदव्युत्तर पाठ्यक्रमांची पुनर्रचना करतांना त्यात दोन तऱ्हेच्या सोई असाव्यात विस्तृत असलेला सामान्य अभ्यासक्रम आणि एका किंवा दोनच विषयामध्ये सखोल ज्ञान देणारा अभ्यासक्रम.

५३. पीएचडी. च्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना निदान दोन ते तीन वर्षे अभ्यास करणे आवश्यक आहे. परंतु पदवीकरिता केलेले संशोधन म्हणजे विद्यार्थ्यांच्या संशोधनात्मक अध्ययनाची पूर्तता आहे असे न मानता ती पहिली पायरी आहे असे मानावे.

५४. अधिस्नातक पातळीवर झालेले अध्ययन पीएचडी च्या अभ्यासक्रमाची पुरेशी बैठक आहे हा विचार सोडून देऊन ज्या समस्येची उकल पीएचडी च्या संशोधनामध्ये करावयाची असेल तिच्याशी संबंधित असलेल्या विषयांच्या व्याख्यानांना हजर राहणे आणि वरच्या दर्जाच्या चर्चात्मक निबंधलेखन करणे हा कार्यक्रम अत्यावश्यक मानावा.

५५. पीएचडी. च्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी काळजीपूर्वक निवडले जावेत आणि प्रबंध सादर करण्याची कालमर्यादा निश्चितपण ठरविण्यात यावी.

५६. एका प्राध्यापकाने एकावेळी किती विद्यार्थ्यांना मार्गदर्शन द्यावयाचे त्यांचीही मर्यादा ठरवावी.

५७. पीएचडी. साठी केलेल्या संशोधन मूल्यमापन करण्याची पद्धती सुधारणा अत्यावश्यक आहे. विद्यार्थ्याने आपल्या प्रबंधाचे यथायोग्य मंडन करणे हा मूल्यमापनातील आवश्यक भाग मानला पाहिजे.

५८. अधिस्नातक पदवीपातळीवरच्या कांही विषयांचा अभ्यास करताना आणि पीएचडी. च्या सर्वविद्यार्थ्यांकरिता इंग्रजी सोडून दुसऱ्या एका जागतिक भाषेचा अभ्यास सक्तीचा असावा.

५९. विद्यापीठामधील अध्ययनासाठी 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही सर्वोच्च पदवी मानावी. विद्वज्जनांनी मान्यता दिलेल्या संशोधनाकरिता ती देण्यात यावी.

६०. ज्या विद्यापीठामध्ये आंतरशाखीय अध्ययन होत असेल तेथे संबंधित विषयांचे पुरेसे तज्ज्ञ प्राध्यापक असले तर, त्यांच्या कार्याच्या विकासाठी खास प्रयत्न करण्यात यावे.

६१. आंतरशाखीय अध्ययनाचे उद्दिष्ट साधण्यासाठी प्राध्यापकांच्या नेमणुका करत असतांना अनेकविध विषयांचे तज्ज्ञ निवडण्यांची काळजी घ्यावी.

६२. भारतीय विद्यापीठांनी आणि संशोधनसंस्थांनी आपल्या कार्यात समाजिक शास्त्रांच्या संशोधनाला यापुढे फार महत्वाचे स्थान देण्याची आवश्यकता आहे.

६३. सामाजिक शास्त्रांच्या विकासाठी पुरेसे द्रव्यसहाय्य देण्याची तरतूद करणे आणि शिष्यवृत्यांची सोय करून या क्षेत्रात बुद्धीमान विद्यार्थ्यांना आकर्षून घेणे, या उपयांची अत्यंत आवश्यकता आहे.

६४. अनेक विद्यापीठांमध्ये समाजिक शास्त्रांच्या परस्परसंबंधित गटांच्या अध्ययनासाठी प्रगताभ्यास केंद्र सुरू करण्यांत यावीत.

६५. शैक्षणिक संशोधनासाठी सर्व प्रकारची माहिती पुरविण्याचे आणि संशोधन प्रल्पांची इतिवृत्त संग्रही ठेवून, ज्यांना जरूर असेल त्यांना ती उपलब्ध करून देण्याचे कार्य राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेने ( NCERT ) करावे.

६६. शिक्षणशास्त्रामध्ये संशोधन करीत असलेल्या विद्वानांचा एकाकीपणा नाहीसा करण्याकरिता परिषद वेळोवेळी भरविण्यांत याव्यात.

६७. स्वतःच्या कार्यक्रमाशी संबंधित असलेल्या शैक्षणिक समस्याविषयी संशोधन करण्याची जबाबदारी विद्यापीठांनी उचलावी.

६८. शैक्षणिक विचारमंथन आणि संशोधन यांना उत्तेजन देण्याकरिता एक राष्ट्रीय शैक्षणिक अकादमी स्थापन करण्यात यावी.

६९. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण मंडळाने आणि राज्य शिक्षणशास्त्रसंस्थांनी शैक्षणिक संशोधनांचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात अंगिकारावा. परंतु इतर संस्थांना संशोधनासाठी सहाय्यक अनुदाने देण्यांचे काम त्यांनी करू नये.

७०. शैक्षणिक संशोधनासाठी अनुदाने देण्याकरिता केंद्रीय शिक्षण मंत्रालयामध्ये एक शैक्षणिक संशोधन मंडळ स्थापन करण्यात यावे.

७१. विद्यापीठ अनुदान मंडळ, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण मंडळ आणि राज्य शिक्षणशास्त्र संस्था यांनी शैक्षणिक संशोधनाचे निष्कर्ष विद्यापीठांना, राज्य शिक्षणविभागांना, शिक्षणसंस्थांना व शिक्षकांना उपलब्ध करून द्यावेत.

७२. शैक्षणिक संशोधनातील प्रकल्पांचा अग्रक्रम ठरविताना, विकेंद्रीत पद्धतीने निर्णय घेण्यावर भर द्यावा.

७३. राज्य सरकार शिक्षणावर जो पैसा खर्च करीत असेल त्यातील निदान एक टक्का खर्च शैक्षणिक संशोधनावर व्हावा.

७४. शिक्षणक्षेत्रात प्रत्यक्ष कार्य करीत असलेल्या व्यक्तींना शैक्षणिक संशोधनाचे निष्कर्ष समजावेत आणि संशोधकांना प्रत्यक्ष कार्यातील समस्यांची माहिती व्हावी म्हणून या दोन्ही प्रकारच्या कार्यकर्त्यांच्या परिषदा घेऊन माहितीची देवाणघेवाण करण्याची संधी त्याना उपलब्ध करून दिली पाहिजे.

— — —

## प्रकरण तेरावे

# विद्यापीठाचे व्यवस्थापन

१. विद्यापीठांचे विशेष उद्दिष्ट आणि त्यांचे कार्यक्षेत्र यांना यथोचित ठरणारी व्यवस्थापनाची गतिमान तंत्रे अवलंबविण्यात यावीत.

२. विद्यापीठांनी गटवारीने एकत्रित येऊन प्रशासनाच्या आणि व्यवस्थापनाच्या प्रश्नांचा अभ्यास करावा म्हणून विद्यापीठ अनुदान मंडळाने त्यांना विशेष उत्तेजन द्यावे.

३. विद्यार्थ्यांची निवड, अध्यापकांची नेमणूक व बढती, अभ्यासक्रमांची निश्चिती, अध्यापन तंत्रांचे विकसन आणि संशोधनाकरिता प्रमेयांची आणि अध्ययनशाखांची निवड, या सर्व बाबतीतील कार्यामध्ये विद्यापीठाला स्वायत्तता मिळाली पाहिजे.

४. विद्यापीठाची स्वायत्तता तीन प्रकारांनी प्रतीत होत असते : विद्यापीठाच्या अंतर्गत कार्यातील स्वायत्तता, शिक्षणव्यवस्थेमधील विद्यापीठाचे स्वायत्त स्थान आणि शिक्षणव्यवस्थेच्या बाहेर असलेल्या संघटना व विद्यापीठे यांचे संबंध लक्षात घेता विद्यापीठाने उपभोगावयाची स्वायत्तता.

### विद्यापीठांची अंतर्गत स्वायत्तता

५. विद्यापीठातील वेगवेगळ्या समित्यांमध्ये शिक्षणक्षेत्राबाहेरचे सदस्य केवळ समाजाचे हितसंबंध व दृष्टिकोन विद्यापीठासमोर ठेवण्याकरिता यावेत. हे दृष्टीकोन अगर हितसंबंध त्यांनी विद्यापीठावर लादू नयेत.

६. विद्यापीठामधील शैक्षणिक कार्याला उपयुक्त ठरणे हा विद्यापीठातील व्यवस्थापन यंत्रणेचा मुख्य उद्देश आहे.

७. काही उत्कृष्ट कल्पना खालच्या पातळीवरील कार्यकर्त्यांकडून पुढे येऊ शकतात ही गोष्ट विद्यापीठाच्या व्यवस्थापनामध्ये मान्यता पावली पाहिजे.

८. प्रत्येक विद्यापीठाच्या प्रत्येक विभागामध्ये, त्या त्या विभागाच्या प्राध्यापकाच्या अध्यक्षतेखाली, एक व्यवस्थापन समिती नेमण्यात यावी आणि तिला बरेच विस्तृत आर्थिक व शासकीय अधिकार देण्यात यावेत.

९. आपल्या स्वायत्ततेच्या आणि स्वातंत्र्याच्या रक्षणाविषयी इतरांनी जेवढी काळजी घ्यावी असे विद्यापीठांना वाटते तेवढीच काळजी त्यांनी महाविद्यालयांच्या बाबतीमध्ये घेतली पाहिजे.

१०. विद्यापीठाच्या प्रत्येक विभागामध्ये आणि प्रत्येक महाविद्यालयामध्ये विद्यार्थी व अध्यापक यांची एक 'सहसमिती' (Joint Committee) असावी आणि अशा सर्व समित्यांच्या आढळात येणाऱ्या सर्वसाधारण अडचणींचा आणि इतर बाबींचा विचार करण्यासाठी प्रत्येक संस्था प्रमुखाच्या अध्यक्षतेखाली एक 'केंद्र समिती' स्थापन करण्यात यावी.

११. विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींना हळूहळू विद्वत्सभा आणि विधिसभा (Court) यामध्ये प्रवेश द्यावा.

### विद्यापीठांची शिक्षणव्यवस्थेतील स्वायत्तता

१२. आंतर विद्यापीठ मंडळाचे सदस्यत्व प्रत्येक विद्यापीठाला आपोआप प्राप्त व्हावे आणि देशातील एका विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या सर्व पदव्यांना इतर विद्यापीठांनी आपोआप मान्यता द्यावी.

१३. ज्या विद्याशाखांमध्ये फार महागाचे साहित्य आवश्यक असेल किंवा जिथे सुपात्र प्राध्यापक दुर्मिळ असतील, तेथे अनेक विद्यापीठांनी एकत्रित येऊन आपआपल्या गरजा सहकार्याने भागवून घेण्यासाठी योग्य ती व्यवस्था करावी.

### विद्यापीठाची बाहेरील संघटना व विद्यापीठाची स्वायत्तता

१४. ज्यांच्यायोगे विद्यापीठावरील सामाजिक हक्कांना मान्यता देण्यात येईल परंतु विद्यापीठाच्या स्वायत्ततेला धोका पोहोचणार नाही अशा सहकार्याने निर्णय घेण्याच्या परंपरा व प्रवृत्ती विकसित करण्याकडे लक्ष दिले पाहिजे.

१५. विद्यापीठाच्या स्वायत्त कार्यक्षेत्राच्या कक्षा स्पष्टपणे ठरविल्या पाहिजेत आणि त्याबाबतीत काही उणीवा राहू नयेत याकरिता आवश्यक असलेली व्यवस्था उच्च शिक्षणाच्या एकंदरीत पद्धतीमध्ये करण्यात यावी.

१६. विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या बाबतीत, प्रवेश देणाऱ्या यंत्रणेने वैयक्तिकरीत्या अगर सामूहिक पद्धतीने विद्यार्थ्यांच्या पात्रतेच्या आधारावर जे निर्णय घेतले असतील त्यांना कोणत्याही प्रकारचे बंधन घालण्यात येऊ नये.

१७. विद्यापिठाच्या विकासाच्या योजना करताना, राष्ट्राच्या शिक्षित मनुष्यबळाच्या गरजांशी त्या सुसंवादी राहातील अशी खात्री करून घेतली पाहिजे. कोणत्याही विवक्षित क्षेत्रात मनुष्यबळाचा तुटवडा पडणार नाही किंवा गरजेपेक्षा अधिक निर्मितीही होणार नाही, याची दखल घेतली जावी. परंतु, त्याचबरोबर, जनतेच्या वाढत्या शैक्षणिक आकांक्षांचाही विचार केला जावा.

१८. प्रत्येक विद्यापिठात किती विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करावी, कोणते पाठ्यक्रम घ्यावे व कोणत्या समस्यांचे व्यावहारिक संशोधन व्हावे, हे ठरविण्याकरिता विचारविनिमय घडावा म्हणून विद्यापीठे, विद्यापीठ अनुदान मंडळ, आंतर-विद्यापीठ मंडळ आणि सरकार यांची एक संयुक्त यंत्रणा निर्माण करण्यात यावी.

१९. विद्यापीठाच्या स्वायत्ततेला लोकमताचा सबळ पाठिंबा मिळविण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळ, आंतर-विद्यापीठ मंडळ आणि समाजातील विद्वज्जन यांनी फार महत्त्वाची भूमिका बजावली पाहिजे.

२०. विद्यापीठांनी आपली शैक्षणिक आणि सामाजिक कर्तव्ये सातत्याने पार पाडून, आपली स्वायत्तता टिकविली पाहिजे.

**विद्यापीठांची अर्थव्यवस्था**

२१. राज्यसरकारने पुरेसा निधी विद्यापीठांच्या स्वाधीन करावा आणि अर्थव्यवस्थेविषयीचे नियम सोपे करावेत.

२२. विद्यापीठ अनुदान मंडळाने विद्यापीठांना त्यांच्या विकासयोजनांसाठी आणि चालू खर्चासाठी देखील अनुदान देण्याची व्यवस्था करावी.

२३. विद्यापीठांच्या विकास खर्चामध्ये, राज्य सरकार आणि विद्यापीठ अनुदान मंडळ यांनी योग्य प्रमाणामध्ये आपआपला खर्चाचा हिस्सा द्यावा.

२४. राज्य सरकारने विद्यापीठांना त्यांच्या नित्याच्या खर्चावर अनुदान दिले नाही तर अशा वेळी विद्यापीठांना जी अडचण सोसावी लागते ती नाहीशी करण्यासाठी विद्यापीठ-अनुदान मंडळाने योग्य ती पावले उचलावीत.

२५. राज्य सरकारकडून विद्यापीठांना द्यावयाच्या साहाय्यक अनुदान पद्धतीची पुनर्घटना करून खंडपद्धतीने अनुदान (Block Grands) देण्याची सोय करावी.

२६. विद्यापीठांची आर्थिक व्यवस्था भक्कम पायावर उभारण्याकरिता तिची वेळोवेळी पाहणी करावी. आणि विद्यापीठ अनुदान मंडळाने दिलेल्या सल्ल्यानुसार राज्य सरकारने आर्थिक सहाय्य उपलब्ध करून द्यावे.

२७. शासनाच्या प्रत्यक्ष हस्तक्षेपापासून विद्यापीठाचे संरक्षण व्हावे आणि सार्वजनिक उत्तरदायित्वाची प्रत्यक्ष जबाबदारीही विद्यापीठावर असू नये.

२८. विद्यापीठांच्या आर्थिक आणि शासकीय स्वातंत्र्यामध्ये हस्तक्षेप न करता त्यांच्या कामावर देखरेख करण्याची आणि ते योग्य मार्गाने चालू ठेवण्यासाठी प्रयत्न करण्याची संधी राज्य सरकारांना मिळावी म्हणून राज्यातील विद्यापीठांबाबतच्या कायद्यात योग्य कलमांचा समावेश करावा.

**कुलगुरूंची नेमणूक व त्यांची भूमिका**

२९. कुलगुरूंची निवड करण्याचे काम जरी सरतेशेवटी प्रत्येक विद्यापीठावरच सोपवावयाचे असले तरी दिल्ली विद्यापीठातील पद्धती किंवा इतर तत्सम पद्धती वापरणे सध्या योग्य ठरेल.

३०. कुलगुरूंची निवड करणाऱ्या समितीचे सदस्य स्वतः विद्वान आणि निस्पृह असावेत. त्यांपैकी एखाद्याचा सन्माननीय कार्यकर्ता या दृष्टीने विद्यापीठाशी संबंध असला तर त्याला हरकत असू नये.

३१. विद्यापीठाचे उपकुलगुरु अगर प्रमुख प्रशासक हे प्रत्येक विद्याशाखेच्या प्रमुखामधून दर दोन वर्षांनी पाळीपाळीने निवडून घेण्यास हरकत नसावी.

३२. विद्यापीठाच्या अस्तित्वातील पहिल्या पाच वर्षाकरिता कुलगुरु नेमण्याचा अधिकार विद्यापीठाचे कुलपती (Chancellor) किंवा महामात्र (Visitor) यांनाच असावा.

३३. कुलगुरुपदावर नेमण्यात यावयाची व्यक्ती मान्यवर शिक्षणतज्ज्ञ असावी किंवा हे स्थान पुरेसा प्रशासकीय अनुभव असलेल्या एखाद्या नामांकित विद्वानाला देण्यात यावे.

३४. कुलगुरूंची नियुक्ती पाच वर्षाच्या मुदतीसाठी केली जावी आणि कोणत्याही व्यक्तीची कुलगुरुपदावरील नियुक्ती एकाच विद्यापीठामध्ये एकंदर दोन वेळांपुरतीच मर्यादित राहावी.

३५. कुलगुरूंच्या सर्व जागा पूर्ण वेळ आणि पगारी असाव्या.

३६. कुलगुरूंचे सेवानिवृत्तीचे वय सामान्यपणे पासष्ट वर्षे असावे. परंतु अखिल भारतीय कीर्तीच्या आणि असामान्य पात्रतेच्या व्यक्तींच्या बाबतीत अपवाद करण्यास हरकत नसावी.

३७. नवीन कुलगुरूची निवड पहिला कुलगुरु निवृत्त होण्याच्या सुमारे वर्षभर आधी करणे विद्यापीठाच्या हिताचे ठरेल.

३८. विद्यापीठाचा कारभार उत्कृष्ट रीतीने चालविण्यासाठी कुलगुरुंना पुरेसे अधिकार देण्यात आले पाहिजेत.

## विद्यापीठांच्या घटक समित्या

३९. विद्यापीठाचे धोरण ठरविण्याची जबाबदारी विद्यापीठाच्या विधिमंडळाची (Court) असावी आणि त्यामध्ये शंभरपेक्षा अधिक सभासद नसावेत. सभासदांपैकी निम्मे विद्यापीठाच्या बाहेरचे असावेत.

४०. विद्यापीठाच्या कार्यकारिणी (Executive-Council) चे अध्यक्षपद कुलगुरुंकडे असावे आणि तिच्या सदस्यांची संख्या पंधरा ते वीस असावी. यापैकी निम्मे विद्यापीठातील व निम्मे बाहेरचे असावेत.

४१. विद्यापीठातील पाठ्यक्रम आणि शैक्षणिक दर्जा ठरविण्याचा संपूर्ण अधिकार विद्वत्सभेकडे (Academic Council) असावा.

४२. विद्वत्सभेच्या बैठका वारंवार बोलावणे शक्य नसेल तर तातडीच्या प्रश्नांवर निर्णय घेण्याकरिता विद्वत्सभेने एक स्थायी समिती नेमावी.

४३. विद्यापीठाच्या दैनंदिन कारभाराशी संबंधित नसणारे एक शैक्षणिक नियोजन मंडळ प्रत्येक विद्यापीठाने नेमावे आणि त्यांच्याकडे विद्यापीठाच्या कार्यक्रमाचे नियोजन आणि मूल्यमापन हे काम सोपवावे.

४४. दीक्षान्त समारंभाच्या कार्यपद्धतीची आणि संस्करणपद्धतीची सुधारणा करण्यासाठी आंतरविद्यापीठ मंडळाने एक समिती नेमावी.

४५. प्रत्येक राज्याचे राज्यपाल हे त्या राज्यातील सर्व विद्यापीठांचे महामात्र (Visitor) असावेत आणि विद्यापीठाच्या कारभाराविषयी चौकशी अगर तपासणी करण्याचा आदेश देण्याचा अधिकार त्यांना असावा.

४६. या इतिवृत्तातील शिफारशींच्या अनुरोधाने विद्यापीठविषयक कायद्यांची फेरपहाणी करण्याचा आणि त्यात बदल घडवून आणण्याचा उपक्रम विद्यापीठ अनुदान मंडळ आणि केंद्रीय शिक्षण मंत्रालय यांनी हाती घ्यावा.

४७. विद्यापीठाची घटना तयार करताना तिच्यामध्ये सर्वसाधारण दृष्टिकोनातून व्यवस्थापनाची दिशा दाखविली जावी आणि नव्या प्रथा पाडण्यासाठी व प्रायोगिक कार्य हाती घेण्यासाठी घटनेमध्ये भरपूर तरतूद असावी.

४८. विद्यापीठ अनुदान मंडळ, शिक्षण मंत्रालय आणि राज्य-सरकार या तीन घटकाच्या दरम्यान सल्लामसलत घडवून आणण्याकरिता एक यंत्रणा तयार करावी आणि तिचा उपयोग विद्यापीठासाठी नवीन कायदा घडविण्याआधी पूर्णपणे करवून घ्यावा.

## विद्यापीठे आणि न्यायालये

४९. शिक्षणपद्धतीतून शिक्षणाला सुयोग्य मूल्यांची बैठक देऊन आणि विद्यार्थी व शिक्षक यांना कायद्याचा आसरा घ्यावासा वाटणार नाही असे वातावरण निर्माण करून, विद्यापीठांचे प्रश्न न्यायालयाकडे नेण्याचे प्रसंग टाळले जावेत.

५०. विद्यापीठांची स्वायत्तता कायम राहावी आणि उच्चशिक्षणाचा विकास व्हावा या दृष्टीने भारताच्या उच्चतम न्यायालयाने योग्य धोरण घालून देण्याची विनंती भारत सरकारने करावी आणि कोणते प्रश्न शिक्षण संस्थांनी न्यायालयाकडे न्यावेत याविषयीचा सुस्पष्ट आदेश या धोरणामधून दिला जावा.

५१. राज्य सरकारशी विचार विनिमय केल्यानंतरच विद्यापीठांनी महाविद्यालयांना संबद्ध म्हणून मान्यता द्यावी.

५२. ज्या अटींवर संबद्धता दिली गेली असेल त्या योग्य प्रकारे पाळल्या जात आहेत याविषयी खात्री करून घ्यावी.

५३. संबद्ध महाविद्यालयांना सहाय्यक अनुदान देण्याविषयी शिक्षणविभागाला सल्ला देण्याकरिता कुलगुरुंची एक विशेष समिती नेमण्यात यावी.

### संबद्ध महाविद्यालये

५४. संबद्ध महाविद्यालयांची एक समिती नेमण्यात येऊन तिने विद्यापीठाला संबद्धतेच्या सर्व प्रश्नाबाबत सल्ला द्यावा.

५५. महाविद्यालयांना संबद्ध करून घेण्यासाठी आणि त्यांची तपासणी करण्यासाठी जी यंत्रणा सध्या उपलब्ध आहे ती अधिक समर्थ व कार्यक्षम करण्यात यावी.

५६. संबद्धता ही विशेष सन्मानाची गोष्ट आहे आणि हा सन्मान सतत मिळविण्यासाठी सुपात्र राहिले पाहिजे याची जाणीव महाविद्यालयांनी ठेवावी.

५७. प्रत्येक विद्यापीठामध्ये तपासणीच्या कामाकरिता काही कार्यकर्ते कायमपणे नेमण्याच्या प्रश्नाचा विद्यापीठ अनुदान मंडळाने विचार करावा.

५८. उपलब्ध साधनसोयींच्या प्रमाणात विद्यार्थ्यांना प्रवेश देणे हा संबद्ध महाविद्यालयांची सुधारणा करण्याचा एकमेव मार्ग आहे.

### सरकारी महाविद्यालये

५९. स्थानिक परिस्थिती आणि परंपरा यांचा विचार करून सरकारी महाविद्यालयांच्या व्यवस्थापनासाठी निरनिराळ्या तऱ्हेचे मार्ग शोधून काढावेत. उदाहरणार्थ, महाविद्यालयाच्या व्यवस्थापनासाठी एक स्वतंत्र संचलनमंडळ तयार करता येईल, किंवा राज्यातील सर्व महाविद्यालयांसाठी एक स्वायत्त संघटना स्थापता येईल. अगर प्रत्येक महाविद्यालय एका स्वायत्त संचालकमंडळाकडे सोपविता येईल.

### खाजगी महाविद्यालये

६०. चांगल्या दर्जाच्या खाजगी संस्थांना अधिक स्वातंत्र्य आणि साह्य देण्याच्या दृष्टीने महाविद्यालयांची वर्गवारी करण्याचे धोरण आखण्यात यावे.

६१. सहाय्यक अनुदानाचा हिशोब करण्याची आणि ते देण्याची एकदर पद्धती सध्यापेक्षा सोपी करण्यात यावी.

### विद्यापीठांचे संयोजन व विकास यासाठी यंत्रणा

६२. कायद्याने स्थापन झालेली अगर सरकारने मान्य केलेली सर्व विद्यापीठे आंतर विद्यापीठ मंडळाची आपोआप सदस्य बनावीत.

६३. कायद्याने प्रस्थापित झालेल्या किंवा सरकारमान्य असलेल्या विद्यापीठातून दिल्या जाणाऱ्या पदव्या अगर सनदा त्याच प्रकारच्या सर्व विद्यापीठात मान्यता पावाव्यात. परंतु या मान्यतेचा उपयोग केवळ प्रवेश मिळविण्यापुरता असावा.

६४. विद्यापीठाकरिता किंवा विद्यापीठांच्या वतीने, संशोधन, विस्तारसेवा आणि सल्लामसलत अशातले कार्य बजावण्याची क्षमता आंतर विद्यापीठ मंडळाला यावी म्हणून त्याची आर्थिक शक्ती वाढविण्यात यावी.

६५. उच्चशिक्षणाच्या सर्व शाखा व उपशाखा एकाच सुसंबद्ध शैक्षणिक स्तराचा भाग आहेत या दृष्टीने कोनाला प्राधान्य देऊन उच्च शिक्षणाच्या विविध अंगोपांगांची जबाबदारी सरतेशेवटी विद्यापीठ अनुदान मंडळाकडे सोपविली पाहिजे

६६. सध्याच्या परिस्थितीत, विद्यापीठ अनुदान मंडळासारख्या वेगवेगळ्या संघटना स्थापन करून त्यांच्याकरती कृषिशास्त्र, स्थापत्यशास्त्र आणि वैद्यकशास्त्र यांची जबाबदारी उचलली जाणे योग्य आहे. त्यांच्या कार्यांचे संयोजन करण्यासाठी योग्य उपाय योजले पाहिजेत.

६७. विद्यापीठ अनुदान मंडळावर फक्त बारा ते पंधरा सदस्य असावेत. यापैकी एक-तृतीयांश सरकारी अधिकारी आणि निदान एक-तृतीयांश विद्यापीठांचे प्रतिनिधी असावेत. स्थानापन्न असलेला एखादा कुलगुरू विद्यापीठ अनुदान मंडळात नेमण्यास हरकत नसावी.

६८. विद्यापीठ अनुदान मंडळाकडे सोपविलेल्या वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी स्थायी समित्या नेमण्याची पद्धती अवलंबविण्यात यावी.

६९. विद्यापीठ अनुदान मंडळाने नेमलेल्या निरीक्षक समित्यांनी प्रत्येक विद्यापीठाची दर तीन वर्षांनी पहाणी करावी आणि ती सध्यापेक्षा अधिक सखोल आणि तपशीलवार असावी.

७०. विद्यापीठ अनुदान मंडळाला त्याच्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडता याव्यात आणि उच्चशिक्षणाच्या विविध समस्या हाताळता याव्यात म्हणून त्याची आर्थिक शक्ती सध्यापेक्षा फार मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आली पाहिजे.

७१. उच्च शिक्षणातील दर्जाचे एकसूत्रीकरण करण्याची जबाबदारी सध्याप्रमाणे 'विद्यापीठ अनदान मंडळ' या एकाच संघटनेकडे राहावी आणि राज्य पातळीवर अनुदान मंडळे निर्माण करून त्यांच्याकडे ती वाटून देण्याचा प्रयत्न करण्यात येऊ नये.

## प्रकरण चौदावें

# कृषिशास्त्र शिक्षण

१. कृषी शिक्षणाचा कोणताही कार्यक्रम तयार करतांना त्यामध्यें उत्पादन, संशोधन आणि विस्तार कार्य ( Extension Services ) या नैसर्गिक शैक्षणिक घटकांचा अन्योन्यसंबंध साधण्यावर भर द्यावा लागेल.

### कृषिविद्यापिठे

२. प्रत्येक राज्यामध्यें निदान एक कृषि विद्यापीठ स्थापण्यात यावे. त्याने इतर राज्यांतील कृषि-विद्यापीठांशी परिणामकारक संपर्क राखावा.

३. सध्या रूढ असलेले कृषिविषयक पाठचक्रम आरंभीच्या काळात जरी चालू ठेवावे लागले तरी हळूहळू आजच्या मितीला उपयुक्त ठरणारे अभ्यासक्रम अंमलात आणण्याची सोय कृषि विद्यापीठांनी करावी.

४. भूशास्त्र आणि शेतीसाठी आवश्यक असलेली इतर शास्त्रे यांच्या अध्ययन-अध्यापनासाठी एक खास विभाग कृषि विद्यापीठांनी शक्य तितक्या लवकर स्थापन करावा.

५. कृषि विद्यापीठामधील अध्यापकांमध्यें सामाजिक शास्त्रात निष्णात असलेले काही विद्वान असावेत.

६. राज्यामधील शेतीविभाग आणि कृषि विद्यापीठे यांच्या वेगवेगळ्या कक्षा स्पष्टपणे ठरविणे अत्यावश्यक आहे.

### पदव्युत्तर शिक्षण आणि संशोधनविषयक प्रशिक्षण

७. यथोचित प्रशिक्षण मिळालेला अध्यापक वर्ग आणि त्यांनी हाती घेतलेले पदव्युत्तर संशोधन हे कृषिविद्यापीठांचे वैशिष्ट्य मानले पाहिजे.

८. कृषिशास्त्राचे आतापर्यंत ज्या विषयाकडे दुर्लक्ष झालेले आहे त्यामध्यें अधिक अध्यापक तयार करण्यासाठी पदव्युत्तर पातळीवर त्या विषयांच्या विद्यार्थ्यांची संख्या वाढवावी लागेल. तथापि शैक्षणिक गुणवत्ता कायम राहावी या दृष्टीने ज्या चांगल्या विद्यापीठांमध्यें पुरेसा अध्यापक वर्ग व साहित्य उपलब्ध असेल तेथेच ह्या नव्या अभ्यासक्रमांच्या विस्ताराचा कार्यक्रम अंगिकारण्यात यावा.

९. ज्या कृषि विद्यापीठांमध्यें उत्पादन व संशोधन यांची संमिश्र सोय असल्याची ग्वाही कृषिशास्त्र तज्ञांनी दिलेली नसेल तेथे पदव्युत्तर शिक्षणाची परवानगी देण्यात येऊ नये.

१०. भारतीय कृषीशास्त्र संशोधन संस्था आणि भारतीय प्राणिवैद्यक संशोधन संस्था, त्याचप्रमाणे राष्ट्रीय दुग्धव्यवसाय संशोधन संस्था अशा प्रकारच्या केंद्रीय संशोधन संस्थात पदव्युत्तर शिक्षणाचे कार्यक्रम राबविण्यात यावेत.

११. कोणत्या संस्थांत कोणत्या प्रकारचा पदव्युत्तर कार्यक्रम घ्यावा याचा निर्णय घेताना त्या संस्थेचा इतिहास, तिचे स्थानिक वैशिष्ट्य व तिच्या अध्यापकांची विशेषज्ञता यांचा विचार व्हावा. पदव्युत्तर संशोधन करण्यासाठी या विद्यापीठामध्यें अन्योन्यसंबंध असावेत आणि त्याबरोबर भारतीय कृषीशास्त्र संशोधन मंडळाच्या कार्यक्रमाशी त्यांचे निकटचे संबंध यावेत.

१२. उत्पादनवाढीच्या दृष्टीने जे सुसंघटीत संशोधन प्रकल्प भारतीय कृषी शास्त्र संशोधन मंडळाने हाती घेतलेले आहेत त्यांचा विकास करण्यात यावा.

१३. पदव्युत्तर संशोधनाच्या पाठचक्रमासाठी केवळ कृषिशास्त्र पदवीधरांची निवड करण्यात येऊ नये. कृषि विद्यापीठामधील शिक्षण आणि संशोधन यांची प्रगती करण्याकरिता इतर ज्ञान-विज्ञान शाखांतील बुद्धिमान विद्यार्थी निवडून त्यांनाही पदव्युत्तर पाठचक्रमात प्रवेश द्यावा.

१४. विद्यार्थ्यांना शक्य तितक्या लवकर संशोधनाच्या तंत्राचा परिचय करून देण्यासाठी आणि स्वतंत्रपणे अध्यापन करणे त्यांना शक्य व्हावे म्हणून प्रत्येक विद्यापीठाने एक सुसज्ज ग्रंथालय व त्याला आवश्यक असलेला कर्मचारी वर्ग ठेवावा.

१५. दहा वर्षांच्या शालेय शिक्षणक्रमानंतर कृषी विद्यापीठामध्ये पहिल्या पदवीचा पाठचक्रम ५ वर्षांचा असावा. परंतु स्थानिक गरजेनुसार त्यामध्यें थोडा लवचिकपणा ठेवण्यात यावा.

### अध्यापक

१६. कृषि विद्यापीठामध्यें शक्य तितक्या अध्यापकांवर वर्गातील अध्यापनाबरोबरच प्रयोगशाळेतील संशोधन, प्रायोगिक प्रकल्प आणि ग्रामीण जनतेबरोबर शेतातील प्रत्यक्ष कामे, अशा प्रकारचे सुसंघटीत कार्य सोपविण्यात यावे.

१७. विद्यापीठ अनुदान मंडळाने सुचविलेली प्राध्यापकांची वेतनश्रेणी कृषि विद्यापीठामध्येसुद्धा लागू करण्यात यावी. नोकरीच्या सोयीही शक्य तितक्या आकर्षक करण्यात याव्यात.

१८. प्राध्यापकांची संख्या किती असावी ते ठरविताना पाठचक्रमाच्या गरजा आणि अध्यापकांची पात्रता या गोष्टी लक्षात घ्याव्यात. ठराविक परंपरेला धरून ती ठरविण्यात येऊ नये.

१९. प्राध्यापकांना बढती देताना गुणवत्ता हाच निकष मुख्यत्वेकरून लावावा.

२०. प्राध्यापकांना पुरेसे बौद्धिक स्वातंत्र्य देण्यात यावे.

२१. बहिःशाल परिक्षांचे महत्त्व कमी करावे आणि शक्य तितक्या लवकर त्या रद्द करण्यात याव्यात.

२२. सध्या अस्तित्वात असलेल्या संस्थापैकी ५/६ उच्च दर्जाच्या संस्थांमध्ये कृषिशास्त्राच्या अध्यापकांच्या प्रशिक्षणाचा कार्यक्रम मोठया प्रमाणावर घेण्यात यावा आणि विज्ञान व कृषिशास्त्र यांच्या पदव्युत्तर शिक्षणक्रमामध्ये पुरेशा शिष्यवृत्यांची सोय करावी.

### विद्यार्थी

२३. कृषिविद्यापीठात अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी निदान २५ टक्के विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या देण्यात याव्यात.

२४. कृषिशास्त्र शिक्षणाकडे बुद्धिमान विद्यार्थ्यांना आकर्षित करून घेण्यासाठी कृषिशास्त्र पदवीधरांची वेतनश्रेणी सुधारण्यात यावी.

### कृषिभूमि (Farm)

२५. निदान १००० एकर क्षेत्रफळाची आणि कमीतकमी ५०० एकर पिकाखाली असलेली क्षेत्रभूमी प्रत्येक कृषिविद्यापीठाला लागून असावी.

### निवासी अध्ययन (Internship)

२६. कृषिशास्त्रातील पदवी देण्यापूर्वी विद्यार्थ्यांकरीता कृषिविद्यापीठाजवळ असलेल्या चांगल्या कृषिभूमीमध्ये एका वर्षाचे निवासी अध्ययन करण्याची सोय उपलब्ध करून देण्याची शक्यता निर्माण करण्यात यावी.

### विद्यापीठांची संख्या, विद्यार्थ्यांची संख्या आणि व्यवस्थापन

२७. प्रत्येक राज्यामध्ये एक कृषिविद्यापीठ स्थापन करण्याच्या उपक्रमात सध्या अस्तित्वात असलेल्या विद्यापीठांपैकी एखाद्या विद्यापीठाचे कृषिविद्यापीठात रूपांतर करण्याची शक्यता अभ्यासावी.

२८. वेगवेगळ्या संस्थांना आपल्या स्वरूपात वेगळेपणा ठेवण्याची परवानगी देणे जरी शक्य असले तरीसुद्धा सर्व कृषिविद्यापीठांची संघटना एका मूलभूत अशा विशिष्ट तत्वानुसार करण्यात यावी. शक्यतो प्रत्येक कृषिविद्यापीठ हे स्वक्षेत्रबद्ध विद्यापीठ ( Single Campus University ) असावी आणि बाहेरची महाविद्यालये त्याला जोडण्यात येऊ नयेत. विशिष्ट परिस्थितीत आणि अपवादादाखल, बाहेरच्या महाविद्यालयांना जोडून घेण्याची जबाबदारी जर एखाद्या कृषिविद्यापीठाला पत्करावी लागली तर अशा महाविद्यालयांना घटक ( constituent ) महाविद्यालये मानून त्यांचा कारभार एकाच प्रशासनाखाली चालवावा.

### इतर विद्यापीठांच्या शेती-विकासाला सहाय्य

२९. ज्या इतर विद्यापीठांना कृषिविषयक अभ्यासक्रम चालवावयाचे असतील त्यांना सर्व प्रकारचे साह्य देण्यात यावे.

३०. काही कृषिविद्यापीठांचे भारतीय तंत्रविद्या संस्थांशी ( IIT) शैक्षणिक संबंध प्रस्थापित होणे जरूर आहे. अध्यापक आणि विद्यार्थी यांची देवाण-घेवाण करून आणि अध्यापनाचे व संशोधनाचे समान कार्यक्रम आखून ही गोष्ट साध्य करता येईल.

३१. देशातील काही प्रमुख विद्यापीठे आणि एकदोन तंत्रविद्या संस्था यांच्यात कृषिशास्त्र विभाग सुरू करण्याची कितपत शक्यता आहे याची चाचणी घेण्यात यावी.

### कृषिशास्त्र महाविद्यालये

३२. कृषिशास्त्रातील पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम कृषिविद्यापीठामध्ये चालवावेत आणि नवीन कृषिशास्त्र महाविद्यालयांची निर्मिती करण्यात येऊ नये.

३३. जेथे कृषि महाविद्यालये ही एखाद्या विद्यापीठाची घटक महाविद्यालये असतील तेथे कृषिशास्त्राच्या अध्यापनाचा अधिक कसोशीने विकास होण्याकरता त्या विद्यापीठाला सहाय्य द्यावे.

३४. प्रत्येक कृषि महाविद्यालयाला निदान २०० एकर क्षेत्रफळाची कृषिभूमी जोडण्यात यावी आणि तिचे व्यवस्थापन चांगले होत असल्याची खात्री करून घेण्यात यावी.

३५. भारतीय कृषिशास्त्र संशोधन मंडळ आणि विद्यापीठ अनुदान मंडळ यांनी संयुक्तपणे दर पाच वर्षांनी कृषि महाविद्यालयाची पहाणी करावी आणि जी महाविद्यालये शैक्षणिक दर्जाच्या अपेक्षित कसोटीला उतरणार नाहीत त्यांची मान्यता रद्द करण्यात यावी.

३६. सध्याच्या काही कृषि महाविद्यालयांचे स्वरूप बदलून त्यांच्यात पदवीपरिक्षेचा पाठ्यक्रम चालविण्याऐवजी कृषिविद्यापीठामधील उच्च तांत्रिक अभ्यासक्रम हाती घेण्यात यावा.

## शेतीच्या तांत्रिक शाळा

३७. माध्यमिक शिक्षणस्तरावंतरच्या पाठ्यक्रमाकरिता शेती तांत्रिकशाळा स्थापन करण्याच्या उपक्रमाला अग्रक्रम देणे आवश्यक आहे.

३८. उत्तम कार्यक्षमतेसाठी त्या कृषिविद्यापीठांना जोडण्यात याव्यात. सुमारे १००० विद्यार्थ्यांचा समावेश करू शकतील अशा ह्या तांत्रिक शाळा निरनिराळ्या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर स्थापन केल्या जाव्यात. सध्याची निकड भागविण्याकरिता ग्रामीण भागातील तांत्रिक शाळांना शेतीविषयक तंत्रांचा पाठ्यक्रम चालविण्याची जबाबदारी द्यावी.

३९. शेती तांत्रिक शाळांतील पाठ्यक्रम विविधोद्देशी असावा आणि त्याच्या साहाय्याने शेती आणि इतर संबंधित क्षेत्रे यांसाठी कुशल कारागीर तयार करता येतील अशी व्यवस्था करावी.

४०. हे सर्व पाठ्यक्रम व्यावहारिकदृष्ट्या उपयुक्त ठरले पाहिजेत आणि त्यांची संघटना करताना पुरेसा लवचिकपणा राखला पाहिजे.

४१. शेती तंत्रशाळांतील काही अभ्यासक्रमांद्वारा तरुण शेतकरी आणि ग्रामीण भागातील मुली व स्त्रिया यांच्याकरिता संक्षिप्त अभ्यासक्रम राबविण्यात यावेत.

४२. या तांत्रिक शाळांतील अध्यापक विशिष्ट पात्रतेचे असावेत व त्यांची वेतनश्रेणीही आकर्षक असावी.

४३. तंत्र शाळांमधील अभ्यासक्रम अंतिम स्वरूपाचा असावा आणि तो पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना निश्चितपणे व्यवसाय मिळू शकेल अशी व्यवस्था व्हावी. त्याचबरोबर, अत्यंत बुद्धिमान विद्यार्थ्यांना पुढे अधिक अभ्यास करून वरच्या पातळीवरील पाठ्यक्रम घेता येईल अशीही तरतूद तंत्रशाळांच्या एकंदर कार्यक्रमात असावी.

## शालेय स्तरावरील कृषिशिक्षण

४४. प्राथमिक आणि निम्न माध्यमिक स्तरावर कृषिशिक्षणाचा कार्यक्रम आखून विद्यार्थ्यांना व्यावसायिक नैपुण्य देण्याचा उपक्रम आतापर्यंत अयशस्वी ठरलेला आहे. त्यामुळे, यापुढे अशा प्रकारचे उपक्रम स्थगित ठेवावेत.

४५. संकुचित स्वरूपाचे व्यावसायिक शिक्षण देण्याऐवजी शेतीच्या कामात तंत्रज्ञानाच्या आधारे जो नवा बदल झपाट्याने घडत आहे त्याच्याशी शेतीचे काम मिळते जुळते, करण्यासाठी शालेय स्तरावरील सर्व विद्यार्थ्यांना गणित आणि शास्त्र या विषयांचे भक्कम आणि सर्वंकष स्वरूपाचे शिक्षण देण्यात यावे.

४६. फार लहान वयामध्ये विशेषज्ञता अंगी बाणविण्याचे प्रयत्न शैक्षणिकदृष्ट्या अयोग्य मानले पाहिजेत.

४७. कनिष्ठ शेती शाळा (Junior Agricultural Schools) खूप मोठ्या संख्येने स्थापन करण्याच्या उपक्रमात अनेक अडचणी असल्यामुळे तो उपयुक्त ठरू शकणार नाही; याकरिता तो यापुढे हाती घेऊ नये.

## सामान्य शिक्षणक्रमातील शेती शिक्षण

४८. सामान्य शिक्षण देणाऱ्या सर्व प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना शेती विषयाचे परिचयात्मक ज्ञान देण्याची सोय व्हावी. नागरी भागातील शाळांनासुद्धा या बाबतीत वगळू नयेत.

४९. शालेय स्तरावरील कार्यानुभवाच्या उपक्रमात शेतीला महत्त्वाचे स्थान असावे.

५०. महाविद्यालयातील आणि विद्यापीठातील पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये देखील विद्यार्थ्यांचा परिचय ग्रामीण आणि शेतीविषयक समस्यांशी व्हावा अशी तरतूद असली पाहिजे. विद्यापीठ अनुदान मंडळ आणि इतर यंत्रणांनी याबाबतीत योग्य दिशेने पावले उचलावीत.

५१. शिक्षक प्रशिक्षणाच्या सर्व अभ्यासक्रमामध्ये अशाच पद्धतीने शेती व ग्रामीण प्रश्न यांच्या परिचयाचा उपक्रम समाविष्ट करावा.

## विस्तार कार्यक्रम

५२. ग्रामसेवकांचे आणि त्यांच्या कामाला सहाय्य करणाऱ्या इतर विशेषज्ञांचे तांत्रिक व व्यावसायिक नैपुण्य वाढविण्याकरिता कृषिविद्यापीठे आणि कृषितंत्र शाळांना सर्व प्रकारची आवश्यक मदत द्यावी. या संस्थांतील विशेषज्ञ अध्यापकांनी या कार्यक्रमात भाग घ्यावा आणि अशा कार्यकर्त्यांसाठी योग्य अभ्यासक्रमही या संस्थांमध्ये चालविण्यात यावा.

५३. शेतीसाहित्य पुरविण्याचे काम आणि विस्तारकार्य जेव्हा ठरविल्याप्रमाणे एकमेकांपासून अलग करण्यात येईल तेव्हा विस्तार कार्यविषयक सर्व बाबी कृषिविद्यापीठांकडे सोपविण्यात याव्या. परंतु त्याचबरोबर विस्तारकार्य, साहित्य पुरवठा, आणि शेती विभागांकडून शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या इतर सोयी या सर्वांमध्ये निकट संपर्क राहील अशी काळजी घ्यावी.

५४. प्रत्येक विकास खंडामध्ये प्राथमिक स्वरूपाचे एक तरी विस्तार केंद्र स्थापन करण्यात यावे.आणि त्याचे स्थान ठरवताना विस्तार कार्याखाली येणारे क्षेत्र सायकलीवरून फिरता येण्याइतके मर्यादित असेल अशी काळजी घ्यावी.

५५. या विस्तार केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या व्यवहारोपयोगी ज्ञानाची पातळी ज्या शेतकऱ्यांचे त्यांनी शिक्षण करावयाचे आहे त्यांच्यापेक्षा अधिक असणे तर अत्यावश्यकच आहे; परंतु त्याचबरोबर कृषी विद्यापीठाच्या विस्तारकार्य विभागाकडून त्यांना सातत्याने मार्गदर्शन व पाठिंबा मिळणे हे देखील फार महत्वाचे आहे.

५६. यशस्वी शेतकऱ्यांच्या ज्ञानाचा उपयोग विस्तार कार्यासाठी सध्यापेक्षा अधिक प्रमाणात करण्यात यावा.

५७. प्राथमिक विस्तारकेंद्रातील पाठयक्रम घेणाऱ्या शेतकऱ्यांनी आपआपल्या गावी शेतकरी-मंडळ स्थापावित यासाठी त्यांना विशेष उत्तेजन द्यावे.

५८. शेतकरी आणि ग्रामीण जनता यांचे शेतीविषयक शिक्षण करण्यासाठी नभोवाणी, चित्रपट आणि इतर दृकश्राव्य साधनांचा जास्तीत जास्त उपयोग करावा.

### मनुष्यबळाची आवश्यकता

५९. शेतीच्या विकासाकरिता आवश्यक असलेल्या मनुष्यबळाचा अंदाज सध्यापेक्षा अधिक अचूकपणे करता यावा यासाठी उपाययोजना केली पाहिजे. तत्पूर्वी, कृषिशास्त्राच्या पदवीधरांची संख्या येत्या दहा वर्षांत दुप्पट व्हावी आणि सनद (Diploma) घेणाऱ्यांच्या संख्येतही तशीच वाढ व्हावी म्हणून जोरदार प्रयत्न केले पाहिजेत.

### भारतीय कृषिशास्त्र संशोधन संस्था व विद्यापीठ अनुदान मंडळाची भूमिका

६०. कृषिशास्त्राच्या यापुढील शिक्षणक्रमात संशोधन, अध्यापन व विस्तारकार्य यांचा अन्योन्य संबंध घनिष्टतेने साधणाऱ्या वैचारिक बैठकीचे महत्व प्रस्थापित करणे हे भारतीय कृषिशास्त्र संशोधन मंडळाचे कर्तव्य आहे.

६१. हे कर्तव्य पार पाडण्यात मंडळाला मदत करण्यासाठी मंडळाने एक स्थायी समिती नेमावी व तिचे अध्यक्षपद एखाद्या विद्वान व्यक्तीला किंवा राष्ट्रीय कीर्तीच्या शास्त्रज्ञाला द्यावे.

६२. ही स्थायी समिती आणि विद्यापीठ अनुदान मंडळ यातील काही सदस्य एकच असावेत.

# प्रकरण पंधरावे

## व्यवसायिक, तांत्रिक आणि स्थापत्यशास्त्राचे शिक्षण

### शालेय पातळी

१. १९८० सालापर्यंत निम्न माध्यमिक स्थरावरील निदान २० टक्के विद्यार्थ्यांसाठी आणि इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेल्या ५० टक्के विद्यार्थ्यांसाठी अंशवेळ आणि पूर्णवेळ व्यावसायिक व धंदेशिक्षणाच्या अभ्यासक्रमाची तरतूद करण्याकरिता सुसंघटीत प्रयत्न झाले पाहिजेत.

२. शालेय स्तरावरील धंदेशिक्षणाच्या अभ्यासक्रमाचे स्वरूप असे असावे की तो अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना व्यवसाय सुरू करण्याची सोय ताबडतोब मिळावी. हे अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या मुलांना उच्च पातळीवरील पुढेच शिक्षण घेण्याची देखील सोय असावी.

### अर्धकुशल आणि पूर्णकुशल कामगारांचे प्रशिक्षण

३. धंदेशिक्षणाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या संस्थांमधील विद्यार्थ्यांची संख्या चौथ्या योजनेच्या काळात निदान दुपटीने वाढवावी. या संस्थांतील पाठ्यक्रमामध्ये आवश्यक असलेल्या दुरूस्त्या करून विद्यार्थी प्रवेशाची मर्यादा १४ वर्षापर्यंत खाली आणावी.

४. सध्याच्या कनिष्ठ तांत्रिक शाळांचे नाव (ज्युनिअर टेक्निकल स्कूल) बदलून त्यांना तांत्रिक माध्यमिक शाळा असे नाव द्यावे. सध्या अस्तित्वात असलेल्या तांत्रिक माध्यमिक शाळांमधून आणि या नव्या तांत्रिक माध्यमिक शाळांमध्येही अंतिम स्वरूपाचे तांत्रिक शिक्षण मिळावे व सध्याच्या उमेदवारीच्या कायद्याच्या (अॅप्रेन्टिसशिप अॅक्ट) अटी ज्यामुळे पूर्ण होऊ शकतील असाच अभ्यासक्रम चालविण्यात यावा. या अभ्यासक्रमामध्ये लवचिकपणा राखावा आणि निरनिराळ्या अभ्यासक्रमांची घडण करताना त्यामध्ये प्रयोगशीलतेला वाव असावा.

५. सर्व प्रकारच्या तांत्रिक शिक्षणामध्ये उपयुक्त मालाची पैदास करण्याचा दृष्टिकोन राखला जावा.

६. कुशल कारागीर तयार करण्यासाठी जे अभ्यासक्रम १० वी इयत्ता पूर्ण न केलेल्या उमेदवारासाठी सध्या ठेवले आहेत, ते तांत्रिक शाळांना जोडण्यात येऊन तांत्रिक शाळांतील उपलब्ध असलेल्या सोयी व साहित्याचा जास्तीत जास्त वापर करण्याची योजना आखावी.

७. शाळा सोडून नोकरी करणाऱ्यासाठी धंदेशिक्षण व तांत्रिक शिक्षण देण्याची सोय असावी. त्याकरिता अंशवेळ, दिवसा थोडी मोकळीक, टपाली शिक्षण, नोकरीच्या वेळात शिक्षण किंवा अल्पमुदतीचे शिक्षणसत्र अशा सोयी उपलब्ध व्हाव्यात. या सर्व उपक्रमांत शक्य तितका लवचिकपणा ठेवावा.

### तंत्रज्ञाचे शिक्षण

८. स्थापत्य शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ यांचे प्रमाण सध्या सुमारे १:१:४ असे आहे. १९७५ पर्यंत १:२:५ आणि १९८० पर्यंत १:३ किंवा १:४ होईल अशा तऱ्हेने पावले उचलावीत.

९. अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण मंडळाने (AICTE) उद्योगधंद्यामध्ये असणाऱ्या तज्ज्ञांचे सहकार्य घेऊन वेगवेगळ्या व्यवसायांतील आणि धंद्यांतील नोकरीचे स्वरूप, प्रत्येक प्रकारच्या कामासाठी लागणारे कुशल कारागीर आणि तज्ज्ञांची पातळी इत्यादींचे सर्वेक्षण वेळोवेळी करावे आणि या सर्वेक्षणाच्या निष्कर्षांच्या अनुरोधाने तंत्रज्ञ निर्माण करावयाच्या अभ्यासक्रमाची फेरपाहणी करावी.

१०. जो पाठ्यक्रम पूर्ण केल्यानंतर सनद देण्यात येते त्यामध्ये व्यावहारिक भाग अधिक असावा. धंद्यातील प्रत्यक्ष अनुभव, प्रायोगिक कार्य आणि धंद्यातील वेगवेगळे प्रश्न सोडविणे यावर हे पाठ्यक्रम आधारावेत.

११. विविधोद्देशी तंत्रशाळांची स्थापना फक्त औद्योगिक केंद्रानजीकच करण्यात यावी. अशा प्रकारच्या ज्या शाळा सध्या ग्रामीण विभागात चालू आहेत त्यांच्यातील अभ्यासक्रम शेतीशिक्षणाकडे आणि शेतीच्या जोडधंद्यातील शिक्षणाकडे हळूहळू वळवावा.

१२. विविधोद्देशी तंत्रशाळांसाठी लागणारे अध्यापक उद्योगधंद्याच्या क्षेत्रातून शक्यतो निवडले जावेत आणि अशा प्रकारच्या नेमणूकांचे प्रमाण वाढविण्यात यावे. शैक्षणिक पात्रतेविषयीचे नियमन जरूर तेथे काही अंशी सैल करावेत. त्यांचे वेतन ठरविताना केवळ शैक्षणिक पात्रतेचाच विचार करण्यात येऊ नये.

१३. शक्य तितक्या खऱ्याखुऱ्या व्यावसायिक पद्धतीने विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण दिले जावे म्हणून टयांचा उपयोग करून विद्यार्थ्यांनी व अध्यापकांनी विशेष तऱ्हेचे उत्पादक काम हाती घ्यावे. ते साध्यासुध्या हत्यारांच्या सहाय्याने करता येण्याजोगे असावे आणि माध्यमिक शाळांना साहित्य पुरविण्यासाठी किंवा विक्रीला ठेवता येण्याजोग्या वस्तू तयार करण्यासाठी या कामाचा उपयोग व्हावा.

१४. विविधोद्देशी तंत्रशाळांतील पहिल्या दोन वर्षामध्ये शास्त्र आणि गणित यांचे शिक्षण सध्यापेक्षा अधिक भक्कम करण्यात यावे. तंत्रज्ञांनाच्या पाठ्यक्रमामध्ये औद्योगिक मानसशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र व किंमती आणि खर्च यांची अंदाजपत्रक करणे इत्यादी विषयांचा समावेश असावा.

१५. नोकरी आणि शिक्षण आलटून पालटून करण्याची ज्यामधून सोय होईल असे अभ्यासक्रम (Sandwich Courses) विविधोद्देशी तंत्रशाळांमध्ये निरनिराळ्या कारखान्यांच्या व औद्योगिक केंद्राच्या सहकार्याने चालविण्यात यावेत.

१६. तांत्रिक सनद घेणारे उमेदवार त्यांच्या राहत्या प्रदेशापासून फार दूरच्या ठिकाणी कामधंदा शोधण्याचे साहस करीत नसतात हे लक्षात घेऊन चौथ्या व पाचव्या पंचवार्षिक योजनांच्या काळात सनदी अभ्यासक्रमाची योजना स्थानिक गरजांच्या अनुरोधाने करण्यात यावी. परंतु त्याच वेळी, प्रदेशामधील एकूण औद्योगिक गरजांकडेही बारकाईने लक्ष दिले जावे.

१७. सर्व विविधोद्देशी तांत्रिक शाळांमध्ये मुलींना उपयुक्त असणारे अभ्यासक्रम ठेवण्यात यावेत. विशेषतः निम्न माध्यमिक अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या मुलींसाठी प्रमाणपत्र व सनद घेणारे अभ्यासक्रम आखण्यास उत्तेजन देण्यात यावे.

१८. विविधोद्देशी तंत्रशाळांतून बाहेर पडणाऱ्या तंत्रज्ञांना व्यवसाय देण्याची पुरेशी तजवीज सध्या नसल्यामुळे तांत्रिक शिक्षण फार मोठ्या प्रमाणावर वाया जाते. हा प्रकार थांबविण्यासाठी कसोशीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. लहान तंत्रशाळांऐवजी मोठ्या तंत्रशाळा असणे अधिक फायद्याचे ठरते म्हणून नवीन तंत्रशाळा काढण्यापेक्षा सध्याच्या तंत्रशाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याकडे अधिक लक्ष द्यावे.

१९. ज्या तंत्रज्ञांना काही वर्षे उद्योगधंद्यात व कारखान्यात काम करण्याचा अनुभव मिळालेला असेल त्यांच्यासाठी सनद परोक्षेच्या वरच्या पातळीवरचा अभ्यासक्रम काही निवडक तंत्रशाळांमध्ये सुरू करण्यात यावा.

## इतर व्यावसायिक शिक्षण

२०. उच्च माध्यमिक स्तरामध्ये (इयत्ता ११ व १२) तांत्रिक शिक्षणाच्या जोडीनेच, इतर पाठ्यक्रमांची विविधता वाढविण्याची पुष्कळशी इष्टता आहे. त्यामध्ये व्यापारविषयक शिक्षण, लिपिक अभ्यासक्रम, शास्त्रीय आणि औद्योगिक व्यवसायांचे शिक्षण यांचा समावेश करण्यात यावा. विशेषतः मुलींना जे व्यवसाय करणे शक्य आहे त्यांचे शिक्षण देण्याची चांगली सोय करावी.

२१. माध्यमिक तंत्रशाळा आणि विविधोद्देशी तंत्रशाळा यांच्यातून बाहेर पडणाऱ्या उमेदवारांना त्यांचा स्वतंत्र व्यवसाय उभारता येईल किंवा इतरांच्या सहकार्याने लघु उद्योगांची केंद्रे चालविता येतील अशा प्रकारची योजना आखण्यात यावी.

## स्थापत्यशास्त्राचे शिक्षण

२२. अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण मंडळ आणि विद्यापीठ अनुदान मंडळ यांनी ठरवून दिलेल्या शिक्षणातील दर्जा ज्या संस्थांमध्ये आढळत नसेल त्या सुधारण्याचे प्रयत्न व्हावेत. ते शक्य नसल्यास त्यांचे रूपांतर तांत्रिक शाळांमध्ये करावे आणि तेही शक्य नसल्यास त्या बंद करण्यात याव्या.

२३. स्थापत्यशास्त्रातील Electronics आणि Instrumentation या विषयांच्या अभ्यासक्रमाकरिता शास्त्राची पहिली पदवी उत्तम प्रकारे घेतलेले उमेदवार निवडण्याची सोय करण्यात यावी. यासाठी पाठ्यक्रमात थोडा बदल करणे आवश्यक झाले तर तोही करण्यात यावा.

२४. स्थापत्यशास्त्राच्या संस्थांतील विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयांच्या अध्यापकांच्या वेतनात सध्या जो अनुचित फरक आहे तो नाहीसा करण्यात यावा. विज्ञान शाखेतील प्राध्यापकांनी काही काळ तंत्रज्ञान शाखेतून काम करणे आणि तंत्रज्ञान शाखेतील प्राध्यापकांनी काही काळ विज्ञान शाखेमध्ये काम करणे शक्य होईल अशी योजना करावी.

२५. पदवी परीक्षेचा पूर्णवेळ पाठ्यक्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक कार्याचा अभ्यास तिसऱ्या वर्षी देण्यात यावा. त्याचा तपशील काळजीपूर्वक तयार करण्यात यावा आणि उद्योगधंद्यातील तंत्रज्ञांच्या मदतीने त्याची देखरेख करावी. शक्य तितक्या प्रमाणात नोकरी आणि शिक्षण आलटून पालटून करता येईल असे पहावे.

२६. औद्योगिक शाळांतील प्रात्यक्षिक कार्याचा रोख उत्पादनक्षमता वाढविण्याकडे असावा.

२७. समाजाच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन पदवी परीक्षा आणि सनद परीक्षांचा अभ्यासक्रम विविधांगी बनवावा.

२८. स्थापत्य महाविद्यालये आणि तांत्रिक शिक्षणाच्या संस्था यामधील अभ्यासक्रमाची सांगड औद्योगिक क्षेत्रातील गरजांशी घालता यावी याकरिता अभ्यासक्रमामध्ये औद्योगिक केंद्रांना अगर कलाकेंद्रांनी सुचविलेले संशोधन-प्रकल्प समाविष्ट करण्यात यावेत.

२९. अभ्यासक्रमामधील साचेबंदपणा नाहीसा करण्याच्या दृष्टीने सर्व अभ्यासक्रमाची तज्ञ समिती कडून नेहमी फेरपहाणी होत राहावी.

३०. नव्याने विकास पावत असलेल्या शास्त्राच्या शिक्षणाकरिता जे मनुष्यबळ लागणार आहे त्याचे अंदाज घेण्याचे काम आणि मनुष्यबळ तयार करण्याचा अभ्यासक्रम ठरविण्याचे काम काळजीपूर्वक करण्यात यावे. या कामाची आवश्यकता विशेषतः स्वयंचलित यंत्रे, रसायन विज्ञान, अवकाश शास्त्र आणि अणूशक्ती निर्मिती या क्षेत्रामध्ये आहे.

### उत्पादन

३१. प्राध्यापकांना औद्योगिक सल्लागार म्हणून काम करण्याची परवानगी असावी. त्यांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी वासंतिक पाठ्यक्रमाची सोय करण्यात यावी.

३२. चांगल्या पात्रतेचे स्थापत्यशास्त्रज्ञ अध्यापनाकडे आकर्षित व्हावेत आणि त्यांनी संशोधनकार्य अंगिकारावे याकरिता स्थापत्य शिक्षणाच्या संस्थांमध्ये योग्य वेतनश्रेणी देण्यात याव्या.

३३. तांत्रिक शिक्षणाच्या संस्थांनी शिक्षण प्रशिक्षणाचा कार्यक्रम पदवीपूर्व त्याचबरोबर पदव्युत्तर पातळीवरील विद्यार्थ्यांसाठी फार मोठ्या प्रमाणात घ्यावा. अशा प्रकारच्या अभ्यासक्रमामध्ये रशियन किंवा जर्मन अशातल्या जगातल्या महत्त्वाच्या अधुनिक भाषांचा अभ्यास अनिवार्य करण्यात यावा. प्रगताभ्यास केंद्रे स्थापन करण्याची योजना तांत्रिक शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये देखील लागू करण्यात यावी.

३४. सरकारी महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक आणि प्राचार्य यांच्या बदल्या व्यावसायिक कारणाखेरीज इतर कोणत्याही कारणासाठी करू नये.

### साहित्य सामग्री

३५. परकीय चलन उपलब्ध करून देणे आणि पुरेशा साहित्याची जमवाजमव करून ठेवणे अशा महत्त्वाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची दिरंगाई होऊ नये याची विशेष काळजी घेण्यात यावी.

३६. वर्षातून कांही दिवसच ज्याचा उपयोग होईल अशी फार गुंतागुंतीची यांत्रिक सामग्री विविधोद्देशी तंत्रशाळांना पुरविण्यात येऊ नये.

३७. जी साधनसामग्री परदेशातून आयात करावी लागते तिच्या नमुन्याबरहुकूम साहित्य स्वतः तयार करण्यासाठी तंत्रशाळांना उत्तेजन देण्यात यावे.

### पदव्युत्तर अभ्यासक्रम.

३८. या अभ्यासक्रमाची आखणी करताना साचेबंदपणा ठेवण्यात येऊ नये. ज्यांनी उद्योगधंद्यामध्ये काम करण्याचा प्रत्यक्ष अनुभव निदान एक वर्ष तरी घेतलेला आहे अशा उमेदवारांना पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश देण्यात यावा.

३९. उद्योगधंद्यातील प्रश्न सोडविण्याकडे या पातळीवरील संशोधनाचा उपयोग झाला पाहिजे. पदव्युत्तर अभ्यासक्रम घेणाऱ्या उमेदवारांपकी अधिक उमेदवारांना उद्योगधंद्यामधून आर्थिक पुरस्कार मिळण्याची शक्यता असावी.

४०. नित्याप्रमाणे करावयाच्या संशोधनासाठी तर पीएच्. डी. पदवी द्यावीच पण उद्योगधंद्यात काम करीत असताना जे संशोधन केले जाईल त्यासाठीही ती देण्यात यावी.

४१. ज्यांची विशेष आवश्यकता नाही असे निरनिराळ्या तऱ्हेचे पाठ्यक्रम चालू करण्यात येऊ नयेत. ज्या पाठ्यक्रमामध्ये फार वरच्या पातळीवरील विशेषज्ञता मिळवावी लागते ते कोणत्या संस्थेत चालवावेत आणि त्यातील कोणते निवडावेत याचे निर्णय राष्ट्रीय पातळीवरून घेण्यात यावेत.

४२. काही स्थापत्य महाविद्यालयांमध्ये भांडवली खर्चासाठी विद्यार्थ्यांकडून अनुदान मागण्याची आणि त्याच्या आधारावर प्रवेश देण्याची (Capitation fee) जी पद्धती सुरू झालेली आहे ती तावडतोब बंद करण्यात यावी.

### मनुष्यबळाचे अंदाज

४३. देशामध्ये वेगवगळ्या पातळीवर तांत्रिक मनुष्यबळ किती लागणार आहे याचा अंदाज करण्याकरिता फार काटेकोर आणि सुधारलेले अभ्यास-प्रकल्प घेण्याची आवश्यकता आहे. या अभ्यास-प्रकल्पांच्या आधाराने नव्या तंत्रशिक्षण संस्था कोणत्या जागी काढावयाच्या आणि कोणत्या अभ्यासक्रमात किती विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचा ते ठरविण्यात यावे.

४४. सध्याच्या तांत्रिक क्षेत्रामध्ये गळतीचे जे मोठे प्रमाण आढळते ते कमी करण्याकडे लक्ष दिले पाहिजे. या दृष्टीने तांत्रिक शिक्षणाच्या संस्थांमध्ये अध्यापनाची गुणवत्ता वाढविणे आवश्यक आहे. शिवाय, अस्तित्वात असलेल्या संस्थांतील विद्यार्थ्यांची संख्या जास्तीत जास्त वाढविणे आणि नोकरीत असलेल्या उमेदवारांसाठी अंशवेळ अभ्यासक्रमाची सोय करणे या गोष्टी अत्यावश्यक आहेत.

४५. विद्यार्थ्यांची विशेषकार्य-प्रवृत्ती (aptitude) शोधून काढण्याच्या कसोट्या वापरून आणि प्रवेश देताना इतर काही कसोट्या लावून विद्यार्थ्यांची निवड करण्यात यावी. तांत्रिक शिक्षणाच्या संस्थांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये जो सामाजिक व आर्थिक भेद सध्या जाणवतो तो कमी करण्यासाठी ग्रामीण आणि शहरी विभागातील संस्थांच्या दर्जामध्ये समानता आणण्याची तरतूद केली पाहिजे.

## शिक्षणाचे माध्यम

४६. विविधोद्देशी तंत्र शाळांमध्ये वरच्या पातळीवरील अभ्यासक्रमासाठी इंग्रजीचे माध्यम सध्यापुरते चालू ठेवून शालेय पातळीवर प्रादेशिक भाषांचा वापर करावा. प्रादेशिक भाषांमध्ये उत्तम प्रकारची तंत्रज्ञान-विषयक पाठ्यपुस्तके निर्माण करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

## प्रत्यक्ष कार्याचे शिक्षण

४७. केंद्र सरकारच्या 'प्रत्यक्ष शिक्षण' योजनेमध्ये जे कारखाने आणि उद्योगधंदे यांचा समावेश आहे त्यामध्ये प्रत्यक्ष कामासाठी पाठवावयाचे उमेदवार काळजीपूर्वक निवडण्यात यावेत. अशा प्रत्यक्ष शिक्षणासाठी अधिक विद्यार्थी घेण्याची सोय करावी.

४८. केंद्र सरकारने सुचविलेल्या उद्योगधंद्यामध्ये प्रत्यक्ष शिक्षणाच्या काही शाळा बंद होण्याचा प्रसंग जर काही कारणामुळे आला तर केंद्र सरकारने त्या शाळा ताब्यात घेऊन पुढे चालू ठेवाव्यात.

४९. जी उद्योग केंद्रे किंवा कारखाने प्रत्यक्ष शिक्षणाची सोय करीत असतील त्यांना केंद्र सरकारने थोडे आर्थिक सहाय्य करावे. अशा औद्योगिक केंद्रात आणि कारखान्यात सुयोग्य पात्रतेचे काही प्रशिक्षित अधिकारी उमेदवरांना शिक्षण देण्यासाठी नेमावेत.

## व्यावसायिक संघटना व औद्योगिक शिक्षण

५०. व्यावसायिक संघटनामार्फत चालविल्या जाणाऱ्या औद्योगिक क्षेत्रातील परीक्षांचा दर्जा चांगला रहावा म्हणून योग्य ते नियम करणे आवश्यक आहे.

५१. उच्च माध्यमिक स्तरावर इयत्ता ११ आणि १२ मध्ये अंशवेळ औद्योगिक शिक्षणाची सोय करण्याच्या कार्यक्रमात व्यावसायिक संघटना भागीदार करून घेण्यात याव्या.

## टपाली अभ्यासक्रम

५२. विविध प्रकारचा व्यावसायिक आणि तांत्रिक अभ्यासक्रम टपाली पद्धतीने देण्याच्या उपक्रमास तावडतोब आरंभ करावा. परंतु हा अभ्यासक्रम फार मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यापूर्वी प्रायोगिक पद्धतीने तो तयार करावा व तपासावा.

## तांत्रिक शिक्षणाचे प्रशासन

५३. तांत्रिक शिक्षणाच्या प्रशासनासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाच्या धर्तीवर एक यंत्रणा तयार करण्यात यावी. या मंडळाचे अध्यक्षस्थानी असलेल्या व्यक्तीने पूर्ण वेळ काम करावे आणि विद्यापीठ अनुदान मंडळ, व्यावसायिक संघटना, उद्योगधंदे आणि संबंधित मंत्रालये यांचे प्रतिनिधी तांत्रिक शिक्षण मंडळावर घेण्यात यावेत.

५४. तंत्रज्ञान संस्था (Institutes of Technology) आणि तत्सम संस्था विद्यापीठाच्या दर्जाच्या मानण्यात याव्या. परंतु त्यांचे सध्याचे नियम आणि त्यांची वैशिष्ट्ये कायम राखण्यात यावीत.

५५. राज्य पातळीवर तांत्रिक शिक्षणाचा संचलन विभाग स्थापन करण्यात यावा. तो शालेय शिक्षण मंडळाचाच एक भाग असावा. या संचालनालयाला पुरेसे शासकीय अधिकार देऊन त्याच्या कार्यामध्ये दिरंगाई टाळता येईल अशी व्यवस्था व्हावी. कर्मचाऱ्यांच्या नेमणुका हा या अधिकारातील एक महत्त्वाचा भाग असावा.

५६. प्रादेशिक स्थापत्य महाविद्यालयाच्या प्रशासन मंडळाची निवड नामांकित शैक्षणिक तज्ज्ञांमधून व्हावी.

५७. महाविद्यालयांच्या शैक्षणिक विकासाकरिता लागणारे साहित्य घेण्याच्या बाबतीत महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पूर्ण अधिकार असावेत. नियमाने ठरवून दिलेले धोरण आणि आर्थिक मर्यादा पाळणे एवढेच बंधन त्यांच्यावर घालून इतर दृष्टीने त्यांना पूर्ण स्वातंत्र्य देण्यात यावे.

— — —

## प्रकरण सोळावे

# शास्त्रशिक्षण आणि संशोधन

१. शास्त्रशिक्षणातील सध्याच्या परिस्थितीत खरी सुधारणा घडवून आणावयाची असेल तर विद्यार्थ्यांची निवड सुपात्र उमेदवारापुरतीच मर्यादित ठेवण्याचे धोरण कडक रीतीने आचरणात आणले पाहिजे.

२. पदव्युत्तर अभ्यासक्रम आणि संशोधन या क्षेत्रामध्ये ज्यांचे शिक्षण करावयाचे त्यांना आपापल्या अध्ययनशाखेत आणि व्यवसायात नेतृत्व घ्यावे लागणार असल्यामुळे त्यांची गुणवत्ता आणि प्रगती यांना आंतरराष्ट्रीय तुलनेमध्ये बरोबरीचे स्थान मिळवावे लागेल. हे उद्दिष्ट साधण्याकरिता प्रत्येक अभ्यासक्रमासाठी सुपात्र उमेदवार निवडणे आणि जेथे अध्ययनाची पातळी उत्कृष्ट राहील अशी अभ्यासकेंद्रे थोड्या प्रमाणावर निर्माण करणे हे उपाय योजावे लागतील. शिवाय या निवडक अभ्यासकेंद्रांना सर्वसामान्य संस्थांसाठी ठरवून दिलेल्या अनुदानापेक्षा आणि साहित्यसामग्रीपेक्षा काही अधिक सोयी द्याव्या लागतील.

३. आपल्या देशातील शास्त्रनिपुण मनुष्यबळ वापरतांना त्याची कार्यक्षमता अत्यंत उच्च प्रकारची राहील अशी काळजी आपण घेतली पाहिजे. ज्या देशात औद्योगिक विकास झालेला आहे त्यातील कार्यकर्त्यांपेक्षा देखील आपल्या शास्त्रीय कार्यकर्त्यांचे कौशल्य अधिक असले पाहिजे. शास्त्र-शिक्षणातील पाठ्यक्रम ठरवितांना आणि संशोधनाचे कार्यक्रम तयार करताना अग्रक्रम कोणत्या निकषावर द्यावयाचा हे आपण स्वदेशाच्या गरजा लक्षात घेऊन आणि स्वतः विचारमंथन करुन काढलेल्या निष्कर्षानुसार ठरविले पाहिजे. या बाबतीमध्ये पुढारलेल्या किंवा इतर देशातल्या उपक्रमांचे निव्वळ अनुकरण करणे अयोग्य मानावे.

४. शिक्षणाच्या सर्व स्तरावर शास्त्राचे शिक्षण सृजनशील असले पाहिजे. अगदी आरंभीच्या स्तरापासून शास्त्रशिक्षणाच्या कार्यक्रमामध्ये विज्ञानाची मूलभूत तत्त्वे आत्मसात करणे आणि शास्त्रीय तर्कशक्ती आणि सृजनशील विचारपद्धती यांचा सतत उपयोग करणे यावर भर दिला पाहिजे.

५. पदवी परीक्षांचा विचार करताना—जर तो अर्थपूर्णतेने करावयाचा असेल तर—विशुद्ध शास्त्रातील (Pure Science) अधिस्नातक पदवीची बरोबरी स्थापत्यशास्त्रातील आणि तंत्रविज्ञानाच्या पाठ्यक्रमातील पहिल्या पदवीशी करण्यात आली पाहिजे.

६. येत्या दोन दशकांमध्ये शास्त्र आणि गणित यातील अभ्यासक्रमांची गुणवत्ता तर वाढविली पाहिजेच; परंतु त्यामध्ये यश मिळवून बाहेर पडणाऱ्या अधिस्नातकांची संख्या देखील अनेक पटींनी देखील वाढविण्यात आली पाहिजे. या कार्यक्रमासाठी पुरेसे आर्थिक साह्य द्यावे लागेल. (यामध्ये परदेशी चलनाची व्यवस्था व्हावी लागेल). प्राध्यापकांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात वाढवावी लागेल आणि त्यांची योग्य प्रकारे निवड करण्यासाठी, त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी आणि अध्यापन व्यवसायातून त्यांनी निघून जाऊ नये यासाठी अत्यंत चिकाटीने प्रयत्नांची शिकस्त करावी लागेल.

७. प्रत्येक विद्यापीठामध्ये ज्या शैक्षणिक नियोजन समित्या स्थापन करावयाच्या आहेत त्यांनी शास्त्र-शिक्षणाच्या पाठ्यक्रमासाठी किती शिक्षकवर्ग लागेल त्याचे नियोजन करावे. तो मिळविण्यासाठी प्रत्येक समितीने प्रगताभ्यास केंद्रांशी निकटचा संपर्क साधावा आणि आवश्यक तेथे अधिस्नातक पातळीवरचे काही उत्कृष्ट, विद्यार्थी अध्यापकांच्या जागांसाठी आधीच निवडून घेऊन त्यांना पुढचे विशेष शिक्षण देण्याची व्यवस्था करावी.

८. शास्त्रीय व्यवसायात व उपक्रमात प्रत्यक्ष काम करणाऱ्या नामांकित कार्यकर्त्यांना त्यांच्या त्यांच्या विविक्षित शास्त्रशाखांचे अध्यापन करण्यासाठी निमंत्रण द्यावे आणि ज्या विद्यापीठात ते वर्ग चालवितील तेथे देशातील इतर विद्यापीठातले विद्यार्थी बोलावून अशा निमंत्रित अध्यापकांच्या विशेषज्ञतेचा लाभ सर्व देशाला करून देण्याचा प्रयत्न व्हावा. अशाच पद्धतीने एका विद्यापीठातील उत्कृष्ट प्राध्यापकांना दुसऱ्या विद्यापीठात जाऊन स्वतःच्या विवक्षित शास्त्रशाखेमध्ये अध्यापन करण्याची संधी द्यावी.

### प्राध्यापकांची अदलाबदल

९. उत्कृष्ट शिक्षकांचा लाभ सर्वांना आळीपाळीने मिळावा यासाठी निरनिराळ्या संस्थांतील व वेगवेगळ्या विद्यापीठांतील प्राध्यापकांची अदलाबदल करण्याचा विद्यापीठ अनुदान मंडळाने सुरू केलेला उपक्रम पुष्कळ प्रमाणात वाढवावा आणि त्याला भरपूर आर्थिक साह्य द्यावे.

१०. दोन किंवा तीन वर्षांच्या कराराने काही फिरते प्राध्यापक (Visiting Professors) नेमणे फायद्याचे ठरेल. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जे भारतीय शास्त्रज्ञ सध्या परदेशात काम करीत आहेत त्यांना आणि नामांकित परदेशी शास्त्रज्ञांना देखील अशा करारावर नेमण्यात यावे.

### विद्यार्थीप्रवेशाबाबत प्रादेशिक असमानता

११. ज्या राज्यामध्ये शास्त्रशाखेतील विद्यार्थ्यांचा प्रवेश अखिल भारतीय सरासरीपेक्षा कमी आहे तेथे तो वाढविण्याचा प्रयत्न कटाक्षाने करण्यात यावा.

### अभ्यासक्रमाची सुधारणा

१२. शास्त्रशिक्षणाचे सध्याचे पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम संपूर्णपणे बदलण्याची आवश्यकता आहे

१३. सर्व विद्यापीठातील शास्त्र-विभागांमध्ये शास्त्रशिक्षणाच्या तात्त्विक आणि प्रायोगिक अभ्यासामध्ये योग्य समतोल राखणे अत्यावश्यक आहे. प्रायोगिक पदार्थविज्ञान आणि रसायनशास्त्र यांच्या विकासाकडे विशेष लक्ष देण्याची निकड आहे. जीवशास्त्राच्या पाठ्यक्रमात सूक्ष्म जंतुविषयीच्या अभ्यासाची विशेष सोय केली पाहिजे. कारण वैद्यकशास्त्र आणि कृषिशास्त्र यामध्ये अशा अभ्यासांचे साह्य फार मोठ्या प्रमाणात होऊ शकेल.

### उद्योगशाळा ( Workshop)

१४. प्रत्येक महाविद्यालयात आणि विद्यापीठाच्या शास्त्रविभागात एक सुसज्ज उद्योगशाळा उभारणे अत्यावश्यक मानले पाहिजे. या उद्योगशाळेमध्ये विद्यार्थ्यांना वेगवेगळी उपकरणे व हत्यारे वापरण्याची सवय लावावी. प्रयोगशाळेतील प्रत्येक कामे आणि प्रयोगाची तंत्र यांचे बारकाईने शिक्षण घेण्यास त्यांना उत्तेजन द्यावे. उद्योगशाळाचा उपयोग सध्यापेक्षा अधिक कार्यक्षमतेने आणि अधिक वेळ करण्यात यावा. सायंकाळच्या वर्गात शिकणाऱ्या किंवा पत्रव्यवहाराने शिक्षण घेणाऱ्या औद्योगिक कामगारांना अशा उद्योगशाळांचा वापर करण्याची मुभा देणे इष्ट होईल.

### प्रयोग व प्रात्यक्षिके

१५. शास्त्रविषयाच्या विद्यार्थ्यांना प्रमाद-उपपत्ति (Theory of Errors), संख्याशास्त्रातील मूलतत्त्वे आणि प्रयोगांची सांख्यिक-रचना या बाबतीत थोडेबहुत ज्ञान मिळणे अत्यावश्यक आहे. आमच्या मते वर्गातील नोंदवहीचे मूल्यमापन आणि विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रयोगांचे मूल्यमापन यांच्या व्यतिरिक्त आणखी एक प्रयोगाची परीक्षा अखेरच्या परीक्षेसाठी मुद्दाम ठेवणे अनावश्यक आहे.

### संयुक्त पाठ्यक्रम

१६. सध्याच्या एम.एससी. च्या अभ्यासक्रमात लवचिकपणा आणणे आणि तो संघटित करताना त्याचे नूतनीकरण करणे फार निकडीचे आहे.

१७. शास्त्राचे शिक्षण आणि तांत्रिक उत्पादन यांना परस्परांच्या समीप आणणे ही आपल्या शिक्षण पद्धतीतील आजची खरी गरज आहे.

### सायंकाळचे वर्ग आणि टपाली अभ्यासक्रम

१८. ठराविक योग्यतेच्या औद्योगिक कर्मचाऱ्यांना संध्याकाळच्या वर्गात आणि टपाली अभ्यासक्रमात प्रवेश देण्याचे धोरण विद्यापीठांनी व स्थापत्यशास्त्राच्या उच्च शिक्षण संस्थांनी अंगीकारले पाहिजे. नेहमीच्या पदवीपरीक्षेच्या आणि सनदपरीक्षेच्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त काही खास अभ्यासक्रमाची योजना करून त्यांच्या द्वारे सूक्ष्म यंत्रशास्त्रज्ञ, (Precision Mechanics) प्रयोगशाळा-तंत्रज्ञ आणि यंत्र चालविणारे कुशल कामगार प्रशिक्षित करण्यात यावेत.

१९. सर्वसामान्य, म्हणजे दोन वर्षाचा, एम.एस.सी. चा अभ्यासक्रम तर चालविला जावाच; परंतु सध्याच्या शास्त्रीय, औद्योगिक आणि इतर तत्सम कार्याच्या गरजा लक्षात घेऊन त्यासाठी विशेष प्रशिक्षण देण्याकरिता एका वर्षाचे किंवा त्याहून कमी कालमर्यादेचे अभ्यासक्रम योग्य त्या विषयाकरिता राबविण्यात यावे.

२०. एम.एस.सी. नंतर एक नवी पदवी निर्माण करण्याची आवश्यकता आहे. अशा पदवीच्या अभ्यासक्रमात अध्यापनशास्त्र हा विषय वैकल्पिक म्हणून ठेवण्यात यावा.

### पाठ्यपुस्तके

२१. आंतरविद्यापीठ मंडळ आणि विद्यापीठ अनुदानमंडळ यांनी पाठ्यपुस्तके निर्माण करण्यासाठी पुढाकार घेऊन चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंत पदवीपूर्व पातळीसाठी लागणारी पुष्कळशी पुस्तके आणि पदव्युत्तर पातळीसाठी आवश्यक असणारी काही पुस्तके या देशातच तयार होतील अशी व्यवस्था करावी.

### वेतनश्रेणी

२२. औद्योगिक देशामध्ये ज्याप्रमाणे स्थापत्यशास्त्रज्ञांचे आणि वैज्ञानिकांचे वेतन राष्ट्रीय उत्पन्नाच्या प्रमाणात देण्यात येते त्याप्रमाणेच ते सामान्यतः आपल्या देशात देण्यात यावे.

२३. भारतातील विद्यापीठ पातळीवर होणारे शास्त्रीय संशोधन आणि भारतीय समाजावर पडणारा त्याचा प्रभाव याविषयीची वस्तुनिष्ठ माहिती सातत्याने व अत्यंत आधुनिक तंत्राने संकलित करण्याची जबाबदारी विद्यापीठ अनुदानमंडळाने घ्यावी आणि मंडळाच्या एकंदर कार्यात या उपक्रमाला महत्त्वाचे स्थान देण्यात यावे.

२४. आपल्या राष्ट्राच्या शास्त्रीय धोरणामध्ये विद्यापीठांत करण्यात येणाऱ्या शास्त्रीय संशोधनाला आणि प्रगताभ्यासाला हेतुपूर्वक पाठिंबा व उत्तेजन देण्याचे तत्त्व मूलग्राही मानण्यात यावे.

२५. सरकारचे शास्त्रविषयक धोरण आणि शास्त्रातील प्रत्यक्ष कार्य यांच्यामध्ये सुसंवादीपणा राखण्यासाठी सरकारने चालविलेल्या शास्त्रीय संस्था व विद्यापीठातील शास्त्रशाखा यांच्यामध्ये उत्कृष्ट परस्परसंबंध राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

२६. विद्यापीठातील शास्त्रशाखेतील सर्व कार्यकर्त्यांनी, म्हणजे प्राध्यापक आणि विद्यार्थी या सर्वांनी संशोधनाचा वेग, प्रमाण आणि गुणवत्ता वाढविणे अत्यावश्यक आहे. या कार्यकर्त्यांची संख्या देखील वाढली पाहिजे. विद्यापीठपातळीवरील प्रत्येक प्राध्यापकाने संशोधक बनण्याचे ध्येय ठेवले पाहिजे आणि प्रत्येक संशोधकाने अध्यापन करण्याचे ठरविले पाहिजे.

२७. विद्यापीठामध्ये वरच्या जागा मिळण्यासाठी उत्कृष्ट अध्यापनशक्तीची तर आवश्यकता आहेच; परंतु त्याखेरीज चांगल्या दर्जाच्या संशोधनाविषयी लेखन करणे आणि ते प्रकाशित करणे ही गोष्ट बढतीसाठी आवश्यक मानावी. पदवीपूर्व पातळीवर काही तीव्र बुद्धीचे विद्यार्थी संशोधनात भाग घेऊ इच्छीत असतील तर त्यांना अवश्य उत्तेजन देण्यात यावे.

२८. जेथे व्यावहारिक दृष्टीने योग्य ठरेल तेथे विद्यापीठाच्या बाहेरील शास्त्रीय संघटनामध्ये काम करणारे कार्यकर्ते निमंत्रित व्याख्याते म्हणून पूर्ण वेळ किंवा अंश वेळ काम करू शकतील अशी योजना आखावी. अशा कार्यकर्त्यांची निवड शास्त्रीय व औद्योगिक संशोधन मंडळ (C.S.I.R.) अणुशक्ती आयोग (Atomic Energy Commission) आणि अशा दर्जाच्या इतर संघटनांमधून करण्यात यावी. त्यांची नियुक्ती कधी अल्पमुदतीची तर कधी दीर्घमुदतीची राहावी.

### पदव्युत्तर पातळीवर विद्यार्थी आणि संशोधन

२९. पदव्युत्तर पातळीवरील काही निवडक विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमातील एक किंवा दोन सत्रे बाहेरील संशोधन संस्थेत, किंवा इतर एखाद्या विद्यापीठात, त्यांच्या आवडीच्या विषयावर संशोधन करण्यासाठी घालविता यावीत. या दृष्टीने आवश्यक त्या सोयी त्यांना उपलब्ध करून देण्यात याव्यात.

### प्रवासाकरिता अनुदान

३०. वेगवेगळी विद्यापीठे आणि संशोधन संस्था यांना अल्पकाळ भेट देण्याची जी योजना विद्यापीठ अनुदान मंडळाने प्राध्यापक, प्रयोगशाळातंत्रज्ञ आणि संशोधक यांच्यासाठी तयार केलेली आहे तिचा अधिक विस्तार करण्यात यावा.

### सामुदायिक कार्य

३१. सामुदायिक संशोधनाच्या नावाखाली कधी कधी अप्रामाणिकपणे आणि इतरांच्या संशोधनशक्तीचा अपहार करून जे काम चालविले जाते ते थांबविण्याकरीता विद्यापीठांनी आपल्या संशोधनविषयक धोरणात विशेष तरतूद करून काही कडक नियम घालून दिले पाहिजेत.

३२. कोणत्याही शास्त्रशाखेतील विभाग-प्रमुखांच्या किंवा अध्यपकाच्या हाताखाली काम करणाऱ्या संशोधनाच्या विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित ठेवली पाहिजे. संशोधनाच्या काही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम कनिष्ठ प्राध्यापकाकडे देखील सोपविण्यात यावे.

३३. पीएच.डी. च्या पाठ्यक्रमात प्रवेश देताना सध्याचे जे पात्रतेचे नियम आहेत, त्यात सुधारणा करावी.

३४. संशोधनाकडे कल असणाऱ्या स्थापत्यशास्त्रातील पदवीधरांना जर गणित, पदार्थविज्ञान आणि इतर शास्त्रशाखामध्ये पीएच.डी. पदवीकरिता अभ्यास करण्याची इच्छा असेल तर त्यांना पहिल्या पदवीनंतरच अशा प्रकारचे संशोधन करण्याची परवानगी द्यावी.

### गणित

३५. येत्या पाच वर्षात निदान तीन किंवा चार चांगल्या विद्यापीठांमध्ये गणित शास्त्राची प्रगताभ्यास केंद्रे स्थापन करण्यात यावीत.

### गणना यंत्र

३६. विद्यापीठ अनुदानमंडळाने निदान एका प्रगताभ्यास केंद्राला गणनायंत्रांच्या साहाय्याने आणि क्रमान्वित अध्ययन पद्धतीने गणितातील उच्च पातळीवरील अभ्यासक्रम राबविण्यासाठी उत्तेजन द्यावे.

### बुद्धिमान विद्यार्थ्यांसाठी शाळा

३७. देशातील एक दोन विद्यापीठांमध्ये गणितात विशेष बुद्धिसामर्थ्य दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे जोडलेल्या माध्यमिक शाळा काढण्यात याव्यात.

३८. विद्यापीठ अनुदान मंडळाने काही निवडक विद्यापीठात गणनायंत्रांची ताबडतोब सोय करावी आणि क्रमान्वित अध्ययनाचे साहित्य तयार करण्याचे प्रशिक्षण देण्याचीही सोय त्याचबरोबर करावी.

३९. अत्याधुनिक तंत्रे वापरून मानवी मनाच्या आणि मेंदूच्या कार्यपद्धतीचे अध्ययन व संशोधन करण्यासाठी दोन कार्यक्षम संशोधन केंद्रे देशात स्थापन करून त्यांच्या संशोधनाला साह्य देण्याचे प्रयत्न अगत्याने व आवश्यक त्या सर्व मार्गांनी करण्यात यावे.

### साधनसामग्री

४०. सध्या जी साधनसामग्री मिळण्यासारखी आहे तिचा पुरेपूर आणि काळजीपूर्वक उपयोग करणे अत्यावश्यक आहे. देशात जी साधनसामग्री अजिबात मिळू शकणार नाही तेवढीच परदेशाहून आयात करण्यात यावी आणि साधनसामग्रीची निर्मिती अधिक प्रमाणात स्वदेशातच व्हावी.

४१. विद्यापीठ अनुदानमंडळ आणि शास्त्रीय व औद्योगिक संशोधन मंडळ यांनी काही विद्यापीठांना व राष्ट्रीय प्रयोगशाळांना आर्थिक साह्य आणि उत्तेजन देऊ करावे आणि त्यांच्याकडून विद्यापीठातील शास्त्रीय अध्ययनाकरिता लागणारी उपकरणे दुरूस्त करण्याची सोय करून द्यावी. या कामासाठी प्रयोगशाळांतील तंत्रज्ञांचे योग्य रीतीने प्रशिक्षण करण्याच्या कार्यक्रमाला अग्रहक्क देण्यात यावा.

४२. विद्यापीठातील शास्त्रविभागांच्या व्यवस्थापनाची आमूलाग्र पुर्नघटना करणे ही बाब अत्यंत निकडीची मानली पाहिजे.

४३. शास्त्रविभागाचे कार्य चालविण्यासाठी, उपलब्ध असलेल्या सर्व साधनसोयींचा पूर्ण उपयोग करून घ्यावयाचा असेल तर व्यवस्थापनाविषयीचे निर्णय घेताना शास्त्रविभागातील प्राध्यपकांचे साह्य नेहमी घेतले पाहिजे.

### व्यवहारोपयोगी काम

४४. नव्या तंत्रांचा विकास करणे किंवा नवी उपकरणे आणि तांत्रिक साहित्य तयार करणे व त्यांचे नवे नमुने बनविणे अशा व्यवहारोपयोगी कामाला शास्त्रविभागामध्ये पुरेसे महत्व देण्याची फार आवश्यकता आहे असे आम्हाला वाटते.

### परदेशातील प्रशिक्षणासाठी पाठ्यवेतने

४५. परदेशातील संघटनांकडून जी पाठ्यवेतने मिळतात ती सोडून भारत सरकारकडूनही प्रत्येक वर्षी परदेशातील अध्यायनाकरिता आणि संशोधनाकरिता काही पाठ्यवेतने देण्यात यावी.

### विद्यापीठांमध्ये संशोधना होणार खर्च

४६. येत्या दहा वर्षांच्या अखेरीपर्यंत विद्यापीठातील एकंदर खर्चापैकी सुमारे एक-चतुर्थांश रक्कम संशोधनासाठी खर्च व्हावी.

४७. संशोधनाला उत्तेजन देण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने विद्यापीठांच्या आर्थिक साह्यात वेगळी तरतूद करावी.

### विद्यापीठांच्या बाहेर होणारे मूलभूत संशोधन

४८. विद्यापीठांच्या बाहेर राहून मूलभूत संशोधन करीत असलेल्या संस्थांना विद्यापीठांच्या कक्षेत आणावे किंवा विद्यापीठाशी संलग्न करून घेण्यात यावे.

४९. ज्या संस्थांमध्ये केवळ मूलभूत संशोधनच केले जाईल आणि अध्यापनाची जबाबदारी ज्या उचलू शकणार नाहीत, अशा खास संशोधन संस्था स्थापन करणे टाळावे.

### विज्ञानविषयक राष्ट्रीय सल्लागार समिती

५०. शास्त्रीय विकासाच्या राष्ट्रीय धोरणाची दिशा स्पष्टपणे ठरविण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर एक सल्लागार समिती नेमण्यात यावी.

५१. भारतीय मंत्रिमंडळाला सल्ला देण्याकरिता जी शास्त्रीय सल्लागार समिती अस्तित्वात आहे, तिची पुर्नघटना करावी आणि तिच्या कार्याचा भार व्यवस्थितपणे उचलू शकतील अशा तज्ज्ञ कार्यकर्त्यांचा सचिव-समूह या सल्लागार समितीला देण्यात यावा.

५२. या सल्लागार समितीच्या अध्यक्षपदी प्रथितयश शास्त्रज्ञाची किंवा स्थापत्यशास्त्रज्ञाची किंवा शास्त्रीय संघटनेचे व्यवस्थापन करण्याविषयी जिने विशेष मान्यता मिळविली आहे अशा व्यक्तींची नेमणूक करण्यात यावी.

### संशोधनातील अग्रक्रम

५३. राष्ट्रीय गरजा लक्षात घेऊनच संशोधन विषयांचा अग्रक्रम ठरविण्यात यावा.

## प्रकरण सतरावे

# प्रौढ शिक्षण

### निरक्षरतेचे निर्मूलन

१. देशातील निरक्षरतेचे निर्मूलन शक्य तितक्या लवकर करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करण्यात यावेत देशाचा प्रत्येक भाग, मग तो कितीही मागासलेला असो, येत्या वीस वर्षांच्या काळात निरक्षरतेतून मुक्त झाला पाहिजे. १९७१ पर्यंत देशातील साक्षरतेचे प्रमाण ६० टक्के आणि १९७६ पर्यंत ८० टक्के झाले पाहिजे.

२. निरक्षरतेची वाढ थांबविण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल म्हणून पुढील उपाययोजना करण्यात यावी.

(अ) सहा ते अकरा या वयोगटासाठी पाच वर्षांच्या सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार करणे ; (ब) अकरा ते चौदा या वयोगटातील ज्या मुलांना शाळेत जाण्याची संधी मिळालेली नसेल किंवा ज्यांनी मध्येच शाळा सोडून दिलेली असेल त्यांच्यासाठी अंशवेळ शिक्षणाची सोय करणे ; (क) पंधरा ते तीस या वयोगटातील प्रौढांसाठी अंशवेळ सामान्य शिक्षणाची आणि व्यावसायिक शिक्षणाची व्यवस्था करणे ही व्यवस्था करतांना या वयोगटातील कमी वयाच्या प्रौढांना प्राधान्य देण्यात यावे.

३. निरक्षरतेचे निर्मूलन करताना दोन प्रकारचे कार्यक्रम नजरेपुढे ठेवले पाहिजे. काही कार्यक्रमात निवड करण्याचे धोरण असावे आणि काहीमध्ये बहुजनसमाजासाठी योजिलेले उपक्रम असावे.

४. निवडक कार्यक्रम ठरविताना प्रौढ व्यक्तींमध्ये निरनिराळे गट पाडून त्यातील कोणत्या गटांना अधिक परिणामकारक रीतीने साक्षर बनविता येईल ते ठरवावे. वेगवेगळ्या गटांचे कामाचे प्रकार, त्यांना द्यावयाची प्रेरणा आणि त्यांच्यावर देखरेख करणारी संघटना या तिन्ही गोष्टी लक्षात घेऊन निरक्षर प्रौढांचे सोयीस्कर गट पाडण्यात यावे. व्यावसायिक आणि उद्योगधंद्यांची केंद्र, कारखाने, मोठ्या शेतकी संघटना इत्यादींच्या बाबतीत, शक्य असल्यास कायद्याचे बंधन घालून, त्यांच्याकडे काम करणाऱ्या निरक्षरांना नोकरीच्या काळातच साक्षर करून घेण्याचे बंधन घालावे. नोकरीची तीन वर्षे पुरी होण्याच्या आत सर्व कर्मचारी साक्षर व्हावेत. सार्वजनिक विभागातील मोठमोठ्या औद्योगिक वसाहतींनी या कामात पुढाकार घ्यावा आणि वर दर्शविलेले उद्दिष्ट थोड्या कालावधीतच साध्य करावे. विकासाच्या प्रकल्पाचे नियोजन करताना प्रत्येक प्रकल्पाच्या कार्यासाठी जो कर्मचारी वर्ग नेमावयाचा, त्यातील निरक्षर कर्मचाऱ्यांना साक्षर करण्याचे काम देखील त्यात समाविष्ट करण्यात यावे. जनतेच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी सरकारने चालविलेल्या प्रत्येक योजनेमध्ये तिच्यातील कार्यकर्त्यांच्या निरक्षरतेचे निर्मूलन करणे हा तिच्यातील अविभाज्य घटक मानण्यात यावा.

५. निरक्षरता निर्मूलनाच्या सर्वस्पर्शी कार्यक्रमामध्ये देशातील शिक्षित स्त्री-पुरुषांना शक्य तितक्या संख्येने कार्य करण्यास उद्युक्त करावे आणि काळजीपूर्वक ठरविलेल्या साक्षरतेच्या मोहिमेमध्ये भाग घेण्याची त्यांना संधी द्यावी. साक्षरतेच्या सार्वत्रिक मोहिमेमध्ये सर्व शैक्षणिक संस्था आणि त्यातील सर्व शिक्षक आणि विद्यार्थी यांना भाग घेण्यास लावावे. राष्ट्रीय सेवेच्या सक्तीच्या कार्यक्रमाचा भाग म्हणून उच्च प्राथमिक पातळीपासून तो पदवीपूर्व पातळीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना निरक्षरता निर्मूलनाचे काम द्यावे. व्यावसायिक शिक्षणाच्या संस्थांतील विद्यार्थ्यांचा देखील यात समावेश असावा. प्रत्येक शैक्षणिक संस्थेने आपल्या भोवतालच्या ठरवून दिलेल्या विभागातील निरक्षरतेचे निर्मूलन करण्याची जबाबदारी घ्यावी.

६. तपशीलवार पूर्वतयारी आणि योजना केल्याशिवाय कोणतीही साक्षरतेची मोहीम हाती घेण्यात येऊ नये.

७. स्त्रियांमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी केंद्रीय समाज कल्याण मंडळाने तयार केलेले संक्षिप्त अभ्यासक्रम कार्यवाहीत आणावे. ग्रामीण विभागातील स्त्रियांना शिकविण्याकरिता 'ग्रामभगिनी' नेमण्याची तरतूद करावी.

८. सार्वत्रिक शिक्षणाची साधने (रेडीओ इत्यादी) परिणामकारक रीतीने वापरून त्यांच्या साह्याने साक्षरतेला उपकारक असे वातावरण तयार करावे आणि एकंदर जीवनाची आणि कामकाजाची पातळी उंचावण्यासाठी व नवे ज्ञान आणि कौशल्य देण्यासाठी त्यांचा उपयोग करावा.

९. साक्षरता टिकविता यावी म्हणून साक्षरतेच्या मोहिमांचा व्यवस्थित मागोवा घेण्याची तरतूद करण्यात यावी. त्यामध्ये वाचन साहित्याची निर्मिती, वाचनालयांचा उपयोग आणि अधिक शिक्षण या गोष्टींचा समावेश करावा.

### शिक्षणाचा पुनरारंभ व शिक्षणाचे सातत्य
### Continuation Education and Continuing Education

१०. ज्या कोणाला पुढचे शिक्षण घ्यावयाचे असेल त्याच्यासाठी सर्व शिक्षण संस्थांनी आपली दारे खुली करावीत आणि रोजच्या ठराविक कामाच्या वेळेबाहेर सकाळी किंवा संध्याकाळी निरनिराळ्या प्रकारचे अभ्यासक्रम चालवावेत. अशा कार्यासाठी शिक्षण संस्थांना योग्य साह्य आणि उत्तेजन देण्यात यावे. प्रौढव्यक्तींना सनद व पदवी परीक्षांना अंशवेळ अभ्यासक्रम घेऊन बसता येईल अशी सोय शिक्षणव्यवस्थेचा नित्याचा भाग म्हणूनच करण्यात यावी.

११. ज्या अभ्यासक्रमातून प्रौढांना आपापले व्यावसायिक प्रश्न सोडविता येतील आणि व्यवसायाशी संबंधित असलेले ज्ञान आणि अनुभव अधिक प्रमाणात मिळविता येतील असे अनौपचारिक अभ्यासक्रम संघटित करण्य त यावेत.

१२. कामगारांचे व कारागिरांचे ज्ञान आणि कौशल्य वाढावे, त्यांच्या जीवनाच्या कक्षा विशाल व्हाव्या, स्वतःच्या व्यवसायाविषयी त्यांना अधिक निष्ठा वाटावी आणि व्यावसायिक प्रगती करण्यासाठी त्यांना उत्तेजन मिळावे म्हणून त्यांच्याकरिता सुयोग्य अभ्यासक्रम आयोजित करण्यात यावेत. खास अंशवेळ अभ्यासक्रम, आणि काम व अभ्यास आलटून पालटून करता येईल अशा प्रकारचे पाठ्यक्रम. त्यांच्यासाठी तयार करून त्यांना पायरी-पायरीने व्यावसायिक उच्च शिक्षणाचा लाभ मिळवून द्यावा.

१३. केंद्रीय समाज कल्याण मंडळाने प्रौढ स्त्रियांकरिता चालविलेल्या संस्था आणि म्हैसूर राज्याने चालविलेली लोकविद्यापीठे या पद्धतीच्या संस्थांची अधिक वाढ करावी. अस्तित्वात असलेल्या संस्थांच्या कार्याची सातत्याने फेरपहाणी करून त्या ग्रामीण जनतेला साह्यकारी होतील अशी काळजी घ्यावी.

## टपाली अभ्यासक्रम

१४. ज्यांना अंशवेळ अभ्यासक्रमांना देखील हजर राहणे शक्य नसेल अशांच्यासाठी टपाली शिक्षणाची सोय खूप विस्तृत प्रमाणावर करण्यात यावी.

१५. टपाली पद्धतीने शिकणारे विद्यार्थी आपल्या शिक्षकांना शंकासमाधानाकरिता अधूनमधून भेटू शकतील अशी व्यवस्था करण्यात यावी. या विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांसारखीच मान्यता द्यावी आणि शक्य असेल तेथे त्यांची नावे जवळपासच्या महाविद्यालयात, अगर तत्सम संस्थांत, ग्रंथालयांच्या वापर करण्यासाठी आणि इतर सोयींचा लाभ घेण्यासाठी नोंदविण्यात यावीत.

१६. रेडिओ आणि दूरचित्रवाणी यांच्या साह्याने टपाली अभ्यासक्रमांची उपयुक्तता वाढवावी.

१७. विद्यापीठातील पदव्यांसाठी विद्यार्थ्यांची तयारी करून घेणे हा मर्यादित उद्देश टपाली अभ्यासक्रमामागे नसावा. शेती व उद्योगधंदे यातील कामगारांना अधिक उत्पादनक्षम करण्यासाठी टपाली अभ्यासक्रम योजण्यात यावेत.

१८. कला आणि संस्कृती यांच्याशी संबंधित विषयांचा अभ्यास प्रौढांना करता यावा म्हणूनदेखील टपाली अभ्यासक्रम उपयोगात आणावे.

१९. सर्व स्तरावरील अध्यापकांना अध्यापनाचे नवे तंत्र अवगत व्हावे आणि शिक्षणशास्त्राचे नवे ज्ञान त्यांना मिळावे यासाठी टपाली अभ्यासक्रमाचा विशेष विकास करण्यात यावा.

२०. शिक्षण मंत्रालयाने इतर मंत्रालयांचे साह्य घेऊन एक 'राष्ट्रीय गृह-अध्ययन मंडळ' स्थापन करावे ज्या संस्था व संघटना टपाली अभ्यासक्रम चालवितात त्यांची नोंदणी करणे, त्यांना मान्यता देणे आणि त्यांच्या कामाचे मूल्यमापन करणे हे सर्व काम या मंडळाकडे सोपवावे. कोणत्या विषयांमध्ये टपाली अभ्यासक्रमांची विशेष गरज आहे आणि असे अभ्यासक्रम उत्कृष्ट रीतीने चालविण्याकरिता कोणत्या तऱ्हेने मूल्यमापन व संशोधन करण्याची गरज आहे ते या मंडळाने ठरवावे.

२१. ज्यांना स्वतंत्रपणे अभ्यास करून माध्यमिक शिक्षणमंडळाच्या आणि विद्यापीठाच्या परीक्षांना बसावयाचे असेल त्यांना अशा परीक्षांची तयारी टपाली अभ्यासक्रमाच्या माध्यमातून करता यावी.

## ग्रंथालये

२२. ग्रंथालय सल्लागार समितीने केलेल्या शिफारशीनुसार सर्व देशांमध्ये ग्रंथालयांची स्थापना करण्यात यावी.

२३. शालेय वाचनालयांचा संबंध सार्वजनिक वाचनालयांशी घनिष्टतेने आणावा आणि या व्यवस्थेतून शालेय विद्यार्थ्यांना त्याचप्रमाणे नवसाक्षरांना योग्य प्रकारचे वाचनसाहित्य अधिक प्रमाणात उपलब्ध करून द्यावे.

२४. वाचनालयांच्या कार्यात आकर्षकता यावी आणि प्रौढांकडून ती वापरली जावीत यासाठी विशेष योजना आखाव्या.

## विद्यापीठांची भूमिका

२५. प्रौढशिक्षणाची जबाबदारी भारतीय विद्यापीठांनी सध्यापेक्षा अधिक प्रमाणात उचलली पाहिजे.

२६. प्रौढशिक्षणाच्या कार्यक्रमांचे व्यवस्थित नियोजन करण्यासाठी आणि तो पद्धतशीरपणे कार्यवाहीत आणण्यासाठी प्रत्येक विद्यापीठाने एक प्रौढशिक्षण मंडळ स्थापन करावे आणि त्यामध्ये ज्ञानविज्ञानाच्या सर्व शाखांना प्रतिनिधित्व द्यावे. त्याचप्रमाणे, एक वेगळा प्रौढशिक्षण विभाग देखील विद्यापीठामध्ये सुरू करण्यात यावा.

२७. प्रौढशिक्षणाच्या कार्यक्रमासाठी लागणारे साहित्य व निधी यांची पुरेशी सोय विद्यापीठांना करून दिली जावी.

## संघटना आणि प्रशासन

२८. राष्ट्रीय पातळीवर एक राष्ट्रीय प्रौढशिक्षण मंडळ स्थापन करण्यात यावे आणि संबंधित मंत्रालयांच्या आणि संघटनांच्या प्रतिनिधिंना त्यामध्ये सदस्यत्व द्यावे. या प्रकाराची मंडळे राज्य पातळीवर आणि जिल्हा पातळीवर देखील स्थापन करण्यात यावीत.

२९. प्रौढशिक्षणाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंस्फूर्त संस्थांना शक्य तितके उत्तेजन द्यावे आणि त्यांना आवश्यक वाटणारे तांत्रिक आणि आर्थिक साह्य देखील पुरवावे.

# भाग तिसरा

## प्रकरण अठरावे

## शैक्षणिक प्रशासन

### शैक्षणिक नियोजन

१. विद्यार्थी-भरती आणि शिक्षणावरील खर्च यांचे इष्टांक गाठण्यावर शैक्षणिक नियोजनामध्ये अवास्तव भर देण्यात आलेला आहे. ही पद्धती बदलून शैक्षणिक विकासाचा विचार अधिक विशाल दृष्टीने करणारी आणि शैक्षणिक उद्दिष्टांचा संबंध शिक्षणाच्या गुणवत्तेशी जुळविणारी पद्धती अवलंबिण्यात आली पाहिजे.

२. शिक्षणाच्या प्रत्येक कक्षेमध्ये थोडेतरी कार्यक्रम हाती घेण्याचे जे धोरण आजपावेतो चालत आलेले आहे, त्यातून साधनसंपत्तीचा बराच अपव्यय झाल्याचे आढळते. मर्यादित असलेली साधनसंपत्ती प्रत्येक कक्षेतील कार्याकरिता थोडी थोडी वापरण्याऐवजी काही आशयपूर्ण कार्यक्रम हाती घेऊन त्यांच्यावर लक्ष केंद्रीत करणे हे शैक्षणिक नियोजनात यापुढे अधिक महत्त्वाचे मानले पाहिजे.

३. सध्याच्या आर्थिक तंगीच्या परिस्थितीत मोठ्या प्रमाणात आर्थिक भांडवल गुंतवणूक करण्यापेक्षा निर्धारपूर्वक करावयाच्या प्रयत्नावर, उत्कृष्ट संघटनेवर आणि परिश्रम व बुद्धिमत्ता यावर ज्या कार्यक्रमांचे यश अवलंबून आहे त्यांची निवड आधी करण्यात यावी.

४. शैक्षणिक नियोजनातील वेगवेगळे कार्यक्रम पडताळून पाहून आणि संशोधनाचे प्रकल्प हाती घेऊन सर्व योजनांचे वेळोवेळी मूल्यमापन करण्याच्या कामात सर्व विद्यापीठांनी, व्यावसायिक संघटनांनी आणि प्रशिक्षण महाविद्यालयांनी सामुदायिकरित्या भाग घेतला पाहिजे.

५. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण मंडळाने Asian Institute of Educational Planning या संस्थेशी सहकार्य करून वेगवेगळ्या राज्यांतील शैक्षणिक नियोजनाचा अभ्यास हाती घ्यावा त्याबरोबरच, ज्या कार्यकर्त्यांना शैक्षणिक योजना तयार कराव्या लागतात त्यांचे प्रशिक्षण करण्यासाठी पाठ्यक्रम चालविण्यात यावे.

६. शैक्षणिक नियोजन, प्रशासन आणि अर्थव्यवस्था या विषयांच्या अध्ययनासाठी एका प्रगताभ्यास केंद्राची स्थापना करण्याचा विचार विद्यापीठ अनुदान मंडळाने करावा.

७. भारतासारख्या लोकशाही पद्धतीच्या संघराज्यामध्ये शैक्षणिक नियोजन करताना केंद्रीय सत्ता आणि तिचे विकेंद्रीकरण शिक्षणाच्या कोणकोणत्या शाखासाठी परिणामकारक ठरेल याचा निर्णय काळजीपूर्वक घेणे अत्यावश्यक आहे. विशेषत: शैक्षणिक प्रशासनाच्या बाबतीत हा विचार फार बारकाईने करावा लागेल. केंद्रित सत्ता व विकेंद्रित सत्ता यांचा विचार करताना कार्यक्रमाचे जे अग्रहक्क ठरवावे लागतील त्यांत राष्ट्रीय पातळी, राज्यपातळी आणि स्थानिक पातळी असा क्रम लावणे उपयुक्त ठरेल.

८. शालेय शिक्षणाची जबाबदारी स्थानिक पातळीवर आणि राज्यपातळीवर विभागली जाईल व उच्च शिक्षणाची जबाबदारी केंद्रीय आणि राज्यपातळीवर विभागली जाईल. केंद्रीत सत्ता आणि विकेंद्रित सत्ता यामध्ये समतोल राखण्याची जी आवश्यकता आपल्या शैक्षणिक नियोजनामध्ये भासते तिची दखल वरील तत्त्वांच्या आधाराने योग्यप्रकारे घेता येईल.

### खाजगी संघटनांची भूमिका

९. खाजगी संघटनांची भावी काळातील भूमिका पुढे दिलेल्या तत्त्वानुसार ठरविली पाहिजे : (अ) आधुनिक भारतामध्ये शिक्षणाचा विकास करण्यासाठी खाजगी संघटनांनी फार मोठी कामगिरी बजाविली असल्यामुळे त्यांच्याकडून शिक्षणाच्या विकासाला यापुढे देखील जी मदत मिळेल तिचे राज्य सरकारने स्वागत करावे आणि तिचा पूर्ण उपयोग करून घ्यावा; (ब) यापुढच्या काळात खाजगी संघटनांना शिक्षणामध्ये मर्यादित प्रमाणातच कार्य करता येईल कारण सरकारने आता शैक्षणिक सोयी पुरविण्याची पूर्ण जबाबदारी अंगिकारिली आहे आणि शिक्षण व्यवस्थेतील हे नवे वळण योग्य असेच आहे.

### स्थानिक स्वराज्यसंस्थाची भूमिका

१०. स्थानिक स्वराज्य संस्थांना शिक्षणाचे प्रशासन करण्याचा अधिकार दोन महत्त्वाच्या अटीवर देण्यात यावा : उत्कृष्ट प्रशासन कायम ठेवणे आणि शिक्षणविकास कार्यक्षमतेने करणे यापैकी एखादी अट जर मोडली गेली तर स्थानिक स्वराज्य संस्थांकडे दिलेला शैक्षणिक प्रशासनाचा अधिकार काढून घेण्यात यावा.

११. भावी काळामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांनी शिक्षणाविषयी जी भूमिका घ्यावयाची आहे, ती पुढीलप्रमाणे राहील : (अ) शाळा आणि शाळेच्या परिसरातील जनता यांनी शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याचे अंतिम उद्दिष्ट नजरेपुढे ठेवण्यात यावे. (ब) केवळ विकेंद्रीकरण साधणे एवढाच या उद्दिष्टाचा अर्थ लावू नये. स्थानिक परिस्थितीचा पूर्ण विचार केल्याखेरीज लोकशाही पद्धतीचे विकेंद्रीकरण सगळीकडे आणि ताबडतोब अंमलात आणणे योग्य ठरणार नाही. (क) या बाबतीमध्ये एक ताबडतोबीचे मर्यादित धोरण राष्ट्रीय पातळीवरून ठरविणे शक्य आहे. ते प्रत्येक राज्यात अवलंबिता येईल. या धोरणानुसार ग्रामीण विभागातील पंचायती आणि शहरी विभागातील नगरपालिका यांच्यावर शिक्षकपगाराखेरीज इतर शैक्षणिक खर्चाची जबाबदारी सोपविण्यात यावी आणि त्यांच्या विभागातील शाळात काम चांगल्या रीतीने चालले आहे की नाही हे सुद्धा त्यांनी पाहावे. शिक्षणासाठी त्यांनी करावयाच्या खर्चावर राज्य सरकारांनी त्यांना साहाय्यक अनुदान आवश्यक तेथे द्यावे. (ड) विकेंद्रीकरणाच्या राष्ट्रीय धोरणातील अंतिम उद्दिष्ट म्हणजे जिल्हा पातळीवर एक कार्यक्षम स्थानिक शिक्षण संघटना निर्माण करून तिच्या हाती विद्यापीठ पातळीच्या खाली असलेले सर्व शिक्षण सोपविणे हे होय. या संघटनेला "जिल्हा शिक्षण मंडळ" असे नाव देण्यात यावे. (इ) या अंतिम उद्दिष्टाकडे जाण्याचा सल्ला केन्द्र सरकारने सर्व राज्य सरकारांना द्यावा, परंतु त्या बाबतीतील शक्याशक्यतेचा विचारही प्रत्येक राज्याच्या परिस्थितीनुसार झाला पाहिजे. या बाबतीत सर्व राज्यांनी एकच धोरण ताबडतोब स्वीकारले पाहिजे असे दडपण त्यांच्यावर आणणे अयोग्य ठरेल.

१२. स्थानिक जनतेला आणि शासनयंत्रणेला शिक्षणाच्या कामी सहभागी करून घेताना शिक्षकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही आणि स्थानिक राजकारण व गटबाजी यात ते गोवले जाणार नाहीत अशी काळजी घ्यावी आणि त्यासाठी कायदेशीर तरतूद ठेवावी.

१३. जिल्हा शिक्षण मंडळाचे कार्यक्षेत्र सर्व जिल्ह्याशी समकक्ष असावे परंतु जिल्ह्यातील मोठ्या नगर–पालिकांना जिल्हा शिक्षण मंडळाच्या अधिकारातून वगळण्यात यावे. जिल्हा शिक्षण मंडळामध्ये जिल्हा परिषद नगरपालिका, शिक्षणतज्ञ आणि संबंधित खात्याचे प्रतिनिधी असावेत. जिल्हा शिक्षण मंडळाला आवश्यक असलेला प्रशासन आणि पर्यवेक्षण ही कामे करणारा सुपात्र कर्मचारीवर्ग पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून द्यावा आणि राज्य सरकारचा एक जेष्ठ अधिकारी शिक्षण मंडळाचा पूर्ण वेळ सचिव म्हणून नियुक्त करावा.

१४. जिल्हा शिक्षण मंडळाच्या कार्यकक्षेत जिल्ह्यातील सर्व प्रकारचे शालेय शिक्षण असावे. व्यावसायिक शिक्षणाचा देखील त्यात समावेश करावा. जिल्ह्यातील सरकारी व स्थानिक व्यवस्थापनाखाली असलेल्या शाळांचे प्रशासन करणे आणि राज्य सरकारने ठरवून दिलेल्या नियमानुसार खाजगी संस्थांनी चालविलेल्या शाळांना सहाय्यक अनुदान देणे हे काम जिल्हा शिक्षण मंडळाकडे सोपविण्यात यावे.

१५. जिल्ह्यातील शालेय शिक्षणाचो विकास योजना तयार करण्याची जबाबदारी जिल्हा शिक्षण मंडळाकडे राहील. जिल्ह्यातील शालेय शिक्षणाच्या विकासाकरिता पैसा आणि मार्गदर्शन जरी राज्य शिक्षण–विभागाकडून जिल्हा शिक्षण मंडळाला राज्यसरकारतर्फे देण्यात यावयाचे असले तरी जिल्हा पातळीवरील शालेय शिक्षणाच्या विकासाची प्रमुख यंत्रणा म्हणजे शिक्षण मंडळच असे मानावे.

१६. ज्या ठिकाणची लोकवस्ती एक लाख किंवा त्याहून अधिक असेल तेथे, वर दर्शविलेल्या पद्धतीने, नगरपालिका शिक्षण मंडळ निर्माण करणे योग्य ठरेल. आर्थिक आणि शासकीय दृष्टया नगरपालिका शिक्षण मंडळाचा कारभार निर्वेधपणे चालवावयाचा असेल तर मोठ्या लोकवस्तीची ठिकाणे निवडणे आवश्यक आहे. नगरपालिका शिक्षण मंडळाची रचना, अधिकार अणि कर्तव्ये जिल्हा शिक्षण मंडळाप्रमाणे असावीत.

१७. प्रत्येक शालेय शिक्षण मंडळाने वेगळा 'शिक्षण निधी' ठेवावा. शिक्षण मंडळाच्या आर्थिक अंदाज-पत्रकाला जिल्हा परिषदेची ( किंवा नगरपालिकेची ) मान्यता असावी. जिल्हा परिषदा किंवा नगरपालिका शिक्षणा-साठी जो निधी गोळा करतील तो त्यानी शिक्षण मंडळाच्या खात्यावर जमा करावा. दैनंदिन प्रशासनाच्या बाबतीत शिक्षण मंडळाला पूर्ण स्वायत्तता असावी. जिल्हा परिषद आणि जिल्हा शिक्षण मंडळ यांचे परस्परसंबंध ज्याप्रकारचे असतील त्याच नमुन्यावर नगरपालिका आणि नगरपालिकेचे शिक्षण मंडळ यांचे परस्पर संबंध ठरवावेत.

१८. शिक्षण मंडळाचे अध्यक्ष, सचिव आणि जिल्हा-शिक्षणधिकारी यांच्या खास समितीने शिक्षकांची निवड, नेमणूक व बदल्या हे काम पाहावे. याबाबतीत राज्य सरकारने केलेले नियम पाळले जावेत अणि बदल्यांचे प्रमाण शक्य तितके कमी करावे. हे धोरण पत्करल्याशिवाय शिक्षकांना ते ज्या संस्थेत काम करत असतील तिच्याविषयी निष्ठा वाटणार नाही.

१९. काही ठिकाणी शिक्षण मंडळावर प्रशासनाची जबाबदारी एकदम टाकणे योग्य होणार नाही. मंडळाला जसजसा प्रशासकीय कामाचा अधिक अनुभव मिळेल व कामाचा पुरेसा उरक दाखविण्याची संधी मिळेल सतशा अधिक जबाबदाऱ्या मंडळाकडे सोपविता येतील.

**केंद्र सरकारची भूमिका**

२०. विज्ञान आणि तंत्रज्ञान या शाखासाठी शैक्षणिक संस्था स्थापन करण्याची जबाबदारी केंद्रसरकारने जशी घ्यावयाची आहे तशीच सामाजिक शास्त्राच्या, अध्यापनशास्त्राच्या आणि मानव्य शाखांच्या शिक्षणासाठी काही संस्था केंद्राने स्थापन करणे अत्यावश्यक आहे. अशा संस्था विद्यापीठाच्या सहकार्याने स्थापन कराव्यात आणि त्यांना उच्च शिक्षणाच्या व्यवस्थेतील अविभाज्य घटक मानावे.

२१. केंद्रशासित प्रदेशामध्ये—विशेषत: दिल्लीमध्ये शिक्षणाचा विकास करण्याची जबाबदारी केंद्राने तर उचलावीच परंतु या प्रदेशातील शिक्षण व्यवस्थेची गतिमानता इतर प्रदेशांना उत्कृष्ट उदाहरण घालून देईल असेही पाहावे.

२२. जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रातून बुद्धीमान व्यक्तींची निवड करण्याचे काम केंद्र सरकारने हाती घ्यावे आणि देशातील अत्युत्कृष्ट कार्यकर्त्यांचा पुरवठा सर्व राज्यांना करावा. विकासाच्या सर्व कार्यासाठी या कार्यकर्त्यांनी सल्लामसलत आणि साह्य पुरवावे.

२३. राज्य सरकारच्या योजनामध्ये शिक्षणाकरिता जी खर्चाची तरतूद केलेली असेल त्यामध्ये निरनिराळ्या कार्यक्रमासाठी रकमांची काटेकोर विभागणी करण्यात येऊ नये. शिक्षणासाठी नक्की करण्यात आलेली आर्थिक तरतूद सर्वसाधारणपणे नियोजन मंडळाच्या मान्यतेशिवाय बदलण्यात येऊ नये; परंतु तरतुदीमधला तपशील आपल्या जबाबदारीवर बदलण्याची मुभा सरकारांना असावी.

२४. ज्या शैक्षणिक उपक्रमांची आर्थिक व शासकीय जबाबदारी केंद्राने घेण्याचे ठरविले असेल आणि आर्थिक जबाबदारी केंद्राने स्वीकारून प्रशासकीय जबाबदारी राज्य सरकारकडे दिली असेल ( Central and Centrally Sponsored Sectors ) त्यांचा विकास करण्याला खूप महत्त्व दिले पाहिजे. ज्या पद्धतीचा शैक्षणिक विकास शिक्षणाच्या महत्त्वाच्या स्तरावर आणि शाखामध्ये राष्ट्रहिताच्या दृष्टीने साधावा लागणार आहे, त्याला उत्तेजन देण्यासाठी आणि मार्गदर्शन पुरविण्यासाठी केंद्र सरकारला ही यंत्रणाच उपयोगी पडेल.

२५. देशातील शिक्षणव्यवस्थेचे विभाजन करून एक विभाग राज्यसरकारच्या यादीत आणि दुसरा संयुक्त यादीत घालणे अयोग्य ठरेल. भारतासारख्या विशाल देशात शिक्षणाची व्यवस्था करताना आपल्या राज्यघटनेमध्ये सुचविण्यात आलेली व्यवस्थाच योग्य ठरते हे मान्य केले पाहिजे. या व्यवस्थेतून केंद्र सरकारच्या नेतृत्वाला पुरेसा वाव मिळतो आणि असे नेतृत्व कोणावरही दडपण न आणता उत्तेजन देऊ शकते. लवचिकपणा आणि प्रयोग करण्याचे स्वातंत्र्य या आपल्या शिक्षणातल्या सध्याच्या प्रमुख गरजा आहेत.

२६. राज्यघटनेमध्ये शिक्षणाच्या विकासासाठी आणि शिक्षणविषयीच्या राष्ट्रीय धोरणाचे मूल्यमापन करण्यासाठी जी तरतूद केलेली आहे तिचा पुरेपूर फायदा घेण्याचा कसोशीचा प्रयत्न करण्यात यावा. सुमारे १० वर्षानंतर सर्व परिस्थितीची फेरपहाणी करण्यात यावी.

**शिक्षण मंत्रालय**

२७. भारतीय शिक्षण मंत्रालयाच्या सचिवाची जागा एखाद्या शिक्षणतज्ज्ञाला देण्याची सध्याची प्रथा पुढे चालू ठेवावी. सध्याप्रमाणेच शिक्षण-सल्लागार आणि शिक्षणसचिव हे दोन्ही हुद्दे एकाच व्यक्तीकडे राहावे. ही महत्त्वाची जागा निवडक व्यक्तिलाच द्यावी आणि निवड करण्याचे क्षेत्र विशाल ठेवून सरकारी व बिनसरकारी कार्यकर्ते, भारतीय शिक्षण सेवाविभाग, विद्यापीठातील प्रथितयश प्राध्यापक, इत्यादीमधून ही निवड व्हावी. सचिव-सल्लागार ही जागा प्रथम ६ वर्षाच्या कराराने भरण्यात यावी आणि अपवादात्मक उदाहरण पुढे आल्यास करारामध्ये ३ ते ४ वर्षांची वाढ करावी. सचिवाची पुर्ननियुक्ती यापेक्षा अधिक काळासाठी होऊ नये.

२८. अपर सचिव आणि सहसचिव या दर्जाच्या जागातील सुमारे निम्म्या जागा बढतीने भराव्यात आणि त्यामध्ये राज्यसरकारच्या शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना देखील स्थान देण्यात यावे. उरलेल्या निम्म्या जागा भरताना नावाजलेले शिक्षणतज्ज्ञ, आणि विद्यापीठे व शालेय पातळीवरील संस्था यातील विख्यात शिक्षकांतून निवड व्हावी. अशा प्रत्येक नेमणुकीचा काळ पाच वर्षापुरता असावा आणि पुर्ननियुक्ती करावयाची झाल्यास ती जास्तीत जास्त ५ वर्षापुरती असावी.

२९. शिक्षण मंत्रालयाचे शिक्षणविषयक माहिती पुरविण्याचे कार्य सध्यापेक्षा पुष्कळ मोठ्या प्रमाणात वाढविले पाहिजे आणि अधिक चांगल्या रीतीने संघटित केले पाहिजे. या कामासाठी राष्ट्रीय शिक्षण संशोधन व प्रशिक्षण मंडळात (NCERT) एक खास विभाग उघडावा व त्याला पुरेसा कर्मचारी वर्ग द्यावा म्हणजे मंत्रालयाचे हे कर्तव्य यथोचितपणे पार पडेल.

३०. शिक्षणातील वेगळ्या प्रकारच्या समस्यातील कोणत्या समस्यांचा अभ्यास निकडीचा आहे ते ठरविण्यासाठी आणि तो तडीला नेण्याचा कार्यक्रम ठरविण्यासाठी शिक्षण मंत्रालयाने एक विशेष समिती नेमावी.

३१. शैक्षणिक नियोजन, शैक्षणिक धोरणांचे निर्णय आणि शैक्षणिक कार्यक्रमाचे मूल्यमापन या उपक्रमासाठी अत्यावश्यक असलेले संख्याशास्त्राचे साह्य उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शिक्षण मंत्रालयाने अधिक जबाबदारी उचलली पाहिजे. ती योग्य तऱ्हेने पार पाडता यावी म्हणून शिक्षण मंत्रालयाने आपल्या संख्याशास्त्र विभागाची पुनर्घटना करावी आणि तो अधिक कार्यक्षम करावा. त्याप्रमाणेच राज्यपातळीवरील शिक्षण विभागातील सांख्यिक कक्ष सुधारण्याचे आणि अधिक कार्यक्षम करण्याचे काम हाती घ्यावे.

३२. केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळ (CABE) आणि मंडळाच्या स्थायी समित्या अधिक कार्यप्रवण ठराव्यात यासाठी उपाय योजण्यात यावेत.

## राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण मंडळ

३३. शालेय शिक्षणाच्या सुधारणेकरिता राष्ट्रीय पातळीवरून कार्य करणारी विशेषज्ञ यंत्रणा या भूमिकेतून वरील मंडळाचे (NCERT) कार्य संघटीत करावे. राष्ट्रीय शालेय शिक्षणमंडळ (National Board of School Education), राज्यसरकारचे शिक्षणविभाग आणि राज्य शिक्षणशास्त्र संस्थेसारख्या त्यांच्या विशेषज्ञ यंत्रणा, यांच्या साह्याने आणि सहकार्याने राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण मंडळाचे काम चालविण्यात यावे.

३४. वरील मंडळाच्या नियामक समितीवर देशांतील सर्व भागातून प्रतिनिधी घ्यावेत आणि त्यामधील बहुसंख्य प्रतिनिधी बिनसरकारी असावेत. नियामक समितीवर निदान एकतरी नामवंत माध्यमिक शिक्षक व प्राथमिक शिक्षक असावा.

३५. या मंडळासाठी पूर्णवेळ संचालक आणि सहसंचालक नेमण्यात यावेत. संचालकाची जागा एखाद्या विख्यात शिक्षण तज्ज्ञाला देण्यात यावी आणि त्याचा दर्जा विद्यापीठाच्या कुलगुरुच्या तोडीचा असावा. संचालकाच्या नियुक्तीचा कालावधी ५ वर्षांचा असावा आणि नोकरीचा काळ पुढे वाढवावयाचा झाल्यास कराराच्या मुदतवाढीची मर्यादा ५ वर्षांपेक्षा अधिक असू नये. संचालकांना प्रशासनाच्या दैनंदिन कामाचा भार वाहावा लागू नये म्हणून त्यांना साह्य करण्यासाठी सहसंचालकांची नियुक्ती व्हावी. सहसंचालकाची जागा शिक्षण मंत्रालयाकडून उसनवार घेतलेल्या अधिकाऱ्याने भरण्यास हरकत नसावी.

३६. सध्या मंडळाच्या देखरेखीखाली काम करणारी Central Institute of Education ही माध्यमिक शिक्षकांचे प्रशिक्षण करणारी संस्था दिल्ली विद्यापीठाकडे सोपविण्यात यावी.

३७. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशासन मंडळाचे अधिकारी आणि राज्य पातळीवरील शिक्षण विभागातील अधिकारी यांची नेहमी देवाणघेवाण करीत राहणे इष्ट होईल.

३८. वरील मंडळाच्या शैक्षणिक परिसराचा (Campus) विकास त्वरेने करण्यात यावा आणि मंडळाच्या इमारती पूर्ण करण्याला उच्च श्रेणीचे प्राथम्य द्यावे.

## राज्य पातळीवर शैक्षणिक प्रशासन

३९. वेगवेगळ्या शासकीय विभागातर्फे जे शैक्षणिक उपक्रम सध्या चालविण्यात येत आहेत त्यांचे एकसूत्रीकरण करण्यासाठी आणि त्यांच्या उद्दिष्टांबाबत आणि विकास योजनांबाबत एकच दृष्टिकोन ठेवता यावा यासाठी राज्यपातळीवर व्यवस्थित यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे. पुढे दिलेले दोन्ही उपाय अशी यंत्रणा घडविण्यासाठी उपयुक्त ठरू शकतील :--

(अ) राज्य पातळीवर कायद्याने नियुक्त केलेले शिक्षणमंडळ शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात यावे. या मंडळाच्या सदस्यात राज्यातील विद्यापीठांचे प्रतिनिधी, शिक्षणाच्या निरनिराळ्या शाखांचे व उपक्रमांचे संचालक, आणि काही नामांकित शिक्षणतज्ज्ञ यांचा समावेश करण्यात यावा शालेय शिक्षणाविषयी सर्व बाबतीत राज्य सरकारला सल्ला देणे, राज्यातील शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेणे, आणि यथायोग्य यंत्रणेच्या द्वारे शैक्षणिक कार्यक्रमांचे वेळोवेळ मूल्यमापन करणे ही मंडळाची प्रमुख कर्तव्ये राहतील. मंडळाचा वार्षिक अहवाल आणि पुढील कार्याबाबत त्याने दिलेल्या सूचना राज्यातील विधानसभेला प्रतिवर्षी सादर करण्यात याव्यात.

(ब) राज्यातील शिक्षणविभागाच्या वेगवेगळ्या शाखांची जबाबदारी ज्यांच्याबर सोपविलेली आहे अशा सर्व अधिकाऱ्यांची एक स्थायी समिती नेमण्यात यावी. राज्याचे शिक्षण-सचिव या समितीचे अध्यक्ष असावेत आणि तिच्या नियतकालिक बैठका घेण्यात याव्यात.

४०. भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयामध्ये ज्याप्रमाणे सचिव अणि सल्लागार हे हुद्दे एकत्रित करण्यात आलेले आहेत, त्याप्रमाणे राज्यपातळीवर देखील शिक्षण-सचिवाची जागा शासकीय सेवेतील व्यक्तीने भरण्याऐवजी तिच्यावर एखाद्या शिक्षण तज्ञाची नियुक्ती करणे अधिक उपयुक्त ठरेल. ही जागा अवधि-पद (Tenure Post) या प्रकारची असावी.

४१. शैक्षणिक प्रश्नांची चिकित्सा शासकिय आणि आर्थिक दृष्टीने करून सरकारने ठरविलेल्या ध्येय-धोरणाशी शैक्षणिक योजना सुसंगत राहतील अशी काळजी घेण्याचे कर्तव्य शैक्षणिक सचिवसमूहाकडून सर्व-साधारणपणे पार पाडण्यात येईल, ते पार पाडताना शिक्षण संचालनालयाच्या तांत्रिक दृष्टीकोनाला यथायोग्य प्राधान्य देण्यात यावे आणि शिक्षण संचालकांनी त्यांच्या विभागाचे प्रमुख या नात्याने परिणामकारक कार्य करावे यासाठी त्यांना मदत द्यावी.

## भारतीय शिक्षण सेवा-विभाग (IES)

४२. अध्यापन आणि संशोधन यांना आवश्यक असलेल्या सोयी उपलब्ध करून देणे हे भारतीय शिक्षण सेवा-विभागाचे कार्य असावे. या विभागातील कर्मचाऱ्यांना अध्यापनाचा अनुभव असावा आणि शैक्षणिक प्रशासकाने काही काळ अध्यापन करण्याची आणि अध्यापकाने प्रशासकीय काम करण्याची तरतूद करण्यात यावी. अशी अदलाबदल निदान अवधि-पद पद्धतीने (tenure assignment) करण्यात यावी.

४३. भारतीय शिक्षण सेवा-विभागामध्ये नेमणुका करण्याची पद्धती पुढीलप्रमाणे असावी : (अ) कनिष्ठ वेतनश्रेणीच्या पातळीवर (junior scale) फक्त १/३ कर्मचाऱ्यांना सरळ सेवाप्रवेश द्यावा. या निवडक व्यक्तींना देखील प्रशासनाचे काम ताबडतोब देण्यात येऊ नये. सेवा-प्रवेशानंतर २-३ वर्षे त्यांना अध्यापनाचे काम द्यावे आणि अशा पद्धतीने शैक्षणिक कार्याची दीक्षा मिळाल्यानंतरच त्यांना प्रशासकीय जबाबदारी देण्यात यावी; (ब) उरलेल्या २/३ जागांवर कर्मचाऱ्यांची नियुक्ती अंशतः सरळ सेवा-प्रवेशाने व अंशतः बढतीने व्हावी या नेमणूका ज्येष्ठ वेतन श्रेणी आणि उच्च वेतनश्रेणी असलेल्या जागांकरिता कराव्या. भारतीय शिक्षण सेवा-विभागातील काही जागा अवधि-पद प्रकारच्या ठेवून त्यामध्ये उत्कृष्ट अध्यापकांची नेमणूक विशिष्ट कालापुरती करण्यात यावी. याच पद्धतीने, भारतीय शिक्षण सेवा-विभागातील काही कर्मचाऱ्यांना अध्यापन आणि संशोधन करण्याची संधी द्यावी.

४४. भारतीय शिक्षण सेवा–विभागात अध्यापन कक्ष निर्माण करण्याची कल्पना सोडून द्यावी लागेल कारण तिच्या मार्गात अनेक अनुल्लंघनीय अडचणी आहेत. शिक्षण–सेवा विभागामध्ये, राज्यपातळीवर, फक्त शिक्षण संचालक, संचालनालयातील अधिकारी, जिल्हा शिक्षणाधिकारी आणि उच्च माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक या जागांचा समावेश करावा, केंद्र पातळीवर, शिक्षण मंत्रालयातील अधिकारी, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण मंडळातील अधिकारी, इतर मंत्रालयातील शैक्षणिक कार्य करणारे अधिकारी व केंद्रशासीत प्रदेशातील शिक्षणविभागांचे अधिकारी यांचा समावेश असावा.

४५. अध्यापन आणि संशोधन या व्यवसायातील बुद्धीमान कार्यकर्त्यांना प्रशासकीय हुद्याविषयी आर्थिक आकर्षण वाटू नये म्हणून भारतीय शिक्षण सेवा–विभागातील उच्च वेतनश्रेणी विद्यापीठे आणि महाविद्यालय यातील काही जागांना लागू करावी.

४६. भारतीय शिक्षण सेवा–विभागातील फक्त शेकडा ५० अधिकारी आपल्या स्वतःच्या राज्यांमध्ये नेमले जातील अशी प्रथा पाडावी. उरलेल्या अधिकाऱ्यांपैकी काही केंद्र पातळीवर आणि काही इतर राज्यामध्ये काम करतील. आंतरराज्य बदल्या करता याव्यात म्हणून सेवा-प्रवेशानंतर हिंदी व आणखी एक भारतीय भाषा ठरविलेल्या गुणवत्तेनुसार अभ्यासातून त्या दोन्हीत ठराविक कालावधित पास होण्याचे बंधन भारतीय शिक्षण सेवा–विभागाच्या प्रत्येक अधिकाऱ्यावर घालण्यात यावे.

## राज्य शिक्षण सेवा-विभाग (State Educational Service)

४७. राज्य शिक्षण सेवा-विभागामध्ये प्रथम श्रेणी (Class I) व द्वितीय श्रेणीच्या (Class II) पुरेश जागा असाव्यात. जिल्हा शिक्षण मंडळाचे सचिव हे प्रथम श्रेणीचे अधिकारी असावेत. जिल्हा शिक्षण पर्यवेक्षक हे भारतीय शिक्षण सेवा-विभागाचे अधिकारी असतील व राज्य शिक्षण सेवा विभागातील प्रथम आणि द्वितीय श्रेणीतील अधिकाऱ्यांच्या सहाय्याने ते काम करतील. राज्य शिक्षणसेवा-विभागाकडे बुद्धिमान कार्यकर्त्यांनी आकर्षित व्हावे यासाठी तीन वेगवेगळ्या पातळीवर सरळ सेवा–प्रवेश देण्यात यावा : उपशिक्षकांची पातळी; सेवा विभागातील द्वितीय श्रेणी (यामध्ये ५० टक्के नव्याने नेमणूका व ५० टक्के बढत्या असाव्यात); आणि सेवा विभागाची प्रथम श्रेणी (यामध्ये ७५ टक्के नव्या नेमणूका आणि २५ टक्के बढत्या असाव्यात).

४८. राज्य पातळीवरील जे वेगवेगळ्या विशेषज्ञतेचे अधिकारी यापुढे नेमणे आवश्यक आहे त्यांचे कार्य लक्षात घेऊन राज्यपातळीवरील शिक्षण विभागाची पुनर्रचना करणे हा सध्याची शिक्षण पद्धती सुधारण्याचा फार महत्त्वाचा भाग आहे. त्याबरोबरच, कार्यकर्त्यांची विशेषज्ञता वाढावी म्हणून त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था विद्यापीठांच्या मदतीने करणे हे देखील शिक्षण विभागाच्या पुनर्रचनेइतकेच निकडीचे व महत्त्वाचे आहे.

४९. शिक्षण विभागातील निरनिराळ्या कार्यकर्त्यांच्या वेतनश्रेणीमध्ये असणारा अहितकारक फरक कमी करणे आणि त्यांची अदलाबदल करण्याची अधिक शक्यता निर्माण करणे पुढील उपायांच्या मदतीने साधता येईल :

(अ) शिक्षण विभागातील प्रशासन कक्ष आणि अध्यापन कक्ष यामधील वेतनमान एकच ठेवावे, (ब) शिक्षण विभागातील कार्यकर्त्यांचे वेतनमान आणि विद्यापीठ अनुदान मंडळाने विद्यापीठातील अध्यापकाकरिता ठरवलेले वेतनमान यांची व्यवस्थित जोडणी करण्यात यावी.

## शैक्षणिक प्रशासकांचे प्रशिक्षण

५०. प्रशासन आणि पर्यवेक्षण करणाऱ्या सर्व अ-राजपत्रित अधिकाऱ्यांचे सेवान्तर्गत प्रशिक्षण करणाऱ्याची जबाबदारी राज्य शिक्षणशास्त्र संस्थेकडे सोपविण्यात यावी आणि आवश्यक तेथे विद्यापीठांची मदत घेऊन ही जबाबदारी शिक्षणशास्त्र संस्थेने पार पाडावी. याशिवाय, राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी परिषदा, चर्चासत्रे व कृतिसत्रे घेण्याची जबाबदारी देखील शिक्षणशास्त्र संस्थेनेच उचलावी.

५१. नोकरीच्या दर पाच वर्षांनंतर तीन महिन्यांची भरपगारी रजा प्रशासकांना देऊन विशेष अध्ययन करण्यासाठी त्यांना मदत करण्याची जी प्रथा पूर्वीच्या काळी अमलात होती तिचे पुनरुज्जीवन करणे अत्यावश्यक आहे.

५२. सेवान्तर्गत प्रशिक्षणाच्याद्वारे जे अधिकारी स्वतःची पात्रता विशेष वाढवितील त्यांना उत्तेजन म्हणून नोकरीमध्ये अधिक लाभ मिळवून देणे आवश्यक आहे.

## शैक्षणिक प्रशासकांसाठी राष्ट्रीय कर्मचारी–महाविद्यालय

## (National Staff College for Educational Administrators)

५३. शिक्षण मंत्रालयाने शैक्षणिक प्रशासकांसाठी राष्ट्रीय पातळीवर एक महाविद्यालय स्थापन करावे. या महाविद्यालयाला राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण मंडळाचा एक भाग मानण्यास हरकत नसावी. या महाविद्यालयाची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असावीत : (अ) भारतीय शिक्षण सेवा-विभाग आणि राज्य शिक्षण सेवा-विभाग या दोन्ही श्रेणीतील ज्येष्ठ अधिकाऱ्यांसाठी सेवान्तर्गत शिक्षणाचे अभ्यासक्रम राबविणे या अभ्यासक्रमाचे दोन प्रकार असावेत. ज्यांनी सरळ सेवा-प्रवेश केला असेल त्यांच्यासाठी दीर्घ मुदतीचा परिचयात्मक अभ्यासक्रम (Induction Course) आणि नोकरीत असणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी ३ ते ६ आठवड्याचा अल्प मुदतीचा अभ्यासक्रम; (ब) शैक्षणिक प्रशासनाच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी एक संशोधन कक्ष महाविद्यालयामध्ये असावा. राज्य पातळीवर आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये शैक्षणिक प्रशासनाच्या ज्या पद्धति व प्रथा अस्तित्वात असतील त्यांच्याविषयी सर्व संबंधितांना माहिती पुरविण्याचे काम महाविद्यालयाने आपल्या माहिती केंद्रातर्फे करावे; (क) प्रशिक्षणाला उपयुक्त पडणारी माहिती गोळा करणे हे महाविद्यालयाचे आरंभीचे काम राहील. अशा माहितीमध्ये निरनिराळ्या वस्तुस्थितीच्या खोलवर अभ्यासप्रकल्पांचा (Case Studies) समावेश असावा. याप्रकारचे काम करण्यासाठी महाविद्यालयाने आरंभीची एक-दोन वर्षे द्यावीत आणि अशा संपूर्ण तयारीनंतरच प्रशिक्षणाचा कार्यक्रम हाती घ्यावा; (ड) महाविद्यालयाने शैक्षणिक प्रशासनाविषयी नियतकालिका परिषदा, चर्चासत्र आणि कार्यसत्र भरवावीत; (इ) महाविद्यालयात एक प्रकाशन विभाग असावा व त्याचे शैक्षणिक प्रशासनाविषयी एक नियतकालिक प्रकाशित करावे.

## शिक्षण विभाग

५४. राज्य पातळीवरील बहुतेक शिक्षणविभागात कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत अपुरी असल्याचे आढळते. या अपुरेपणाची कारणे पुढीलप्रमाणे आहेत. शिक्षणविभागातील कर्मचाऱ्यांच्या संख्येतील वाढ शिक्षणसंस्था निर्माण करण्याच्या पूर्वी न घडता संस्था वाढल्यानंतर कार्यकर्त्यांच्या संख्यावाढीचा विचार होतो; अधिकाऱ्यांची संख्या वाढविण्याकरिता जे निकष ठरविलेले असतात ते प्रत्यक्ष व्यवहारात पाळले जात नाहीत; विभागीय कर्मचाऱ्यांच्या संख्यावाढीवर जो खर्च आवश्यक असतो त्याला आर्थिक अग्रक्रमाच्या यादीमध्ये सर्वात खालची जागा देण्यात येते. ही सध्याची धोरणे पूर्णपणे बदलण्याची आवश्यकता आहे; परंतु त्यात लक्षात ठेवण्याची गोष्ट म्हणजे खालच्या पातळीवर पुष्कळ अधिकारी नेमण्यापेक्षा चांगले वेतनमान देऊन वरच्या पातळीवरील अधिकाऱ्यांची संख्या वाढविणे कार्यक्षमतेच्या दृष्टीने अधिक फायदेशीर ठरते.

## कार्यपद्धती

५५. जुन्या कार्यपद्धती सध्याच्या घटकेला अर्थहीन ठरत असल्या तरीसुद्धा त्यांना चिकटून राहण्याची प्रवृत्ती शैक्षणिक प्रशासकांनी सोडून दिली पाहिजे आणि चिकित्सक वृत्ती व मनाचा मोकळेपणा हे नवे गुण त्यांनी अंगी बाणविले पाहिजेत.

५६. शासकीय कार्यपद्धतीमध्ये ज्या गोष्टी काही काळाने निरुपयोगी ठरतात त्या काढून टाकण्याच्या दृष्टीने दर तीन किंवा पाच वर्षांनी प्रशासकीय कार्यपद्धतीची फेरपहाणी करण्यात यावी आणि आवश्यक तेथे नव्या पद्धती अंगिकारण्या याव्यात.

५७. सर्व राज्यामध्ये आंतर-राज्य संपर्क वाढीला लावावा आणि निरनिराळ्या राज्यातील शैक्षणिक प्रशासनाच्या पद्धतीचा तौलनिक अभ्यास करण्याला उत्तेजन द्यावे. विशेषतः ज्या तौलनिक अभ्यास प्रकल्पामध्ये राज्य शिक्षण विभागाला सहभागी होता येईल असे नियतकालिक प्रकल्प घेण्यात यावे.

५८. शैक्षणिक नियोजनासाठी व नियोजित प्रकल्पांचे कार्यक्रम तपशीलवार आखण्याकरिता नवीन तंत्रे विकसित करण्याचे कार्य आणि या तंत्रांचे प्रशिक्षण संबंधित अधिकाऱ्यांना देण्याचे कार्य देखील राज्य शिक्षण शास्त्र संस्थांनी आणि राष्ट्रीय शैक्षणिक प्रशासकांच्या महाविद्यालयाने अंगिकारले पाहिजे.

५९. प्रशासनाच्या ज्या आधुनिक पद्धतीमध्ये प्रशासनाचे बहुतेक कार्य स्वतः अधिकारी करतात आणि ज्यामध्ये त्यांना थोड्याच कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे सहाय्य लागते, अशातली अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असलेली (officer-oriented) पद्धती आचरणात आणली पाहिजे.

### शैक्षणिक कायदे

६०. सर्व देशातील शिक्षणाला शिक्षणाच्या सर्व विभागांमध्ये कायद्याची बैठक दिली पाहिजे. सर्व राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये शैक्षणिक कायदे पास करण्यात यावेत. हा उपाय सर्वग्राही (comprehensive) पद्धतीचा असावा आणि त्याचा भर एकीकरणावर असावा. त्याच्या साहाय्याने सध्या अस्तित्वात असलेले किरकोळ कायदे रद्द करता यावेत आणि शैक्षणिक प्रशासनातील काही महत्वाच्या भागाकडे (उदाहरणार्थ: सहाय्यक अनुदान देण्याची पद्धती) कायद्याच्या दृष्टीने अधिक लक्ष देण्यात यावे. ज्या महत्वाच्या गोष्टी सध्या शासकीय आदेशाच्या आधाराने करण्यात येतात त्यांना कायद्याचा आधार देण्यात यावा.

६१. स्थानिक प्रशासन आणि राज्य सरकार यांना शैक्षणिक योजना तयार करण्यासाठी आणि त्या कार्यवाहीत आणण्यासाठी मार्गदर्शन व्हावे म्हणून भारत सरकारने राष्ट्राचे शैक्षणिक धोरण स्पष्ट करावे.

६२. राष्ट्रीय शैक्षणिक कायदा पास करण्याच्या शक्यतेचा विचार व्हावा.

## प्रकरण एकोणीसावे

# शिक्षणाची अर्थव्यवस्था

१. शिक्षणाचा यथायोग्य विकास/घडवावयाचा असेल तर शिक्षणावर सध्या (१९६५-६६) होत असलेला दरडोई १२ रुपये हा खर्च येत्या वीस वर्षात (१९८५-८६ पर्यंत), किंमती स्थिर राहतील असे मानून, दरडोई ५४ रुपये झाला पाहिजे. याचा अर्थ असा की १९५०-५१ मध्ये शिक्षणावर होणारा ११४ कोटी रुपयांचा खर्च १९६५–६६ पर्यंत ६०० कोटी झाला परंतु यापुढे तो १९८५–८६ पर्यंत ४,००० कोटी पेक्षा थोडा अधिक असणे आवश्यक ठरेल.

२. येत्या दोन किंवा तीन दशकांमध्ये शिक्षणावरील एकंदर खर्चापैकी २/३ वेगवेगळ्या शाखेतील शालेय शिक्षणावर आणि १/३ उच्च शिक्षणावर होईल असे सर्वसाधारणपणे आढळते. तरीदेखील, वेगवेगळ्या शैक्षणिक कार्यक्रमांवर जो भर द्यावा लागेल त्याचा प्रकार व क्षेत्र प्रत्येक दशकात वेगवेगळे राहील.

(अ) १९६५ ते १९७५ या दहा वर्षांच्या काळात शालेय स्तरावरील खर्च अधिक राहील. हा अधिक खर्च पुढील कारणामुळे येईल :—

(१) शिक्षकाचे वेतनमान वाढवावे लागेल ;

(२) विद्यापीठपूर्व वर्ग आणि Intermediate वर्ग महाविद्यालयातून काढून घेऊन शालेय स्तरात आणावा लागेल ;

(३) सर्व मुलांना कमीत कमी ५ वर्षांचे परिणामकारक प्राथमिक शिक्षण द्यावे लागेल ;

(४) माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायिकरण करावे लागेल ;

(ब) १९७५ ते १९८५ या काळात पुढील शैक्षणिक कार्यक्रमांवर भर द्यावा लागेल : सात वर्षांचे परिणामकारक प्राथमिक शिक्षण ; शालेय स्तरात एका अधिक वर्षाची मिळवणी ; आणि माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायिकरण. या दशकामध्ये उच्च शिक्षणावर भर देण्यास सुरुवात होईल.

(क) १९८५ नंतरच्या काळात उच्च शिक्षणाच्या विकासावर आणि संशोधनकार्यावर अधिक भर देण्यात येईल.

३. शिक्षणावर खर्च करण्याची बहुतेक जबाबदारी जरी शासकीय निधीतून घेण्यात आली तरी शिक्षणाच्या सर्व अर्थव्यवस्थेची जबाबदारी सरकारकडे सोपवून तिचे केंद्रीकरण करणे योग्य ठरणार नाही. यासाठी, स्थानिक जनता, खाजगी संस्था व संघटना, आणि स्थानिक प्रशासनयंत्रणा यांच्यावर शिक्षणाकरिता स्वत:चा निधी उभारण्याची थोडीफार जबाबदारी टाकण्यात आली पाहिजे.

४. शाळासुधार मोहीम हाती घेऊन शाळातील भौतिक सोयी व साधन यांचा पुरवठा करण्यासाठी स्थानिक जनतेला उद्युक्त केले पाहिजे.

५. जिल्हा शिक्षणमंडळाची आर्थिक सोय करून देण्याकरिता जिल्हापरिषदांनी जमीन महसूलावर कर बसवून शिक्षणासाठी निधी उभा करावा. या कराची किमान पातळी राज्य सरकारने ठरवून द्यावी आणि ती ठराविक मर्यादेपर्यंत जास्तीत जास्त वाढविण्याची मुभा जिल्हापरिषदांना असावी. स्थानिक निधी उभारण्यासाठी उत्तेजन म्हणून, ज्या जिल्हापरिषदांनी वरील पद्धतीने अधिक निधी गोळा केला असेल त्यांना जमविलेल्या निधीच्या प्रमाणात राज्य सरकारने सहाय्यक अनुदान द्यावे.

६. राज्य सरकारने जिल्हापरिषदांना द्यावयाच्या सहाय्यक अनुदानाची पद्धती पुढीलप्रमाणे सुधारण्यात यावी :—

(अ) सरकारने मंजूर केलेले शिक्षक, प्रशासक आणि पर्यवेक्षक यांचे पगार आणि भत्ते यावर १०० टक्के अनुदान देण्यात यावे. आवश्यक शिक्षकसंख्या आणि प्रशासक व पर्यवेक्षक यांची संख्या ठरवून देण्याकरिता असंदिग्ध निकष तयार करावेत.

(ब) शिक्षक-खर्चाव्यतिरिक्त इतर खर्चाची तरतूद करण्यासाठी, उपस्थित असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यामागे ठराविक ठोकबंद अनुदान देण्यात यावे. या अनुदानाचे प्रमाण निरनिराळ्या श्रेणीतल्या शाळांसाठी निरनिराळे ठरविण्यात यावे आणि दर तीन ते पाच वर्षांनी त्याची फेरपहाणी करावी.

(क) जिल्हापरिषदांनी उभारलेला स्थानिक निधी आणि त्यावर राज्य सरकारने दिलेले अनुदान जिल्हापरिषदांच्या ताब्यात ठेवावे व या सर्व निधीमधून शिक्षणाच्या विकासासाठी परिषदेला आवश्यक वाटणारा खर्च करता यावा.

(ड) अनावर्ती खर्चाकरिता वेगळे अनुदान देण्यात यावे आणि ते शक्यतो खर्चाच्या २/३ असावे.

७. राज्य सरकारने जिल्हा परिषदांना दिलेल्या अनुदानाची रक्कम परिषदेच्या निधीत मिसळण्याची परवानगी द्यावी आणि आर्थिक वर्षाअखेर अनुदानाची उरलेली रक्कम बुडू देऊ नये.

८. शिक्षणाच्या खर्चाचे काही प्रमाण स्वतः देण्याची जबाबदारी नगरपालिकांवर घालण्यात यावी. हा खर्च निभावण्यासाठी त्यांनी जमिनीवर आणि इमारतीवर कर बसवावा.

९. सरकारी अनुदान देताना नगरपालिकांचे वर्गीकरण त्यांच्या आर्थिक परिस्थितीनुसार वेगवेगळ्या गटात करावे आणि ज्यांची आर्थिक स्थिती निकृष्ट असेल त्यांना इतरांपेक्षा अधिक प्रमाणात अनुदान देण्यात यावे.

१०. आपापल्या कार्यक्षेत्रातील निदान प्राथमिक शिक्षणाचा तरी भार सोसण्याची जबाबदारी सर्व महानगर-पालिकांवर टाकण्यावर यावी. त्यांना देण्यात यावयाच्या सरकारी अनुदानाचे प्रमाण ठरविताना एकंदर खर्चातील विशिष्ट भाग महापालिका पत्करतील अशी दक्षता घ्यावी.

११. केंद्र सरकारने शिक्षणाच्या बाबतीत सध्यापेक्षा फार मोठी आर्थिक जबाबदारी घ्यावी. केंद्रीत योजनांचे आणि केंद्र पुरस्कारीत योजनांचे क्षेत्र सध्यापेक्षा पुष्कळच विस्तृत झाले पाहिजे. या कार्यक्रमाची लक्षण पुढीलप्रमाणे असावीत:—

(अ) राष्ट्रीय स्वरूप आणि अत्यंत महत्त्वाचे कार्यक्रम या क्षेत्रात समाविष्ट करावेत.

(ब) केंद्रीय सहाय्याने राबविण्याच्या पुरस्कारीत कार्यक्रमात प्रत्येक राज्यातील वेगवेगळ्या गरजांनुसार काही फेरफार करण्याची शक्यता असावी.

(क) केंद्र पुरस्कारीत कार्यक्रमांना केंद्र सरकारने द्यावयाच्या अनुदानाची मुदत कमीत कमी ५ वर्षे आणि काही बाबतीत १० वर्षे असावी. योजनेच्या काळापुरतीच मदत देण्याची सध्याची प्रथा पुढे चालवू नये.

१२. शिक्षणाकरिता जास्तीत जास्त साधनसंपत्ती जरी गोळा केली तरी आर्थिक अपव्यय करणारी आणि शिक्षणाची गतिमानता खुंटविणारी सध्याची पारंपरिक शैक्षणिक तंत्रे वापरणे सुरूच राहिले तर जमविलेल्या साधनसंपत्तीतून शैक्षणिक पुनर्रचनेच्या कमीत कमी गरजा भागविणे देखील शक्य होणार नाही. यासाठी, अपव्ययाचे निराकरण, काटकसरीची उपाययोजना आणि उपलब्ध असलेल्या निधीचा अत्यंत कार्यक्षमतेने वापर या गोष्टी अत्यावश्यक आहेत. कार्यक्षमतेला धोका न पोहचविता काटकसर साधण्यासाठी शक्य ते सर्व मार्ग अवलंबिण्यात यावेत.

१३. इतर काही देशात शैक्षणिक अर्थशास्त्रविषयी जे अभ्यास-प्रकल्प घेण्यात आले आहेत त्यातून आर्थिक विकासासाठी शिक्षणाच्या महत्त्वाचा निर्देश करण्यात आलेला आहे. भारतामध्ये अद्याप अशा तऱ्हेचे अभ्यास-प्रकल्प घेण्यात आलेले नाहीत. या विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन विद्यापीठ अनुदान मंडळाने काही विद्यापीठांना असे अभ्यास-प्रकल्प घण्यास उत्तेजन द्यावे

Sub. National Systems Unit,
National Institute of Educational
Planning and Aministration
17-B, Sri Aurbindo Marg, New Delhi-110016
DOC. No. 3321
Date 10/9/86

NIEPA DC
D03321